सूचनादाताओं की शैक्षणिक स्थिति और रेडिओ सुनने की प्रवृत्ति में सार्थक सम्बन्ध पाया गया निम्न शैक्षणिक स्तर के लोग ७३.१७ प्रतिशत नियमित रूप से रेडिओ सुनते है। ये सूचनादाता रेडिओ का प्रयोग नवीन ज्ञान प्राप्त करने और मनोरंजन के लिये करते है। मध्यम शिक्षा प्राप्त ६७.१४ प्रतिशत और उच्च शिक्षा प्राप्त ६६.६७ प्रतिशत सूचनादाता नियमित रूप से रेडिओं सुनते है।

**मुख्य अभिरूचि का रेडिओ कार्यक्रमः-**

रेडिओं कार्यक्रम में सूचनादाताओं की अभिरूचि का अध्ययन करते हुए उनसे यह पूछा गया है कि वे किस रेडिओ कार्यक्रम को अपेक्षाकृत अधिक रूचि से सुनते है। उनसे प्राप्त जानकारी निम्न तालिका में दर्शाया गया है।

तालिका संख्या १.३

सामाजिक परिर्वत्य और अभिरूचि का रेडिओ कार्यक्रम

| अ. क. | पर्याय | समाचार | फिल्म संगीत | लोकगीत | ग्रामीण कार्यक्रम | महिला कार्यक्रम | युवा कार्यक्रम | खेलकूद कार्यक्रम | अन्य | लागू नही | कुल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अशिक्षित | – | ८ | ५ | २ | ३ | – | – | – | – | १८ |
| | | – | (४४.४४) | (२७.७८) | (११.११) | (१६.६७) | – | – | – | – | (१००) |
| २ | निम्न शैक्षणिक स्तर | ६ | २० | १६ | १४ | ४ | ६ | ७ | ८ | १ | ८२ |
| | | (७.३२) | (२४.३९) | (१९.५१ | (१७.०७) | (४.८८) | (७.३२) | (८.५४) | (९.७६) | (१.२२) | (१००) |
| ३ | मध्यम शैक्षणिक स्तर | २९ | १५ | ५ | २० | – | – | – | – | १ | ७० |
| | | (४१.४) | (२१.४३) | (७.१४) | (२८.५७) | – | – | – | – | (१.४३) | (१००) |
| ४ | उच्च शैक्षणिक स्तर | १५ | ५ | – | – | – | ३ | ४ | २ | १ | ३० |
| | | (५०) | (१६.६७) | – | – | – | (१०) | (१३.३३) | (६.६७) | (३.३३) | (१००) |
| | कुल: | ५० | ४८ | २६ | ३६ | ७ | ९ | ११ | १० | ३ | २०० |
| | | (२५) | (२४) | (१३) | (१८) | (३.५० | (४.५०) | (५.५०) | (५.००) | (१.५०) | (१००) |

उपरोक्त तालिका संख्या १.३ से यह पता चलता है कि २५ प्रतिशत समाचार बुलेटिन, २४ प्रतिशत फिल्म संगीत, १३ प्रतिशत लोकगीत, १८ प्रतिशत ग्रामीण कार्यक्रम, ३.५ प्रतिशत महिला कार्यक्रम, ४.५ प्रतिशत युवा कार्यक्रम, ५.६ प्रतिशत खेलकूद कार्यक्रम तथा ५ प्रतिशत सूचनादाता किसी अन्य रेडिओ कार्यक्रम में अभिरूची रखते है। अतः स्पष्ट है कि सूचनादाताओं की अभिरूचि समाचार पत्र और ग्रामीण विकास कार्यक्रम जैसे जागरूकता वृध्दि के कार्यक्रम में या फिल्म संगीत और लोकगीत जैसे मनोरंजनात्मक कार्यक्रम में है। सूचनादाताओं द्वारा रेडिओ का प्रयोग जागरूकता वृध्दि और मनोरंजन दोनों ही प्रकार के कार्यो के लिये किया जाता है।

शिक्षा और रेडिओ कार्यक्रम में अभिरूचि का सहसम्बन्ध ज्ञात करते हुये ये विदित होता है कि समाचार सुनने की प्रवृत्ति उच्च शिक्षा प्राप्त सूचनादाता ५० प्रतिशत में तुलनात्मक रूप से अधिक पायी गयी। फिल्म संगीत सुनने की प्रवृत्ति अशिक्षित सूचनादाताओं में २७.७८ प्रतिशत अपेक्षाकृत सबसे अधिक पायी गयी।

लोकगीत सुनने की प्रवृत्ति भी अशिक्षित वर्ग २७.२८ प्रतिशत में अपेक्षाकृत अधिक है।

**टी.वी. की तुलना में रेडिओ का प्रभावः-** सूचनादाताओं से यह जानकारी प्राप्त की गयी कि ऐसा कहा जाता है कि रेडिओ का प्रभाव क्षेत्र अपेक्षाकृत अधिक व्यापक है। क्योंकि यह साधन अनपढ और दूरस्थ भौगोलिक तक अपना प्रभाव डालता है। क्या आप इस विचार से सहमत है। उनसे प्राप्त उत्तरों को निम्न तालिका में दर्शाया गया है।

तालिका संख्या १.४

उत्तरदाताओं का उक्त के गति विचार

| अ.क्र. | पर्याय | संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १. | सहमत | ११० | ५५ |
| २. | असहमत | ७० | ३५ |
| ३. | कह नही सकता | २० | १० |
| | कुलः | २०० | १०० |

उपयुक्त तालिका से स्पष्ट है कि ५५.०० प्रतिशत सूचनादाता इस विचार से सहमत हो कि टी.वी. की तुलना में रेडिओ का प्रभाव क्षेत्र अपेक्षाकृत अधिक व्यापक है। क्योंकि यह साधन दूरस्थ भौगोलिक क्षेत्र तक अपना प्रभाव डालता है। ३५.०० प्रतिशत सूचनादाता असहमत है, १०.०० प्रतिशत निरूत्तर पाये गये है।

**निष्कर्ष (सार)ः-** आधुनिक समाज में रेडिओं सूचना एंव सम्प्रेषण का अत्यंन्त प्रभावशाली साधन है। रेडिओं के द्वारा प्रकाशित कार्यक्रम एक विस्तृत भौगोलिक क्षेत्र में हुये शिक्षित और अशिक्षित दोनों ही प्रकार के व्यक्तिओं तक प्रसारित किये जा सकते है। रेडिओं बहुधा सरकारी नियंत्रण के अधीन होता है। अतः इसका प्रयोग एक सरकारी प्रचार साधन के रूप में करते हुये सरकारी नीतिओं कार्यक्रमों एवं राजनीतिक विचारधारा को पोषित करने का प्रयास किया जाता है। खेती किसानी से लेकर पशुपालन वानिकी, पर्यावरण, ग्रामोद्योग, उत्पाद विपणन, जनस्वास्थ्य, स्वच्छता, पेयजल, जल संरक्षण, सामुदायिक विकास जैसे तमाम ऐसे परिप्रेक्ष्य है जिन पर रेडिओं अन्य वार्ताओं से लेकर विशेष कार्यक्रमों तक के दौरान नाना प्रकार की जानकारियाँ अपने श्रोताओं को उपलब्ध कराता है। विभिन्न सरकारी योजनाओं द्वारा चलाई जा रही योजनाओं आदि के बारे में भी रेडिओं पर्याप्त मार्गदर्शन करता है।

रेडिओं सूचना-सम्प्रेषण का साधन मात्र ही नहीं है। वरना ये मनोरंजन का एक अत्यन्त लोकप्रिय साधन भी है। रेडिओं से प्रसारित होनेवाले फिल्मी गीत, लोकगीत, नाटक, प्रहसन तथा अन्य सांस्कृतिक कार्यक्रम सामान्य जन के मनोरंजन की आवश्यकता की पूर्ति करते है। खेल सम्बन्धी कार्यक्रम महिलाओं, बच्चों और युवकों के लिये कार्यक्रम मुख्य रूप से कृषि विकास कार्यक्रम ग्रामीण क्षेत्रों के विकास में महत्वपूर्ण योगदान दे रहे है।

आदिवासी समुदाय में रेडिओं/ट्रांजिस्टर का विशेष महत्व है। सामान्यतः नगर के समान मनोरंजन के अवसर आदिवासी क्षेत्र में उपलब्ध नहीं होते अतः रेडिओं एक ऐसा सरल और सुलभ साधन है जो ग्रामीण व्यक्ति के मनोरंजन की आवश्यकता की पूर्ति करता है। बिजली के अभाव में आदिवासी व्यक्ति की मनोरंजन की आवश्यकता को पूरा कर रहा है। रेडिओं आदिवासी क्षेत्र में बाह्या संसार से सम्पर्क का सुत्र बन गया है। समकालीन राजनीतिक परिवेश में विचारों के आदान-प्रदान के द्वारा रेडिओं आदिवासी व्यक्ति के राजनीतिक समाजीकरण का महत्वपूर्ण साधन भी बन गया है।


*संदर्भ ग्रंथः-*

१. *आगलावे प्रदीप, जुन १९९८; समाजशास्त्रीय संकल्पना आणि सिध्दान्त, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*
२. *डॉ.आगलावे प्रदीप; आदिवासी समाज, विद्या प्रकाशन, नागपूर*
३. *मुखर्जी रविंद्रनाथ, १९७२; सामाजिक सर्वेक्षण व शोध, सरस्वती सदन, दिल्ली*
४. *शर्मा एस.पी., कल्चरल ऑफ इंडियन ट्रायबल्स*
५. *श्रीनिवास एम.एन., २००२, आधुनिक भारत मे सामाजिक परीवर्तन, राजकमल प्रकाशन, दिल्ली.*
६. *Masani, Mehra 1985, Luthra, H.K. 1987, Kesavan, S-1970, Narayan Menon, V.K. 1963*
७. *Jacson, Sherri, L. 2010, Research Methods: A modular Approach, Wordsworth, Belmont*

# ताराबाई शिंदे प्रणीत स्त्रि–पुरूष समानता

***डॉ. नलिनी बोरकर,** समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेट्रोलपंप, जवाहरनगर, जि. भंडारा ९४२१२४०९९३*

**प्रस्तावनाः–** भारतातील पहिली स्त्रीवादी लोखिका ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री पुरूष तुलना' हे पुस्तक एकोणीसाव्या शतकातील महत्वाचे पुस्तक आहे. त्यांनी या पुस्तकात स्त्री–पुरूष सत्तासबंधातील असमतोलाचे विवरण केलेले आहे. या पुस्तकात स्त्रीला न्याय मिळवून देण्याची तळमळ स्पष्ट जाणवते. त्यांनी आपल्या पुस्तकाला ''स्त्री–पुरूष तुलना अथवा स्त्रिया व पुरूष यात साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध'' असे दोन मथळे दिले आहेत (लोटेः२०१७:१६१). या दुसऱ्या शिर्षकामधून स्त्री जातीला न्याय मिळवून देणे हा त्यांचा विचार व लेखनाचा हेतू असल्याचे स्पष्ट होते. स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडणारा प्रभावी, महत्वपूर्ण ग्रंथ दुसरा नाही. पुरूष समाजसुधारक म. ज्योतीबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, राजा राममोहन रॉय इत्यादींनी स्त्री जातीला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला असला तरी एक स्त्रीने असे धाडस करण्याचे हे पहिलेच उदाहरण आहे.

भारतीय समाजात स्त्रियांची दयनीय अवस्था होती. त्यांच्यावर स्त्रिधर्म लादलेला आहे. ताराबाई शिंदे स्त्री धर्माची व्याख्या करतांना म्हणतात ''स्त्री धर्म म्हणजे निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्याच्या मर्जीनुसार वागणे, त्याने लाथा मारल्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेवल्या तरी त्याची हसत मुखाने देवासारखी पूजा करावी'' (आगलावेः२०११:२०८). परंतू या व्याख्यावरून हे स्पष्ट होते की त्या काळातील स्त्रियांची कशी दननीय अवस्था होती. लिंगभेदाच्या विरूध्द ताराबाई शिंदेनी आपले विचार मांडलेत. स्त्री–पुरूषांची तुलना करून भारतीय समाजातील पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे तिचे कसे शोषण होते, याचे सविस्तर विश्लेषण केले. समाजात लिंगभेद करू नये, स्त्रिचे स्थान पुरूषापेक्षा दुय्यम आहे असे म्हणणे चुकीचे आहे. कायद्याच्या समोर सुध्दा स्त्रि–पुरूष असा भेद करू नये असे क्रांतीकारी विचार त्यांनी मांडलेत. भारतीय समाजव्यवस्थेने पुरूषप्रधान संस्कृतीने महिलांवर केलेल्या अन्यायावर भाष्य करतांना त्यांनी पुरूषी वर्तनाची मिमांसा केली आहे. पंडीता रमाबाई व ताराबाई शिंदे यांनी 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या शिर्षका अंतर्गत पुरूषांचे स्त्रीविषयीचे अनेक पूर्वग्रह कसे अनुदार, तर्कदृष्ट व अवास्तव आहेत हे संवादाद्वारे स्पष्ट केले आहे. त्याचे स्त्री जातीतील सामाजिक परवड, स्त्रीयांचे समाजातील दुय्यम स्थान, त्यांची केली जाणारी उपेक्षा, स्त्रीयांवरील विविध बंधने इत्यादी संदर्भात विशेष महत्वपूर्ण विचार आहेत. मे १८८१ च्या टाईम्स ऑफ इंडिया मध्ये विजयालक्ष्मी नावाच्या ब्राम्हण विधवा स्त्रीच्या व्यभिचारातून झालेल्या मुलीची हत्या केली आणि तिला झालेल्या फाशीच्या शिक्षेऐवजी जन्म ठेपेत रूपांतरीत झाली (पाटीलः२०१७:२३३). या घटनेमुळे सनातनी वृत्तपत्रांनी महिलांवर प्रचंड टिका केली. ते वाचल्याने ताराबाईचे मन खिन्न झाले. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. भारतीय समाजातील पुरूषवर्गाने स्त्रिवर कसे अनन्वीत अन्याय केलेत ते सांगण्याचा प्रयत्न केला. लिंगभेदावर कठोर प्रहार केला, भारतीय समाजातील पुरूष प्रधान संस्कृतीने स्त्रियांचे कसे शोषण चालविले आहे त्याचे सविस्तर वर्णन केले. ताराबाई शिंदे पुरूषांच्या दुटप्पी प्रवृत्तीचे वर्णन करतांना म्हणतात ''रोजच पुरूषांचे साहस, धाडस व दगाबाजीचे नित्य नवनवीन भयंकर उदाहरणे दिसूनही तिकडे कोणीच लक्ष देत नाही. केवळ स्त्रीयांवरच सर्व दोषाची गोणी लादतात''. त्या उपरोधाने पुरूष संस्कृतीला उपदेश देतांना म्हणतात की, ''तुम्हाला विधवा स्त्रीयांची कथा, गरीब कारागीर लोकांच्या मुळाबाळांचा कनवळा येऊन आपल्या देशाकडे पहिल्या सारखी नजर फिरवून आपापले धर्म आणि चालिरिती देश रिवाज सोडून न देता स्वदेशाभिमानी व्हावे व सर्व प्रकारे स्त्रीयांना दोषास पात्र ठरवून रसातळाला न घालण्याचे आव्हान म्हणून छोटासा निबंध तुमच्या समोर सादर केला आहे''. ताराबाई शिंदे यांनी स्पष्ट नमुद केले आहे की धर्म, ग्रंथ, देव, शास्त्र या सर्वांच्या आधारे पुरूष प्रधान संस्कृतीने स्त्रीयांना बंधनात अडकवून शिक्षणापासून वंचित ठेवले, विधवांच्या विवाहावर बंधन घातले. केशवपणाला प्रेरित केले, जबरदस्तीने सती जायला लावले, त्यांनी रूढी, परंपराच्या नावावर गुलाम बनविले. या अनिष्ट चालिरिती किती चुकीच्या आहेत याचे सुत्रबध्द वर्णन ताराबाईंनी केलेले आढळते.

**स्त्रिया आणि भारतीय पुरूषसत्ताक पध्दती :** भारतीय समाज पुरूषसत्ताक आहे पुरूषाला स्त्रिपेक्षा उच्च दर्जा आहे तर स्त्रिला कनिष्ठ दर्जा प्राप्त आहे.

प्राचीन काळापासून स्त्रिला उपभोग्य वस्तू मानून गुलामाप्रमाणे वागविले जाते. वेद, मनुस्मृती किंवा इतर हिंदू धर्मग्रंथात स्त्रियांना कनिष्ठ माणून तिला दासीचे स्थान दिले आहे. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरूष तुलना' या पुस्तकातून स्त्री पुरूषापेक्षा श्रेष्ठ असल्याचे मत मांडले आहे. स्त्री ही पुरूषापेक्षा अधिक सहनशिल, अल्पसंतुष्ट, पुरूषाच्या प्रेमाची भुकेली, प्रेमपूर्तीसाठी जिवन अर्पण करणारी असते. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात तिचे शोषण व दुर्दशा केली जाते. पुरूषांनी वाईट वागावे मात्र त्यांची विषारी फळे स्त्रिला चाखावी लागतात. तिच्या वाटयाला निंदा, नालस्ती, अपमान, शिक्षा आणि निराधारपण येते. स्त्रिपेक्षा पुरूषांमध्ये कित्येक दुर्गुण असतात. त्यांनी रामायण, महाभारत, पांडवप्रताप, रामविजय यांसारख्या हिंदू धर्म ग्रंथाचा अभ्यास करून आपले विचार मांडले आहेत. भारतीय धर्म ग्रंथातील सर्व परंपरा, रूढी, बंधने स्त्रियांच्या दुर्दशेस कारणीभूत आहेत म्हणून त्या म्हणतात ''हिंदू धर्म ग्रंथात त्यांना (पुरूषांनी) पशुप्रमाणे लिहून ठेवले आहे. परंतू आता निस्तरणे हे स्त्रियांच्या कपाळी आहे''. (आगलावेः२०१७:२२३). पुरूषसत्ताक पध्दतीचे टिकात्मक समीक्षण करण्यासाठी ताराबाई कुटुंब व्यवस्थेची बारकाईने परिक्षण करतात. पुरूषांना सर्वश्रेष्ठ, देवतुल्य मानायचे या परंपरेला आव्हान देऊन स्त्री-पुरूष समानता निर्माण करण्याची मागणी करतात. पुरूषाला श्रेष्ठ स्थान देणारी विचारसरणी त्यांनी मोडीत काढली पुरूष प्रधान, पुरूषी वर्चस्वाची ही केवळ दमनकारी यंत्रणा आहे. स्त्रिला तुच्छ मानने व अवहेलना करणे याचा ताराबाईंनी विरोध केला. स्त्रीच्या अधःपतनाला पुरूषच कारण आहे आणि त्याचा हा वाटा लक्षात घ्यावयास हवा अशी त्यांची मागणी आहे. पुरूष आणि स्त्री दोघांमध्ये पुरूषाला प्राधान्य देऊन स्त्रीला कनिष्ठ ठरविण्याचा कट उघड उघड सत्तासंबंधावर अधिष्ठित आहे, त्यामागे कोणतेही तर्कशास्त्र नाही असे स्पष्ट करीत ताराबाईंनी आपले लेखन कार्य केले आहे. त्यांनी आपल्या लेखांतून पुरूषांची ही दगाबाजी उघडी केली आहे. जे दुर्गुण स्त्रियामध्ये आहेत असे पुरूषांना वाटते. त्यांचे वस्तीस्थान पुरूषांमध्येच असल्याचे वर्णन त्या करतात. स्त्रिला गौण लेखण्यामध्ये पुरूषांचीच स्वतःला श्रेष्ट ठरविण्याची धडपड होती. पुरूषांचे श्रेष्ठत्व देवतुल्य वगैरे असल्याची समजूत ताराबाईंनी साफ खोडून काढली.

विवाह पध्दतीचे त्या बारकाईने विश्लेषण करतात. त्यांच्या मते, लग्न ही घटना स्त्रीच्या जीवनाला सर्वस्वी भिन्न वळण लावणारी असते. तिच्या भविष्याची सुंदर सुखात असते. लग्नाची समस्या तिच्या चिंतेचा विषय आहे. लग्नानंतरच्या काळात त्या मालिकेला शृंखलेचे स्परूप प्राप्त होते. लग्नामुळे पुरूषांवर कोणतेही दुष्परिणाम होत नव्हते परंतू स्त्रिला मात्र प्रसंगी 'पाठ सोलून' घ्यावी लागे. ताराबाईंनी विवाहप्रसंगी मुलीचे बाप कसे वागतात त्याचे चार तऱ्हेनी वर्णन केले आहे. त्यापैकी एक तऱ्हा अशी असते असे त्या म्हणतात, ''कित्येक बाप आपल्या नक्षत्रासारख्या दहा-अकरा वर्षाच्या मुलीला ऐंशी-नव्वद वर्षाच्या श्रीमंत म्हाताऱ्यास रूपयाची थैली घेऊन व त्याचे श्रीमंतीवर नजर ठेवून'' नवरा मेला तरी चिंता नाही. इला पैशाची तर काही कमी नाही ना? दोन दिवस खाईल, पिईल, नेसेल. एक नवरा नसला तर का चिंता? असे म्हणून वाघाला जशी बकरी द्यावी, त्या प्रमाणे बेधडक देतात'' (लोटेः२०१७:१६६).

स्त्रियांच्या हृदयामधील भावभावना ताराबाई सुक्ष्मपणे लिहितात विवाहाच्या पध्दतीमधील दोष दाखवितांना त्या म्हणतात, ''पुरूषांच्या बायका मेल्या तर पुरूषांनी सती कां जावू नये?'' परंतू स्त्रिच्या जिवनाचे काहीच महत्व नाही. पती मेला तर तीला सती जावे लागते. नवऱ्याची एक बायको जिवंत असूनही दूसरी केली जाते. प्रेम असे दोन, तीन जणांवर वाटून घेता येत नाही ते काही कोणते फळ नाही विधवेला पुर्नविवाह करण्यास बंदी आहे परंतू पुरूष पाचशे बायका सुध्दा करू शकतात. विधवा विवाहास परवानगी नाकारल्याने विधवांच्या अनेक समस्या निर्माण होतात. पुरूषसत्ताक कुंटुबपध्दतीमुळे स्त्री व पुरूष नाते परस्पर पुरक आहे. ही त्यांची धारणा आहे. परंतू व्यवहारात मात्र स्त्रिया पुरूष यांच्या समान दर्जाकडे दुर्लक्ष करून समाजात स्त्रियांच्या वाटयाला जे दुःखद जिवन येते ते पाहून त्यांचा जीवाचा तिळपापड होतो. हिंदू धर्मातील सर्व शास्त्रे पुरूषाच्या वर्तनाचे समर्थन तर करतातच परंतू स्त्रिच्या विरोधी सुध्दा आहेत असा आक्षेप त्या घेतात. शास्त्रावर आधारीत सर्व परंपरा व प्रघात स्त्री जातीच्या दुःखाचे कारण बनतात. इतिहास पालटने आणि स्त्रीला सन्मान व प्रतिष्ठा लाभावी यासाठी प्रयत्न करणे यामधूनच ताराबाईंच्या स्वतंत्र विचारांची स्पष्टोक्ती होते.

**स्त्रीचे महत्वाचे स्थान** : आपली सृष्टी विविध सुंदर वस्तूंनी भरलेली आहे. अनेक सुंदर फुले व वेली आपले लक्ष वेधून घेतात. अनेक सुंदर देखावे आपले चित्त विचलीत करतात. त्याचप्रमाणे सुंदर स्त्री व संपत्ती या दोन्ही गोष्टी मन वेधून घेणाऱ्या आहेत. संपत्ती पेक्षाही कधी कधी स्त्री सुंदर व सुख देणारी

वाटते. तुमचा मोठा महाल आहे. अनेक गाडया आहेत. ऐशआरामाच्या सर्व वस्तू आहेत सर्व प्रकारची सुखे पाणी भरीत आहेत. एवढी सघनता असूनही जर स्त्री नसेल तर तुमच्या सुखाला अर्थ उरत नाही. तुमचे उंच महाल भकास वाटतील, गाद्यागिरद्या चितेसमान वाटते, मित्र, स्नेही, सेवक, पंचपक्वान, अलंकार, लिंबाचे गोळे सर्प वाटतात. अशावेळी प्रत्यक्ष देव आला तरी तुम्ही त्याला हाकलून लावाल असे विचार ताराबाई व्यक्त करतात. स्त्रिशिवाय पुरूषाला सुख नाही, स्त्रिशिवाय पुरूषाच्या जीवनाला पुर्णत्व नाही म्हणून पुरूष स्त्री शिवाय राहू शकत नाही. तसेच पुरूषांशिवाय स्त्रियांच्या जिवनाला अर्थ राहत नाही. पुरूषांशिवाय स्त्रियांच्या जिवनाला अर्थ राहत नाही. पुरूषांशिवाय स्त्रिया सुखी राहू शकत नाही म्हणून त्या लिहितात की पुरूषाविरहित स्त्रियास तरी कसे सुख होईल बरे? जी तुमची दशा तीच तीची. तिलाही किती मोठया ऐश आरामात सर्व पृथ्वीचे सार्वभौमत्व दोन एकरी ठेवा म्हणजे पहा तिची कशी दशा होते?'' (आगलावेः२०१७:२१४). अशाप्रकारे स्त्रिचे महत्व ताराबाई शिंदे अधोरेखीत करतात. स्त्री-पुरूष समानतेचा त्या पुरस्कार करतात. स्त्री ही पुरूषांपेक्षा कनिष्ठ नाही असा विचार त्या मांडतात.

स्त्री पुरूषाला आपल्या जिवनाचा आधारस्तंभ मानते. ती त्याची काळजी घेते. त्याच्यावर अधिक प्रेम करते. पतीच्या आईने त्याला सांभाळले नसेल एवढी ती त्याला जपते. पुरूषाच्या जिवनात स्त्रिचे कीती महत्व आहे. पतीची आज्ञा पाळते. त्याच्या अब्रुस नुकसान होवू नये म्हणून ती अतिशय काळजी घेते. ती सतत पतीच्या सेवेत असते. सुख दुःखात ती खंबीरपणे उभी राहते. त्याच्या आनंदात आनंद व दुःखात दुःख मानते. ज्यामुळे तीचा पती सुखी होईल ते सर्व करण्यास ती तयार असते. स्त्री मुळे पुरूषांचे जिवन सार्थक आहे. स्त्रियांमुळे समाजाचे अस्तित्व टिकून आहे असे मत त्या मांडतात.

**स्त्रियावरील आरोप खोटे** : मनुस्मृती मध्ये स्त्रियांना स्वातंत्र्य देवू नये तर त्यांनी नेहमी पुरूषांच्या गुलामीत राहावे असे नमुद केले आहे. कुमारी अवस्थेत पिता, तरूण अवस्थेत पती आणि म्हातारपणी पुत्राने स्त्रिचे रक्षण करावे. स्त्रीला स्वातंत्र्य देवू नये. तीने जे काही करावयाचे ते पती आज्ञाप्रमाणेच असे म्हटले आहे. मनुने स्त्रियांना दुराचारी, व्यभिचारी, दूर्गुणी, सुखलोलूप असे म्हटले. स्त्रियांकरीता विवाह हा एकच संस्कार मानला आहे. काया, वाचा मनाने पतीसेवा करणे, त्याच्या विरूध्द न जाणारी स्त्री स्वर्गात जाते, साध्वी होते. असे मनूचे म्हणणे आहे. अशा प्रकारचे आरोप स्त्रियांवर लावले आहेत त्यांचे खंडन करतांना ताराबाई म्हणतात ''स्त्रियांना दोषी ठरविणारे पुरूष हे स्वतः किती अपराधी आहेत ते शोधून पहावे? त्यांच्या वागण्यामुळे किती अनर्थ घडून येतात याचा अभ्यासही करावा. ताराबाई पुरूषांना म्हणतात की, तुमचे देव देखील दगाबाज आहेत, कारण त्यांनी पाहिले होते की देव, धर्म यांच्या नावावर स्त्रियांना पुरूषांच्या तुलनेत कनिष्ठ व गुलाम समजले जाते. ताराबाईच्या मते स्त्रियांना बदनाम करणारी ही सर्व यंत्रणा असते. स्त्रियांवरच वेगवेगळे दोष लावले जातात. स्त्रिया प्रमाणे पुरूष स्वतःला कधी दोषी समजतात का? असा प्रश्न ताराबाई उपस्थित करतात. असे प्रश्न सुध्दा एक स्त्री समाजात निर्माण करू शकत नाही ही शोकांतीकाच आहे. स्त्रियांवरील पुढील प्रकारच्या अरोपांना त्या खोडून काढतात आणि त्यांचे खंडन करतात.

१) **स्त्री रूप यंत्रामध्ये जगणं मरणापेक्षा बलिष्ठता** : स्त्री मध्ये जगणं मरणापेक्षा बलिष्ठता आहे. तिच्यापेक्षा रूप यंत्रामध्ये पुरूषापेक्षा जास्त बलिष्ठता आहे. तिच्यापेक्षा बुध्दीच्या मानाने तुम्ही जास्त बलिष्ठ आहात! तुमच्या बुध्दीबळाने तुम्ही काय नाही केले बरे? जे आधारीत ते करून दाखविले. तुम्ही जे महापराक्रम केले तिथे स्त्री जातीची बलिष्ठता किती? 'शुन्य आहे' किंवा 'काहीच नाही' असे उत्तर त्या या प्रश्नाचे देतात.

२) **स्त्रियांमध्ये संशयप्रवृत्ती** : स्त्रिया अनेक संशयाचा परिभ्रम भोवरा आहे हे खरे आहे कारण त्या अशिक्षित असल्याने प्रत्येक प्रकारचे संशय त्यांच्या मनात येतात. त्यांचा संशय त्यांच्या संबंधापूरताच असतो परंतू पुरूषांची मने अनेक प्रकारची देशी-परदेशी, मानसिक व्यवहार, दगाबाजीने अगदी संभ्रमीत असतात. जगातील सर्व स्त्रिया सुर्यप्रकाशाएवढया प्रखर, सतेज, अंर्तबाहय निर्मल आहेत असे मुळीच नाही. पृथ्वीवरील सर्व स्त्रियांना एकत्र केले तरी त्या संशयाच्या केवळ दहा टक्केच असतील.

३) **स्त्रिया उध्दटतेचे केवळ गृहच** : स्त्रियावर प्रस्तुत आरोप केला जातो की, स्त्रिया उध्दटतेचे घर आहेत जणु या प्रश्नाचे उत्तर देतांना ताराबाई म्हणतात मग पुरूष काय कमी आहेत काय? पुरूषाचे पारडे शंभर दिडशे तोडयाने जडच होईल. स्त्रियांवरील या आरोपाची त्या खंडन करतात.

४) **स्त्रिया अविचारी** : स्त्रिया अविचाराचे नगरच आहेत असा आरोप स्त्रियांवर केला जातो. त्यावर ताराबाई म्हणतात की, स्त्रियांच्या हातून अविचार

घडतात आणि पुरूषांच्या हातून अविचार घडत नाही कां? तुम्ही पाजी, बेईमान, भरवंसा देवून केसांनी गळा कापणारे पुरूष आहेत. पुरूषांच्या हातून कधीच अविचार होत नाही का? पुढे त्या उपरोधिकपणे म्हणतात पुरूष म्हणजे अगदी विचारमंदिरे, पुरूषांनो शाबास, पुरूष शहाणे आणि विचारी असून देखील त्यांच्या हातून भूतकाळ आणि भविष्यकाळात कधी न होणारे असे अविचार रोज घडून येत असतांना देखील ते स्वतःला विचारी म्हणवतात.

५) **स्त्रिया सकल दोषांचे निधान** : या आरोपाबाबत आपले विचार व्यक्त करतांना ताराबाई म्हणतात सर्व दोषांचे निदान प्रथम पुरूषच आहेत. स्त्रियांना दोषपात्र समजण्यास पुरूषच कारणीभूत आहेत. त्यांच्या मते अनेक बाप आपल्या दहा अकरा वर्षाच्या मुलीचे लग्न नव्वद वर्षाच्या श्रीमंत म्हाताऱ्याशी लावून देतात. ताराबाई पुरूषांना सर्व दोषांचे निदान मानतात.

६) **स्त्रिया कपटी असतात** : स्त्रिया शतशः कपटानी व्यापलेल्या असतात या आरोपाचे खंडन करतांना त्या म्हणतात कपटीपणामध्ये तर पहिला क्रमांक पुरूषांचा लागतो. त्याचा पावलोपावली अनुभव येतो. पुरूष विभिन्न सोंग करण्यात पटाईत. गोसावी, फकीर, साधू, भारती, नानक, जटाधारी, लफंगे बनून सर्व जगात पुरूषच फिरतात.

७) **स्त्रिया दुगुणांचे उत्पत्ती स्थान** : या आरोपाच्या संदर्भात ताराबाई म्हणतात की, दुर्गुनांची उत्पत्ती पुरूषांपासूनच झाली आहे. प्रथम स्वधर्म सोडून मन मानेल तसे वर्तन करणे, दारू पिवून रस्त्यात लोळणे, पोरींचे तमाशे पाहत फिरणे, जूवा खेळणे, दारू पिणे, गांजा ओढणे, रांडा ठेवणे इत्यादी घाणेरडे आचरण पुरूषच करतात. रांडा या पुरूषांची फसवणुक करून घराबाहेर काढलेल्या स्त्रिया असतात. स्त्रियांना दुर्गुणास भाग पुरूषच पाडतात.

८) **स्त्रिया यम नगरीचे व्दार** : स्त्रिया स्वर्ग मार्गाचा नाश करणारे यम नगरीचे व्दारच आहेत. स्त्रियावरील आरोपाचे खंडन करतांना ताराबाई म्हणतात की, पुरूष स्त्रियांचा उल्लेख यम नगरीचे व्दार असे करतात. परंतू या स्त्रिया म्हणजे कोण आहेत. पुरूषांनी ज्यांच्यापोटी जन्म घेतला, ज्यांनी नऊ महिने पुरूषांना उदरात ठेवले. स्वतःच्या प्राणापेक्षाही बाळाला जपले. तुमच्या बहिणी, आई, पत्नी तुमच्यावर ऐवढे प्रेम करणाऱ्या स्त्रिया यम नगरीचे व्दार कसे असू शकेल. असा प्रश्न त्या उपस्थित करतात. अजून दुसऱ्या कोणत्याच स्त्रिया नाहीत, स्त्रिया म्हटल्या की सर्व स्त्रियाच आल्या आहेत. जेंव्हा पुरूष हे त्यांना काय सर्व कपटाचे पात्रच आहेत असे स्वर्ग नाश करणारी अशी संबोंधने देतात ते अयोग्य आहे.

**निष्कर्ष** : स्त्री अधिक श्रेष्ठ आहे. ती एक शक्ती आहे. प्रत्येक पुरूषाचा जन्म स्त्रिच्याच उदरातून झालेला आहे. स्त्रीशिवाय पुरूषाच्या जिवनाला अर्थ नाही म्हणून स्त्रिचे महत्व अनन्यसाधारण आहे. ''स्त्री जाती एक प्रती शक्तीच आहे. तिच्या वाचून तुम्हाला शोभा, मोठेपण, जय नाहीच. दूर कशाला ज्या घरात ती नाही ते घर केवळ स्मशानासारखे ओसाड दिसते. मग तो एक मोठा सर्व संपत्तीने भरलेला वाडा कां असेना त्याला तीच कळा. पण जेथे ती वास करील ती मोडकी तीन वाशाची झोपडी जरी असली तरी एक मोठे शोभिवंत घवघवीत मंदिरच दिसेल याकरिताच स्त्रियांना लक्ष्मी असे म्हणतात. असे मत त्या व्यक्त करतात. स्त्री-पुरूष तुलना पुस्तकात ताराबाईंनी स्त्री-पुरूषांची तुलना करून पुरूषांच्या दुर्गुणांचे सविस्तर विवेचन केले आहे. स्त्रियांच्या दुर्गुनांना मोठे करून सांगतांना आपले दुर्गुण पुरूष लपवितात. त्या पुरूषांना सदाचाराचा सामना देतात. त्यांनी आपली वागणूक जर विवेकवान ठेवली आणि आपल्या मर्यादा कामविकारावर जर नियंत्रण मिळविले तर घरोघरी असणाऱ्या स्त्रिया आपोआप पतिव्रता होतील व आंनदाने आचरण करतील, सर्व घरे सुखी होतील असे त्या म्हणतात. त्यांनी आपल्या विचारांनी समाजाला जागृत करण्याचे महत्वाचे कार्य केले.

*संदर्भ :*

1. *मूलभूत समाजशास्त्रीय विचार पाश्चात्य आणि भारतीय, डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. सरोज आगलावे, २०१७, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*
2. *भारतीय समाजशास्त्रीय परंपरा, रा.ज. लोटे, २०१७, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.*
3. *पाश्चात्य आणि भारतीय समाजशास्त्रीय विचार परंपरा, डॉ. प्रमोद पाटील, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर.*

# गलिच्छवस्तीतील किशोरवयीन मुली व आरोग्य

***डॉ. साधना विजय लांजेवार,*** *सहयोगी प्राध्यापिका, समाजशास्त्र विभाग, हिस्लॉप महाविद्यालय, नागपूर*

*सारांश :- व्यक्तीच्या सामाजिकरणात किशोरावस्था हा सर्वात महत्वाचा कालखंड असतो. विशेषतः मुलींच्या बाबतीत हा महत्वाचा काळ असतो. तीची शारिरीक आणि मानसिक अवस्था गोंधळलेली असते. भावनांचा गोंधळ असतो. त्यातच गलिच्छ वस्त्यांमध्ये त्यांची परिस्थिती फारच बिकट असते. सभोवतालच्या वातावरणाचा, शेजारचा, कुटूंब सदस्यांचा त्यांच्यावर प्रभाव पडत असतो. या गोंधळलेल्या कालखंडात ती स्वतः स्वस्थ आरोग्यापासून वंचित राहते. लिंग विभेदना मुळे म्हणा किंवा आई वडिलांचे दुर्लक्ष आणि ती स्वतः सुध्दा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्षीत असते त्यामुळे तीला अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. या सर्वाचा विपरित परिणाम तीच्या आरोग्यावर पडतो आणि स्वास्थ विषयक अनेक समस्यांना तीला सामोरे जावे लागते. अशा किशोरवयीन मुलींच्या आरोग्यविषयक समस्यांचा आढावा सदर शोधनिबंधात घेण्यात आला आहे.  मुख्य शब्द : गलिच्छ वस्ती, किशोरवयीन मुली, आरोग्य.*

**प्रस्तावना** :- किशोरवयीन मुलींच्या संदर्भात आरोग्याचा विचार करतांना त्यांच्या सामाजिकरणाच्या प्रक्रियेत त्यांचा आहार, निसर्ग, सामाजिक, आर्थिक परिस्थिती, शिक्षण, क्रिडा हे पैलू आरोग्याच्या दृष्टीने अतिमहत्वाचे असलेले दिसतात आणि आरोग्य संपन्न सामाजिक जीवन जगणे हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क असून आरोग्य संपन्न जीवन जगण्यासाठी योग्य परिस्थीती निर्माण करणे ही प्रत्येक समाजाच्या राज्यसंस्थेचा घटक म्हणून सरकारची जबाबदारी असते. पण काही वेळेला हे चित्र अगदी वेगळे दिसते. अयोग्य सामाजीकरणाच्या अभावी आणि योग्य परिस्थिती अभावी ‘आरोग्य‘ या पैलूकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते. त्यातच गलिच्छ वस्त्यांत ही परिस्थिती फारच बिकट दिसते. या वस्त्या म्हणजे सामाजिक समस्येचे केंद्र आहेत. तेथे स्वच्छतेचा अभाव, हवेशीर घरांचा अभाव, सांडपाणी वाहून न जाण्याची व्यवस्था त्यामुळे या वस्त्यातून कॉलरा, मलेरिया, काविळ, त्वचारोग, गर्मीक्षय कुपोषणाचा प्रश्न बिकट झाला आहे. या सर्वाचा एक मोठा प्रभाव किशोरवयीन मुलींवर होतांना आढळतो. अयोग्य सामाजिकरणाच्या अभावी त्यांच्या जीवन प्रतिमानात बरेच वैफल्य, उदासिनता, असुरक्षीतता आढळून येते. त्यांच्या आरोग्याच्या तक्रारीपण बऱ्याच प्रमाणात दिसून येतात. तेथील वातावरणाचा किशोरवयीन मुलींच्या आरोग्यावर विपरित परिणाम आढळतो. याचाच आढावा घेण्यासाठी प्रस्तूत संशोधन लेखाची मांडणी करण्यात आली.

सामाजीकरणाच्या संदर्भात समाजात व्यक्तीने जीवन कसे जगावे या संबंधीचे निकष सर्वसाधारण सामाजिक संस्था ठरवतात. या निकषापैकी एक निकष आहे ‘‘आरोग्य‘‘ आरोग्याचा संबंध व्यक्तीचे शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य, आहार, निसर्ग, क्रिडा, काम, शिक्षण, उपचार, आर्थिक परिस्थिती व समाजव्यवस्था यांच्याशी असतो.

जागतिक आरोग्य संघटना ˘;भ्क्ष जगातील सर्व लोकांच्या आरोग्याची काळजी घेणारी एक संघटना असून या संघटनेतर्फे आरोग्य संकल्पनेची सर्व व्यापक अशी व्याख्या इ.स. १९४८ मध्ये केली असून त्याच वेळी जगातील ४४ राष्ट्रांनी या व्याख्येस मान्यता दिली. ‘आरोग्य म्हणजे शरीराची आणि मानवी सामाजिक प्राणी या नात्याने एक परिपुर्ण अवस्था असते. टी. एम. डक च्या मते आरोग्य या संज्ञेचा अर्थ व्यक्तीनुरुप व गटा नुरुप स्थळ आणि काळ तसेच सामाजिक संदर्भानुसार वेगवेगळा असतो सकारात्मक दृष्टीकोनातून आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक सुस्थित अवस्था होय. नकारात्मक दृष्टीकोनातून आरोग्य म्हणजे रोगांचा अभाव आणि आजारीपणाचा अभाव होय. एकूणच मानवी शरीराची मनाची व समाजाची सुस्थिती म्हणजेच रोगमुक्त अवस्था म्हणजे आरोग्य होय. अर्थात ही अवस्था शक्तीच्या सामाजिक सांस्कृतिक परिस्थीतीवर आधारित असते.

किशोरावस्था म्हणजे लैगिंकदृष्टया परिपक्व झालेले वय होय. किशोरावस्था म्हणजे व्यक्तीच्या शारीरिक, भावनिक, मानसिक आणि सामाजिक अशा सर्वागीण परिपक्वतेचा काळ मानला जातो. (जोशी २००८:१४) चौदा वर्ष वयाचा हा काळ मुलींच्या दृष्टीने अधिक महत्वाचा असतो. या सुमारास मुलींमध्ये स्त्रिची वैशिष्टये निर्माण झालेली असतात. या वयात मुलींमध्ये अनेक शारिरीक बदल घडून येतात. मुलींचे खांदे खाली येतात. विशेषतः त्यांच्या उंचीत होणारा बदल नजरेत भरण्यासारखा असतो. कटिभाग रुंदावतो,

वक्षस्थळांना देखील एक प्रकारची गोलाई येते. या अवस्थेत शरीरातील अंतःस्त्राव ग्रंथीचे कार्य वेगाने सुरु होते. चेहऱ्यावर पुरळ येवू लागतात. मुलींना मासिक पाळी सुरु होत असल्यामुळे त्या गोंधळून व भांबावून जातात (जगतापः२००८:१०२) मुलींच्या आरोग्याबाबत निर्माण होणारी ही परिस्थिती अतिशय संकुचित दृष्टीने विचारात घेतली जाते. अस्वास्थ शारिरीक, सामाजिक स्थितीत राहणाऱ्या आर्थिक दुर्बल व गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या मुलींना अशा अनेक आरोग्य समस्यांचा सामना करावा लागतो. कंवर यांच्या मते, किशोरवयीन मुलींमध्ये रोग प्रतिकार शक्तीचा अभाव दिसतो. त्यांच्यात सतत आजारपण, ताप, सर्दी, खोकला, डोकेदुखी, थकवा, पाळीचा त्रास, कमजोर दृष्टी या गोष्टी सर्रास दिसतात. याचे कारण अयोग्य, चुकीचा किंवा कमी आहार होय. मुली वा स्त्रींयाच्या आरोग्याबाबत निर्माण होणारी ही परिस्थीती अतिशय संकुचीत दृष्टीने विचारात घेतली जाते. अस्वास्थ, शारिरीक सामाजिक स्थितीत राहणाचा आर्थिक दुर्बल व गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या मुलींना तर अशा अनेक आरोग्य समस्याचा सामना करावा यासाठी त्यांना नियमित आरोग्यांची तपासणी करणे आवश्यक ठरते. पुढील द्विपद सारणीत गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या किशोरवयीन मुलींच्या संदर्भात त्यांची आरोग्य तपासणी व त्यांना होणारे शारीरिक त्रास यांचा सहसंबंध दर्शविला आहे.

उत्तरदात्यांची आरोग्य तपासणी व शारिरीक समस्यांचा सहसंबंध दर्शविणारी सारणी

| आरोग्य तपासणी | शारिरीक त्रास | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | एकूण |
| नियमित | १<br>२.०३ | ०७<br>०६.६३ | ०५<br>७.८६ | १५<br>१४.५१ | ०१<br>१.०२ | १५<br>१२.४८ | १०<br>६.३६ | ०२<br>१.७८ | ५६<br>(२५.४५) |
| अनियमित | ०५<br>३.५३ | २५<br>१७.२० | १७<br>१३.६७ | १८<br>२५.१३ | ०२<br>१.७६ | १६<br>२१.६१ | ०८<br>११.०२ | ०३<br>३.०६ | ६७<br>(४४.०६) |
| अजिबात नाही | ०२<br>२.४४ | ०७<br>११.८८ | ०६<br>६.४४ | २४<br>१७.३६ | ०१<br>१.२२ | १५<br>१४.६२ | ०७<br>७.६१ | ०२<br>२.१३ | ६७<br>(३०.४६) |
| एकूण | ०८ | ३६ | ३१ | ५७ | ०४ | ४६ | २५ | ०७ | २२० |

(Figures in the parentheses are the expected values)

Chi Square=17.96, Table Value of Chi Square=23.68, d.f.=14, N=220, Contigency Coeff.=0.27, $p<0.05$

वरील द्विपद सारणीत स्वतंत्र चलामध्ये उत्तर दात्याची नियमित आरोग्य तपासणी, अनियमित तपासणी व अजिबात नाही असे पर्याय दिले होते तर अवलंबित चलांमध्ये किशोरवयीन मुलींना होणारे शारिरीक त्रास हया चलामध्ये कंबर व पाय दुखणे, हातापायाला गोळे येणे, डोके दुखणे, भुक न लागणे, पोट साफ न होणे, चीडचीड होणे, अंगावर पांढरे जाणे (Ceucorea) व इतर त्रास असे पर्याय दिलेले होते.

वरील सारणीत गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्याची अनियमित तपासणी बाबत धक्कादायक तथ्य दिसून आले सुमारे ४४.०६ प्रतिशत मुली या वर्गवारीत असल्याचे दिसून आले त्या खालोखाल ३०.४६ प्रतिशत मुली अजिबातच आरोग्य सेवाचा लाभ घेत नाहीत. सुमारे २५.४५ प्रतिशत मुली मात्र आरोग्याची तपासणी करतात.

गलिच्छ वस्तीतील आरोग्याच्या अनेक समस्यामध्ये सार्वत्रिक आजारामध्ये अनेक संसर्गजन्य रोगांचा समावेश होतो ज्यात काविळ, कॉलरा, टी.बी. अशा रोगाचा प्रामुख्याने समावेश होतो. याशिवाय डायरिया, मलेरिया, न्युमोनिया हे सुध्दा गलिच्छ वातावरणामध्ये प्रभावी असतात.

वरील सर्व आजारांचा परिणाम किशोरवयीन मुलींच्या व्यक्तिगत प्रकृतीवर अतिशय परिणाम करणारा दिसतो. घरची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखिची असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या आहारावर झाल्याने भुक न लागणे सतत अस्वास्थाचा अनुभव त्यांना घ्यावा लागते. २५.६१ प्रतिशत मुलींमध्ये अशा प्रकारचे नियमित त्रास होत असल्याचे दिसून येतात. यामुळेच २२.२७ प्रतिशत मुलींमध्ये सततची चीडचीड होणे व नेमके काय होत आहे यांची चिकित्सा त्यांना घेता येत नाही व त्यातच आरोग्याबाबतची अनभिज्ञता यामुळे आरोग्याच्या इतर अडचणी व तक्रारी वाढत जातात. आजार व आहार यामधील अनियमितता यामुळे अशक्तता वाढीस लागते १७.७३ प्रतिशत मुलींमध्ये हातापायाला गोळे आल्या सारखे वाटणे असे त्रास वाढीस लागलेले दिसून आले. गलिच्छ वस्तीतील एकूणच राहणीमान आरोग्यासाठी अयोग्य असल्याने सतत डोके दुखी, श्वसनाचे त्रास हे चित्र नियमितपणे दिसून आले. १४.०६ प्रतिशत मुली या त्रासापासून पिडीत झालेल्या दिसतात जननक्षम वय असलेल्या

किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीची सुरूवात झालेली असते त्यातच निकृष्ट वातावरणाचा परिणाम मुलीवर होत असल्याचे दिसते. सभोवतालचे या निकृष्ट वातावरण या सोबतच निकृष्ट आहार व्यवस्था, आधुनिक जीवनशैली जोपासण्याची धडपड, अयोग्य निवास यामुळे होणारी अपुरी झोप व आरोग्यासाठी उपलब्ध सोयी यामुळे त्यांच्या मासिक पाळीतून अंगावर पांढरे जाणे अश्या समस्या निर्माण होतात. ११.३६ प्रतिशत मुलींमध्ये अशा प्रकारची समस्या असल्याचे दिसून आले. अशाच आजारातून कंबर व पाय दुखण्याचे सततचे त्रास वाढीस लागतात. ३.६४ प्रतिशत मुलींमध्ये ही तक्रार आढळून आली ३.१८ प्रतिशत मुली अशा त्रासातून नेमके काय त्रास होतात याबाबत प्रतिक्रिया नोंदवू शकल्या नाहीत व विविध प्रकारचे आजारापासून त्रस्त होत असल्याचे दिसून आले. आरोग्याबाबत नियमित तपासणी न करू शकल्याचे त्यांना होत असल्याच्या त्रासाचे निदान देखील त्यांना करता येत नाही तसेच सोबत आरोग्य तपासणी बाबतच असलेली अनउपलब्धता, आरोग्याबाबतची अनास्था यामुळे किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्याच्या अनेक समस्या वाढीस लागतात.

वरील तथ्यावरून निष्कर्ष काढल्या जातो की आरोग्य तपासणी व उत्तरदात्यांना होणारे त्रास यांचा सहसंबंध जरी दिसत नसला तरी नियमित आरोग्य तपासणी मुळे रोगाचे निदान होऊन त्यासाठी आवश्यक आरोग्याची काळजी घेणे शक्य होईल.

**चर्चा** :– सातत्याने अनारोग्य निर्माण होणाऱ्या वस्तीतील निवासामुळे तेथील नागरिक अनेक रोगांनी बेजार होत असल्याचे दिसतात. महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमाने येथील नागरीकांसाठी मोबाईल आरोग्य सेवा देण्यात याव्यात. खाजगी आरोग्य सेवा घेणे परवडत नसल्याने व सार्वनजिक आरोग्य सेवांचा लाभ घेता न आल्याने किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होतात. जननक्षम वयामध्ये किशोरवयीन मुलींच्या आरोग्यासाठी आरोग्य शिक्षण व आरोग्य व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. सोबतच या वस्त्यांमधून आरोग्य शिबीर नियमित राबविणे गरजेचे आहे.

'किशोर शक्ती' योजनेद्वारे किशोरवयीन मुलींच्या शक्ति व सक्षमता ओळखून त्यांच्या विकासाच्या संधी मिळण्यासाठी त्यांना मदत करणे. स्वतःची ओळख निर्माण करण्यास कौशल्य वृध्दीसाठी या योजनांची मदत अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून करता येईल.

***ग्रंथसूची***


1. *Bhushan Vidya Sachadeva (2012) Fundamentals of Sociology: Perarson Education in Sourth Asia*
2. *Devasia, leelamma V.V.Devasia (1991) 'Girl Child in India' Delhi Ashish Publication.*
3. *कुलकर्णी पि.के. (२००८) आरोग्य आणि समाज, पुणे डायमंड पब्लिकेशन*
4. *काळदोत, सुधा (२००८) वैद्यकीय समाजशास्त्र औरंगाबाद, नारा प्रकाशन*
5. *कंवर रमेशचंद्र (२०११) शरिररचना क्रिया, विज्ञान एवम् स्वास्थ शिक्षा, नागपूर ब्रदर्श पब्लिकेशन*
6. *महाजन संगिता (२०१६) किशोरावस्था योग्यदिशा, दिपस्तंभ, नागपूर, धर्मदायी संस्थेचे प्रकाशन*

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक नवसामाजिक ज्वलंत समस्या व त्याची अदृश्य कारणे

*डॉ. दिपक कृष्णराव पवार, समाजशास्त्र-विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट ॲन्ड कॉमर्स, ३१०-ब, नविन नंदनवन, नागपूर-०६ Email:profdipakpawar@rediffmail.com Mob. : 9423405816, 8983314465*

भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असून, २०११ च्या जनगणनेनुसार भारतात खेड्यांची एकूण संख्या ६ लाख ४१ हजार ४८१ इतकी आहे. २०१७ च्या आकडेवारीनुसार ६१.०५ टक्के इतकी लोकसंख्या ग्रामीण भागातील आहे. म्हणून भारत देश हा खेड्यांचा देश आहे. ग्रामीण भागाचा विकास झाला तर बहुसंख्य लोकांचा विकास होईल. आजही ग्रामीण भागातील बहुतांश लोकांचा मुख्य व्यवसाय शेती व शेतीशी संबंधित आहे. परंतु अनेक कारणांनी शेती व्यवसायाची दुर्दशा झाली असून ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध नाही. वेगवेगळ्या दळणवळणाच्या साधनाने ग्रामीण-नागरी असा सबंध तयार झाला पण त्यातून ग्रामीण भागाचा विकास होऊन ग्रामीण जीवनमान उंचावण्यापेक्षा ग्रामीण नागरी स्थलांतरण वाढत आहे. ब्रिटीशांनी ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष केले. केवळ वसाहतवादाकरिता पुरक गोष्टींचा विकास केला, या सर्व गोष्टी व भविष्याच्या संकटाची सुचक चाहूल म. गांधींना लागली होती त्यामुळेच त्यांनी ग्रामीण उत्थानाकरिता ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली आणि 'खेड्याकडे चला' असे आव्हान केले होते. म. गांधी म्हणायचे की भारताची ओळख ही शहरापेक्षा येथे असलेल्या ८ लाख गावातून होते. भारत हा खेड्यात बसलेला आहे, मुळात खेडी ही आमच्या गरजांच्या पुर्तीकरिता बनवली गेली आहेत. खरे तर ग्रामीण भाग नाहीसा झाला, तर भारत देशाची सांस्कृतिक ओळख नाहीशी होईल. ग्रामीण विकासाचा पुनरुध्दार केवळ तेव्हाच संभवनीय असेल जेव्हा त्याचे शोषण होणार नसेल''[१] मा. गांधीजींचे हे विचार जेव्हा स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील ग्रामीण भागाची व्यवस्था मोडकळीस येऊ लागली व खेड्यांची स्वयंपूर्णता नष्ट होऊ लागली होती त्यावेळचे आहेत पण आजही समकालीन आहेत.

राष्ट्राच्या विकासाच्या संकल्पनेत देशाची व समाजाची प्रगती अभिप्रेत असते. विकासातून आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थांमध्ये परिवर्तन होत असते. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. विकासातून समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात लक्षणीय बदल घडवून आणला जातो. विकास ही परिवर्तनीय, व्यक्तीसापेक्ष आणि मुल्याधारीत संकल्पना आहे व यात सामान्य माणसांचे प्रश्न मध्यवर्ती असतात. आजकाल विकास हा शब्द आर्थिक वृध्दी किंवा वाढ या अर्थानेच लक्षात घेतला जातो. यातील सामाजिकता व नैतिकता लोप पावली आहे. वाढ किंवा वृध्दी ही संख्यात्मक बाजू लक्षात घेते तर खऱ्या विकासात गुणात्मक व संख्यात्मक या दोन्ही बाजू अभिप्रेत आहेत. वृध्दी किंवा वाढ हे शब्द विकास या व्यापक संकल्पनेचा एक भाग आहेत. विकास या शब्दात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, भौतिक, कौटुंबिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय या सर्व गोष्टींचा समावेश होतो. म. गांधींनी ग्रामीण विकासाची संकल्पना याच अंगानी मांडली आहे. परंतु आजची ग्रामीण विकासाची संकल्पना मेक इन इंडियाची आहे. म. गांधींना स्वयंपूर्ण खेडी हवी होती तर आजच्या विकासाचे धोरण याच्या अगदी उलटे ग्रामीण भागाला शहराशी परावलंबित्व करणारे आहे. प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वयंपूर्ण व शांतताप्रिय झाले, तेथे राजसत्ता व अर्थसत्ता यांचे मनोमिलन झाले तर ग्रामराज्य निर्माण होते. पण परंतु वाढलेल्या शहरीकरण, औद्योगीकर आणि जागतिकीकरणातुन ही कल्पना कालबाह्य होऊन ग्रामीण सर्वांगीण विकासाचा प्रश्नच निर्माण झाला असुन, ग्रामीण समुदायाचे अधःपतन झालेले आहे व त्यातून अनेक समस्या निर्माण होऊन 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' ही एक नवसामाजिक ज्वलंत समस्या निर्माण झालेली आहे.

**शेतीक्षेत्राची अवस्था** - भारताच्या दृष्टीने शेतीक्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अजूनही या क्षेत्राच्या अवस्थेवर भारतातील ६६ टक्के लोकांचे भवितव्य अवलंबून आहे. १९५०-५१ मध्ये शेतीवर अवलंबून असणाऱ्या भारतीय लोकसंख्येचे प्रमाण ७७ टक्के होते. ते २००१-०२ मध्ये थोडेसे घटून ६६ टक्के झाले आहे. तर २०११ ला ते घटून ६१.५ टक्के इतके झालेले आहे.[२] २०१६-१७ मध्ये आणखी घटून ६१.५ टक्क्यांवर आले आहे. १९५०-५१ मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा हिस्सा ६१ टक्के होता, २००१-०२ मध्ये तो घटून २४.२ टक्के झाला तर २०१६-१७ ला तो १७.३२ टक्के झालेला आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राशी टक्केवारी मोठ्या प्रमाणात घटते आहे. त्यामानाने शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण कमी होत नाही. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचे प्रमाण कमी होणे, हे विकासाचे लक्षण आहे असे सांगितले जाते. परंतू

जेव्हा शेतीवर अवलंबून लोकसंख्येचे प्रमाण फारसे कमी होत नाही आणि शेती उत्पन्नाचा हिस्सा मात्र मोठया प्रमाणात कमी होतो, तेव्हा ते विकासाचे लक्षण मानता येणार नाही. याच आकडयांचा दुसऱ्या बाजूनेही विचार करता येईल. १९५०-५१ मध्ये ७७ टक्के लोक ६१ टक्के उत्पन्नावर जगत आहेत तर २००१-०२ मध्ये ६६ टक्के लोक २४ टक्के उत्पन्नावर जगत आहे तर २०१६-१७ मध्ये १७.३२ टक्के उत्पन्नावर ६१.५ टक्के लोक जगत आहे. शेती उत्पादनातील वार्षिक वाढीचा दर १९७९-८० ते १९८९-९० या १० वर्षात सरासरीने ३.७२ टक्के होता. तो १९८९-९० ते १९९९-२००० या बाजारी अर्थव्यवस्थेच्या व आभासी खुल्या स्पर्धेच्या १० वर्षात घसरुन २.२९ टक्के झाला. याच काळात शेतीच्या उत्पादकतेच्या वार्षिक सरासरी वाढीचा दरही घसरला, तो २.९९ टक्क्यावरुन १.२१ टक्क्यांवर आला होता. मात्र २०१६-१७ मध्ये तो थोडा वाढून २.१ टक्के इतका झाला आहे.[३] एकूणच अभ्यासाअंती लक्षात घेता शेतीच्या उत्पादनवाढीचा दर घसरला, पण शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण फारसे कमी झालेले नाही. शेतीची अवस्था आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्याची अवस्था बिकट झाली आहे. विषमता वाढली आहे. भारताच्या दृष्टीने शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे आणि शेतीक्षेत्राची अवस्था बिकट आहे. ती अधिक गंभीर होण्याचे लक्षणे दिसत आहे.

**शेती क्षेत्राच्या वाईट अवस्थेची महत्वपुर्ण अदृश्य कारणे :-**

**१. भारतीय शेतीची उत्पादकता खूप कमी** – भारतीय शेतीची उत्पादकता खूप कमी आहे. नीती आयोगाने प्रसिध्द केलेल्या संशोधनपर निबंधानुसार भारतात दर हेक्टरी तांदळाचे उत्पादन ३७२१ किलो इतके मर्यादीत आहे. तर चीन, इंडोनेशिया, बांगलादेश व व्हिएतनाम या प्रगत नसलेल्या देशात तांदळाचे दर हेक्टरी उत्पादन अनुक्रमे ६७७५, ५१३६, ४४२१ आणि ५६३१ किलो इतके आहे. भारताच्या एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या २२ टक्के क्षेत्रावर तांदळाची लागवड केली जाते. गहु हे भारतातील दुसरे महत्त्वाचे पीक, याचे लागवडी क्षेत्र १५.५ टक्के आहे. गव्हाचे भारतात दर हेक्टरी उत्पादन ३१७७ किलो आहे, तर चीन, फ्रांस, जर्मनी व इंग्लंड या देशातील दर हेक्टरी उत्पादन अनुक्रमे ४८८७, ७५९९, ७३२८ व ६६५७ किलो एवढे आहे. याहीपेक्षा तृणधान्यातील ज्वारी, बाजरी, नाचणी, कडधान्ये व तेलबिया यांचे दर हेक्टरी उत्पादन तांदुळ व गहु यापेक्षाही लक्षणीय प्रमाणात कमी आहे. भारतात शेतीची उत्पादकता कमी म्हणून शेतकरी गरीब आणि शेतीसंबंधित अवलंबून असणाऱ्या वर्गाचेही उत्पन्न कमी आहे[४].

**२. आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताची कमकुवत भुमिका** – अमेरिका, युरोपिय देश, जमीन आदी प्रगत भांडवली देशात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण जेमतेम ३ ते १० टक्के आहे. त्याचबरोबर त्या देशांची सरकारे त्यांच्या शेतकऱ्यांना भारतीय शेतकऱ्यांच्या तुलनेत प्रचंड प्रमाणात अनुदाने देतात. प्रसंगी शेती न पिकवल्याबद्दल अनुदाने मिळतात. भारतातील अल्पभुधारक अर्धा एकर जमीन कसतो तर अमेरिकेतील किमान एक हजार एकरांचा मालक आहे. तेथील शेती कंपन्या करतात, त्यामुळे आधुनिक यंत्रे व तंत्रज्ञान व बियाणे वापरण्याचे सामर्थ्य आहे. मात्र भारतीय शेतकरी त्यांच्या दुबळेपणामुळे काहीच करु शकत नाही. गेल्या वर्षात आंतरराष्ट्रीय बाजारात शेतमालाचे भाव घसरत आहे. अशा अवस्थेत भारतीय शेतकऱ्यांचा माल जागतिक बाजारात टिकाव धरु शकत नाही हे स्पष्ट झाले.

आंतरराष्ट्रीय बाजारात सोडा, भारतीय शेती उत्पादित माल भारताच्या अंतर्गत बाजारपेठेत सुध्दा टिकाव धरु शकत नाही. विदेशी शेतमाल भारतीय बाजारात येऊन भारतीय बाजारपेठेतील शेतमालाचे भाव आणखी पडतात. आणि त्यामुळे भारतीय शेतमाल आणखी संकटात येऊन भारतीय शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट होऊन जाते.

भारताने २००१ ला आंतरराष्ट्रीय गॅट करारावर सही करतांना सर्व प्रकारची अनुदाने, विशेषतः शेती क्षेत्रातील अनुदान बंद करण्याचे कबुल केले आणि त्याप्रमाणे अनुदाने कमी केलीत. परंतु अमेरिका, युरोपमधील देश, जपान इत्यादी प्रगत व भांडवली देशानी मात्र शेती क्षेत्रातील अनुदाने कमी केली नाही तसेच त्यांनी ३६ टक्के निर्यात अनुदान कमी करण्याचे कबुल केले होते पण त्यातले काहीही केले नाही. या सर्व भांडवल किंवा प्रगत देशाच्या घडामोडी बघता ही अनुदाने कमी होण्याची मुळीच शक्यता नाही. या देशात निर्यातीतही मोठ्या प्रमाणात अनुदाने दिली जात आहेत, ती कबूल करुनही कमी केली नाहीत मात्र भारताने मुळातच कमी असलेली अनुदाने आणखी कमी केली. तीच गोष्ट आयात मालावरील कर आकारणीची आहे. या प्रगत भांडवली देशात आयात मालावर मोठ्या प्रमाणात कर आकारला जातो. मात्र भारताने आयात कर कमी केला आहे. हे सर्व आत्मघातीपणाचे आहे. त्यामुळे भारतीय शेतमाल निर्यात होत नाही. निर्यात झालेला त्या देशात महाग राहून विकल्या जात नाही. मात्र भारतात परदेशी

शेतमाल भारतीय उत्पादित शेतमालापेक्षा स्वस्त पडतो त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचा माल भारतातच विकल्या जात नाही आणि विकला तर त्यातून उत्पादन खर्च देखील निघत नाही. हॉंगकॉंग बैठकीत केलेल्या करारांच्या अंमलबजावणीवर अगोदर निर्णय होऊन मगच इतर चर्चा व्हायला हवी. नाहीतर कबुल केले त्याचा काय उपयोग?

**३.पायाभूत विकासाकडे दुर्लक्ष** – सरकारची तिजोरी रिकामी आहे व जे आहे ते फक्त रस्ते बांधनी आणि पुल तयार करणे याच मुलभूत गोष्टीवर खर्च करीत आहे. इतर मुलभूत सुविधांच्या विकासाचा अभाव आहे. जसे विद्युत प्रकल्प, जलाशय, रेल्वे प्रकल्प इत्यादी अशा पायाभुत सुविधांच्या निर्मितीशिवाय औद्योगिकीकरणाला चालना मिळू शकत नाही आणि औद्योगिक क्षेत्राच्या वाढीला गती प्राप्त झाल्याशिवाय शेती क्षेत्रातील अतिरिक्त मनुष्यबळाला उत्पादक रोजगार उपलब्ध होऊन शेतीवरील भार हलका होत नाही.

**४. कृषी क्षेत्राच्या संशोधन व विस्तार कार्यक्रमाचा अभाव** – भारतामध्ये कृषी क्षेत्रातील पिकांच्या वेगवेगळ्या जाती, प्रजाती शोधून काढणे, नवे टिशू कल्चर निर्माण करणे, शेती क्षेत्रांशी संबंधित यंत्रसामुग्री खते इत्यादी संशोधन व विस्तार करण्याबाबत सरकारकडे पैसाच नाही आणि अशीच गुंतवणूक केल्याशिवाय शेतीक्षेत्रात उत्पादकता वाढू शकत नाही.

**५. सिमांत व अल्पभुधारक शेतकरी** – भारतात सिमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांची समस्या मोठी गंभीर आहे. ती केवळ शेतीवर गुजरान करु शकत नाही. कारण शेतीवर त्यांना वर्षभर काम मिळू शकत नाही. अजूनही भारतातील ५० टक्के शेतीवर हंगामी पिक घेतल्या जाते, ते हंगामी पिक म्हणजे हंगामी काम संपले की त्यांना पर्यायी रोजगार भारतीय शेतीक्षेत्र किंवा गावांमध्ये नाही. त्यामुळे त्यांचे उत्पन्न फारच कमी आहे.

**६. शेतकऱ्यांची बदललेली जीवनशैली** – शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थिती खालावण्यामागे शेतकऱ्यांची विशेषतः युवा शेतकऱ्यांची बदललेली जीवनशैली आहे. सर्व प्रकारच्या मिडीयाचा प्रभाव शेतकऱ्यावर पडला असून प्रत्येकाच्या घरात टी.व्ही. वेगवेगळे चॅनल्स, हातात मोबाईल व त्यामध्ये इंटरनेट आलेले आहे. यामध्ये तरुणांपासून तर वृध्द शेतकऱ्यांपर्यंत त्यात सर्वच गुंतून गेलेले आहते. शेतीकाम सोडून यामध्ये व्यस्त आहते. घरोघरी तरुणांकडे मोटारसायकली आल्या असून त्यासोबत फॅशनेबल कपडे घालून शेतीबाह्य वेळ घालविला जात आहे. खेड्यापाड्याात किंवा गावोगावी विवाह सोहळे, वाढदिवस मोठ्याा प्रमाणात, नविन फिल्मी पध्दतीतुसार, क्षमतेपेक्षा खूप जास्त पैसा खर्च करुन, कधी कर्ज काढून केले जात आहे. त्यामुळे शेतीक्षेत्रातला पैसा अशा अनुत्पादक गोष्टीवर खर्च होतो आणि लागवडीकरिता अपुरा पडतो आहे. गावोगावी अलीकडे बिअरबार मोठ्याा प्रमाणात सुरु झाले असून ते चांगले सुरु आहेत हे कशाचे लक्षण? आणि याचे दुष्परिणाम काय हे सर्वश्रुत आहे. पुर्वी घरातला पुरुष व स्त्री दोघेही शेतावर राबत पण अलीकडे घरातील स्त्री शेतावर राबतांना दिसत नाही.

**७. सरकारचे शैक्षणिक धोरण** – शेतकऱ्यांच्या वाईट अवस्थेला महाराष्ट्र सरकारचे गेल्या १५-२० वर्षातील शैक्षणिक धोरण सुध्दा जबाबदार आहे. सरसकट आठव्या वर्षापर्यंत कोणालाही नापास न करणे आणि १० वी १२वी मध्ये परीक्षा पध्दतीतील बदल व त्यामुळे वाढलेला निकाल. पुर्वी परीक्षेची पातळी कठीण असल्यामुळे क्षमता नसणारे १० वी पर्यंत किंवा १० वी मध्ये नापास व्हायचे आणि आपली शिकण्याची क्षमता नाही हे ओळखून आपल्या पांरपारीक व्यवसाय किंवा शेती व्यवसाय करीत. त्यांना ते काम करण्याची काही कमी किंवा लाज वाटत नव्हती. पण अलीकडे क्षमता नसणारे १२ वी पर्यंत पास होतात पण पुढे शिक्षणात टिकत नाही ते पुढेही जात नाही आणि त्यांना शेती काम करण्याची लाज वाटते. ज्यावर उदरनिर्वाह होतो आहे, जगतो आहे ते काम केले नाही तर उत्पन्न वाढणार का? शेती पिकणार का? शेती पिकली नाही तर दुसरा स्त्रोत काय?

शेती क्षेत्राची अवस्था वाईट असण्याची ही वेगळी पण अदृश्य कारणे तर आहेत पण त्याचबरोबर कर्जाची सुलभता नसणे, कर्जबाजारीपणा, पिकांचे नुकसान, शेताच्या लागवडीचा वाढलेला खर्च, व्यसने, सिंचनाच्या सोयीचा अभाव, कौटुंबिक शेतीवर अवलंबून असणांऱ्याचा वाढलेला भार, शेतीशी संबंधित जोडधंद्याचा अभाव ही कारणे सुध्दा जबाबदार आहेत. भारतात मोठे, गरजेचे व जास्त लोकसंख्या अवलंबून असणारे क्षेत्र, शेती क्षेत्र आहे. पण इतर क्षेत्रापेक्षा अत्यंत दुर्लक्षित राहिले असून या क्षेत्रात विपन्नावस्था आणि नैराश्य निर्माण झाले आहे त्यामुळे या क्षेत्रावर उपजिवीका करणाऱ्या लोकांमध्ये विपन्नावस्था व नैराश्य निर्माण झाले असून त्याचा अतेरिकी परिणाम शेतकऱ्यांच्या दिवसेंगणिक वाढलेल्या आत्महत्या हा आहे.

भारतात सर्वत्र कमी अधिक प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत आहे पण महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि छत्तीसगढ या राज्यात हे प्रमाण अधिक असून महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त आहे. महाराष्ट्रातही समृध्द शेती असणाऱ्या भागात हे प्रमाण कमी असून मराठवाडा व विदर्भात तर आणखी जास्त आहे. एकट्याा विदर्भात २०१५ ला सर्वाधिक १५४१ आत्महत्या झाल्या असून २०१७-१८ ची खरी आकडेवारी मिळत नाही आहे.[६]

शेतकऱ्यांच्या दुरावस्थेला जबाबदार असणाऱ्या दृश्य-अदृश्य, स्थानिक-राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय, वैयक्तिक व सार्वजनिक आणि धोरणात्मक आणि परिणामात्मक या सर्व कारणांचा तटस्थेने शोध घेऊन त्यावर योग्य व प्रभावी नियोजन व अंमलबजावणी किंवा उपाययोजना केली तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकतील. अन्यथा हा प्रश्न खूप गंभीर स्वरुप धारण करु शकतो.

***संदर्भः***

१. *shodhganga.inflibnet.ac.in>bitstream*
२. *https://www.quora.com>whatpercenta*
३. *https://m.economictimes.com>...>news*
४. *पाध्ये रमेश, शेती क्षेत्रावरील गहीरे संकट, दैनिक लोकमत, १ जुलै १९१७*
५. *पानसरे गोविंद, दैनिक लोकमत, मंथन, रविवार, दि.१३ नोव्हेंबर २००५, पृष्ठ ८*
६. *आगलावे डॉ. प्रदीप, भारतीय समाजः संरचनात्मक प्रश्न आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१८, पृ. १२७.*

***संदर्भ ग्रंथ –***

१. *आगलावे डॉ. प्रदीप, भारतीय समाज : संरचनात्मक प्रश्न आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१८*
२. *ओंकार, म. वा., विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे व दिर्घकालीन उपाय, प्रकाशक ओंकार एज्युकेशनल फाउंडेशन, बजाजनगर, नागपूर.*

# रोकडरहित व्यवहारांचे लाभ आणि मर्यादेचे अध्ययन

*प्रा. आकाश बेले, एम.कॉम., एम.बी.ए. बी.एड. (गोल्ड मेडॅलिस्ट) ओम नगर, सक्करदरा, नागपूर-०६*
*मो. 9960226145 email:beleakash29@gmail.com*

**प्रस्तावना :-** आज भारतात नोट बंदी नंतर रोकडरहित व्यवहाराचे प्रमाण खुप वाढले आहेत. त्यासोबतच मोबाईल बँकींग, ई-वॉलेट, ऑनलाईन पेमेंन्ट असे शब्द ऐकायला मिळत आहेत. रोकडरहित व्यवहारासोबतच सायबर धोकाधडीचे प्रमाण देखील वाढत आहे. माहिती तंत्रज्ञानाने आपल्या शाखा विस्तारल्या आहेत परंतू सायबर गुन्हेगारीच्या बाबतीत आपला देश आजही उदासीन आहे. भारतात नोट बंदी नंतर सरकारने रोकडरहित व्यवहाराला प्रोत्साहित केलेले आहे. त्यासाठी विविध प्रकारच्या सवलती शासनाद्वारे दिल्या जात आहे. शासनाने रूपे कार्ड, मास्टर कार्ड आणि व्हिजा कार्डसाठी 'कॉमन क्विक रिस्पॉन्स कोड' वर आधारीत पेमेन्ट सोलुशन्स तैयार केले आहे. परंतू आजही रोकडरहित व्यवहाराच्या विकासात अनेक अडचणी आहेत. सरकारने रोकडरहित व्यवहारासाठी 'ऐकीकृत पेमेन्ट इंटरफेस (यु.पी.आय.) चा विकास केला आहे. युपीआय ची ही सुविधा आज प्रत्येक बँकेच्या ॲपमध्ये आहे.

आज मोबाईल बँकींगचे, नेट बँकिंगचे प्रमाण वाढलेले आहेत. परंतू रोकडरहित व्यवहार खरोखरच सुरक्षित आहे काय? त्याच्या काय मर्यादा आहेत? व त्यापासून आपल्याला काय लाभ प्राप्त होऊ शकतो? इत्यादी अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या उद्देशाने मी ''रोकडरहित व्यवहाराचा लाभ आणि मर्यादेचे अध्ययन'' हा संशोधनाचा विषय निवडला आहे.

**शोध निबंधासाठी वापरण्यात येणारी संशोधन पद्धती :-** शोध निबंधातील अभ्यास हा द्वितीय समंकावर अवलंबून आहे. समंकाचे संकलन हे विषयाशी संबंधीत विविध पुस्तक, मासीक, वार्षिक, अहवाल, वर्तमानपत्र व सांकेतिक स्थळा वरून करण्यात आले आहे.

**रोकडरहित व्यवहाराशी संबंधीत काही शब्दांच्या व्याख्या :**

**रोकडरहित व्यवहार :** जेव्हा संपूर्ण राष्ट्रात आर्थिक व्यवहार करण्यासाठी छापील नोटांचा वापर न करता त्या ऐवजी धनादेश, धनाकर्ष (डी.डी.), क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, मोबाईल बँकींग, नेट बँकिंग, ईवॅलेट, आर.टी.जी.एस., इ.एफ.टी. इत्यादीचा उपयोग केला जातो. तेव्हा त्यास 'कॅशलेस' व्यवहार किंवा 'रोकडरहित व्यवहार' असे म्हणतात.

**एम कॉमर्स :**हा ई-कॉमर्सचा एक धटक असून यात मोबाईल फोनचा उपयोग करून इंटरनेटच्या सहाय्याने संदेश वहन तसेच आर्थिक व्यवहार केले जातात. म्हणून याला 'मोबाईल कॉमर्स' सुद्धा म्हणतात.

**ई-वॉलेट :** 'ई-वॉलेट' म्हणजे मोबाईलमध्ये असलेले एक आभासी पॉकीट किंवा ॲप किंवा मोबाईल वॉलेट होय. ई-वॉलेट यालाच डिजिटिल पॉकीट सुद्धा म्हणतात.

**संशोधनाचे उद्देश :** १) रोकडरहित व्यवहाराच्या संभाव्य धोक्यापासून बचाव करण्यासाठी माहिती प्राप्त करणे. २) रोकडरहित व्यवहाराच्या लाभ व मर्यादेचे अध्ययन करणे. ३) रोकडरहित व्यवहाराविषयी शासणाच्या धोरणाची व भूमिकेची माहिती प्राप्त करणे. ४) रोकडरहित व्यवहाराच्या विविध पद्धतीविषयी माहिती प्राप्त करणे. ५) संशोधनाच्या अध्ययनाद्वारे व्यवहारात सुरक्षितता कशी आणता येईल यासाठी योग्य उपाय सुचविणे.

**संशोधनाची गरज आणि महत्त्व :-** इतर क्षेत्राप्रमाणेच भारतात बँकींग क्षेत्रात नवतंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. आज कुठेही केव्हाही या सिद्धांतावर बँक चोविस तास आपल्या सेवा देत आहे. बँक ही रोकडरहित व्यवहाराचा एक महत्त्वाचा धटक आहे. आज प्रत्येकच बँकेचे संगणकीकरण झालेले आहे. आर्थिक व्यवहारासाठी मोठ्याा प्रमाणावर इंटरनेट आधारीत इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर केला जात आहे. रोकडरहित व्यवहारात व्यक्ती धर बसल्या किंवा कोठेही, केव्हाही, कुणाशीही आर्थिक व्यवहार करू शकतो. यासाठी ए.टि.एम., क्रेटिड कॉर्ड, मोबाईल बँकींग, इंटरनेट बँकींग या साधनांचा वापर वाढलेला आहे. ई-खरेदी, ई-पैसा, ई-फन्डे, ट्रॉन्सफर, आणि पाईन्ट ऑफ सेल इत्यादी साधनाद्वारे रोडरहित व्यवहार केले जात आहे. परंतू या नव्या शोधामुळे मनुष्यासाठी जरी सुख सोई उपलब्ध झाल्या असल्या तरी सायबर गुन्हेगारी, फिशिंग, मॉलवेअर हल्ले, व्हायरस इत्यादी धोकाधडीचे प्रकार दिवसेन दिवस वाढत आहे. नॅश्नल क्रॉइम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवाला नुसार २०१५ या वर्षात एकुण ८०४५ सायबर गुन्हांची नोंद झालेली आहे. या गुन्हांमध्ये एकुण ५१०२ व्यक्तींना माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत अटक

करण्यात आले होते. मात्र त्या तुलनेत गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण खुप कमी आहे. हे गुन्हेगार डिजिटल स्वरूपाच्या पुराव्याच्या अभावी गुन्हे करूनही मुक्त सुटलेले आहेत.

प्रस्तुत संशोधनाद्वारे रोकडरहित व्यवहारावर सायबर क्राईमचा काय प्रभाव पडू शकतो? रोकडरहित व्यवहारात कोणकोणते धोके उदभवू शकतात? या धोक्यांपासून उपयोगकर्त्याचा कशा प्रकारे बचाव होऊ शकतो? इत्यादी प्रश्नांचा शोध घेणे आजच्या वेळेची व काळाची गरज आहे.

**संशोधनाची रूपरेषा :-** आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात, स्पर्धात्मक युगात इंटरनेट आणि स्मॉर्ट फोन यांना अधिकच महत्त्व प्राप्त झालेले दिसून येत आहे. प्रत्येकाच्या हातात स्मॉर्ट फोन नी आपली जागा निश्चित केल्याचे दिसून येते. याच्या वाढत्या वापरामुळे आणि वाढत्या आधुनिक शैक्षणिक प्रणालीमुळे सुचनातंत्रज्ञानाच्या माध्यमाने रोखरहित व्यवहाराच्या विकासाला मोठ्याा प्रमाणात चालणा प्राप्त झालेली दिसून येते. यात शासनाची विकासात्मक भूमिका पण फार महत्त्वाची ठरत आहे. ऑनलाईन व्यवहार पद्धतीत सरकार सुद्धा मोठ्याा प्रमाणात पुरेपुर प्रयत्न करतांना दिसताहेत. आजचे सरकार हे स्किल इंडीया, डिजिटल इंडिया, मेक इन इंडीया सारख्या महत्त्वपूर्ण योजनांवर कार्य करत आहे. ज्यात आजच्या या आधुनिक युगाच्या आर्थिक क्षेत्रात रोकडरहित व्यवहार आकाशात गगण भरारी घेतांना आपल्याला दिसून येत आहे.

प्रस्तुत संशोधन हे रोकडरहित व्यवहार काय आहेत? रोकडरहित व्यवहारात कोणते धोके उदभवू शकतात? रोकडरहित व्यवहाराचे कोण कोणते फायदे-तोटे आहेत, त्याच्या काय मर्यादा आहेत? तसेच रोकडरहित व्यवहाराबाबत सरकारची काय योजना व भूमिका आहे? आणि रोकडरहित व्यवहारापासून होणाऱ्या धोक्यांपासून कशा पद्धतीने स्वतःचा व इतरांचा बचाव कसा करता येईल? या संपूर्ण घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनाद्वारे जो निष्कर्ष सामोर येईल तो निष्कर्ष अशाच प्रकारच्या अन्य संशोधन कार्यात उपयोगी होईल आणि भविष्यात रोखरहित व्यवहार करतांना व त्याच्या विकासाच्या प्रक्रियेसाठी उपयोगी ठरेल.

**रोकडरहित व्यवहाराच्या विविध पद्धतीः-** वर्तमानात रोकडरहित व्यवहाराच्या अनेक पद्धती आहेत. याचा सर्वात प्रचलीत पद्धत म्हणजे डेबीट किंवा क्रेडिट कार्डच्या माध्यमाने पेमेन्ट करणे होय. कारण कार्डद्वारे पेमेन्ट करण्याची पद्धत सरल व सोपी आहे. तसेच आपन ऑनलाईन बँकींगच्या माध्यमाने सुद्धा किंवा नेट बँकींगच्या माध्यमाने सुद्धा मोबाईल वॉलेटचा वापर करून पेमेन्ट करू शकतो. आज अनेक बँका व्यक्तीरीक्त इतर खाजगी सेवा देणाऱ्यांच्या सुद्धा मोबाईल वॉलेट आहे. ज्याद्वारे पैशाचे शोधन केले जाऊ शकते. या विविध पद्धती विषयी माहिती खाली सविस्तरपणे जाणून घेऊ या.

**१) स्वयंचलित टेलर यंत्र** (ATM) : ए.टी.एम. हे मानवरहित किंवा बँकेच्या बाहेर ठेवण्यात आलेले यंत्र असून या यंत्राद्वारे अभिनव रोख रक्कमेचे शोधन केले जाते. या यंत्राद्वारे स्वयंसेवा बँकींग या संकल्पनेवर आधारीत सुविधा पुरविल्या जातात. सर्वप्रथम केवळ पैसे काढण्यासाठी ए.टी.एम.चा वापर होत होता परंतू आता बदलत्या तंत्रज्ञानामुळे ए.टी. एम. चे स्वरूप ही बदलेले आहे. आता ए.टी.एम. द्वारे रोख रक्कम भरता सुद्धा येते. तसेच काही ए. टी.एम. मध्ये धनादेश सुद्धा जमा करता येतात. उपयोग कर्त्याला या मशिनीद्वारे त्याच्या व्यवहाराशी संबंधीत पुरावा म्हणून छापील स्वरूपात पावती सुद्धा प्राप्त होत असते. ए.टी.एम. मधुन पैसा काढण्यासाठी रूपे, मॉस्टर, व्हिजा, ग्लोबल इत्यादी डेबीट कार्डची गरज असते. उपयोगकर्ता या यंत्राच्या विशिष्ट ठिकाणी या कार्डला स्वॅप करून व विशिष्ठ पिन नंबर टॉकून बँकींगचे व्यवहार ऑनलाईन पद्धतीने करू शकतो.

**२) क्रेडिट कार्ड सेवा :** बँक आपल्या विशिष्ट ग्राहकाला त्यांच्या व्यवहार पाहून विशिष्ट मर्यादेपर्यंत कर्जाऊ रक्कम उचल करण्याची किंवा विशिष्ट ठिकाणातून उधार खरेदी करण्यासाठी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जे कार्ड देते त्या कार्डला क्रेडिट कार्ड सेवा असे म्हणतात. दुसऱ्या शब्दात या कार्डला पतपत्र सुद्धा म्हणतात. यात ग्राहकाच्या खात्यात रक्कम नसतांना सुद्धा तो विशिष्ट मर्यादेपर्यंत रक्कम उचलू शकतो किंवा तेवढ्याा रूपयाची उधार खरेदी करू शकतो. म्हणूनच याला 'पोस्ट पेड कार्ड' सुद्धा म्हणतात. परंतु जेव्हा ग्राहक आपल्या खात्यात असलेल्या रक्कमे येवढीच रक्कम काढू शकतो व ही रक्कम काढण्यासाठी तो ज्या कार्डचा वापर करतो त्याला 'डेबीट कार्ड' असे म्हणतात.

**३) दूरभाष बँकींग** (Tele Banking) : टेली बँकींग ही अशा प्रकारची सुविधा आहे. ज्यात लाभ घेण्यासाठी ग्राहकाला ए.टी.एम. कार्डची गरज भासत नाही. या पद्धतीत बँकेचा संगणक बँकेच्या टेलिफोन व मॉडेमशी जोडलेला असतो. त्यामुळे ग्राहक केव्हाही दूरध्वनी वरून बँकेशी संपर्क स्थापीत करून आपल्या

खात्यातील शिल्लक रक्कमेबाबत, व्यवहारा बाबत माहिती जाणून धेऊ शकतो. तसेच आपल्या खात्यातील रक्कम इतर व्यक्तीच्या खात्यात किंवा इतर खात्यात स्थानांतरीत करण्याची सुचना देऊ शकतो. तंत्रज्ञानाच्या बदलत्या स्वरूपाच्या परिणामाने आज बँक, व्हाइस प्रोसेसींग फॅसेलिटी, सॉफ्ट वेअर, व्हाइस मेल फॅसेलिटी इत्यादीचा उपयोग करून सुद्धा ग्राहकांना टेली बँकींगची सुविधा पुरवित आहे.

४) **नेट बँकींग** : बँकेची ही सेवा सर्वात स्वस्त ठरणारी व सरल अशी आहे. यात इंटरनेटच्या सहाय्याने संगणकांचा किंवा मोबाईलचा उपयोग करून पैसे स्थानांतरीत करणे, बिले अदा करणे, या खात्यातून त्या खात्यात नीधीचे हस्तांतरण करणे, कर्जासाठी अर्ज पाठविणे, धनादेशाची विनंती करणे, दिलेले चेक रद्द किंवा थांबविणे, नविन खाते उधडणे इत्यादी कार्ये केली जातात. यासाठी ग्राहकाला बँकेत जाण्याची गरज नसते.

५) **मोबाईल बँकींग** : आज भारतात अनेकांकडे स्मार्ट फोन उपलब्ध आहे. त्या फोनचा केवळ संप्रेषण करण्याकरिता उपयोग न करता इंटरनेटचा उपयोग करून व विशिष्ट ॲपचा उपयोग करून बँकेची विविध व्यवहार केले जातात. हे सर्व व्यवहार, इंटरनेट व मोबाईलवर आधारीत असल्यामुळे याला मोबाईल बँकींग म्हणतात. बँक आपल्या ग्राहकाकडून मोबाईल बँकींगची सेवा सुरू ठेवावी की नाही अशी विचारणा करते. जर ग्राहकांनी ती सेवा स्विकारली असेल तरच त्याला ती सेवा पुरविली जाते. परंतू आज विविध पेमेंट ॲपच्या द्वारे आपल्या खात्यांना जोडून रोकडरहित व्यवहार करण्याच्या पद्धतीचे प्रमाण वाढत आहे.

६) **इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर** (EFT) : इलेक्ट्रॉनिक फन्ड ट्रान्सफर ही अशी पद्धती आहे की ज्याच्या सहाय्याने एका बँकेतून दुसऱ्या बँकेत किंवा एकाच बँकेच्या शाखेतून दुसऱ्या शाखेत निरोप व रक्कम ऑपोआप ट्रॉन्सफर करता येते. इएफटी ही एक ऑन लाईन पद्धत असून त्वरीत रक्कम ट्रॉन्सफर करण्यासाठी या पद्धतीचा उपयोग केला जातो. इएफटीच्या सेल्स टर्मिनलच्या मदतीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने रक्कम स्थानांतरीत केली जाते व संबधीत खात्याला डेबीट किंवा क्रेडिट केले जाते.

७) **इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवा** (ECS) : ग्राहकांनी आपल्या बँकेवर काढलेले धनादेश दुसऱ्या बँकेत ही जमा केले जातात. अशा वेळेस बँकांमध्ये परस्पर देणी–धेणी निर्माण होतात. ही देणी–धेणी समायोजित करण्याचे कार्य रिझर्व्ह बँक करीत असते. कारण रिझर्व्ह बॅकेजवळ देशातील सर्वच बँकांच्या ठेवी असतात म्हणून आर.बी.आय. निरसन केंद्राचे कार्य सहज करू शकते.

इलेक्ट्रॉनिक निरसन सेवेचा विकास होण्यास ई–बँकींग तसेच माहिती तंत्रज्ञानाचा विकास करणीभूत ठरला आहे. ई–बॅकिंगच्या विकासाबरोबरच ऑनलाईन निरसन केंद्राचा विकास होत गेला. भारतीय रिझर्व्ह बँकेने ऑनलाईन निरसन केंद्राची सेवा भारतीय ग्राहकांसाठी २००५ मध्ये सुरू केली. या पद्धतीने संगणक, संगणकीय नेटवक, इंटरनेट यांच्या साहाय्याने रक्कमांचे एका बँकेतून दुसऱ्या बँकेच्या खात्यामधे ऑनलाईन स्थालांतरीत केले जाते. आर.बी.आय. ने ऑनलाईन निरसन केंद्राची सोय सुरूवातीला फक्त मोठ्याा स्वरूपाच्या व्यवहार करणाऱ्या बँकांनाच दिली होती. परंतु २००७–०८ मध्ये रिझर्व्ह बँकेने वित्तसंस्था, एल.आय.सी., पोस्ट ऑफिस, कोषागार इत्यादींना दिलेली आहे.

८) **ई–वॉलेट किंवा मोबाईल वॉलेट** : ई–वॉलेट किंवा मोबाईल वॉलेट ही संकल्पना सध्या संपूर्ण भारतभर चर्चिली जात आहे. ८ नोव्हेबर, २०१६ रोजीच्या रात्री अचानक भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० व १००० रुपये किंमतीच्या नोटा रद्द करण्याची धोषणा केल्यानंतर ह्या संकल्पनेला अधिक महत्त्व प्राप्त झालेत. ई–वॉलेट म्हणजे ईलेक्ट्रानिक वॉलेट होय. ईलेक्ट्रॉनिक कार्डाचा तो एक प्रकार असून संगणक किंवा स्मार्ट फोन ने ऑनलाईन व्यवहार करण्यासाठी ते वापरले जाते. ई–वॉलेट बँक खात्याशी जोडावे लागते आणि त्यानंतर खात्यावरून पैसे चुकते करता येतात. ई–वॉलेटचा प्रमुख हेतू हा कागदाशिवाय पैशाचे व्यवहार सोपे करणे हा आहे.

९) **आर.टी.जी.एस.** (Real Time Gross Settlement) : आर.टी.जी.एस.चे पूर्णरूप 'रियल टाईम ग्रॉस सेटलमेंट' असे आहे. कोअर बँकींगच्या पुढची पायरी म्हणजे 'आर.टी.जी.एस' होय. ''आरटीजीएस ही एका बँकेतून दुसऱ्या बँकेत पैसे हस्तांतरीत करण्याची अत्याधुनिक सुविधा होय.'' या सुविधेमुळे बँकेच्या ग्राहकांना कोणत्याही ठिकाणावरून कोणत्याही ठिकाणी तात्काळ पैसे पाठविण्याची सोय उपलब्ध झाली आहे. ज्या बँकांच्या शाखा कोअर बँकींगने जोडलेल्या आहेत. अशाच बँकांच्या शाखांच्या माध्यमातून आरटीजीएस द्वारे पैसे ट्रान्सफर करता येतात. मात्र ही सेवा रिझर्व्ह बँक व इतर बँकांच्या कार्यालयीन वेळातच उपलब्ध असते.

१०) **एन.ई.एफ.टी.** (NEFT-National Electonic Fund Transfer) : एन.ई.एफ.टी.द्वारे पैसे पाठविल्यास

ते लगेच ट्रान्सफर न होता काही वेळानंतर ट्रान्सफर होतात. कारण या प्रणालीमध्ये प्रत्येक तासाचा टाईम स्लॉट तयार केलेला असतो व त्यानुसारच पैसे ट्रान्सफर केले जातात. या सुविधेद्वारे एकावेळी ५०००० रुपये ट्रान्सफर करता येतात. परंतु सामान्यतः २ लाख किंवा त्यापेक्षा जास्त रुपये पाठविण्यासाठी या सुविधेचा उपयोग केला जातो. ही सुविधा सुद्धा रिझर्व्ह बँक व इतर बँकांच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळातच उपलब्ध असते.

**रोकडरहित व्यवहाराचे लाभ** : रोकडरहित व्यवहाराचे लाभ पुढीलप्रमाणे आहेत. १) रोकडरहित व्यवहार करणे सुलभ आणि सोयीचे असते. तसेच ते रोख रक्कम हाताळण्यापेक्षा अधिक सुरक्षित असते. २) रोकडरहित व्यवहारांद्वारे अर्थव्यवस्था अधिक प्रगत व विकसित होते. ३) रोकडरहित व्यवहारांमुळे अर्थव्यवस्था अधिक पारदर्शक होते. ४) व्यापारी वर्गाला त्यांच्या भौगोलिक कक्षांच्या पलीकडे जावून व्यापार करणे शक्य होते. ५) कागदी चलन छापण्याची आवश्यकता कमी झाल्यामुळे कागदाची मागणी धटते, परिणामतः कमी झाडे कापली जाते आणि त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होऊन पर्यावरण हानी होत नाही. ६) रोकडरहित व्यवहारामुळे आपल्याला बँकेच्या रांगेत न लागता धर बसल्या व्यवहार करता येत असल्यामुळे वेळेची व श्रमाच बचत होते. ७) रोकडरहित व्यवहारामुळे आर्थिक व्यवहारामध्ये प्रभावीपना येतो. त्यामुळे भ्रष्टाचार व बेकायदेशिर आर्थिक व्यवहारांना पायबंद बसतो. ८) रोकडरहित व्यवहार वाढल्याने कागदी चलनांची आवश्यकता कमी होऊन बनावट कागदी चलनाला पायबंद धेण्यास मदत होईल. ९) रोकडरहित व्यवहारामुळे आपण सुटिच्या दिवसाला पण कोणालाही पेमेंट करू शकतो. म्हणजेच बँकांची किंवा रोख रक्कमांची कामे पडून राहत नाही. १०) रोकडरहित व्यवहारामुळे बँकेत ग्राहकांची गर्दी होत नाही त्याच्याच फायदा बँक कर्मचाऱ्यांचा ताण कमी होण्यास होतो. ११) ग्राहकास धरी बसून बँकेकडून आपल्या खात्याविषयी सर्व माहिती मिळविता येते. १२) बँकेतून रक्कम ट्रान्सफर करणे, व्यवहाराची पूर्तता करणे यासाठी कागदपत्राची गरज नसल्याने बँकेच्या छपाई खर्चात बचत होते.

**रोकडरहित व्यवहाराच्या मर्यादा** : १) रोकडरहित व्यवहार करणाऱ्या यंत्रात बिधाड झाल्यास व्यवहार पूर्ण होत नाही. २) रोकडरहित ट्रांजेक्शनासाठी उपयोगात येणाऱ्या मायक्रो-एटीएम.पीओएस मशीन वर मालवेअर हल्ले होण्याचा धोका आहे. ३) साक्षर नसलेला व्यक्ती रोकडरहित व्यवहार करू शकत नाही. ४) ऑनलाईन किंवा रोकडरहित व्यवहार पूर्ण करणाऱ्या ट्रॅजेक्शन आयडी किंवा गोपनीय क्रमांकाची माहिती इतर व्यक्तीला प्राप्त झाल्यास आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. ५) रोकडरहित व्यवहारात फेक लिंक ही एक मोठी व गंभीर समस्या आहे. ६) देशात सायबर सिक्युरिटी व्यवस्था सुरक्षित नाही. त्यामुळे त्यातील पैसे चोरीला जाण्याची भीती कायम असणार आहे. ७) रोकडरहित व्यवहारासाठी इंटरनेट सेवा उपलब्ध झाल्याशिवाय याच्या पुरेपुर उपयोग धेता येत नाही. ८) देशातील इंटरनेट बँकींगचा संथ गतीने होणाऱ्या विकास रोकडरहित व्यवहारावर मोठ्याा प्रमाणात मर्यादा आणतात. ९) रोकडरहित व्यवहारात इंटरनेट बँकीगमधील तांत्रीक अडचणीमुळे मर्यादा येतात.

**निष्कर्ष** : इलेक्ट्रॉनिक कॉमर्स, ऑनलाईन व्यवहार, मोबाईल बँकींग, रोकडरहित व्यवहार, ई-वॉलेट, आरटीजीएस, एन.ई-एफ.टी., बँकांचे संगणकीकरण, स्वयंचलित टेलर यंत्र, टेली बँकींग आणि कोअर बँकींग ह्या सर्व सेवा इंटरनेटच्या वापर करून जनतेचा आणि प्रक्रियेचा संबंध जोडून जागतिक स्तरावर कुठल्याही क्षेत्रात काम करण्याची मोकळीक देते. प्रत्यक्ष करीत असलेल्या व्यवहारालाच इंटरनेटच्या पसरलेल्या जाळ्याच्या माध्यमातून व्यवहार करणे म्हणजे 'ऑनलाईन व्यवहार किंवा रोकडरहित व्यवहार' होय.

आपल्यासाठी आपले पालक वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन वस्तूंची खरेदी करतांना आपण पाहिले आहेत. परंतू आता या खरेदीसाठी कुठेही बाहेर जाण्याची गरज राहलेली नाही. कारण आजच्या या आधुनिक जगात रोकडरहित व्यवहार करून आपण धर बसल्या वस्तू व इतर कोणत्याही सेवा प्रत्यक्ष, सरळ व वेगाणे करतांना दिसतो ते म्हणजेच रोकडरहित व्यवहार होय. या संशोधनावरून असे लक्षात येते की, कोणत्याही प्रकारच्या वास्तविक पैशाचा उपयोग न करता संपूर्ण आर्थिक व्यवहार ई-कॅश ने करणे किंवा ऑनलाईन ने करणे म्हणजे रोकडरहित व्यवहार होय.

नोटबंदी नंतर कॅशलेस व्यवहार वाढवण्यासाठी सरकार सतत प्रयत्न करीत आहे. डिजिटल इंडिया या कार्यक्रमाद्वारे धरबसल्या इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन व्यवहार करून बँकेचे काम, पैसे पाठविणे, पैसे स्विकारणे, खात्यातील शिल्लक चेक करणे, अर्ज करणे, धनादेश थांबविणे, खरेदी करणे, तिकीटे काढणे इत्यादी अनेक व्यवहार ऑनलाईन/रोकडरहित व्यवहाराच्या माध्यमातून पूर्ण करता येते. आज रोकडरहित व्यवहाराच्या माध्यमातून मानवी जिवनातील धावपळ थोडी फार कमी झालेली दिसून येते. परंतू

रोकडरहित व्यवहाराचा लाभ जितका प्रभावी आहे त्याचप्रमाणे त्याचे धोके सूद्धा आपल्याला पहावयास किंवा ऐकण्यास मिळत आहे. हे धोके रोकडरहित व्यवहारात अडचणी निर्माण करून ऑनलाईन बँकींग प्रणालीत मोठ्याा प्रमाणावर मर्यादा आणतात. याचे परिणाम सरळ ग्राहकाच्या मनावर होऊन ग्राहकांच्या मनात या व्यवहारांबाबत शंका तसेच भिती निर्माण होते. परिणामतः ग्राहक ऑनलाईन व्यवहार, रोकडरहित व्यवहार शक्यतः टाळण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. त्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशामध्ये आज इंटरनेटचा वापर आणि प्रसार वेगाने होऊन सुध्दा तसेच स्मार्टफोन धारकांची संख्याही वाढली असून सुध्दा 'रोकडरहित' व्यवहार तेवढे वाढलेले दिसून येत नाही किंवा मोठ्याा प्रमाणावर प्रचलीत झालेले दिसून येत नाही.

भारतात रोकडरहित व्यवहार मोठ्याा प्रमाणावर वेगवान व प्रभावी करावयाचे असल्यास प्रथम देशात सायबर न्याय व्यवस्था आणि सायबर सिक्युरिटी व्यवस्था सुरक्षित व सक्षम करायला हवे. प्रत्येक ऑनलाईन व्यवहाराची संपूर्ण क्रिया सुरक्षित यंत्रणेद्वारे व्हायला पाहिजे किंवा तशी व्यवस्था करायला पाहिजे. त्याचप्रमाणे सायबर हल्ले यांचे प्रमाण वाढू लागलेले आहेत. त्यामुळे बँकेच्या खात्यातून किंवा ऑनलाईन व्यवहार खात्याच्या यंत्रणेतून खातेदारांची वैयक्तिक व आर्थिक माहिती चोरली जावू शकते. म्हणून सायबर हल्ल्यांवर लक्ष ठेवण्याची आणि येत्या काळात सायबर हल्ल्याविषयी व सायबर गुन्हेगारी विरुद्ध आपली तयारी अधिक सक्षम व अत्याधुनिक करून प्रभावी व उचित न्याय व्यवस्था, यंत्रणा व सुरक्षा व्यवस्था यांचा विकास करून त्याचा प्रचार व प्रसार करण्याची गरज आहे.

**सुचना (उपाययोजना)** : १) सरकारद्वारे सीईआरटी संस्थेला प्रभावी व सक्षम (मजबूत) करण्याची आवश्यकता आहे. २) देशात सायबर न्यायव्यवस्था प्रभावीपणे राबवायला पाहिजे. ३) रोकडरहित व ऑनलाईन व्यवहाराबाबत ग्राहकांना संपूर्ण माहिती देण्यात यावी किंवा त्याचा प्रसार व प्रचार करावा. ४) भारत सरकारने आपली सायबर संरक्षण सिद्धता वाढवायला पाहिजे. ५) सरकारने सायबर स्पेस अत्याधुनिक बनवावी. ६) सायबर क्राईम या संदर्भातील कायदे कडक करण्यात यावेत. ७) माहिती तंत्रज्ञानासंबंधी लागलेल्या सर्व साहित्यांची, हार्डवेअर व सॉफ्टवेअरची निर्मिती भारतात करण्यात यावी. ८) रोकडरहित व्यवहार करणाऱ्याने आपला पासवर्ड सुरक्षित ठेवावा व अधुनमधुन त्याला बदलविण्यात यावा. ९) रोकडरहित व्यवहार करणाऱ्या यंत्रणांची व्यवस्था सुरक्षित करण्याकरिता प्रभावी व्यवस्था निर्माण करावी.

---

***संदर्भ ग्रंथ सुची :***


१. *स्मार्टपणे व्हा..... कॅशलेस प्रणव सखदेव, रोहन प्रकाशन, पुणे.*
२. *अधिकोषण - डॉ. राजपूत, साई ज्योती प्रकाशन, नागपूर.*
३. *बँकींगची मूलतत्त्वे आणि कार्यपद्धती डॉ. चव्हाण, प्रा. व्ही. एस.जैन, अर्थव पब्लिकेशन्स, धुळे.*
४. *मौद्रिक अर्थशास्त्र, भाग-२, एम.एस.कोलते, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.*
५. *बँक व्यवसायाची मूलतत्त्वे - डॉ. मुलाणी, डॉ. कदम, प्रा. मोरे, कब्लाश पब्लिकेशन्स्, पुणे.*
६. *व्यावसायिक संधटनेची मूलतत्त्वे - डॉ. दिनबाला बी. प्रबोधनकार, प्रा. आकाश बेले, साई ज्योती प्रकाशन, नागपूर.*
७. *पैसा पैश्याचे मूल्य आणि बँक प्रणाली, जोशी शरद, केंद्र नाशिक-२००५.*
८. *डॉ. सुधिर बोधनकर, प्रा. विवेक अलोणी, 'सामाजिक संशोधन पद्धती' साईनाथ प्रकाशन, नागपूर.*
९. *वर्तमानपत्रातील लेख व प्रकाशीत माहिती, नवभारत, दैनिक भास्कर, लोकमत, झिं चोवीस तास.*
१०. *सांकेतिक स्थळे, www.googal.com, Mr. Vikas pedia>e-governance , zeenws.india.com*

# व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणाचा दुर्बल घटकांवर पडलेला प्रभाव

*हेमचंद्र भैय्याजी रामटेककर, संशोधक विद्यार्थी, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर*
*मो. 9096597525 Email- hemchandrabramtekkar@gmail.com*

**प्रस्तावना :—** स्वांतत्र्यपूर्व काळात भारतातील व्यवसाय आनुवांशिक व जातीवर आधारीत होते. या जातिव्यवस्थेच्या बंधनामुळे जनसामान्यांना परंपरागत व्यावसायिक कामे करावी लागत होती. त्यामुळे त्यांना विकासापासून पद्धतशीरपणे वंचित ठेवण्यात आले होते. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्व प्रकारची विषमता नष्ट होऊन प्रत्येकाला शिक्षणाची व विकासाची संधी प्राप्त झाली. भारत नव्या विचारांची कास धरू लागला. पंचवार्षिक योजनांची व शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी होऊ लागली. भारतातील हरीतक्रांती व धवलक्रांतीमुळे विविध उद्योगधंदे व सेवाक्षेत्र वाढीस लागले आणि अल्पकाळातच व्यावसायिक शिक्षणाची विद्यापीठे, महाविद्यालये व संस्था मोठ्या प्रमाणात सुरू करण्यात आली. ही सर्व व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये व संस्था सरकारी नियंत्रणात व अनुदानावर चालणारी होती. त्यांचे खाजगीकरण झाले नव्हते. पण १९९० च्या दशकात भारताला गॅट करारात सहभागी होऊन खाजगीकरणाचे धोरण स्विकारावे लागले. यामुळे शिक्षणक्षेत्रात खाजगीकरणाचा शिरकाव झाला. आज व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण फार मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे दुर्बल घटकातील मुलामुलींना उच्च व व्यावसायिक शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. परिणामत: आर्थिक व सामाजिक विकासातून मिळणाऱ्या लाभांना ते मुक्त आहे. त्यामुळे व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणाचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिविकासावर, कुटूंबावर, समाजावर व देशावर देखील होत आहे.

प्राचीन काळापासूनच भारतीय समाजातील स्तररचना धर्म आणि जातीवर आधारलेली होती. त्यामुळे जातिविशिष्ट व्यवसाय कौशल्ये समाजात दृढ झाली होती. या जातीव्यवस्थेच्या बंधनामुळे जनसामान्यांना परंपरागत व्यावसायिक कामे करावी लागत होती. जसे ब्राह्मणाला धर्म, यज्ञ, हवन या संबंधित धर्मकर्माचे शिक्षण दिले जात होते. क्षत्रियांना युद्ध विद्या व राजनितीचे शिक्षण दिले जायचे. वैश्यांना वाणिज्य, व्यापार व कृषिविषयक शिक्षण मिळत होते. तर शुद्रांना शेती व हस्तकलांचे शिक्षण दिले जात होते. हे पारंपारिक व्यावसायिक शिक्षण प्रत्येक मुलाला त्याच्या कुटुंबातूनच परंपरागत पद्धतीनुसार शिकण्यास मिळत होते. त्या त्या व्यवसायाचे शिक्षण त्यांना घरीच मिळे, यात स्पर्धेला वाव नव्हता. अशाप्रकारे भारतात जातीआधारीत व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था केल्या गेली होती. पण या बंद स्तरीकरणातील जातीव्यवस्थेत अस्पृश्य जातीतील लोकांना शिक्षण पूर्णत: नाकारले होते. शुद्र जातीतील लोकांनीसुद्धा शिक्षण घेऊ नये अशी तत्कालीन समाजातील मुल्य व्यवस्था होती. तसेच आदिवासी व भटका समाज हा तर प्रगत समाजापासून कोसो दूर होता, त्यांच्या शिक्षणाचा प्रश्नच नव्हता.

एकंदरित समाजातील ७० टक्के दुर्बल वर्गाला विकासापासून वंचित ठेवून दाबून ठेवण्यात आले होते. त्यांची प्रगती होऊ शकली नाही. त्याला हजारो वर्षे गरीबीत जीवन काढावे लागले. पण अठराव्या शतकात पाश्चिमात्य देशात व इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. या औद्योगिक क्रांतीच्या प्रभावामुळे व इंग्रजांचे भारतातील आगमनामुळे भारताच्या समाजव्यवस्थेत व अर्थव्यवस्थेत बदल होत गेला. यामुळे कुटूंबातच वंशपरंपरेने प्राप्त होणाऱ्या व्यावसायिक शिक्षणाची परंपरा खंडीत होऊ लागली. भारतीय हस्तव्यवसाय व परंपरागत उद्योग मागे पडले. औद्योगिक क्रांतीमुळे व इंग्रजांच्या धोरणामुळे आपल्या देशात हळुहळु निरनिराळ्य व्यवसायांचा विकास होऊ लागला. उद्योगधंदे वाढले व वस्तुंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारे कारखाने निर्माण झाले. तरीही आवश्यक त्या प्रमाणात व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना झालेली नव्हती. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांकडून भारतात कारकूनी विद्येचेच शिक्षण प्रामुख्याने दिले जात होते.

देशाला स्वातंत्र्य मिळाले. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत सर्व धर्म, जाती, पंथ, वंश आणि लिंग असा कोणताही भेद न करता शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली आणि घटनात्मक व कायदेशीरदृष्ट्या सर्व प्रकारची विषमता नष्ट

झाली. जनतेला शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाने घेतली. त्यानंतर विविध शैक्षणिक आयोग व धोरणामुळे अल्पकाळातच व्यावसायिक शिक्षणाची विद्यापीठे, महाविद्यालये व संस्था मोठ्या प्रमाणात सुरू करण्यात आली. त्यामुळे भारतात उच्च व व्यावसायिक शिक्षण हे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचण्यास सुरूवात झाली. तसेच अनेक थोर पुरूष व समाजसुधारकांच्या प्रेरणेने वंचित व दुर्बल घटकात शिक्षण घेण्याप्रती जाणीव निर्माण झाली. परंपरागत धर्म व जातीच्या बेड्यांना तोडून या दुर्बल घटकाने शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन करीत विकास साधायला सुरूवात केली होती. त्याला वेग यायला लागला होता. वंचित आणि आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकातील मुलगा किंवा मुलगी बौद्धिक गुणवत्तेच्या आधारावर कोणत्याही शिक्षणात पुढे जाऊ शकत होती, शिक्षण घेऊ शकत होती. कारण उच्च व व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये व संस्था सरकारी नियंत्रणात व अनुदानावर चालणारी होती. त्यांचे खाजगीकरण झाले नव्हते. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळून गुणवंत व्यावसायिक व तज्ञ तयार होत होते.

पण १९९० च्या दशकात भारताची आर्थिक स्थिती बिघडली. देश आर्थिक संकटात सापडला. या आर्थिक अडचणीवर मात करण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडीमुळे भारताला गॅट करारात सहभागी होऊन उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारावे लागले. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात खाजगीकरणाचा शिरकाव झाला. खाजगी कायम विनाअनुदानित विद्यापीठे व महाविद्यालये स्थापन करायला परवानगी देता यावी यासाठी ‘खाजगी विद्यापीठे (स्थापना व नियमन) विधेयक’ १९९५ ला संसदेसमोर आणले व त्यासंबंधी अध्यादेश २००४ ला जारी करण्यात आले.[१] उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणासंबंधी असे अनेक विधेयके संसदेत पारित झाले आहे. त्यामुळे भारतात कायम विनाअनुदानित तत्त्वावरील महाविद्यालये, अभिमत खाजगी विद्यापीठे आणि इतरही स्वयंअर्थसहाय्यित उच्च व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था मोठ्या प्रमाणात स्थापन झालेली आहेत, इतकेच नव्हे तर शासनाच्याही उच्च व व्यावसायिक संस्थेमध्ये विनाअनुदानित तत्त्वावरील विविध अभ्यासक्रम चालविले जात आहे.

अशाप्रकारे मागील दोन दशकात उच्च व व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. भारतात २००१ ला खाजगी विद्यापीठांची संख्या २ होती, तर ती २०१७ ला २६० झाली. तसेच अभिमत विद्यापीठांची संख्या १२३ वर पोहोचलेली आहे. आजच्या स्थितीत भारतात ७९९ विद्यापीठे व ३९०७१ महाविद्यालये असून यातील उच्च व व्यावसायिक शिक्षणाची ७८ टक्के महाविद्यालये ही पारंपारिक व सरकारी नियंत्रणाच्या विद्यापीठाशी संलग्न असली तरी ती खाजगी कायम विनाअनुदानित आहे.[२] तसेच FICCI Higher Education Summit २०१२ नुसार खाजगी कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील संख्येचा विचार केल्यास २००१ मध्ये ४२.६ टक्के, २००७ मध्ये ६१.८ टक्के तर ती २०१२ मध्ये ६३.९ टक्के इतकी होती.[३]

**व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणाची संकल्पना :** भारतात अलिकडच्या दशकात उच्च व व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण विविध स्वरूपात होत आहे. ते पुढीलप्रमाणे आहे.

१. शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक संस्था व विद्यापीठांना स्वयंअर्थसहाय्यित म्हणजेच कायम विनाअनुदानित तत्त्वावर चालविण्यास मान्यता देणे व त्यासाठी लागणारा खर्च, भरमसाठ फी च्या रूपाने विद्यार्थ्यांकडून वसूल करणे.

२. शासकीय व अनुदानित उच्च व व्यावसायिक शिक्षण संस्थेत तसेच महाविद्यालयात विना अनुदानित तत्वावर विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणे.[४]

३. खाजगी अनुदानित संस्थांचे स्वयंअर्थसहाय्यित संस्थांमध्ये रूपांतरण करणे.

४. भारतात परदेशी गुंतवणुकीची खाजगी विद्यापीठे स्थापन होत आहे. ही विद्यापीठे आपल्या गुंतवणुकीचा नफा भरमसाठ शैक्षणिक शुल्काच्या रूपाने वसूल करीत आहे.

५. भारताने १९९१ ला मुक्त आर्थिक धोरण स्विकारल्याने व गॅट्स करारामुळे ‘शिक्षण’ हे सेवाक्षेत्र हळूहळू खाजगी क्षेत्रात हस्तांतरित करण्यात येत आहे.

अशाप्रकारे सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या उच्च व व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण होत

आहे. यामध्ये व्यावसायिक शिक्षणातून सरकारने आपला सहभाग काढून खाजगी संस्थांना खाजगीरीत्या चालविण्यासाठी स्वातंत्र्य दिले आहे. यामध्ये व्यवस्थापन व फी आकारणीवर सरकारचे आवश्यक नियंत्रण दिसून येत नाही.

**दुर्बल घटकाची संकल्पना :—** भारतात चातुर्वर्ण्य व्यवस्था जेव्हापासून अस्तित्वात आली तेव्हापासून जातीव्यवस्थेवर आधारित समाज रचनेतील सर्वात तळागळातील दुर्बल घटक म्हणून अनुसूचित जाती—जमाती, इतर मागासवर्गीय व स्त्रियांना ओळखले जाते. पण आधुनिक काळातील वेगवेगळ्या विचारवंतांच्या मते, 'जे दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहे त्यांना दुर्बल घटक म्हणता येईल.' याचा अर्थ दारिद्र्य म्हणजे काय? हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

**गिलीन आणि गिलीन** च्या मते, 'दारिद्र्य ही एक अशी परिस्थिती आहे की, ज्यामुळे कोणतीही व्यक्ती अपुरे उत्पन्न किंवा गैरवाजवी खर्चामुळे स्वत:चा जीवनस्तर हा उंचावू शकत नाही. व्यक्ती स्वत:ची शारीरिक व मानसिक तंदुरूस्ती टिकवून ठेवू शकत नाही. तसेच ते ज्या समाजाचे सदस्य आहेत त्या समाजाच्या जीवनमूल्याप्रमाणे योग्य प्रकारे कार्य करू शकत नाही.'[५]

**गोगार्ड** च्या मते, 'एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणारे इतर लोक यांचे स्वास्थ्य, आरोग्य व त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा अभाव किंवा अपर्याप्त पुरवठा म्हणजे दारिद्र्य होय.'[६]

थोडक्यात, 'समाजातील जे घटक अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मुलभूत आवश्यकतांची पूर्तता करू शकत नाही त्यांना दुर्बल घटक म्हणता येईल.' या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आज अनेक व्यक्ती असमर्थ ठरत आहेत. याचे मूळ कारण भारतातील सर्वसामान्य जनतेचे दारिद्र्य होय.आज जगातील एकूण दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण ९.६ टक्के (७०.५५ कोटी)[७] असून त्या तुलनेत भारतातील एकूण दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २१.९ टक्के (२६.९७ कोटी) इतके आहे. तर महाराष्ट्रातील एकूण दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण १७.४ टक्के (१. ९७ कोटी) आहे.[८] तसेच देशात ६७.५ टक्के स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींचे सरासरी उत्पन्न दरमहा ७५०० रूपयांपेक्षाही कमी आहे. तर ५७. २ टक्के नियमित नोकरी करणाऱ्या व्यक्तीचे सरासरी उत्पन्न दरमहा १०००० रूपयापेक्षाही कमी आहे.[९] यावरून लक्षात येते की, एकंदरीत भारतातील ५० टक्के सामान्य जनता ही दुर्बल घटकातील असून त्यांचे सरासरी उत्पन्न खूप कमी आहे.

त्यामुळे समाजातील जवळजवळ ५० टक्के असलेल्या वंचित व दुर्बल घटकांतील प्रतिभा देशाच्या प्रगतीत वापरता येत नाही, यामुळे देशाच्या बौद्धिक संपत्तीची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. अशाच प्रकारची हानी हजारो वर्षे झाली. जातीव्यवस्थेने समाजातील मोठ्या घटकाला शिक्षण, विकासाची संधी आणि मानवी हक्क नाकारले होते. त्यामुळे त्यांच्यातील मोठ्या प्रतिभेला मुकावे लागले. एकोणिसाव्या शतकापर्यंत पाश्चिमात्य राष्ट्रांत अनेक महत्त्वपूर्ण शोध लागलेत. त्यांची प्रगती झाली. पण भारतात सर्व नैसर्गिक उपलब्धता असूनही देश मागासलेला राहिला. जो पर्यंत समान संधी आणि सुविधा मिळणार नाही, तो पर्यंत भारत जागतिक महासत्ता होणार हे दिवास्वप्न नक्कीच राहणार आहे, यात कोणताही किंतु नाही.[१०]

**दुर्बल घटकावर पडलेला प्रभाव:—** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत एक प्रगतिशील, विज्ञाननिष्ठ राष्ट्र बनावे यासाठी पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आय. आय. टी., इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स यासारख्या उच्च शिक्षण संस्थांची पायाभरणी केली. ग्रामीण व शहरी भागांमध्ये शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार व्हावा म्हणून काही योजना कार्यान्वित केल्या. त्यांनतरच्या काळात भारताने विज्ञानासह अनेक क्षेत्रांत कौतुकास्पद प्रगतीही साधली असली तरी शिक्षणाचा सर्वांगीण प्रसार होण्याबाबत आजही निराशाजनक परिस्थिती आहे. आज उच्च व व्यावसायिक शिक्षण क्षेत्रामध्ये सरकारी शिक्षण संस्थांपेक्षा खासगी शिक्षण संस्थांचा वरचष्मा निर्माण झाला आहे. सरकारी शिक्षण संस्थामधील शिक्षण शुल्क हे समाजातल्या दुर्बल घटकातील उच्च व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या पालकांच्या खिशाला परवडण्यासारखे असते. मात्र खासगी शिक्षण संस्था आकारत असलेले

शिक्षण शुल्क हे गोरगरिबांच्या आवाक्यापलीकडे गेलेले आहे.

आज मोठ्या प्रमाणात व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण झालेले आहे. जसे अभियांत्रिकीसाठी प्रतिवर्ष ५० हजार ते १.५ लाख खर्च येतो. वैद्यकिय शिक्षणाला ५ ते १५ लाखांपर्यंत प्रतिवर्षाला खर्च येतो. विधी शाखेतही हे शुल्क ३५ हजारापर्यंत गेले आहे. तसेच भारतातील बहुसंख्य जनता दारिद्र्यात खितपत पडली आहे. त्यामुळे अशा महागड्या व्यावसायिक शिक्षणाचा लाभ फक्त श्रीमंताच्या मुलामुलींनाच घेता येईल. यामुळे श्रीमंत हे श्रीमंतच होतील व गरीब हे गरीबच राहतील. त्यामुळे दुर्बल घटकातील विद्यार्थी हे शिक्षणात तसेच जीवनाच्या विकासात मागे पडत आहे. पैसा, शैक्षणिक वातावरण व उत्तेजन यांच्या अभावी जन्मत: बुद्धिमान असलेल्या अनेक मुलांची बुद्धी गंजून जाते आहे. शासनातील अधिकारी वर्ग म्हणतात की, दुर्बल घटकांच्या विकासासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु महाविद्यालयातील प्रवेश फी, इतर निधी, पुस्तकांचा खर्च, इ. असे अनेक बाबी सांगून विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क घेतले जाते. ज्यामुळे शिष्यवृत्ती मिळूनही इतर अवाढव्य खर्चामुळे दुर्बल घटकातील मुलांना व्यावसायिक शिक्षण घेणे परवडणारे नसते. तसेच इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांना ५० टक्के स्कॉलरशिप मिळते, तर गरीब पण खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना काहीच सवलती नाही. यामुळे समाजात एक असमतोल निर्माण होऊन सामाजिक विषमता वाढतच आहे.

सध्यातरी खाजगीकरणामुळे व पैशाअभावी दुर्बल घटकांना व्यावसायिक शिक्षणाची समान संधी प्राप्त होत नाही. त्यामुळे या घटकात बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. आज भारतात बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, उडिसा, झारखंड आणि उत्तर भारतातील पहाडी राज्यांमधील तरूणांमध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे. 'आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या (International Labour Organization) 'वर्ल्ड एम्प्लॉयमेंट सोशल आउटलुक : ट्रेन्ड्स २०१८' च्या अहवालानुसार २०१७ ला भारतातील बेरोजगारीचे प्रमाण ३.५ टक्के होती. आकडेवारीत सांगायचे झाल्यास २०१७ ला बेरोजगारांची संख्या १.८३ कोटी होती तर २०१८ ला १.८६ कोटी झाली. तर २०१९ मध्ये १.८९ कोटी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच आगामी दोन वर्षात भारतातील बेरोजगारी कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत, असे आय. एल. ओ. या संस्थेचा अंदाज आहे.'[११]

आज लाखों अकुशल मुलांना रोजगारांसाठी वणवण करावी लागत आहे. त्यांच्याकडे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी आर्थिक परिस्थिती नसते, नोकरी सुद्धा मिळत नाही. व्यावसायिक किंवा रोजगाराभिमुख शिक्षण न मिळाल्याने ते बेरोजगार होत आहे. अशा परिस्थितीत ही मुले गुन्हेगारी क्षेत्राकडे सहज वळू शकतात. त्यामुळे त्यांच्यात व्यसनाधिनता, खून, दरोडे, चोरी इ. अशा अनेक वाईट सवयी हळूहळू जडत आहे. त्याचबरोबर असा अभावग्रस्त, वंचित व दुर्बल घटकातील तरूण वर्ग नक्षलवाद, आतंकवाद आणि गैरविधायक प्रवृत्तीला बळी पडत आहे. केवळ कागदी नोटांचे चलन कोटी रूपयांमध्ये जमा करणारे सरकार व शिक्षणसम्राट या राष्ट्राची संपत्ती, सामाजिक आधार असलेली तरूणाई उध्वस्त करीत असतांनाही आत्मसंतुष्ट व विचारांनी संकुचित झालेला समाज जागतिकीकरणाच्या गुंगीतून पारतंत्र्यात जात असल्याचे जाणवते. पर्यायाने राष्ट्राचे स्वातंत्र्यही अबाधित कसे राहू शकेल ? सामाजिक व शैक्षणिक अध:पतन सहन करणारा समाज हा षंढत्त्वाचे लक्षण आहे. शिक्षणाचा बाजार मांडणारे शिक्षणसम्राटच सत्तेच्या ठिकाणी पोहचल्याने हजारो कोटी रूपये मिळवून व सत्ता संपादनासाठी वापरणारे सत्ताधीश झाल्याचे दिसत आहे. शिक्षण प्रक्रियेतून समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे, पालकांचे आर्थिक शोषण हे सरकारातील सत्ताधाऱ्यांना व शिक्षणसम्राटांना मान्य असल्याने त्यांना रोखणारे मनगटे दुबळी झाली.

आज देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास सात दशके झाली. स्वातंत्र्य मिळाल्यावर परिस्थिती बदलेल अशी आशा होती. काही प्रमाणात परिस्थिती देखील बदलली. पण आपल्या प्रगतीची गती मंदच राहिली. आज आधुनिक भारतात शिक्षण, नोकरी, व्यवसाय वा इतर कोणत्याही बाबतीत आपला विकास करून घेण्यासाठी कोणतेही बंधन राहिलेले नाही. पण सद्यस्थितीत आर्थिक परिस्थिती उत्तम असलेल्या

पालकांनाच आपल्या मुलांच्या विकासासाठी उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी व साधने उपलब्ध होऊ शकतात. ती दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकणार नाही म्हणजेच गरीब, वंचित, दुर्बल घटकातील मुलांचा विकास होऊ शकणार नाही. तात्पर्य या दुर्बल घटकांमध्ये प्रगती करण्याच्या आशा—आकांक्षांना अडथळा निर्माण झाला आहे. खाजगीकरण व पैश्याअभावी दुर्बल घटकामध्ये नैराश्यता निर्माण होऊन ते भावी जीवनातही दु:खी व निराश असतात. त्यांना रोजगाराभिमुख शिक्षण न मिळाल्याने त्यांच्या बेरोजगारीत वाढ होत असून ते गुन्हेगारी व इतर वाईट मार्गावर वळत आहे याचा परिणाम त्यांच्या मानसिक व सामाजिक आरोग्यावर होऊन समाजाची सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची गती मंदावत आहे आणि समाजात सामाजिक व आर्थिक विषमतेत वाढ होत आहे. एकंदरित या दुर्बल घटकांमध्ये अस्थिरतेची भावना वाढून समाजाचे अध:पतन होऊन देशाचे नुकसान होत आहे.

**समारोप** :— स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत एक प्रगतीशील, विज्ञाननिष्ठ राष्ट्र बनावे यासाठी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी आय.आय.टी., इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स यासारख्या उच्च शिक्षण संस्थांची पायाभरणी केली. ग्रामीण व शहरी भागांमध्ये शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार व्हावा म्हणून १९५१ ते १९९० पर्यंत अनेक योजना कार्यान्वित केल्यात. त्यामुळेच भारताने विज्ञानासह अनेक क्षेत्रात कौतुकास्पद प्रगतीही साधली व ती अशीच वेगाने साधता आली असती पण व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षणाचा सर्वांगीण प्रसार होण्याबाबत निराशा निर्माण झाली आहे. उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे सरकारी शिक्षण संस्थांपेक्षा आता खाजगी शिक्षण संस्थांचा वरचष्मा निर्माण झाला आहे. सरकारी शिक्षण संस्थांमधील शिक्षण शुल्क हे अनुसूचित जाती, जमाती, अन्य मागासवर्गीय, महिला, भटके, विमुक्त तसेच दुर्बल घटकातील मुलांच्या पालकांच्या खिशाला परवडण्यासारखे असते. मात्र खाजगी शिक्षण संस्था आकारत असलेले शिक्षण शुल्क हे वंचित व दुर्बल घटकांच्या आवाक्यापलीकडे गेलेले आहे.

अलीकडच्या शैक्षणिक धोरणातून मानवी क्षमता विकसनाची संधी समाजातील वंचित व दुर्बल घटकांना देत नाही. या वंचित व दुर्बल घटकातील प्रतिभा देशाच्या प्रगतीत वापरता येत नाही. यामुळे देशाच्या बौद्धिक संपत्तीची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. आज व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे अनेक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना या शिक्षणापासून पद्धतशीरपणे वंचित ठेवले जात आहे. त्यामुळे या दुर्बल घटकात अकुशल कामगारांचे व बेरोजगारीचे प्रमाण वाढत असून त्यांच्यात अनेक वाईट सवयी जडत आहे. याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिविकासावर, कुटूंबावर, समाजावर, देशावर तसेच त्याच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनावर होत आहे. याकरिता सरकारने या नवीन उच्च व व्यावसायिक शिक्षणातील धोरणांचा फेरविचार केला पाहिजे.

---

संदर्भ :—


१. *धनागरे डॉ. द. ना. (२०१०), उच्च शिक्षण : ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे, लोकवाङ्मयगृह, मुंबई., पृष्ठ १६७, १६१.*

२. *All India Survey on Highter Education (2015-16); MHRD, Department of Higher Education, New Delhi.*

३. *Higher Education in India – 12th FYP (2012-2017) and beyond, FICCI Higher Education Summit 2012.*

४. *आगलावे डॉ. प्रदिप (२०१५), भारतीय समाज: प्रश्न आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृष्ठ १८४*

५. *आगलावे डॉ. प्रदिप (२०१३), भारतीय समाज संरचना आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृष्ठ १३६*

६. *तत्रैव — पृष्ठ १३७*

७. *https://ourworldindata.org/extreme-poverty*

८. *Report of the Expert Group to Review the Methodology for measurement of Poverty, Government of India, Planning Commission, June 2014*

९. *https://cmie.com/kommon/bin/sir-php?kall=warticle&dt=2016-09-30%2013:55:47& msec =993*

१०. *पवार डॉ. दिपक कृ. (मार्च २०१६), उच्च शिक्षणाचे वर्तमान स्वरूप, मराठी समाजशास्त्र परिषद, समाजशास्त्र संशोधन पत्रिका, औरंगाबाद. अंक २०, पृष्ठ २२, २३*

११. *World Employment Social Outlook : Trends 2018, International Labour Organization, Geneva.*

# कवडस येथील ऐतिहासिक गढी : एक ऐतिहासिक वारसा

***प्रा. डॉ. टी.जी. गेडाम,*** *माजी इतिहास विभाग प्रमुख, संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा, जि. नागपूर.*

**प्रस्तावनाः–** स्वायत्ततापूर्ण ग्राम किंवा खेडयाची शासनव्यवस्था हे मराठे कालीन शासनव्यवस्थेचे एक प्रमुख वैशिष्टय आहे. गावाचा कारभार आणि संरक्षण या दोन्ही दृष्टीने खेडी स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी होती. "पाटील हा गावाचा प्रमुख अधिकारी असे, पाटीलकी ही वंशपरंपरेने चालणारे वतन होते, पाटलाला त्याच्या कामाच्या मोबदल्यात उत्पन्नातून एक भाग दिला जाई, महसुल व्यवस्थेबरोबरच खेडयाची संपूर्ण व्यवस्था पाटील पाहत असे. त्याच्या मदतीला इतर अधिकारीही असत."

"महसुल विभागाशी संबंधीत पुन्हा दोन पदे होती. ती म्हणजे देशमुख व देशपांडे यांची एका विशिष्ट प्रदेशाच्या किंवा देशाच्या मुख्य प्रशासकीय अधिकाऱ्याला देशमुख व त्याच प्रदेशातील शेतसारा विषयक कामाची जबाबदारी पार पाडणाऱ्या अधिकाऱ्याला देशपांडे असे नांव होते. देशमुखास गावाच्या शेतसाऱ्याचा १/१० भाग आपल्या कामाच्या मोबदल्याच्या रूपाने मिळत असे. परगण्यातील सर्व शेतीयोग्य जमीन लागवडीखाली आणने, परगण्यातील सर्व तंटे-बखेडे मिटविणे, गावाच्या सीमा ठरविणे, आपल्या प्रदेशात सरकारी अमल, शांतता व व्यवस्था राखणे इ. कामे देशमुखाला करावी लागत. या सर्व कामात देशपांडे त्यांना मदत करीत. या दोन्ही वतनदारांकडे मोठमोठया जमीनी व प्रदेश असल्यामुळे कित्येकदा राजाला न जुमानता ते आपल्या प्रदेशात स्वतंत्र राजाप्रमाणे कार्य करीत."[२]

पुढे चालून या खेडयातील शासनव्यवस्थेलाच नाईक या पदाची जोड मिळाली. नाईक हाही खेडयातील वतनदारच, त्याला जमीनदार किंवा मालगुजारही म्हणता येईल. अनेक गावांचा कारभार नाईकाकडे असे. शिवाय त्या गावातील जमीन आणि परिसरातील जंगलावरही नाईकाचाच अधिकार असे. त्याच्या अधिकारातील प्रदेशात त्याचा वचक व दरारा असे. भरपूर जमीन, भरपूर संपत्ती, नोकर-चाकर असल्यामुळे तो चैन व विलासात जीवन जगत असे. गावगाडयात त्याला भरपूर मान व प्रतिष्ठा असे. लोक त्याच्या आदेशाचे पालन करीत. स्वतःला व कुटुंबीयांना राहण्याकरिता त्यांनी मोठमोठया हवेल्यांची निर्मिती केली होती. एवढेच नाही तर स्वतःच्या संरक्षणासाठी भरपूर तटबंदी असलेल्या किल्लेवजा गढीची निर्मितीही त्यांनी केली होती. परंतु पुढील काळात या मंडळींना खेडयातील जीवन निरस व कंटाळावाणे वाटू लागले. यामुळेच ते शहरात येवून वास्तव्य करू लागलेत. खेडयातील सर्व कारभार व जमीनीची देखभाल करण्याकरिता त्यांनी दिवानजी नेमलेत. या दिवानजीच्या नेतृत्वात भरपूर नोकर-चाकर असत. दिवानजीच्या अधिकारात नाईकांचा खेडयातील कारभार व जमिनीची व्यवस्था कित्येक वर्ष सुरू राहिली.

**लघु शोध निबंधाचा उद्देश्यः–** ऐतिहासिक स्मारकांचा शोध घेणे, त्यांची माहिती गोळा करून अशा वास्तुंचा किंवा अवशेषांचा इतिहास संकलीत करणे, त्यांचा अभ्यास करणे, विद्यार्थ्यांना अशा अवशेषाबद्दलची माहिती अवगत करून देणे व त्यांच्या इतिहासाच्या ज्ञानात भर घालणे, प्रत्यक्षपणे असे अवशेष विद्यार्थ्यांना दाखविणे व यातुन आपल्या देशाचा इतिहास जाणून घेणे, अशा विविध उद्देशाने हे शोधकार्य करण्यात आले.

**संशोधनाची पध्दतीः:–** महाविद्यालयातील इतिहासाच्या विद्यार्थ्यांना सोबत घेवून या ऐतिहासिक स्मारकाला भेट देण्यात आली. यात प्रथम, व्दितीय आणि तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्रथमतः विद्यार्थ्यांना या संशोधनाचा उद्देश सांगुन कवडस येथील या जमीनदाराच्या गढीची माहिती देण्यात आली. व नंतर विद्यार्थ्यांसोबतच गढीचे निरिक्षण करून माहिती घेण्यात आली. या गढीबद्दल गावातील काही लोकांकडूनही माहिती जाणून घेण्यात आली. यात गावातील बुजूर्ग आणि जानकार लोकांचा समावेश होता. तसेच कवडस येथीलच एक जमीनदार लक्ष्मण (आटोळे) आठवले यांच्या पिढीतील त्यांचे वंशज भिमसींग आठवले यांची भेट घेवून त्यांच्याकडून गढीबद्दल माहिती घेण्यात आली. गढीच्या बांधकामाचे प्रत्यक्षपणे मोजमाप करण्यात आले. राणोजी नाईकांनीच बांधलेल्या गांवातील तलावाला भेट देवून निरीक्षण करण्यात आले. माहितीची सत्यता पटविण्याकरिता गढीची आणि तलावाचीही छायाचित्रे घेण्यात आलीत.

**गढीचा इतिहासः:–** कवडस हे गांव नागपूर जिल्हयात आणि हिंगणा तालुक्यात येत असून, नागपूरपासून जवळ-जवळ ३२ कि.मी. अंतरावर बसलेले आहे. हे गांव फारसे मोठे नसले तरी सभोवतालची जमीन सुपीक आहे. तसेच गांवाच्या

सभोवताल जंगल असून या जंगलात सागवान वृक्षांची रेलचेल आहे.

प्रस्तुत गढीची माहिती दुसरा रघुजी यांच्या बखर नं. २ मध्ये असल्याची माहिती इतिहासाचे अभ्यासक भिमसींग आठवले यांनी सांगितले. (परंतु त्यांनी सांगितलेल्या ग्रंथालयात हा ग्रंथ आज उपलब्ध नाही.) नागपूरकर भोसल्यांचा इतिहास या ग्रंथातही राणोजी नाईकांच्या वंशावळीची माहिती आलेली आहे.

सन १६६१ ला पानीपतच्या रणमैदानावर मराठे आणि अफगानीस्थानचा शासक अहमदशहा अब्दाली यांच्यात घनघोर संघर्ष घडून आला. या प्रसंगी सदाशिवराव भाऊ उर्फ भाऊसाहेब यांच्या नेतृत्वात जवळ जवळ १ लक्ष मराठा सैन्य युध्दात उतरले होते. परंतु अहमदशहा अब्दालीकडून या युध्दात मराठयांचा दारूण पराभव झाला. मराठयांकडील मोठमोठे सेनानी या युध्दात मारले गेले. असंख्य सैनीकही युध्दात कामी आले यातील जे बचावलेत ते आपापल्या परीने गवसेल त्या मार्गानी पळून गेलेत. यातीलच राणोजी नाईक व लक्ष्मण (आटोळे) आठवले हे मराठा सरदार पानीपतावरून परततांना हिंगणा तालुक्यातील कवडस या गांवाच्या मार्गाने आलेत. त्यांना हा परिसर व येथील सुपीक जमीन आवडल्यामुळे ते दोघेही मराठा सरदार कवडस येथेच स्थायीक झालेत.

“नागपूरकर भोसल्यांच्या अधिकारात असलेल्या प्रदेशात त्यावेळी पाच सुभे होते. यातील देवगड सुभ्यात किवा प्रान्तात नागपूर आणि त्याच्या सभोवतालचा सर्व भाग येत होता.”[३] याच प्रान्तात कवडस हे गांव येत होता. राणोजी नाईक या मराठा सरदाराने सुरूवातीला आपला जम बसविण्याकरिता पेंढारी लोकांना हाताशी घेतले. “त्याकाळी पेंढाऱ्यांच्या मोठमोठया टोळया निरनिराळया नाईकांच्या हाताखाली असत.”[४]. या पेंढाऱ्यांच्या मदतीने राणोजी नाईकांनी आजूबाजूच्या परिसरात लुटमार सुरू केली. उत्तरोत्तर राणोजींची लुटमारी वाढत गेली. यातुनच त्यांच्याकडे भरपुर संपत्ती गोळा झाली. या बळावर त्यांनी कवडसच्या परिसरातील अडीच गांवे विकत घेतली. नंतर छिंदवाडयाकडील राजना, कोंढाळीकडील राहटी काजोळी आणि परिसरातील एकंदर साडे सोळा गांवाची जमीनदारी विकत घेवून राणोजी नाईक हे कवडसचे मालगुजार बनले. त्यांच्या या मालगुजारीचे मुख्य क्षेत्र कवडस हेच होते.

दुसरे मराठा सरदार लक्ष्मण आठवले हे ही कवडस येथेच स्थायीक झालेत. त्यांनी शेती आणि सावकारी सुरू केली. हळूहळू त्यांची सावकारी वाढत गेली. त्यांच्याकडेही संपत्ती गोळा झाली. या बळावर त्यांनीही मोठया प्रमाणात जमीन विकत घेतली. जवळ ८५० एकर जमीन आठवले यांचेकडे होती. यामुळे तेही कवडस येथील एक जमीनदार म्हणून ओळखले जावू लागले.

कवडस येथे स्थायीक झालेल्या या दोन्ही मराठा सरदारांमध्ये पुढे चालुन सत्तास्पर्धा सुरू झाली. येथील गांवकऱ्यांना ते आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करू लागलेत. यामुळे अर्धे गांव आठवले या जमीनदाराकडे आले तर अर्धे गांव राणोजी नाईकांकडे आले. आपापल्या परिने हे दोघेही गांवकऱ्यांना मदतही करीत असत.

**राणोजी नाईकांची वंशावळः**:– राणोजी यांचे पूर्वीचे आडनाव गाईकवाड असे असावे. परंतु त्यांना भोसल्यांच्या राजवटीत नाईक हे पद मिळाल्यामुळे ते नंतर नाईक याच नावानी ओळखले जावू लागले व पुढे चालुन हेच त्यांचे आडनाव बनले असावे. “नागपूरकर भोसल्यांचा इतिहास“ या ग्रंथात खालील प्रमाणे नाईकांची वंशावळ दाखविण्यास आली आहे“[५].

नाईक (गायकवाड)
!
------------
! !
दारकोजी विश्रामजी
!
गिरमाजी नाईक (सिलेखान्याचा मुख्य)
!
राणोजी नाईक
(पुढील वंशज नागपूरला स्थायिक)

राणोजी नाईकांचे कवडस येथील गढीला लागुन असलेल्या हवेलीतच वास्तव्य होते. पण नंतर त्यांच्या वंशजांनी नागपूर येथे राहायला सुरूवात केली. महालच्या परिसरात त्यांचा वाडा आहे. राणोजी नाईकांच्या पत्नीचे नाव मंजुळाबाई असे होते. त्यांना एकही मुलगा नव्हता. फक्त मुलीच असल्यामुळे मुलीच्या मुलालाच दत्तक घेवून वंश पुढे चालविला. नंतर या घराण्यात मुलींच्या मुलांनाच दत्तक घेतले. नाईकांची पिढी ही दत्तकांचीच आहे असे बोलले जाते.

**गढीचे बांधकामः**– राणोजी नाईकांनी बांधलेल्या या गढीचे अस्तीत्व काही वर्षातच संपुष्टात येईल. कारण ही गढी अतिशय जीर्ण होवून पडायला लागली आहे. पाच वर्षापूर्वी या गढीच्या चारही भिंती अस्तीत्वात होत्या. पण आज तीन बाजुच्या भिंती कोसळलेल्या आहेत. फक्त एका बाजुचीच भिंत कायम आहे. परंतु आतल्या बाजुंनी ही भिंतही पोखरत चालली आहे. सुरूवातीला राणोजी नाईकांनी स्वतःला राहण्याकरिता

एका हवेलीची निर्मिती केली होती. त्या हवेलीत ते आपल्या कुटुंबासोबत राहत असत. त्या हवेलीतच प्रशस्त दिवाणखाना होता. शयनकक्ष होते व इतर अनेक सोयी होत्या. समोरच एक गुरांसाठी प्रशस्त गोठा बांधण्यात आला होता. काही वर्षानंतर हवेलीला लागुनच या गढीची निर्मिती करण्यात आली. कारण नंतरच्या काळात भोसल्यांच्या प्रदेशावर वारंवार पेंढारी लोकांची आक्रमणे सुरू झाली होती. हे पेंढारी लोक गांवात शिरून लुटमार करीत. लोकांना ठार मारत आणि महिलांची अब्रु लुटत. अशा प्रसंगी स्वतःचा व स्वतःच्या कुटुंबीयांच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. यावर तोडगा म्हणून राणोजी नाईकांनी या गढीची निर्मिती केली. याचबरोबर अशा आक्रमणाच्या प्रसंगी गावातील लोकही गढीचा आश्रय घेवू लागलेत.

या गढीची लांबी ६० फुट असून रूंदी ५६ फूट आहे. (आतला भाग) भिंतीची उंची ५० फुट असून जाडी ८ फूट आहे. गढीच्या चारही कोपऱ्यांवर चार प्रशस्त बुरूज आहेत. या बुरूजांची उंचीही ५० फुट आहे. या बुरूजांची गोलाई ६३ फुट (बाहेरून) असून आतून हे बुरूज जवळ-जवळ २० फुट गोल आहेत. यातील तीन बुरूज पोकळ असून एक बुरूज मात्र पोकळ ठेवण्यात आला नाही. गाांवकऱ्यांच्या मतानुसार या बुरूजावर पीर बाबांचे ठाणे होते. राणोजी नाईक आणि लक्ष्मण आठवले हे दोघेही तसेच गावकरीही पीर बाबांना मानत असल्यामुळे बुरूजावर हे ठाणे निर्माण करण्यात आले होते. या सर्व बुरूजांवर चढण्याकरिता पायऱ्याची व्यवस्था करण्यात आली होती. लोक बुरूजांवर चढून तेथे बसत असत. याशिवाय चारही बाजूंच्या भिंतीची रूंदी प्रशस्त असल्यामुळे भिंतीवरून चारही बाजुंनी फिरता येत असे. शिवाय गढीच्या चारही भिंतीच्या आत तळघरासारखी पोकळ जागा असून त्यातुनही लोक ये-जा करित असत असेही बोलले जाते. भिंतीला लागुन ठिकठिकाणी धान्य साठवून ठेवण्यासाठी मोठया बकाऱ्या निर्माण केलेल्या आहेत. गढीच्या मध्यभागीही तळघर असावे असा अंदाज आहे.

गढीच्या चारही बाजूंच्या भिती किल्यासारखा बांधलेल्या आहेत. भिंतींना सर्वात वर छिंद्रे ठेवण्यात आलेली आहेत. आक्रमणाच्या वेळी या छिंद्रामधून बाहेर शत्रुंवर गोळीबार करण्यात येत असे. गांवावर पेंढाऱ्यांचे आक्रमण झाले असता लोक या गढीचा आश्रम घेत व यावेळी या गढीवरून शत्रुवर गोळीबार केला जाई. गढीच्या मागच्या एका बुरूजातून गांवातील तलावापर्यंत जाण्याचा भूमार्ग होता असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. नाईक व त्याचे कुटुंबीय आंघोळीसाठी या तलावावर जात असत. गढीपासून हा तलाव १/२ कि.मी. च्या अंतरावर आहे. हा तलाव चौकोणी पध्दतीचा असून चारही बाजूंनी काळया दगडाची प्रशस्त भिंत घातली आहे. गढीतून बाहेर पडण्यासाठी जो भूमार्ग होता त्या मार्गावर एक दरवाजा आहे. या दरवाजाच्या चौकटीची उंची ४ फुट १ इंच असून रूंदी २ फूट ३ इंच आहे. ही चौकट दगडाची आहे.

या किल्लेवजा गढीच्या बांधकामाला केव्हा सुरूवात झाली हे स्पष्ट नसले तरी या गढीचे बांधकाम इ.स. १८५४ मध्ये पूर्ण झाले. गढीचे बांधकाम अतिशय मजबूत आहे. माती, चुना, रेती, बेलांची चिक्की व काळा गुळ एकत्र करून, तो घोटून त्यांचा मसाला तयार करण्यात येत असे. या मसाल्याने दगडांची जुडाई करण्यात येत असे. गढीच्या पायव्याला संपूर्णपणे काळा दगड वापरण्यात आला आहे. तसेच बुरूजांच्या बांधकामासाठीही काळा दगड वापरला आहे. भितीसाठी मात्र काळा दगड व गोल दगडांचाही, वापर करण्यात आला आहे. एकंदरीत नगरधनच्या किल्यासारखे या गढीचे बांधकाम आहे. आज या गढीच्या तिनही बाजूंच्या भिंती कोसल्यामुळे सर्वत्र माती आणि दगड पडलेले आहेत. या गढीचे दगड गावातील लोक आपल्या घरांचे बांधकाम करण्याकरिता राजरोसपणे घेवून जातात. एकंदरीत ही गढी पूर्ण पणे दुर्लक्षीत आहे. गढीचा एक बुरूज पुर्णपणे कायम आहे. तर तिन बुरूज काही प्रमाणात कोसळलेल्या स्थितीत उभे आहेत. गांवकऱ्यांच्या मतानुसार पूर्वी दर तीन वर्षानी कवडस या गांवाला आग लागत असे. अशा एका आगीतच किल्यातील हवेली पूर्णपणे जळून खाक झाली.

राणोजी नाईकानंतरची पीढी नागपूर येथे वास्तव्याला राहत असल्यामुळे दिवानजी व नोकर-चाकरच या हवेलीत वास्तव्य करायचे. शेतीवाडीची देखभाल हे लोकच करीत असत. यात तुकाराम परतेकी व निलकंठराव साबळे हे नाईकांचे दिवाणजी होते. अलीकडे ही हवेलीही अस्तित्वात नाही. गांवातील जमीनीबरोबरच आजुबाजूच्या जंगलावरही राणोजी नाईकांचाच अधिकार होता.

कवडस येथील दुसरा जमिनदार लक्ष्मण आठवले यांचा वाडाही या गढीला लागुनच होता. त्यांचे दोन वाडे होते. आज एक वाडा अस्तित्वात नाही. परंतु एका वाडयाचे काही अवशेष शिल्लक आहेत. त्या अवशेषांचे जतन आठवलेंच्या पाचव्या पीढीतील भिमसींग मानीकराव आठवले यांनी केले आहे. या कोसळणाऱ्या वाडयावर छत घालून ते तेथे काही काळ वास्तव्याला असतात. या वाडयात त्यांनी आपले धान्य

ठेवल्याचे दिसून आले गढीच्या भिंतीला लागूनच आठवलेंनी एक हनुमान मंदिर बांधले. हे मंदीर आज ही अस्तित्वात आहे. या हनुमानाच्या देवळाखाली आठवलेंची धान्य साठवण्याची बकारी होती. त्या बकारीत जवळ-जवळ १५० पोती धान्य साठविण्यात येत होते. हे आठवले जमीनदार मुळचे पुणे-सोलापूर मार्गावरील शिरसुफळ या गांवाचे रहिवासी होते.

**निष्कर्ष :- पुरातन वास्तुंचे संरक्षण करण्याची गरज :-** एके काळी कवडस हे गांव राणोजी नाईकामुळे व या गढीमुळे हिंगण्याच्या परिसरात प्रसिध्द होते. परंतु आज राणोजी नाईकही नाहीत आणि गढीही पूर्ण रूपात उभी नाही. कोसळलेल्या गढीचे अवशेष तेवढे शिल्लक आहेत. काही वर्षात ते अवशेष ही पूर्णपणे संपुष्टात येतील आणि मध्यकाळातील इतिहासाची ही धरोहर काळाच्या ओघात पूर्णपणे विस्मृतीत जाईल.

भारताचा इतिहास जाणून घेण्याकरिता या पुरातन वास्तुंची अवशेषांची अतिशय मोलाची मदत होत असते. या अवशेषांवरूनच आपणांस भुतकाळातील इतिहास अवगत होतो. म्हणून अशा वास्तुंचे किंवा अवशेषांचे जतन करणे आवश्यक आहे. असे हे अवशेष संपूर्ण भारतभर पसरलेले आहेत. यातील काही मोठया अवशेषांचे निश्चितच शासनाकडून जतन होत आहे. परंतु लहान-लहान असे असंख्य अवशेष पूर्णपणे दुर्लक्षीत आहेत. असे अवशेष गावगाडयातही मोठया प्रमाणात आहेत. ते दुर्लक्षीत असल्यामुळे जीर्ण होवून पडत आहेत. काही पूर्णपणे पडलेले आहेत. या वास्तुंचे, अवशेषांचे जतन करण्यात आले नाही तर इतिहासाचा हा अनमोल ठेवा काळाच्या उदरात गडप होण्याचा धोका आहे. म्हणून इतिहासाच्या अभ्यासकांनी या स्थानिक इतिहासाकडे दुर्लक्ष न करता या इतिहासाचे जतन करण्याकरिता पुढे यावे.

*संदर्भ :-*


१. *बारगळ, बा.सा./ढवळे, प्र.कृ. "मराठयांचा इतिहास" विद्या प्रकाशन द्वितीय आवृती १९८८, पृष्ठ क्र. १८७.,*
२. *कित्ता - पृष्ठ क्रं. १८८.*
३. *काळे, यादव माधव "नागपूरकर भोसल्यांचा इतिहास" द्वितीय आवृत्ती- १९७६, पृष्ठ क्र. ३२२.*
४. *कित्ता, पृष्ठ क्र. २५०*
५. *कित्ता, पृष्ठ क्र. ३६०*
६. *भीमसिंग आठवले यांची मुलाखत . (आठवले सरदाराचे वंशज)*
७. *तुकाराम परतेकी व निलकंठराव साबळे (दिवानजी) यांच्या वंशजांची मुलाखत.*
८. *गढीचे प्रत्यक्षपणे निरीक्षण आणि परिक्षण करून घेतलेली माहिती.*

# स्त्री सक्षमीकरण : एक दृष्टिक्षेप

*डॉ. **प्रा. संतोष मेंढेकर,** समाजशास्त्र, विभाग प्रमुख, रेणूका कॉलेज, बेसा, नागपूर.*
*मो.नं. 9860015025] 8788968622 santoshmendhekar@gmail.com*

**प्रस्तावनाः–** संपूर्ण जगात भारत देश आपली संस्कृती, परंपरा, आध्यात्म व भौगोलिक विविधता यामुळे ओळखला जातो. ही नाण्याची एक बाजू झाली. पण हाच देश जगभर पुरूषप्रधान संस्कृतीसाठी ही प्रसिध्द आहे. तसे बघितले तर भारतात महिलांना आदि शक्तीचे रूप मानून पुरातन काळापासून पुजनीय मानले गेलेले आहे. त्याचवेळी याच भारत देशात महिला घरात आणि समाजात बंधनामध्ये अडकून पडल्या आहेत. त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. त्यांचे अधिकार व विकास यापासून त्यांना पूर्णपणे दूर केले जाते. तरी सुध्दा येथे स्त्री–पुरूष समानतेच्या गोष्टी बोलल्या जातात. महिलांच्या स्वातंत्र्य व अधिकार याविषयी कळकळ व्यक्त केली जाते. असे असतांना ही निर्भयाकांड किंवा कोपर्डी सारख्या अमानुष अत्याचाराच्या घटना घडतात आणि अशावेळी आपल्या समोर महिलांचे बिकट समस्या बनुन उभ्या राहतात. त्यावर आचार म्हणून समाजात महिलांना स्वायत्तता सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविण्यास सुरूवात करतो.

मुळातच भारतीय महिला ही कधी अबला नव्हतीच, भारत हा नवदुर्गेची पूजा करणाऱ्या संस्कृतीतील स्त्रीशक्तीचा देश आहे. प्रत्येक यशस्वी पुरूशांच्या मागे एका स्त्रीचा सहभाग असतो असे येथे म्हटले जाते. किंबहुना या समाजात घडलेले महापुरूष स्त्रीमुळे घडले. राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, मदर टेरेसा, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, कल्पना चावला, सुनिता विल्यम, पी.टी. उषा आणि इतरही अनेक कर्तृत्ववान महिलांनी या देशाचा नाव लौकीक वाढविला आहे. राजामाता जिजाऊ होत्या म्हणून संस्कारमुर्ती व किर्तिवंत छत्रपती शिवराय घडले. सावित्रीबाई फुलेंची साथ होती म्हणून ज्योतिबा फुले महात्मा झाले. मुळातच महिलांमध्ये निसर्गाकडून काही देणग्या पुरूषांपेक्षा जास्त आहेत. स्त्रीमध्ये सहनशीलता, नाविन्यता, सौंदर्याची जाणीव, बचत वृत्ती, संघप्रेरणा, स्मरणशक्ति हे गुण निसर्गतःच अधिक आहेत. स्त्री सृजनशील आहे, कारण निसर्गाने निर्मितीचा अधिकार स्त्रियांना दिला आहे. स्त्री मुळातच सबला आहे. जरी संविधानाने स्त्री व पुरूष यांना समान अधिकार दिले असले तरी भारताच्या पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकुन पडली आहे. तीन 'प' अर्थात पिता, पती आणि पुत्र यांच्या आदेशाने आणि बंधनाने ती आपले आयुष्य काढते आहे. अगदी कामकाजी, व्यवसायी, नोकरदार महिलांशी चर्चा केली असता त्यादेखील स्वतःला सक्षम मानत नाहीत. त्यांच्या दृष्टिने महिला सबलीकरण म्हणजे फक्त कार्यक्रम, व्याख्यान आहे. पण तसे न होता वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणिव करून वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे होय. महिला या देशाचे भविष्य ठरविणारी शक्ती आहे आणि त्यामुळे ही शक्ती सुदृढ व सक्षम बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. महिलांना समानतेचा दर्जा प्राप्त होण्यासाठी संघर्ष करणारी एक महिला वकील बेल्ला अब्जुग यांच्या प्रयत्नांनी १९७१ पासून २६ अगस्त हा दिवस महिला समानता दिवसाच्या रूपात साजरा केला जातो.

**भारतीय महिलांचे सामाजिक योगदान व सामाजिक स्थान :** भारतात ब्रिटिशांनी स्त्रियांच्या शिक्षणाला प्रथम स्थान दिले. त्यामुळेच आधुनिक काळातील जडण–घडण होऊ लागली. समाजाचा आधार असलेली स्त्री पुरूषाच्या बरोबरीने समतेचा लढा देण्यास सज्ज झाली. यावेळी महिलांनी सामाजिक योगदान दिले ते महत्वपूर्ण आहेत. भारतीय संस्कृती विकासाच्या इतिहासाची पाने उलगडून पाहिली तर एक गोष्ट लक्षात येते की, पूर्व कालखंडात ती वासना आणि विटंबनेची प्रतीक पाशात स्त्री अडकली गेली.

भारतात महिलांना स्वातंत्र्यानंतर मतदानाचा अधिकार दिला. पुरूषांच्या बरोबरीचा दिला गेला. परंतु वास्तविक समानता या विषयी पाहिले तर भारतात स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतर सुद्धा महिलांची स्थितीकडे पाहिले असता याठिकाणी त्या सर्व महिला दिसून येतात ज्या सर्व प्रकारच्या भेदभावांनी ग्रासलेल्या असून सुद्धा त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपले एक स्थान मिळविले आहे आणि सर्वांना यावर गर्व देखील आहे. परंतू या रांगेत त्या सर्व महिलांना सहभागी करून घेण्याची गरज आहे. ज्या रोज आपल्या घरात तसेच समाजात महिला असल्यामुळे असमानतेपणाने त्यांचे शोषण होत आहे. मग ती घरची मुलगी, पत्नी, आई किंवा बहिण या नात्याने या समाजातील मुलीबरोबर

होणारी छेडछाड आणि बलात्कार अशा बातम्यांद्वारे वाचतो. भारतात प्रतिभाताई पाटील, लता मंगेशकर, कल्पना चावला, इंदिरा गांधी इ. या कर्तबगार महिला असूनही आज देशातील महिलांची स्थिती चांगली नाही. महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती आंदोलनाची पहिली अग्रणी, पहिली स्त्री शिक्षीका व पहिली मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी अनेक प्रकारचा त्रास सहन केला. पती निधनानंतर त्यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य केले. विधवा पुनर्विवाह घडवून आणणारी सभा स्थापन केली. पंडिता रमाबाई यांचे स्त्री सुधारणे संदर्भात कार्य मोलाचे समजले जाते. भारतातील शिक्षण पद्धतीत पुनर्रचना करण्यासाठी १८८३ मध्ये हंटर कमिशन समोर रमाबाईंनी साक्ष नोंदवली. मार्च १८८६ 'शारदा सदन' नावाची मुंबई येथे शाळा सुरू केली. स्त्रियामध्ये पंडिता रमाबाई यांच्यानंतर प्रभावी कार्य करणारी प्रमुख महिला म्हणून रमाबाई रानडे यांचा उल्लेख केला जातो. अमेरिकेत जाऊन वैद्यकिय शास्त्रातील पदवी मिळविणारी देशातील पहिली महिला आनंदीबाई जोशी होत्या. महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन ताराबाई शिंदे यांनी स्वतंत्र विचार मांडले. १८८२ मध्ये 'स्त्री-पुरुष' तुलना या विषयावर निबंध लिहिला. विठ्ठल शिंदे यांची बहिण जनाबाई शिंदे यांनी अस्पृश्य स्त्रियांमध्ये जागृती करण्याचे कार्य केले. स्पृश्य-अस्पृश्य महिलांना एकत्र आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यानंतरच्या काळात भारतीय स्वातंत्र्यासाठी झाशीची राणी लक्ष्मीबाई, मादाम कामा, प्रितीलता वेदा अशा अनेक स्त्रियांनी मोलाचे योगदान दिले. भारताच्या पहिल्या पंतप्रधान म्हणुन इंदिरा गांधीनी उत्कृष्ट कार्य केले. स्त्री चळवळीची बीजे रोवण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी रोवली. आज त्याचा वटवृक्ष झाला आहे.

पुर्वीची स्त्रीची प्रतिमा आता विस्तारली असली तरी सामान्य गृहिणीपासून, डॉक्टर, शिक्षीका, कायदेतज्ञ, लेखिका, पत्रकार, अभियंता या क्षेत्रातही अस्तीत्वासाठी स्त्रीयांना संघर्ष करावा लागतो. आजचे स्त्रीयांचे समाजातील स्थान याचा वास्तवतेने विचार केल्यास भारतीय संस्कृतीत 'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी हृदयी अमृत नयनी पाणी' अशी परिस्थिती आहे. बीड जिल्हा हा स्त्री भृण हत्या प्रकरणात देशात गाजला. ही परिस्थिती का आली याचाही विचार व्हायला हवा. स्त्रीकडे आम्ही उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले. त्यामुळे तिचे समाजातील स्थान डळमळीत झाले. महिलांवरील अत्याचार वाढले. हुंड्यासारख्या प्रथेने आमच्या समाजात पाय घट्ट रोवले, मुलगी घरात होणे म्हणजे मुलींच्या बापासाठी जीवाला घोर निर्माण झाला आणि आजारापेक्षा उपचार भयानक या उक्तीप्रमाणे महिला अत्याचार, हुंड्याची समस्या या बाबत उपाय शोधण्यापेक्षा मुलगी न होऊ देणे हा पर्याय निवडण्यात आला.

महाराष्ट्रात स्त्री विषयक सुधारणाचा आरंभ १६ व्या शतकाच्या उत्तरार्धात काही समाजसुधारकांनी केला. स्त्रीयांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले आहे. पाश्चात्य विचारांनी भारावलेल्या समाजसुधारकांनी येथील धर्म, रूढी आणि परंपरा यांची चिकित्सा केल्यानंतर त्यांना असे दिसून आले की, स्त्री जातीवर धर्मांच्या नावाखाली लादलेली सर्व बंधने अतिशय अमानुष आहेत. या बंधनामुळे स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व कायमचे संपुष्टात येऊन ती केवळ पुरूषाची दासी व त्यांच्या पुत्र प्राप्तीचे एक साधन म्हणुन तिचे अस्तित्व कायम आहे. यातुन स्त्रीयांना मुक्त करण्याकरीता समाज सुधारकांनी विद्यमान पुरूषप्रधान समाजव्यवस्थेच्या विरोधात बंडाचा झेंडा उभारला. परंतु समाज जीवनात खोलवर रूजलेल्या अमानुष रूढी परंपरांमुळे स्त्रीयांना सहजपणे त्यांचे अधिकार मिळतील याची शक्यता नव्हती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना असे वाटत होते की, भारतीय महिलांचे सक्षमीकरण झाले पाहिजे यासाठी त्यांनी भारतीय संविधानात मुलभूत अधिकांराची तरतुद करून महिलांना ही समान अधिकार दिले. परंतु भारतीय समाजात प्राचीन काळापासूनच स्त्रियांना अतिशय निम्न दर्जा असल्यामुळे संविधनातील तरतुदीही अपुऱ्या पडतील असे त्यांना वाटत होते. यासाठी त्यांनी हिंदू कायद्याची संहिता तयार करून हिंदू स्त्रियांना समाजात मानाच्या स्थानाबरोबरच पुष्कळ अधिकार ही देण्याचा प्रयत्न केला. तसे स्वतंत्र भारताचे कायदेमंत्री म्हणून निवड झाल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी स्त्री-पुरूष समानता निर्माण करणे व स्त्रियांचे सक्षमीकरण घडवून आणणे हे आपले कर्तव्य समजले होते. यासाठी त्यांनी भारतीय संविधानातही स्त्रियांना मुलभूत अधिकार दिलेत व हिंदू कोड बिलाचा मसुदाही तयार केला. हिंदू कोड बिल पास होणे ही काळाची गरज होती पण विरोधकांनी प्रचंड विरोध करून हे बिल रोखले. याच बिलातील तरतुदी टप्प्याटप्प्याने सरकारला पास कराव्या लागल्यात व स्त्रियांना त्यांचे अधिकार बहाल करावे लागले.

भारतीय संविधानाने महिलांना पुरूषांना सारखाच अधिकार दिला आहे. वेळोवेळी असे कायदे तयार केले आहे की, जे महिलांना समाजात सन्मानाने जगण्याचा

अधिकार देतात. या दृष्टिने बघितले तर महिलांना समान अधिकार आणि पुढे जाण्याची संधी आहे. परंतू ही नाण्याची एक बाजू आहे. नाण्याची दुसरी बाजू लाजवणारी आहे. वास्तविकतः महिला कधीही सुरक्षित नाही. महिलांचा समाजाच्या सर्वच क्षेत्रात लैंगिक छळाचा सामना करावा लागतो. लैंगिक शोषणाची ती शिकार होते. महिलांना व्यावसायिक क्षेत्रामध्ये, शाळेत, कॉलेज आणि उद्योगधंद्यामध्ये व कार्यालयांमध्येही लैंगिक छळाचा सामना करावा लागतो. शेतात काम करतांना, शहरात मजूरी करतांना सुद्धा विभिन्न प्रकारे लैंगिक छळाची शिकार होत असते. या चर्चेवरून भारतात महिला सशक्तीकरणाची स्थिती चांगली नाही. स्वातंत्र्यानंतर लगेचच सरकार महिलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करत आहे. तरी आज सुद्धा महिला शिक्षणापासून दूर आहेत. इतके प्रयत्न करून देखील राजकारणामध्ये महिलांचा सहभाग वाढला नाही. विधान सभेमध्ये महिला आरक्षण विधेयक पास होऊ शकले नाही. कुटुंबामध्येही महिलांची स्थिती काही चांगली नाही. महिला आज शिक्षित होवून नोकरी जरी करत असली तरी कुटुंबामध्ये त्यांची स्थिती चांगली नाही. महिलांविरोधी होणारे अपराध दिवसेंदिवस वाढतच आहेत. थोडक्यात भारतात महिला सशक्तिकरणासाठी खुप प्रयत्न केल्या जात आहे. तरीही आज सुद्धा आम्हाला काही करावे लागेल आणि काही करणे बाकी आहे.

**समारोपः**– आपल्या देशाची अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. या लोकसंख्येसाठी सरकारद्वारे मातृदिवस, महिला दिन, बालिका दिन, जननी सुरक्षा अभियान असे कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे समाजात स्त्री शक्तीचे महत्व व अधिकार जागृत करण्याचे काम केले जाते. पण या सोबत आज महिला सबलीकरण करतांना सर्वप्रथम समाजात महिलांचे अधिकार व मुल्य यांच्यावर घात करणाऱ्या विघातक प्रवृत्ती अर्थात हुंडाप्रथा, स्त्री–भृणहत्या, निरक्षरता, लैंगिक अत्याचार, असमानता इ. चा नाश करणे गरजेचे आहे. लैंगिक भेदभाव नष्ट करून समानता प्रस्थापित करणे. तसेच सामाजिक, घरगुती अन्याय व अत्याचार यांच्याविरूद्ध कठोर कायदे व उपाययोजना करणे, त्याचबरोबर महिलांना शारीरिक, सामाजिक, आर्थिक व मानसिक स्वरूपात सशक्त बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. या प्रकारे महिला सबलीकरण करणे म्हणजे पुरूषांना त्यांच्यापेक्षा श्रेष्ठता सिद्ध करणे असे नव्हे तर फक्त महिलांना त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म, क्षमता, परंपरा यांच्यासह समानतेने वागविणे होय. असा विचारप्रवाह समाजात प्रस्थापित झाला तर खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होईल. स्त्रीशक्तीच्या रूपात देशात असलेले मनुष्यबळ विकसित करून स्त्रीशक्तीचे आरोग्य, शिक्षण, संस्कार व स्वालंबन हे चार आधारस्तंभ समाजाने भक्कम केले तर समाजात सुराज्य व स्वराज्य दिसेल आणि फक्त अभियाना पुरते कागदोपत्री नाही तर वास्तवात महिला सबलीकरण झालेले असेल. आपल्या भारत देशाला पूर्ण विकसित बनवण्यासाठी व परिपूर्ण विकासाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी महिला सबलीकरण महत्त्वाचे ठरेल.

***संदर्भ ग्रंथ सूची***


*१. स्त्री अभ्यासाच्या दिशा, अर्थव पब्लिकेशन, धुळे १० जानेवारी २०१२ डॉ. सुनंदा ल. अहिरे, प्रा. उषा य. साळुंके*

*२. बाबर सरोजिनी (१९६८) स्त्री शिक्षणाची वाटचाल, मुंबई*

*३. थ्शक्षण संक्रमण, मार्च २०१२*

*४. योजना सप्टेंबर २०१६, महिला सबलीकरण*

*५. हाशिये की आवाज, नवम्बर २०१६*

# पॉलिॲमरी बहुविध नातेसंबंध

***प्रा. जयंत चंद्रकांत घाटगे.*** *समाजशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव*

***सारांश*** *: मानवाच्या वैषयिक गरजांची, कामवासनेची तृप्ती व्हावी या उद्देशाने सर्व काळातील सर्व समाजांकडून भिन्न लिंगियांतील वैषयिक संबंधांना समाजमांन्यता देण्यासाठी प्राचिन काळापासून प्रयत्न सुरू आहेत. त्यातूनच विवाहसंस्थेची व कुटूंबसंस्थेची व्यवस्था निर्माण झाली. काळाच्या प्रवाहाबरोबर त्यात बदलही होत गेले. आज एक पती व एक पत्नी असणारी कुटूंबसंस्था समाजमांन्य झाली आहे. काही तुरळक भागात आजही बहुपती बहुपत्नी विवाहाचे प्रचलन आढळते. याच्याच पुढचा एक टप्पा म्हणजे पॉलिॲमरी किंवा बहुविध नातेसंबंध होय. प्रस्तुत संशोधन निबंधात या व्यवस्थेची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. हा शोधनिबंध पुर्णपणे दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित आहे. यामध्ये मी स्वतः काही मित्रांबरोबर केलेल्या चर्चेचा समावेशही केला आहे.*

स्वभावतःच आढळणारी विविधता हे मानवाचे एक महत्वाचे लक्षण आहे. त्याच्या या वेगळेपणाचा संबंध त्याच्या इतरांबरोर असलेल्या संबंधातूनही दिसून येतो. स्त्री पुरूष संबंधांबाबतही हे वेगळेपण आपणास प्रकर्षाने आढळून येते. भारतीय समाजात स्त्री पुरूष संबंधातील ही विविधता प्रस्थापित नैतिकतेच्या व्यवस्थेकडून नियंत्रित होत असल्याचे प्रकर्षाने जाणवते. अशी व्यवस्थात्मक रचनेची सुरूवात मुख्यत्वे एकपती व एकपत्नीत्वाच्या पध्दतीने होत असल्याचे दिसून येते. पण प्रत्येक व्यक्ती अशा पध्दतीने मनातून अशा संबंधांत सुखी राहीलच अशी खात्री आपल्याला देता येणार नाही. कारण मानवाच्या मुलभूत गरजांमध्ये ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र व निवारा या गरजांचा समावेश होतो या गरजांप्रमाणेच किंवा या सर्वांपेक्षा महत्वाची गरज म्हणून आपल्याला कामवासनेचाही विचार प्रामुख्याने करणे गरजेचे आहे. ही गरज सर्व व्यक्तीमध्ये समान असतेच असे नाही. काही व्यक्ती अधिक प्रमाणात विषयासक्त असतात तर कांही व्यक्तीत कामवासना अत्यंत कमी प्रमाणात आढळते. यामुळे व्यक्तीच्या विषयवासनेच्या तृप्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक समाज कोणती ना कोणती व्यवस्था निर्माण करत असतो. कारण विषयवासना ही सामाजिक व नैतिक व्यवस्था आहे असे समाज मानतो. यासाठीच प्रत्येक समाजाने मग तो विकासाच्या कोणत्याही टप्प्यावर असो विवाहसंस्थेची निर्मिती केली आहे हे दिसून येते. जेंव्हा विषमलिंगी व्यक्ती एकत्र येऊन आपली वैषयिक गरज पूर्ण करतात तेंव्हा त्यांच्याकडून प्रजोत्पादन होते व यामूळेच समाजाचे सातत्यही टिकून राहते व समाजमांन्य मार्गाने विषमलिंगी व्यक्ती आपली विषयवासनाही तृप्त करून घेऊ शकतात.

यासाठीच प्रत्येक समाजाने विवाहसंबंधांची निर्मिती केली आहे. गीलीन यांच्या मते ‘‘स्त्री पुरूष यांच्यात लैगिक संबंध प्रस्थापित करण्याचा समाज मान्य मार्ग म्हणजे विवाह होय.’’ यावरून हेच स्पष्ट होते की, स्त्री पुरूषांतील वैषयिक संबंधावर नियंत्रण ठेवणे हे विवाहसंस्थेचे कार्य आहे. पण या विवाहसंस्थेत काळानूरूप सातत्याने बदल होत आले आहेत. समूह विवाह, बहुपती विवाह, बहुपत्नी विवाह, एकविवाह असे विवाहाचे समाजमांन्य विवाहाचे प्रकार प्रचलित असले तरी काळाच्या प्रवाहात लिव्ह इन रिलेशनशीप, ओपन मॅरेज अशा व्यवस्था अस्तित्वात येताना दिसत आहेत आणि समाजाकडून आज काही प्रमाणात का असेना त्यांना मांन्यताही दिली जात असल्याचे दिसून येते. पण ही व्यवस्था अस्तित्वात येण्यापुर्वीही भारतीय समाजातील लोकसाहित्यात विवाहबाह्य संबंध आपणास पहावयास मिळतात. आज अनैतिक पण एकेकाळी नैतिक मानल्या गेलेल्या संबंधांचा आढावा घेणे या ठिकाणी योग्य वाटते. अति प्राचिन वाडमयातील कथा म्हणून आदीम अवस्थेतील मानवांचे स्वरूप स्पष्ट होते. सृष्टीच्या निर्मीतीतील कथेतील आद्य जोडपे बहुदा सहोदर बंधु भगिनींचे आहे. त्यांच्या कामासंबंधीच्या अनेक कथा आढळून येतात. वेदांतील देवतांपैकी इंद्र व चंद्र तर कामी व लंपट म्हणूनच प्रसिध्द आहेत. आपल्या कन्येविषयी लैंगिक अभिलाशा बाळगणारा ब्रम्हदेव प्रसिध्द आहे. शिव-पार्वती हे विश्वाचे मायबाप असल्याचा उल्लेख अनेक कथांमध्ये आढळतो. त्यांच्या मुक्त काम विलासाच्या अनेक कथा आढळतात. असे असले तरी कार्तिकेय व गणपती या दोघांची गर्भधारणा पार्वतिच्या ठिकाणी झाल्याचे आढळत नाही. पार्वतीच्या दर्शनाने स्खलित झालेले शिवाचे वीर्य गंगेने व सहा कृतिकांनी धारण करून कार्तिकेयला जन्म दिला तर पार्वतीच्या एकटीच्या अंगावरच्या मळापासून गणेश घडवला आहे. या कथेतील अद्‌भूतचे आवरण काढल्यास हे स्पष्ट होते की कार्तिकेय केवळ शिवाचा व गणेश केवळ पार्वतीचा

पुत्र आहे. शिव पार्वती पती-पत्नी असल्याने दोघेही माता-पिता आहेत. यावरून हेच स्पष्ट होते की एके काळी स्त्री पुरूषांच्या कामजीवनासंबंधी आज निषिध्द माणन्यात आलेले संबंध एके काळी तसे मानले जात नव्हते. याबरोबरच विवाहसंस्थेने बऱ्यापैकी मूळ धरल्यानंतरही विवाहबाह्य संबंध अनैतिक मानले गेल्यानंतरदेखील विवाहबाह्य संबंध समाजमान्य मानले गेलेले आढळतात. असे संबंध दोघांच्या मर्जीने आलेले स्पष्ट करणाऱ्या अनेक कथा प्रचलित आहेत. अशा संबंधामागे पती पत्नी एकमेकांना आवडत नसणे, पती वृध्द असणे, कुरूप किंवा रोगी असणे, पतिपेक्षा अन्य व्यक्तीचे आकर्षण वाटणे, विवाहपुर्वीच्या प्रियकराचे विवाहानंतर भेटणे, घरातच सासरा - सुन, दिर - भावजय यांना परस्परांविषयी आकर्षण वाटणे अशा अनेक कारणाने विवाहबाह्य संबंध निर्माण झाल्याचे दाखले देणाऱ्या अनेक घटना आढळतात. मध्य युगात व्यापारी सरदार इत्यादी लोकांपासून दिर्घकाळ दुर रहावे लागल्याने त्यांच्या स्त्रियांचे अनेकांबरोबर वैषयिक संबंध आल्याचे स्पष्ट करणाऱ्या अनेक कथाही आढळतात. लोककथांप्रमाणे म्हणी, वाक्यप्रचार लोक धारणांतूनही विवाहबाह्य संबंधांचे प्रचलन असल्याचे सुचित होते.

आज तर स्त्री शिक्षणामुळे विविध पदावर कार्यरत झाल्यामुळे एकेकाळी घर आणि मुल एवढ्यापुरतीच मर्यादीत भुमिका पार पाडणारी स्त्री मोकळ्या वातावरणात कार्यरत झाली आहे. अशा परिस्थितीत तिचा अन्य पुरूष्यांशी संबंध निर्माण होणे अपरिहार्य बनले आहे. यातुनच पतीपेक्षा इतर पुरूष अगर सहकारी स्त्री विषयी पुरूषाला आकर्षण निर्माण होणे अपरिहार्य बनले आहे. यातुनच विवाहबाह्य वैषयिक संबंध निर्माण होण्याचे प्रमाण वाढीस लागले आहे. यामुळे अनेकवेळा पती पत्नींमध्ये संबंधामुळे संघर्ष निर्माण होत आहेत. यावर कसा तोडगा काढता येईल याचे चिंतन करत असताना एका नव्या बहुविध नातेसंबंधांची व्यवस्था, एक नवा प्रयोग म्हणून आज पाश्चात्य देशात स्विकारला जात असल्याचे काही प्रमाणात का होईना दिसून येते. ही व्यवस्था म्हणजेच ''पॉलिॲमरी'' बहुविध नातेसंबंध व्यवस्था होय. ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीत (२००६) पॉलिॲमरीची व्याख्या अशी केली आहे. : ("The fact of having simultaneous close romantic relationships with two or more other individuals, viewed as an alternative to monogamy, esp. in regard to matters of sexual fidelity; the custom or practice of engaging in multiple romantic relationships with the knowledge and consent of all partners concerned." )

'पॉलि' या शब्दाचा अर्थ 'पुष्कळ' एकाहून अधिक तर 'ॲमोर' या लॅटिन शब्दाचा अर्थ 'प्रेम' होय. या व्यवस्थेची पहिली अट ही की, संबंधित व्यक्तीपैकी प्रत्येकाला प्रत्येकाच्या इतरांशी असलेल्या प्रेमाच्या नात्याविषयी पूर्ण कल्पना असेल. ही संकल्पना माणसातल्या बहुविध ऊर्मींना बहुविध व्यक्तींद्वारे नियमित करण्याचा प्रयत्न करते. याचाच अर्थ असा की या व्यवस्थेला एकच एक साचेबंद चेहरा नाही. याचाच अर्थ असा की लग्न झालेल्या जोडप्यातील स्त्रिच्या आयुष्यात अन्य कोणी पुरूष आला तर तिचे त्याच्याशी असलेले नाते भावनिक व शारीरिक दोन्ही असू शकेल. हिच बाब पुरूषालाही लागू असेल. पाश्चिमात्य राष्ट्रांत ही संकल्पना काही प्रमाणात आज अस्तित्वात असल्याचे आढळून येते. ही एक मुक्त व्यवस्था असल्याने तिथे कुठल्याच स्वरूपाच्या नातेसंबंधांना नकार नाही. भारतीय समाजाबाबत बोलायचे झाल्यास ही व्यवस्था नवीन असून ती माहितीची नाही. परिणामी बहुतेक जण ती स्विकारण्यास तयार नाहीत. शिवाय आपल्या समाजात प्रचलित असलेल्या विवाहसंस्थेने एकास एक हे आपल्या मनात रूजवलेले आहे आणि ते आपण सहजासहजी पुसूही शकणार नाही. यात दोष कोणाचाही नाही.

विवाह संबंधाच्या बाबतीत मला माझ्या एका जवळच्या मित्राने अगदी सहजगत्या बोलताना त्याच्या मित्राचा एक अनुभव कथन केला. त्याच्या एका मित्राने त्याच्या घरातली बाब त्याला सांगितली ती अशी की त्याच्या बायकोचे दुसऱ्या बरोबर असलेले विवाहबाह्य संबंध त्याच्या मुलाला कळाल्यावर त्याने बापाला न सांगताच त्याच्या एका मित्राच्या मदतीने विवाहबाह्य संबंध ठेवलेल्या व्यक्तीला एका रात्री पाऊस पडत असताना घरातून बोलवून नेऊन निपचित पडेपर्यंत मार दिला. यावेळी त्या व्यक्तीने असे संबंध असल्याचे व आपली वैषयिक गरज भागवण्यासाठी त्याच्या आईने त्याला कशा प्रकारे कोणत्या कोणत्या लॉजवर फिरवले आहे. त्याला अनैतिक संबंध चालू ठेवण्यास कसे भाग पाडले. या संबंधाबरोबरच त्याच्या आईने असे संबंध चालू ठेवावेत म्हणून आपल्याला कशाप्रकारे आर्थिक मदत केली. चार चाकी गाडी घेण्यासाठी आपल्या नावावर कर्ज काढून चार लाख रूपये कसे दिले. शिवाय घरासाठी घर चालवण्यासाठी कशी ती सातत्याने आर्थिक मदत करते हे ही कबूल केले. आणि याबाबत कोणालाही न सांगण्याबाबत शपथ कशी घातली हे ही सांगितले. यानंतर आपल्या जिवाच्या भितीने दुसऱ्याच

दिवशी मार खालेल्या व्यक्तीने या सर्व बाबींची माहिति गावातील एका प्रतिष्ठीत व्यक्तीला सांगितली. आपली चूकही कबूल केली. मग त्याच दिवशी त्याच्या गावातील त्या प्रतिष्ठीत व्यक्तीने त्याला बोलावल्यानंतर हे सर्व कसे समजले हे मित्राने सांगितले. हे सर्व बोलणे ऐकताना त्या व्यक्तीची बायकोही तेथे हजर होती. या गोष्टीचा परिणाम म्हणून दोन्ही घर कशी उध्वस्त झाली असती व त्यातून आपण कशाप्रकारे वाट काढण्याचा प्रयत्न करतोय हे ही शेवटी त्यानेच सांगितले. याचाच अर्थ असा की आपण व आपली पिढीच नव्हे तर आज तारूण्याच्या उंबरठ्यावर उभी असलेली पिढीही हे सहजगत्या स्विकारत नाही. कारण अजूनही आपल्यावर व आजच्या नव्या पिढीवर समाजमान्य नैतिकतेचा पगडा कसा घट्ट हेच स्पष्टपणे यावरून दिसून येते.

असे बहुविध नातेसंबंध अस्तित्वात येऊ शकतील का? या विषयावर मी स्वतः माझ्याबरोबर कार्यरत असलेल्या मित्रांना विचारले असता सुरूवातीला ही बाब भारतातच काय कुठेही अस्तित्वात असणारच नाही किंवा हा विचारही भारतीयांना पटणारच नाही अशीच प्रतिक्रिया बहुतेकांनी दिली होती. इतकेच नव्हे तर त्या सर्वांनी प्रथम माझी गणना खुळ्यात केली. यावरून मी एकाच निष्कर्षाला आलो की जर सुशिक्षीतांना हे अशक्य वाटत असेल तर सामांन्यांना ही बाब सहजासहजी रूचणार नाही. म्हणूनच या व्यवस्थेविषयी सर्वांनी जाणून घ्यावे यासाठी मी हा निबंध सर्वांसमोर मांडण्यासाठी निवडला आहे. सुरूवातीला या व्यवस्थेच्या वैशिष्टांची चर्चा आपणास करावी लागेल.

**वैशिष्ट्ये** : या व्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये खालिलप्रमाणे विषद करता येतील.

१. माणसांच्या एकाहून अधिक गंभीर स्वरूपाच्या नातेसंबंधांची ही एक व्यवस्था आहे.

२. प्रेम अमर्याद असून एका व्यक्तीवर जितक्या तिव्रतेने आपण प्रेम करू शकतो तितक्याच तिव्रतेने आपण दुसऱ्या व्यक्तीवरही प्रेम करू शकतो असे ही व्यवस्था मानते. याबरोबरच या व्यवस्थेत प्रेम व त्याच्या विविध छटा समजून घेणे तितकेच महत्वाचे आहे.

३. या व्यवस्थेत दुसऱ्या व्यक्तीला मग ती स्त्री असो वा पुरूष सामावून घेणे हे या व्यवस्थेचे प्रमुख लक्षण आहे. याचाच अर्थ असा की पती पत्नी और 'वो' हा या व्यवस्थेत अजीबात त्रासदायक ठरत नाही. त्याला किंवा तिला या व्यवस्थेत सामावून घेतले जाते. याचाच अर्थ असा की ही तीन लोकांची आनंदी व्यवस्था असणे अपेक्षित आहे.

४. केवळ लैंगिग आकर्षण किंवा लैंगिक संबंधांची इच्छा असणे म्हणजे पॉलिॲमरी नव्हे तर यात लैंगिक संबंध वर्ज मानले जात नाहीत. पण या व्यवस्थेत स्त्री किंवा पुरूषाला लैंगिक शेअरिंगसाठी तयार असावे लागते.

५. ही व्यवस्था अशा संबंधातील व्यक्ती जर एकाच घरात रहात असतील तर निश्चितच प्रभाविपणे काम करू शकते.

६. या व्यवस्थेत एकाहून अधिक व्यक्तींना कुटूंबाच्या कक्षेत सामावून घेतले असल्याने मुलांचे पालकत्व दोन आया किंवा दोन बाबांकडे जाऊ शकते.

७. ही व्यवस्था केवळ पाश्चात्य राष्ट्रांत अस्तित्वात आहे असे दिसत असले तरी पण या विषयीचा कोणताही संख्याशास्त्रीय अभ्यास आजमितीस उपलब्ध नाही. कदाचीत ही व्यवस्था भारतात अस्तित्वात असेलही पण पाश्चिमात्यीकरण व सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेमूळे ही व्यवस्था नजिकच्या काळात भारतातही प्रवेश करून प्रभावी बनू शकेल असे म्हणावयास काही प्रमाणात वाव आहे.

८. ही व्यवस्था भारतात अस्तित्वात येण्यासाठी व्यक्तींमधील 'भावनिक साक्षरता' मोठ्या प्रमाणात वाढणे गरजेचे आहे. यासाठी व्यक्तीस्वातंत्र्यात वाढ होणे आवश्यक आहे. एका अर्थी ही व्यवस्था विवाहाहून प्रगल्भ आहे. पण विवाहाला पर्याय ठरू शकणार नाही. यासाठी आपल्याला मनोविकासाचे अनेक टप्पे गाठावे लागतील. हे ही तितकेच वास्तव आहे.

बहुविध प्रेमसंबंध स्विकारण्यासाठी प्रगल्भ मानसिकतेची आवश्यकता असते. अशा संबंधांना मांन्यता दिलेले व अशा प्रेमसंबंधांना मांन्यता दिलेल्या काही व्यक्ती असतील तर त्यांच्या समोरचा मुख्य प्रश्न हा असतो की हे संबंध त्यांनी पुढे कसे न्यायचे ? यावेळी दोन शक्यता निर्माण होऊ शकतात. सर्व संबंधितांना असे संबंध मांन्य असतील तर काहीच अडचण असणार नाही पण काहींना हे संबंध मान्य नसतील तर समस्या निर्माण होणार हे निश्चित आहे. मुख्यतः भारतीय मानसिकतेचा विचार केला तर पुरूषाकडून आपल्या पत्नीचे असे संबंध त्याच्या मानसिकतेमुळे मांन्य होणे अडचणीचे ठरणार आहे. कित्येकदा तर अशा संबंधांचा केवळ संशय आला तरी असे संबंध असलेल्या स्त्रिला अनन्वित छळाला सामोरे जावे लागले आहे. कित्येकदा आपला जीवही गमवावा लागला आहे. या बाबतच्या एका उदाहरणाची चर्चा

वर केली आहेच. पुरूषाच्या बाबतीत मात्र अशा विवाहबाह्य संबंधांना पत्नीकडून होणारा विरोध तितका टोकाला गेल्याचे दिसत नाही याचे मूळ कारण तिच्या समाजीकरणात असल्याचे आढळून येते. याबरोबरच आपल्यातील अशा संबंधांची माहिती व असे संबंध समाजातील इतरांकडून स्विकारले जातील अशी शक्यता आज तरी वाटत नाही. कारण समाजाने व्यक्तीच्या एका व्यक्तीबरोबरच वैषयिक संबंधांना समाजमांन्यता दिली असून त्याला नैतिकतेची जोड दिली आहे. अशा वेळी अशा संबंधांना समाजाने मांन्यता देण्यापर्यंत वाट पाहण्याशिवाय व्यक्तीसमोर कोणताही पर्याय उपलब्ध नाही.

याबरोबरीनेच आणखी एक महत्वाची अडचण अशी की अशा संबंधात जीवन जगत असलेल्या व्यक्तींनी याबाबतची आपली भूमिका आपल्या आसपासच्या लोकांना व नातेवाईकांना कशी द्यायची की द्यायचीच नाही. याबाबतचा निर्णय जाणीवपूर्वक आणि विचारपूर्वकच घ्यावा लागेल. कारण आपले नातलग अशा संबंधांना लगेच स्विकारतील असे वाटत नाही. कारण त्यांच्यावरही समाजाच्या नैतिकतेचा प्रचंड प्रभाव असणार आहे परिणामी लगेच अशा संबंधांची कल्पना इतरांना देण्याची गडबड करण्यापेक्षा यासाठी हळुहळू अशा संबंधांचा स्विकार केलेल्यांनी आपापसात याबाबत सातत्याने चर्चा करावी लागेल. यासाठी उपलब्ध साहित्याचा वापर करता येईल. यादृष्टीने आपल्या कवींनी केलेल्या मराठी कवितांचा त्यातील शब्द सामुग्रीचा आपल्याला आढावा घ्यावा लागेल.

याबरोबरच आपल्या लोकसाहित्यात स्त्री पुरूष संबंध कसे होते याचे असंख्य दाखले आपल्याला मिळतात. या ठिकाणी उदाहरणादाखल केवळ एकच गोष्ट विचारात घेणे शक्य आहे. याचाच अर्थ असा की असे मुक्त संबंध पुरातन काळापासून प्रचलित होते. अशा विविध कथा कविता आजच्या काळात इंटरनेट व विविध चॅनेलवर उपलब्ध असलेली माहिती यांचा शोध घेऊन त्याविषयी आपापसात चर्चा व विचारमंथंन होणे या बाबी नवीन पिढी समोर सातत्याने मांडणे आज गरजेचे झाले आहे. याबरोबरीनेच आपल्या मनातील विविध भावनांबाबत आपली भावनिक साक्षरता सातत्याने वाढवण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

व्यक्तीमधील संबंध निभावणे यात जशी व्यक्तीच्या मनाची प्रगल्भता मुख्य भूमिका पार पाडू शकेल. ही बाब मुलांबाबतही योग्य ठरू शकेल. अशा संबंधातून जन्माला येणाऱ्या मुलांसाठी जैविक माता पिता प्रमुख असतील तर इतर व्यक्ती दुय्यम भूमिका पार पाडू शकतील. पण ते घरातीलच इतर नातलग बनतील हे शक्य झाले तरच नव्या पिढीला लहानपणापासूनच अशा नव्या नातेसंबंधांची सहजगत्या ओळख होऊ शकेल. याबरोबरच त्यांची वाढही या व्यवस्थेच्या वाढीला पूरक अशीच होईल. आणि अशी नव्याने अस्तित्वात येऊ पाहणारी बहुविध नातेसंबंधांची ही व्यवस्था समाजाकडून स्विकारली जाऊ शकेल. पण यासाठी काही काळ वाट पहावी लागेल.

या व्यवस्थेतील संबंधांचा स्विकार करण्यातील प्रमुख अडचण ही प्रेमातील 'पझेसिव्हनेस' आहे. यासाठी सतत एकत्र राहून अगर राहण्याचे प्रयोग करून इष्ट बदल आपणास घडवून आणता येईल. यामध्ये परिस्थितीनुसार भावनिक व लैंगिक अशा दोन्ही मार्गांचा अवलंब करता येणे शक्य आहे. पण व्यक्तीच्या मनात पझेसिव्हनेसची भावना इतकी खोलवर रूजली आहे की ती सहजगत्या बाजूला करणे शक्य होईल असे वाटत नाही. यासाठी आपल माणूस सर्वप्रथम 'स्वतंत्र माणूस आहे' हे मनात रूजवणे अत्यंत गरजेचे आहे. अशा संबंधातील सर्व व्यक्ती जर एकाच ठिकाणी रहात असतील तर याबाबत फारशी अडचण येणार नाही. आणि हाच मार्ग मला व्यक्तीगत म्हणायचे झाले तर अगदी योग्य वाटतो. हे खरे असले तरी काही ठिकाणी एकत्र राहणे शक्य नसले तर त्यासाठी मुळात व्यवस्था लवचिक असावी हेच योग्य. असे झाले तर घर चालवण्यासाठी जे जे करावे लागते त्या सर्व कामांची वाटणी करावी लागेल. व त्याला अनुसरून वेळेची विभागणी करावी लागेल. पण जर अशा संबंधातील व्यक्ती एकत्र रहात नसतील तर दैनंदिन कामाच्या बाबतचा मुद्दा विचारात घ्यायची गरजच भासणार नाही. पण एकत्र राहिल्याने जी आपुलकी स्नेह व प्रेमभावना निर्माण होईल त्याला निश्चितच मुकावे लागेल.

आज केवळ पती पत्नी व त्यांची मूल एवढेच मर्यादित असणारी विभक्त कुटूंब व्यवस्था पालकांसमोर मुलांसमोर व विभक्तावस्थेत रहात असलेल्या वृध्दांसमोर अनेक प्रश्न निर्माण करत आहे. यातून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. हे आपणास जाणवत आहे. या समस्यांपासून मुक्तता मिळवण्यासाठी हा एक पर्याय आपणासमोर मांडण्याचा एक अल्पसा प्रयत्न मी करत आहे. यावर विचारमंथन व्हावे अशी माझी अपेक्षा आहे.

*संदर्भ :*

1. *ऊत्पल व्ही. बी. लोकसत्ता चतुरंग दिनांक : ४ नोव्हेंबर २०१७.*
2. *ऊत्पल व्ही. बी. लोकसत्ता चतुरंग दिनांक : २७ ऑक्टोंबर २०१८ पान नं. ५.*
3. *डॉ. तारा भवाळकर 'लोकपरंपरा आणि स्त्रीप्रतिभा' लोकवांङमय गृह जानेवारी २००२.*

# औरंगजेबाच्या कार्याचे मुल्यमापन (इ. स. १६५८ ते १७०७)

*डॉ. प्रमिला भोयर, इतिहास विभाग प्रमुख, स्व.निर्धन पाटील वाघाये महाविद्यालय, लाखनी*

**प्रस्तावना** :– मोगल बादशहा शहाजहांच्या काळामध्ये त्याच्या चार मुलामध्ये सप्टे. १६५७ मध्ये जे वारसा युध्द घडून आले. त्यामध्ये औरंगजेब होता. इतर भावाच्या तुलनेत औरंगजेब अतिशय मुत्सद्दी, पराक्रमी आणि कावेबाज असल्यामुळे वारसा युध्दामध्ये आपल्या तिन भावांचा निकाल लावून शहाजहानला कैदेमध्ये घालून १६५८ मध्ये स्वतःला बादशहा घोषित केले. आणि मे १६५६ मध्ये आलमगिर (जग जिंकणारा) हि पदवी घेवून दिल्लीच्या गादीवर बसला.

**औरंगजेबाचे धार्मिक धोरण (असहिष्णू)** ::– सम्राट अकबराने आपल्या काळात उदार धार्मिक धोरणाचा अवलंब केल्यामूळे इस्लाम धर्माचे महत्व कमी झाले होते. अकबर नंतरच्या बादशहानी काही प्रमाणात अकबराच्याच धोरणाचा अवलंब केला. परंतू औरंगजेब हा कट्टर सुन्नी पंथाचा असल्यामुळे पुर्वजांच्या धार्मिक नितित बदल करून इस्लाम धर्माचे महत्व वाढविण्यासाठी औरंगजेब ज्या कठोर धार्मीक धोरणाचा अवलंब केला त्यालाच औरंगजेबाचे असहिष्णू धार्मिक धोरण असे म्हणतात.

**औरंगजेबचे धोरण (ध्येय)** :– बादशहा औरंगजेब हा इस्लाम धर्माचा कट्टर पुरस्कर्ता असून सुन्नी पंथाचा कट्टर व्देष्टा होता. त्यामुळे इस्लाम धर्माचे महत्त्व वाढविण्यासाठी त्याने प्रथमच इस्लामला राजधर्म म्हणून घोषित केले. आणि संपुर्ण भारतात इस्लामचा प्रसार आणि प्रचार करून संपूर्ण भारत इस्लाममय बनविण्याचे त्याने आपल्या जीवनाचे प्रमुख ध्येय ठरविले. औरंगजेब भारताला काफीराचा देश समजत असे. आपल्या ध्येय पुर्तीसाठी औरंगजेबाने खालीलप्रमाणे आपल्या धार्मिक धोरणाची अंमलबजावणी केली.

**औरंगजेबाचे आदेश (इस्लाम विरोधी प्रथा बंद)** :– औरंगजेबाने पुर्वापार चालत आलेल्या इस्लाम विरोधी प्रथावर बंदी आणली. त्यातील प्रमुख प्रथा पुढीलप्रमाणे –

१. कुराणाप्रमाणे जिझीया जकात खिराज आणि खम्स हे चार प्रमुख कर ठेवून इतर सर्व कर रद्द केले.
२. संगीतावर बंदी आणली.
३. झरोका दर्शन प्रथेवर बंदी आणली.
४. तुलादान प्रथा बंद केली.
५. हिंदू सण आणि रितीरिवाजावर बंधने घातली.
६. मादक पदार्थावर बंदी, जुगार इ. औरंगजेबाने आपल्या धर्मानूसार बंदी आणली.
७. नमस्तेऐवजी सलाम आलेकूम अशाप्रकारचे अभिवादन सुरू केले.

वरिल आदेशांचे कठोरतेने पालन करण्यासाठी औरंगजेबाने ‘मुहता साहेब’ नावाच्या धर्माधिकाऱ्यांची नियुक्ती केली. औरंगजेबाच्या कार्यामुळे तो इस्लाम धर्मीयात अतिशय प्रिय झाला.

**हिंदू विरोधी कृत्य (धार्मिक छळ)** :– केवळ इस्लामविरोधी प्रथा बंद करूनच औरंगजेबाचे समाधान झाले नाही. हिंदूचा छळ करण्यासाठी औरंगजेबाने अनेक कठोर उपायांचा वापर केला. म्हणूनच डॉ. श्रिवास्तव म्हणतात, ‘‘अलिकडच्या काळातील (१६३०–४०) महंमद अली जिना वगळता हिंदू आणि मुस्लीम या दोन जमातीमधील अंतर वाढविणारी औरंगजेबासारखी दुसरी व्यक्ती झाली नाही.’’ औरंगजेबाने हिंदूचा धार्मिक छळ करण्यासाठी जे उपाय योजलेत ते खालीलप्रमाणे –

**१) हिंदू मंदिराचा विध्वंस** :– औरंगजेबच्या आदेशानुसार इ.स. १६६६ मध्ये बनारसचे विश्वनाथ मंदिर, मथुरेचे श्रीकृष्ण मंदिर, गुजरात मधील सोमनाथ मंदिर, उत्तर भारतातील हिंदूचे मंदिरे तसेच दक्षिण भारतातील हिंदूच्या मंदिराचा विध्वंस करून त्या ठिकाणी मस्जिदी उभारल्या. एवढेच नव्हे तर हिंदूच्या मंदिरात मुद्दाम गाईचा वध करून हिंदूच्या धार्मिक भावना दुखावल्या जात असत.

**२) हिंदूना प्रशासनापासून दूर** :– औरंगजेबपूर्वी मोगल साम्राज्यात अनेक क्षेत्रात जे हिंदू नौकरीला होते. त्याना औरंगजेबने नोकरीवरून काढले आणि आपल्या काळात पुन्हा हिंदूला प्रशासनात सहभागी केले नाही.

**३) जिझिया कर** :– सम्राट अकबराने इ.स. १५६४ मध्ये गैरमुस्लीम प्रजा म्हणून घेतला जाणारा हिंदूवरील कर रद्द केला होता. शहाजहानने जिझिया कर पुन्हा लावला नाही. परंतू औरंगजेबने इस्लाम धर्माचा कट्टर पुरस्कर्ता असल्याने त्याने हिंदूचा धार्मिक छळ करण्यासाठी आणि आपली तिजोरी भरण्यासाठी हिंदू वर पुन्हा एप्रिल १६७६ मध्ये गैरमुस्लीक प्रजा म्हणून जिझिया कर लावला. या शिवाय हिंदूला यात्रा कर, कुरणावर कर, पशुकर इ. कर द्यावा लागे.

४) **जकातीचे प्रमाण अधिक :–** मुसलमानाच्या तुलनेत हिंदूला जकातकर जास्त प्रमाणात द्यावा लागे. उदा. हिंदूना ५० टक्के तर मुसलमानांना २५ टक्के कर द्यावा लागत असे.

५) **हिंदू रितीरिवाजांचा निषेध :–** औरंगजेबाने हिंदुच्या पुर्वापार चालत आलेल्या चालीरिती व प्रथावर बंदी आणली. सतीप्रथा, हिंदूची सण तसेच घोडयावर बसणे, उत्तम कपडे वापरणे इ. हिंदूच्या चालिरीती आणि रितीरिवाजावर औरंगजेबाने बंदी आणली.

६) **धर्मांतरास उत्तेजन :–** औरंगजेबाने इस्लाम धर्माचा प्रसार करण्यासाठी हिंदूला अनेक आमिषे तसेच बळजबरीने इस्लाम धर्म स्विकारण्यास भाग पाडले. इस्लाम धर्म स्विकारणाऱ्या हिंदूला अनेक सुख सोयी दिल्या जात. इ. प्रमुख उपाय योजना आखून औरंगजेबाने हिंदूचा अतोनात छळ केला.

**औरगंजेबाच्या धार्मिक धोरणाचे परिणाम :–** डॉ. स्मिथच्या मते, ‘‘शक्तीशाली हिंदूच्या सहकार्याने अकबराने भारतामध्ये मोगल साम्राज्याची प्रचंड वाढ करून मोगल साम्राज्याचा पाया मजबुत केला. शहाजहानच्या काळापर्यंत काही प्रमाणात ही परिस्थिती कायम होती. परंतू औरंगजेबाने विनाकारण हिंदूना आपल्या धार्मिक धोरणाव्दारे डिवचून मोगल साम्राज्याचे पतन जवळ आणले’’.

१) **बंडाळया आणि उठाव :–** अकबराने ज्या दूरदृष्टीने हिंदूशी उदार धोरणाचा अवलंब केला ती कला औरंगजेबला साधता आली नाही. औरंगजेबाला आपल्या धार्मिक कट्टरतेमुळे भारतातील गैर मुस्लीम प्रजेचा अतोनात छळ केला. त्यांच्यावर प्रत्येक ठिकाणी अत्याचार केले. त्यामुळे आपला धर्म धोक्यात येत आहे. असे समजताच उत्तर भारतातील जाट, रोहिले, सिख, राजपुत तसेच दक्षिण भारतात मराठयांनी सुध्दा औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाविरूध्द फार मोठया प्रमाणात बंडाळया आणि उठाव केलेत. त्यामुळे मोगल साम्राज्य खिळखिळे झाले.

२) **प्रशासन व्यवस्थेत बिघाड :–** औरंगजेबाने आपल्या कट्टर धार्मिक धोरणामध्ये पुर्वी जे हिंदू प्रशासनात होते त्यांना नोकरीवरून काढले आणि आपल्या संपुर्ण कारकिर्दित पुन्हा हिंदूला प्रशासनात सहभागी करून घेतले नाही. मुसलमान हे प्रशासनात कुशल नसल्यामुळे प्रशासनात असंख्य घोटाळे निर्माण होउन औरंगजेबाची प्रशासन व्यवस्था डबघाईस आली.

३) **प्रचंड संपत्तीचा खर्च :–** औरंगजेबने आपले धार्मिक धोरण कठोरतेने राबविण्यासाठी अनेक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. तसेच औरंगजेबच्या धार्मिक धोरणामुळे त्याने अनेक शत्रु निर्माण केले. त्यामुळे त्या शत्रुच्या बंदोबस्तासाठी औरंगजेबाला सैन्यामध्ये विनाकारण प्रचंड वाढ करावी लागली. आणि याचा खर्च सरकारी तिजोरीतून करावा लागत असल्यामुळे प्रचंड संपत्तीचा खर्च होवून त्याचा ताण सरकारी तिजोरीवर पडला.

४) **मोगल साम्राज्याचे पतन जवळ आले :–** औरंगजेबने आपल्या कठोर धार्मिक धोरणामुळे उत्तर भारतामध्ये अनेक शत्रू निर्माण केले त्यामुळे त्यांनी औरंगजेबच्या विरोधात प्रचंड प्रमाणात उठाव केलेत. उत्तर भारतातील परिस्थिती व्यवस्थीत न करता इ.स. १६८१ मध्ये दक्षिण भारतात आला. दक्षिण भारतात सुध्दा मराठयांनी औरंगजेबला जेरीस आणल्यामुळे संपुर्ण भारतात गोंधळ निर्माण होवून ती परिस्थिती मोगल साम्राज्याच्या पतनास काणीभूत ठरली.

अशाप्रकारे औरंगजेबचे कठोर धार्मिक धोरण त्याच्या आणि मोगल साम्राज्याच्या पतनास कारणीभूत ठरले.

ज्या देशात राज्य करायचे आहे त्या देशातील जनतेला प्रशासनात सामावून घेतले असते तर कदाचित औरंगजेबाने भारतात जास्तीत जास्त काळ सुरळीत राज्य केले असते. परंतू जी कला अकबराला जमली ती कला मात्र औरंगजेबाला जमली नाही म्हणुन याचा वाईट परिणाम होवुन भारतातील मराठे, जाट, बुंदेले इत्यादी जातींनी उठाव केले. व्यक्तीची जात आणि धर्म जेव्हा बुडतो तेव्हा तो कशाचीही पर्वा करीत नाही. त्यामुळेच भारतातील मराठे आणि इतर जातीच्या लोकांनी औरंगजेबाच्या विरोधात बंड सुरू केले. औरंगजेबाचे धार्मीक धोरण त्याच्या मुलाला सुध्दा पटले नाही. त्यामुळे त्यांनी सुध्दा बंड केले. धर्माचा आधार घेवुन हिंदुचा छळ केला नसता तर, औरंगजेबाला भारतात सुरळित आणि जास्तीत जास्त काळ राज्य करता आले असते परंतू असे न झाल्यामुळे औरंगजेबाच्या धार्मिक धोरणामुळे शेवटी मोगल साम्राज्याचे पतन जवळ आले किंवा मोगल साम्राज्याला उतरती कळा लागली.

***संदर्भ ग्रंथ सूची :–***


1. *प्रा. बाळकृश्ण सा. बारगळ, ‘मध्यकालीन भारत’ इ.स. १२०६ ते १७०७*
2. *नी.सी.दिक्षीत, ‘भारताचा इतिहास प्रारंभापासून’ इ.स. १७६१ पर्यंत, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, महाल नागपूर तीसरी आवृत्ती जनू २००८*
3. *प्रा. प्रभाकर कृ. ढवळे, भारताचा ईतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती १९८७*
4. *डॉ. एम.एल.शर्मा, ‘मुगल साम्राज्यका उदय और वैभव’*
5. *डॉ. आर.एस.शर्मा, ‘भारत में मुगल साम्राज्य’*
6. *डॉ. आर.पी.त्रिपाठी, ‘मुगल साम्राज्यका उत्थान व पतन*

# भारताचे परराष्ट्र धोरण

*डॉ.संपदा एस. कुल्लरवार, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज, नंदनवन, नागपूर*

आधुनिक काळात कोणतेही राष्ट्र एकटयाने जगू शकत नाही. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय किंवा आर्थिक असो सर्वच क्षेत्रात कोणत्याही राज्यांना एकमेकांशी संबंध ठेवणे भाग पडते. प्रत्येक राष्ट्राला आपले परराष्ट्रीय धोरण आखावे लागते. त्यामुळे त्या राष्ट्राला आपल्या धोरणाची निश्चितता करता येते. विदेशनीती किंवा परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्राने आपले राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी आखलेले धोरण होय.

विदेशनीती हे एक गतिशील तत्व असून त्यात परिस्थितीनुसार बदल होत जातो. जगातील कोणत्याही राष्ट्राला इतर राष्ट्राशी संबंध प्रस्थापित करताना त्या विषयाची काही मूलभूत तत्वे निश्चित करावी लागतात. एखाद्या राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण ठरविणे म्हणजे सर्वप्रथम त्या राष्ट्राचे हितसंबंध निश्चित करून ते साध्य करण्यासाठीचे विविध मार्ग व साधनांचा आलेख मांडणे होय. बाहेरील जगाशी आपले संबंध कसे असावे याविषयी एखाद्या स्वतंत्र राष्ट्राने घेतलेले निर्णय म्हणजे त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण होय. जगातील प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आपल्या राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करणे हे असते. प्रत्येक देशाला स्वतःची अशी ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा लाभलेली असते. प्रत्येक राष्ट्राला आपली राष्ट्रीय सत्ता, राजकीय व भौगोलिक पर्यावरण, ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा इत्यादी घटकांचे भान ठेवून आपले परराष्ट्र धोरण आखावे लागते. त्यामुळे जगातील प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणाला स्वतःची अशी खास वैशिष्टये प्राप्त झालेली असतात.

**अलिप्ततावाद** – भारताच्या परराष्ट्र धोरणाचे महत्वाचे तत्व म्हणून अलिप्ततेच्या तत्वाचा उल्लेख केला जातो. आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततेच्या तत्वाचा सर्वप्रथम पुरस्कार करणाऱ्या मोजक्या राष्ट्रांपैकी भारत हा एक होता. जगातील अनेक राष्ट्रांनी अलिप्ततावादाला आपल्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य सूत्र बनविले. त्यातूनच आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततावादी चळवळीची सुरूवात झाली. भारत हा त्यापैकी एक देश असून पं.नेहरूंना भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचे शिल्पकार म्हणतात. अलिप्तता म्हणजे एखाद्या राष्ट्राने आंतरराष्ट्रीय राजकारणापासून स्वतःला पूर्णपणे अथवा जास्तीत जास्त प्रमाणात बाजूला ठेवण्यासंबंधी अवलंबिलेले धोरण होय असे नसून अलिप्तता म्हणजे कोणत्याही प्रकारच्या लष्करी गटापासून किंवा आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्ता गटापासून अलिप्त राहणे होय. अलिप्ततावादाचे धोरण पंडीत नेहरूंनी विचारपूर्वक स्वीकारले होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या सुमारास जगाची विभागणी अमेरिका व रशिया अशा दोन परस्पर विरोधी सत्तागटात झालेली होती. दोन्हीही गट आपआपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत होते व शीतयुद्धाची परिस्थिती निर्माण झाली होती. पुढे युद्धाचीही परिस्थिती निर्माण होऊ शकली असती. अशावेळी पं.नेहरूंनी जागतिक शांततेचा पुरस्कार करून शीतयुद्धाच्या परिस्थितीचा धोका कमी करण्याचा प्रयत्न केला आणिबाणीची वेळ आल्यास या दोन्ही महाशक्तीच्या गटात मध्यस्थी करणे, त्यांच्यात समझोता घडवून आणणे व त्यांना प्रत्यक्षपणे संघर्ष करण्यापासून प्रवृत्त करणे ही भूमिका भारताला समर्थपणे बजावता येईल असे त्यांना वाटत होते. नेहरूंचा हा विश्वास कमी प्रमाणात खरा आहे हे त्यावेळच्या अनेक घटनांवरून दिसून येते.

**नेहरूंची राष्ट्रीय हित जोपासण्याची भावना** : नेहरूंचे असे मत होते की, राष्ट्रीय हितसंबंध प्रधान मानूनच अलिप्ततावादी धोरणाचा विचार केला पाहिजे. कारण त्यांच्या मते भारताचे हितसंबंध हे सर्वात महत्त्वाचे होते आणि त्यांच्या या मताला राजकीय वास्तवतेचा आधार होता. भारत हा नव्याने स्वतंत्र झालेला देश असून भारतापुढे गंभीर स्वरूपाच्या अनेक समस्या होत्या. या समस्या सोडविण्यासाठी देशाच्या विकासाच्या कार्यक्रमावर लक्षा केंद्रित करणे सर्वात महत्वाचे होते. अशा परिस्थितीत भारताने स्वतःला कोणत्याही सत्तागटात किंवा लष्करी करारात गुंतवून घेणे योग्य नव्हते. याउलट या दोन्ही महासत्तांपासून समान अंतरावर राहून त्यांच्याशी जर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले तर आपल्या विकास कार्यक्रमाला दोन्ही महाशक्तींपासून मदत मिळविता येईल असा नेहरूचा विचार अगदी योग्य होता.

पंडीत नेहरूंच्या या अलिप्ततावादी धोरणाला ऐतिहासिक आधारही होता व तो म्हणजे भारत हा प्राचीन काळापासून शांतताप्रिय देश म्हणून ओळखल्या जातो. या देशात पूर्वीपासूनच शांतता, सद्भाव व मानवतावाद या तत्त्वांचा स्वीकार केला गेला. त्यामुळेच

पं. नेहरूनंतरही सत्तेवर आलेल्या लाल बहादूर शास्त्रीं, श्रीमती इंदिरा गांधी यांनीही अलिप्ततावादाचे धोरण पुढे सुरू ठेवले. पुढे १९७७ मध्ये या अधिकारावर आलेल्या जनता पक्षाच्या सरकारनेही हेच धोरण पुढे सुरू ठेवले. त्यानंतर श्री विश्वनाथ प्रताप सिंह, एच.डी.देंवेगौडा, गुजराल, अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारनेही आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततावादी धोरणच पुढे चालू ठेवले. यावरून भारत हा जागतिक अलिप्ततावादी चळवळीत प्रमुख घटक म्हणून आपली भूमिका बजावेल असाच नंतरच्या सर्व सरकारने पुनरूच्चार केला. यावरून अलिप्ततावादी धोरणाला भारतातील बहुतेक सर्व राजकीय पक्षांच्या सरकारनी पाठिंबा दर्शविलेला होता.

**अलिप्ततावादाचा मुख्य उद्देश** – आंतरराष्ट्रीय राजकारणात परस्पर विरोधी उभ्या असलेल्या व राजकीय वर्चस्वासाठी स्पर्धा करणाऱ्या दोन महासत्ता अस्तित्वात होत्या. तोपर्यतच अलिप्ततावादी चळवळीची गरज होती आणि १९९१ मध्ये रशियाचे विघटन झाल्यानेच अमेरिका हे जगातील एकमेव महासत्ता बनली व त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणतील सत्तास्पर्धा व शीतयुद्ध संपुष्टात आले आणि अशा वेळी अलिप्ततवादी चळवळीची उपयुक्तताही संपुष्टात आली असे प्रतिपादन काही जण करतात.

अलिप्ततावादी चळवळीला अशा प्रकारे मोडीत काढणे बऱ्याच अभ्यासकांना मान्य नाही. त्यांच्या मते ही चळवळ आजही कालसंगत आहे. सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत तर महत्वाची भूमिका बजावत आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणातील ताणतणाव दूर करणे हे याच चळवळीचे उद्दिष्ट होते. सोंव्हिएत युनियनच्या विघटनानंतर वास्तविक आंतरराष्ट्रीय राजकारणातील ताणतणाव कमी व्हायला पाहिजे होते पण आता तर अमेरिका ही जगातील एकमेव महासत्ता झाल्याने त्यांच्या दादागिरीमुळे जगात अनेक ठिकाणी तणावग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या या अवस्थेत अलिप्ततावादी चळवळ निश्चितच उपयुक्त ठरेल.

अलिप्ततावादी चळवळीने दोन जागतिक महासत्तांमधील आंतरराष्ट्रीय राजकारणातील दोन सत्तागटातील संघर्षात मध्यस्थीची भूमिकाच बजावली पण याशिवाय जगातील विकसनशील राष्ट्रांमधील परस्पर संबंध व्रद्धिंगत करणे व त्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावणे हे देखील एक महत्वाचे उद्दिष्टय होते. या उद्दिष्टांची पूर्तता अद्यापही झालेली नाही. आजची परिस्थिती बदलली आहे. आज जगातील विकसित राष्ट्र आपला स्वार्थ शोधण्यासाठी विकसनशील राष्ट्राचे निरनिराळया मार्गाने शोषण करण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा वेळी विकसनशील राष्ट्रांना समान उद्दिष्टांसाठी समान पातळीवर एकत्र आणून त्यांच्यातील परस्परांच्या भावनेला चालना देण्याच्या उद्देशाने अलिप्ततावादी चळवळ कार्य करेल असा विश्वास चळवळीच्या पुरस्कर्त्यांना वाटत आहे.

भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात आंतरराष्ट्रीय शांततेलाही नेहमीच प्राधान्य दिलेले आहे. राष्ट्राराष्ट्रातील वादग्रस्त प्रश्न व संघर्ष युद्धाच्या मार्गाने न सोडविता ते शांततेंच्या व परस्पर विचारविनिमयाच्या मार्गाने सोडविले जावेत असा भारताचा आग्रह होता. भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू हे शांतीदूत म्हणून गौरविले गेले होते. जागतिक शांततेला प्राधन्य देण्याच्या धोरणातूनच भारताने शांतता व सहजीवनाचा पुरस्कार चालविला आहे.

आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे जग फार जवळ आलेले आहे. आजच्या जगाची स्थिती एखाद्या खेडयाप्रमाणे झालेली असून त्यातूनच ग्लोबल व्हिलेजची कल्पना पुढे आलेली आहे. आज जगातील सर्वच राष्ट्रांचे परावलंबित्व वाढलेले आहे. आज कोणतेही राष्ट्र इतर राष्ट्रांपासून वेगळे राहू शकत नाही. त्यामुळे सर्वच राष्ट्रवादाचा भिंती ओलांडून सहकार्याच्या भावनेने एकत्र यावे या विचाराचा पुरस्कार भारताने केलेला आहे. अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय सहकार्यातून मानव जातीच्या कल्याणाचे उद्दिष्ट्या साध्य करता येईल असा भारताचा विश्वास आहे.

आज भारत माहिती तंत्रज्ञानातील प्रमुख जागतिक सत्ता बनला आहे. भारताने अधिकाधिक बाजारपेठेच्या संधी निर्माण करून जागतिक गुंतवणुकीचे धोरण अवलंबिले आहे. ११ सप्टेंबर २००१ नतर दहशतवाद्याविरूद्धच्या जागतिक युद्धासाठी भारताने केलेले सहकार्य व भारताच्या दहशतवादाच्या विरोधी कृतिशील भूमिकेचे जगभर कौतुक केल्या गेले. त्यासाठी भारताचा धोरणात्मक दृष्टीकोन महत्वाचा ठरला.

आंतरराष्ट्रीय संघटना विशेषतः संयुक्त राष्ट्र व तिच्या समित्यांचे भारत नेहमीच संस्थापक सदस्य राहिलेला आहे. त्यामुळे जागतिक संघटनांना पाठिंबा देंऊन त्यांना बळकट करणे हा नेहमीच भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य हेतू राहिलेला आहे.

नंतरच्या काळातही म्हणजे संयुक्त राष्ट्राच्या निर्मितीपासून ते आजपर्यंत संयुक्त राष्ट्राच्या

जडणघडणीत व विकासात भारताने महत्वाची भूमिका स्वीकारलेली आहे. संयुक्त राष्ट्राच्या तत्व व उद्दिष्टांवर भारताचा द्रुढ विश्वास आहे. वसाहतवाद, वंशभेद, शस्त्र स्पर्धा व मानव अधिकाराचे उल्लंघन या विरूद्धच्या लढयांमध्ये भारत नेहमीच संयुक्त राष्ट्रासोबत होता. आज बदलत्या जागतिक व्यवस्थेमुळे भारताच्या राष्ट्रहिताला हानी न पोहचता भारताच्या परराष्ट्र धोरणात बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. आजच्या काळातील भारताच्या धोरणाची चौकट ही १९८१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आखली होती. त्यानंतर सर्व शासकांनी तत्कालीन गरजांनुसार योग्य ते बदल करीत करीत धोरणांमध्ये अधिक सुधारणा घडवून आणल्या.

डॉ.मनमोहनसिंगाच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडी शासनकाळात अर्थव्यवस्था व सुरक्षिततेबरोबरच भारताला त्याच्या एकाकीपणातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला गेला. परराष्ट्र धोरणाच्या आखणीतून शासन नेतृत्वानुसार राष्ट्रहितासाठी जे प्रयत्न केल्या गेले त्यावरून असे लक्षात येते की, भारतासाठी परिवर्तन व विकासाला पोषक असे बाह्य वातावरण निर्माण करणे हेच भारताच्या परराष्ट्र धोरणाचे प्राथमिक कार्य राहिलेले आहे. यासाठी निर्धारकांना काही आव्हानांचा सामना करावा लागला. यात शांततामय शेजाराची हमी, मोठया सत्तांबरोबर संबंध तसेच जलउर्जा व पर्यावरणासारखे भविष्यातील प्रश्न यासोबतच शेतीमध्ये संशोधन, शिक्षण व विस्तार घडवून आणणे इत्यादी आव्हानांना स्वीकारून भारताची आर्थिक प्रगती साध्य केली आहे.

भारताच्या आर्थिक प्रगतीमुळे भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा सुधारली असून भारताची आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रगतीच्या अनेक संधी उपलब्ध झालेल्या आहेत. तसेच इतर महासत्तांसोबत समान पातळीवरचे संबंध प्रस्थापित करणे भारताला शक्य झालेले आहे.

*संदर्भ ग्रंथ –*

*१. देशमुख डॉ. अलका, आंतरराष्ट्रीय संबंध*

*२. पाटील वा. भा., भारताचे परराष्ट्रीय धोरण*

*३. बी. सी. नरूला, राजनितीशास्त्र विश्वकोष*

# महाराष्ट्र राज्य शासनाची महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासात भूमिका

***प्रा. प्रविण घ. कामथे,*** *एम.कॉम, एम.बी.ए, एम.फील, नेट (जेआरएफ) (वाणिज्य), नेट (व्यवस्थापन), सेट, जी. डी.सी.ए.,तिलक वार्ड, तुमसर, जि. भंडारा (महाराष्ट्र) email:pravinkamthe27@gmail.com*

**प्रस्तावना** :- भारतात संपूर्ण लोक संख्येंच्या ६० टक्के लोक हे खेडयात राहतात व त्यांच्या मुख्य व्यवसाय हा शेती आहे. त्यांची आर्थिक बाजु कमकुवत आहे. त्यांना आर्थिक दृष्टया संकटांना सामोरे जावे लागते म्हणून शेतीचा विकास, शेतीवर अवलंबून किंवा संलग्न क्षेत्राचा विकास, रोजगार निर्मीती व मुलभूत सुविधांची निर्मीती उदा. रस्ते, पिण्याचे पाणी, शेती साठी पाणी, शिक्षण, विद्युत, संचार, बाजार इत्यादी हे सर्व ग्रामीण विकासाचा भाग बनले पर्यायाने शेतकऱ्यांचा विकास बनले व शेतकऱ्यांचा विकास म्हणजे देशाचा विकास ही गोष्ट सरकारच्या लक्षात आली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारच्या राष्ट्रीय योजनेत कृषी विकासाला आर्थिक विकासाचा सामाजिक परिवर्तनाचा व सामाजिक न्याय मिळवून देण्याचे मोठे साधन मानले गेले.

महाराष्ट्र राज्य शासनाव्दारे कृषी विभागाच्या सहाय्याने शेतकऱ्यांचे मेळावे भरविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, शेतकऱ्यांना अनुदानावर बि-बियाणे, खते, अवजारे, पाईपपुरवणे, इत्यादी कार्य केली जातात. पाईपलाईन, जुनी विहिर दुरूस्ती, बैलजोडी-गाडी इत्यादींसाठी, फळबाग लागवडीसाठी अनुदान दिले जाते. मृदा संधारण योजना, राष्ट्रीय पिक विमा योजना, शेतकरी अपघात विमा योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना, एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन योजना इत्यादी अनेक योजना राज्यात शेतकऱ्यांसाठी राबविल्या जातात. महाराष्ट्र राज्य शासनाच्या वास्तविक भूमिकेचे अध्ययन करण्याच्या उद्देशाने ''महाराष्ट्र राज्य, शासनाची महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासात भूमिका'' हा संशोधनाचा विषय निवडला आहे.

**शोध निबंधासाठी वापरण्यात येणारी संशोधनाची पद्धती** - शोध निबंधातील अभ्यास हा द्वितीय समंकावर अवलंबून आहे. समंकांचे संकलन हे विषयाशी संबंधीत विविध पुस्तके, मासिके, वार्षीक अहवाल, वर्तमान पत्र व सांकेतीक स्थळावरून करण्यात आले आहे.

**संशोधनाचे उद्देश** :- प्रस्तुत संशोधनाचे मुख्य उद्देश खालील प्रमाणे आहेत. १. महाराष्ट्र राज्य शासनाची महाराष्ट्राच्या कृषी विकासात भूमिका जाणून घेणे. २. राज्याच्या कृषी विकासात सहाय्यक घटक कोणते आहेत त्यांचा शोध घेणे. ३. महाराष्ट्र राज्याच्या कृषी व संलग्न क्षेत्राच्या विकासाची गती जाणून घेणे. ४. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य, कृषी विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ कशा प्रकारे मिळतो हे जाणून घेणे. ५. महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी विभागाव्दारे व संबंधित अन्य विभागाव्दारे उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पांची माहिती मिळवणे व त्यातील गुण-दोषांचा शोध घेवून ते प्रकल्प राज्याच्या विकासात कशा प्रकारे सहाय्यक होतील याचा शोध घेणे.

**संशोधनाची गरज आणि महत्व** :- कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राच्या महत्वाला नकारता येत नाही. कृषी व संलग्न क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नात असलेला वाटा यावरून या क्षेत्राचे महत्व लक्षात येते. या क्षेंत्राचा विकास करण्यासाठी सरकारने कृषी विभागासोबतच अनेक विभागांची स्थापना केली आहे. शेतकऱ्यांचा विकास हा ग्रामिण विकास व पर्यायाने देशाचा विकास असे समीकरण आज निर्माण झाले आहे. राष्ट्रीय विकासाच्या अनेक योजना कृषी विकासाच्या पर्यायी व पुरक अशा दोन्ही प्रकारे निर्माण करण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधनाव्दारे महाराष्ट्र राज्याची आर्थिक, व्यावसायीक, सामाजिक व बौद्धिक विकासात महाराष्ट्र राज्य शासनाची कशी भूमिका आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी विभागाव्दारे कोणकोणत्या योजना शेतकऱ्यांच्या विकाससाठी राज्यात राबविण्यात येतात तसेच त्या योजनांचा उपयोग शेतकरी आपल्या कृषीचा विकास करण्यासाठी कशा प्रकारे करून घेतात इत्यादी गोष्टिंचा शोध घेणे प्रस्तुत अध्यययनाचा उद्देश आहे. प्रस्तुत संशोधनाव्दारे जो निष्कर्ष समोर येईल तो निष्कर्ष अशाच प्रकारच्या अन्य संशोधन कार्यात उपयोगी होईल आणि सर्व विकासाच्या प्रक्रियेसाठी लागू होईल हे या संशोधनाचे महत्व आहे.

**महाराष्ट्र राज्य शासनाची महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासात भूमिका** :- महाराष्ट्रात जुलै १९८३ मध्ये कृषी खात्याची स्थापना करण्यात आली. कृषी क्षेत्राशी निगड़ीत सर्व विभागांचा त्यात समावेश करून ग्रामिण भागात शेतीमध्ये उत्पादनवाढीसाठी शासन स्तरावरून आवश्यक ती मदत करण्याच्या उद्देशाने कामाला सुरूवात झाली त्याच उद्देशातुन महाराष्ट्र राज्यात कृषी

विभाग कार्य करू लागले. सन १९५७ पासुन तालुका बिजगुणंन केन्द्रामार्फत दर्जेदार बियाणे उत्पादन सुरूवात झाली. सन १९६५-६६ पासुन विविध पिकांच्या संकरीत वाण निर्मीतीमुळे देषात कृषीचा आश्चर्यजनक विकास झाला.

कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांना अधिक मार्गदर्शनाची गरज लक्षात घेवून सन १९८१-८२ पासून प्रशिक्षण व भेट योजना सुरू करण्यात आली. कृषी विद्यापीठातील सुधारीत तंत्रज्ञान सर्वसाधारण शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी आखलेल्या पिक प्रात्याक्षिके, प्रक्षेत्र भेटी, प्रचार सभा, चर्चासत्रे, मेळावे, प्रदर्शने इत्यादी कार्यक्रमांच्या परिणामकारक अंमलबजावणी मध्ये महाराष्ट्र राज्य, कृषीविभागाची महत्वाची भूमिका आहे. अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता हे महाराष्ट्र राज्य, कृषी विभागाचे एकमेव उद्देश नसुन शेतकऱ्यांना उपलब्ध संसाधनाचा परिपूर्ण वापर करून अधिकाधिक आर्थिक फायदा मिळवून देणे हे आहे. यासाठी कृषी, फलोत्पादन व जलसंधारण क्षेत्रात, कृषी उपादनवाढ, निर्यातवृद्धी, कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या अनेक विविध योजना कृषी विभागाव्दारे राबविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे कृषी विभागाच्या सहाय्याने शेतकऱ्यांच्या विकासासाठी राज्यात अनेक योजना राबविले जात आहेत. त्यात मुख्यतः एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, राष्ट्रीय कृषी विमा योजना, महाराष्ट्र जल क्षेत्र विकास कार्यक्रम, कृषी उद्योग निती २०१०, राष्ट्रीय कृषी विकास योजना, क्षेत्रिय शेती पद्धती कार्यक्रम, एकात्मिक किड/रोग व्यवस्थापन आणि तण व्यवस्थापन, शेतकरी अपघात वीमा योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत प्रकल्प इत्यादींचा समावेश आहे.

महाराष्ट्रात पावसाच्या मानाने बाष्पीभवन जास्त असल्यामुळे वर्षातुन खुप ठिकाणी एकच पिक घेता येते व तेही कधी-कधी चांगले येत नाही कारण बरेचदा १५ ते २० दिवसांची उघड असते तरी काही वेळा अतिवृष्टी होते व त्यामुळे पीक उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर उंचवटयाने मर्यादीत केलेल्या व विशीष्ट जागेवरून पाणी वाहून जाणाऱ्या क्षेत्रास 'पाणलोट' म्हणता येईल. वरील सर्व परिस्थितीचा विचार करून कृषी विभागाने राज्यात सर्व जिल्हयात 'एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन' कार्यक्रमांच्या अंबलबजावणीवर जोर दिले व त्याचा चांगला परिणाम दिसुन येत आहे. राज्यात उन्हाळी पीक उत्पादनात वाढ झालेली आहे.

नैसर्गिक साधनांचे संरक्षण व संधारण सर्वाधीक महत्वाचे असून त्याबरोबरच पिकांचा लागवड खर्च कमी करून किफायतशीर उत्पादन काढणे, दर्जेदार व सकस शेतमाल निर्माण करणे हया बाबींचा एकूण सर्वकष विचार केल्यास शेतीमध्ये भावी काळात रासायनिक पदार्थांचा वापर कमीत कमी करणे हिताचे आहे. पिकांना आवश्यक अन्नद्रव्यांचा पुरवठा, पिकांचे पोषण तसेच कीड व रोगांपासुन संरक्षण करण्यासाठी रासायनाऐवजी सेंद्रिय अथवा जैविक पदार्थांचा वापर करण्याच्या पद्धतीस सेंद्रिय शेती पद्धती असे संबोधण्यात येते. वरील सर्व परिस्थितीचा विचार करून महाराष्ट्र राज्य, कृषी विभागाने 'सेंद्रिय शेती पद्धतीची वर्ष २०००-०१ पासुन सुरूवात केली आहे. त्यासाठी कृषी, विभागाव्दारे शेतकऱ्यांना कंपोस्ट, हिरवळीचे खत, गांडुळ खत तयार करण्यासाठी प्रशिक्षण दिले जात आहे. शासनाचा पुढाकार, कृषी विभागातील अधिकारी, शेतकरी, कृषी विद्यापीठ, शास्त्रज्ञ व सेवाभावी संस्था या सर्वांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रात सेंद्रिय शेतीची मोठी चळवळ उभी राहीली आहे. सेंद्रिय शेतीमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्याकृषी विभागाला ''शायनिंग वर्ल्ड लिडरशिप ॲवार्ड'' या आंतरराष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांनी दिनांक ५ डिसेंबर २००६ ला गौरविण्यात आले आहे.

राष्ट्रीय कृषी विमा योजना रब्बी १९९९-२००० हंगामापासुन केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व भारतीय कृषी विमा कंपनीच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्यात अधिसुचित मंडळातील, अधिसुचित पिकांसाठी राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय कृषी विमा योजना खरीप २०१३ हंगामात एकुण कमाल विमा संरक्षित रक्कम सरासरी उत्पन्नाच्या १५० टक्के पर्यंत होती. राष्ट्रीय कृषी विमा योजना अंतर्गत सन १९९९-२००० पासुन २०१०-११ पर्यंत भरलेल्या ६९९ कोटी रूपये विमा हप्त्यापोटी राज्यात '८६ लाख शेतकऱ्यांना १८८५ कोटी रूपये नुकसान भरपाई पोटी देण्यात आली आहे. तसेच राज्यात २०११-१२ पासून फळपीक विमा योजना राबविण्यात येत असून जवळपास ४२ कोटी रूपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे. पिक फळ विमा योजना अधिक परिणामकारक करण्याकरीता राज्यातील प्रत्येक महसूल मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी करण्यात येत आहे. तसेच उपग्रहाव्दारे पिकांचे सर्वेक्षण करून संबंधित पिकाची सखोल माहिती गोळा करून शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळविण्यासाठी पिक विमा योजनेत या माहितीचा उपयोग करून

घेण्याबाबद अभ्यास करण्यात येत आहे. अशा प्रकारे महाराष्ट्र राज्य, कृषी विभाग पिक विमा योजनेला यशस्वी बनविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

सन २००१ मध्ये स्थापित केलेल्या डॉ. एम.एस. स्वामिनाथन समितीने अध्ययन करून देशात कृषी विकासासाठी पूढील २५ वर्षांसाठी आपल्या अहवालात ३४७ सिफारशी सुचवले आहे. त्या शिफारशी महाराष्ट्र राज्य कृषी विभागाद्वारे स्विकारल्या गेल्या आणि अंमलात आणल्या गेल्या आहेत. त्यातील महत्वाची सूचना म्हणजे देशात कृषी विकासासाठी ''वर्चूवल युनिर्व्हसिटी'' स्थापन करण्याची गरज असल्याचे समितीने सुचवले होते. या सुचनेला लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य कृषी विभागाने 'महा-ॲग्रीनेट'' स्थापन करण्याचा विचार केला त्यात उत्पादकता, गुणवत्ता, लाभदायकता आणि समर्थता या चार गोष्टींवर भर देण्यात आला. आणि आज महाराष्ट्र राज्य, कृषी विभाग www.mahaagri.com या संकेतस्थळाच्या माध्यमाने शेतकऱ्यांना अनेक प्रकारची माहिती पुरवत आहे व या कामगीरीमुळे भारत सरकारचा देशातील कोणत्याही विभागाव्दारे किंवा संस्थेव्दारे ऑनलाईन माहिती पुरविण्यासाठी असलेला प्रथम पुरस्कार महाराष्ट्र राज्य, कृषी विभागाला मिळाला आहे.

सन २०१३-१४ मध्ये देशात राष्ट्रीय अन्न सुरक्षा लागू करण्यात आला या कायद्याच्या यशस्वी होण्यासाठी देशात अन्न-धान्य उत्पादनात वाढ करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्य, कृषी विभागाव्दारे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत प्रकल्पाधारीत विस्तार कार्यक्रमात राज्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना नविन तांत्रिक पद्धतीने शेती करण्याचे प्रशिक्षण देण्याचे कार्य केले जात आहे. या अंतर्गत भंडारा जिल्हयात ''श्री'' पद्धतीने धान लागवडीवर जोर देण्यात आला आहे व त्यानुसार शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्याच्या परिणामाने आधिच्या शेती पद्धतीच्या तुलनेत नविन तंत्रज्ञानानुसार शेतकऱ्यांनी शेती केल्यावर उपादनात वाढ झाल्याचे दिसून आले आहे. अशा प्रकारे महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या सहाय्याने राज्याच्या कृषी विकासात, पर्यायाने शेतकऱ्यांच्या विकासात महत्वपूर्ण योगदान आहे.

**महाराष्ट्रात कृषीचा विकास** :- महाराष्ट्रात कृषी क्षेत्राचा शुद्ध घरेलू उत्पादनात वाटा हा वर्ष १९६७-६८ मध्ये २८ टक्के होता. वर्ष १९८०-८१ मध्ये २५ टक्के, वर्ष १९९०-९१ मध्ये १९ टक्के होता म्हणजेच तो त्या काळात सतत पडत गेला आहे. परंतु ही घसरण महाराष्ट्र राज्याच्या कृषी क्षेत्रातच नव्हती तर त्या काळात संपुर्ण देशाच्या कृषी क्षेत्राची हिच स्थिती होती. वर्ष १९६७ ते ८० च्या दरम्यान पुन्हा महाराष्ट्रातील शेती व संलग्न क्षेत्राने गती धरली. महाराष्ट्राचा कृषी क्षेत्राचा विकास या काळात आकर्षक गतीने झाला याचे कारण म्हणजे देशातील त्या काळातील "हरीत क्रांतीचा" प्रभाव होय.

दहाव्या पंचवार्षिक योजने मध्ये (वर्ष २००२-०७) राज्यातील कृषी व संलग्न क्षेत्रातील स्थूल राज्य उत्पन्नाचा सरासरी वार्षिक वृद्धीदर २.६ टक्के इतका होता. तर नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (वर्ष १९९७-२००२) तो ३.६ टक्के इतका होता. अशा तऱ्हेने कृषी क्षेत्राच्या निराशाजनक कामगिरीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या एकंदर वाढीमध्ये अडथळा निर्माण होत आहे. योजना आयोगाने निर्धारित केल्यानुसार अकराव्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राच्या ४ टक्के विकासाच्या लक्षाच्या तुलनेत ४.३ टक्के सरासरी वाढ दिसून आली. कृषी क्षेत्रामध्ये ४.३ टक्के वृद्धी दराने वाढ प्राप्त करणे हे निश्चित अवघड काम होते. कारण ही वाढ विविध स्वरूपाच्या पर्यावरण विषयक आणि भौगोलिक मर्यादेच्या पार्श्वभूमिवर कृषी क्षेत्राने प्राप्त केली होती.

राज्याच्या कृषी व संलग्न कार्ये क्षेत्राच्या स्थूल राज्य उत्पन्नामधील हिस्यात सातत्याने घट होत आहे. हा हिस्सा वर्ष १९९९-२००० मध्ये १५.७ टक्के होता. तो वर्ष २००५-०६ मध्ये १२.४ टक्के पर्यंत खाली आला होता. राज्याच्या एकुण खर्चातील कृषी व संलग्न कार्ये यावरील खर्चाच्या प्रमाणातही सातत्याने घट होत असुन वर्ष २००१-०२ मधील हे प्रमाण ९. ९ टक्क्यावरून वर्ष २००५-०६ मध्ये ते ४.९ टक्के एवढे झाले होते. राज्याच्या कृषी आणि संलग्न कार्ये या क्षेत्रामधील अल्प आणि अस्थिर वाढीच्या दरामुळे राज्याच्या एकंदरीत आर्थिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

११ व्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राच्या ४ टक्के विकासाच्या लक्ष्याच्या तुलनेत ४.३ टक्के सरासरी वाढ दिसून आली १२ व्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राच्या विकासाचे उद्दिष्ट ११ व्या पंचवार्षिक योजने इतकेच म्हणजे ४ टक्के निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात चालू किंमतीनुसार २०११-१२ या वर्षाचे स्थुल राज्य उत्पन्न रू. ११९९५४८ कोटी असून देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याच्या सुमारे १४. ४ टक्के हिस्सा होतातर कृषी व संलग्न क्षेत्राचा राज्य उत्पन्नात १२.९ टक्के हिस्सा होता. याचकाळात राज्यातील २२९.१ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली

होती व ५२.१ लाख हेक्टर जमीन वनाखाली होती. सिंचनात वाढ व्हावी या साठी अनेक सिंचन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. पशुसंवर्धन हे कृषी क्षेत्राशी संबंधीत महत्वाचे क्षेत्र असून देशातील पशुधन व कुक्कुटपालन यामध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे ७ व १० टक्के आहे.

अशा प्रकारे कृषी व संलग्न क्षेत्राचा चालू किंमती नुसार स्थूल राज्य उत्पन्न वर्ष २०११-१२ मधील वाटा जरी १२.४ टक्के इतका असला तरी राज्यातील मागील काही वर्षातील कृषीचा विकास पाहता असे आढळते की, राज्याच्या अर्थव्यवस्थेत कृषी व संलग्न क्षेत्राचा सहभाग अत्यंत व्यापक स्वरूपाचा आहे.

**निष्कर्ष** :- १. महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासात महाराष्ट्र राज्य, कृषी विभागाचा योगदान आहे. २. महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक, सामाजीक, कृषी, व्यावसायिक विकासात वृद्धी होत आहे. ३. महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक व व्यावसायीक विकासात राज्यातील कृषी व संलग्न क्षेत्राच्या मोठा योगदान आहे. ४. महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकास प्रक्रियेला महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या विविध योजनांव्दारे, राज्यातील विविध बँकांच्या ऋण योजनामुळे व शासनाच्या विविध प्रकल्पांच्या उभारणीमुळे गती मिळाली आहे. ५. राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक व अन्य इतर समस्यांना समोर जावे लागते. ६. राज्यातील सिंचनाचे अनेक प्रकल्प अपूर्ण आहेत त्यामुळे कृषी विकासाची गती मंद आहे.

**सूचना** :- १. कृषी संशोधन व उच्च शिक्षा क्षेत्रात निवेश वाढविण्याची गरज आहे. २. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गॅरंटी योजना (मनरेगा) च्या अंतर्गत कामांना उत्पादक कार्यासोबत जोडायला पाहिजे. ३. राज्यात सिंचनाचे अनेक प्रकल्प अपूर्ण आहेत त्यांना शासनाने लवकरात लवकर पूर्ण करावे. ४.कृषी विभागातील रिक्त पदे लवकरात लवकर भरावी. ५.शासनाने अश्या योजना आणाव्यात ज्यामूळे शेतकऱ्यांच्या अर्थिक समस्या सुटतील. ६.शासनाने डॉ. एम. एस. स्वामीनाथन समितीने देशातील कृषी विकासासाठी सूचविलेल्या सिफारशी लागू कराव्यात. ७. सरकारने कृषी विम्याच्या क्षेत्रात वाढ करावी व विमा कंपन्यांनी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावीत कृषी क्षेत्राच्या पिक विमा दाव्यांची थकीत क्षतीपुर्ती रक्कम शेतकऱ्यांना लवकर द्यावी.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**


१. *आगलावे डॉ. प्रदिप,' सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र' विद्या प्रकाशन,नागपूर,२०००*
२. *कुरूलकर आर.पी.' विकासाचे अर्थशास्त्र', विद्या प्रकाशन,नागपूर १९९१*
३. *कुरूलर आर.पी. 'विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत' विद्या प्रकाशन,नागपूर १९९१*
४. *गंगवाल सुभाष 'भारत का विकास : दशा एवं दिशा', मंगलदिप प्र.,जयपूर, २००४*
५. *महाराष्ट्र राज्य, कृषी विभाग दैनंदिनी २००२ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला.*
६. *"Maharashtra Water Sector Improvement Project Proposal For Agriculture Support Service Component", 5 Nov 2004*
७. *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००३, २००४, २००५,२००६, २००७, २००८, २००९, २०१०, २०११, २०१२, २०१३, २०१४, २०१५ प्र. महाराष्ट्र राज्य सांख्यिकी कार्यालय, मुंबई महाराष्ट्र*
८. www.mahaagri.org.in
९. www. maharashtra.gov.in
१०. *नवभारत, लोकमत, तरूणभारत, भंडारा पत्रिका, इत्यादी*

# स्त्री चळवळीच्या परिवर्तनाचे प्रवाह

***डॉ. अंजली जोशी – टेंभुर्णीकर,*** *सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर.*
anjalitembhurnikar@gmail.com_मो. न. 9423775426

**प्रस्तावना** – पाश्चिमात्य जगात स्त्री प्रश्नासंबंधी नवा विचार साधारणपणे १९६० सालानंतर सुरू झाला. सिमॉन दी बुव्हाच्या 'दी सेकंड सेक्स' या गाजलेल्या पुस्तकाने १९४९ मध्ये प्रकाशित झालेले असूनही खरा प्रभाव १९६६ नंतर दाखवायला सुरूवात केली. त्यामुळे आधुनिक स्त्रीवादी विचारप्रवाह प्रामुख्याने १९६० ते ८० या दोन दशकांत निर्माण झालेले दिसतात. दुसऱ्या महायुद्धानंतर समाजाच्या पुनर्बांधणीमध्ये प. यूरोप व अमेरिका व्यग्र असताना या देशामध्ये सर्वत्र सुबत्ता निर्माण व्हायला सुरूवात झाली होती. अनेक सोयी-सुविधांनी राज्य कल्याणकारी बनत असताना स्त्रिया मात्र या सुबत्तेत रममाण झाल्या होत्या आणि अधिकाधिक पुरुषप्रधान संस्कृतीत रममाण होत होत्या. विशेष म्हणजे याची जाणीवही त्यांना नव्हती. स्त्रियांना शिक्षणाचा आधार मिळत होता तरीही आपण केवळ शोभेच्याच वस्तू म्हणून राहिलो आहोत याची जाणीव त्यांना हळूहळू व्हायला लागली.

दुसरीकडे इंडो-चीन युद्ध, अमेरिकेतील काळ्यांची चळवळ, १९६८ मधील पॅरीसमधील विद्यार्थ्यांचे बंड यातून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत जहालवादी चळवळींनी जोर धोर धरला होता. सर्वच क्षेत्रांतील जहालवादी चळवळींमुळे भारतातील स्त्री चळवळीवर प्रभाव पडला. या काळात स्त्री प्रश्नावर वेगवेगळ्या पैलूंमधून चर्चा व्हायला सुरूवात झाली हा काळ होता १९६० ते १९८०.

**स्त्री-पुरुष समतेचा अर्थ** – या काळानंतर समकालीन स्त्रियांच्या चळवळीमधून समतेचा नवा अर्थ प्रवाहीत झाला. समतेचा अर्थ पूर्वी सांगितला जात होता. तो असा स्त्री-पुरुषांचे गुणधर्म मुळात वेगळे आहेत. म्हणून त्यांची कार्यक्षेत्रेही भिन्न आहेत. या स्वायत्तेचा आदर म्हणजे समता. स्त्री-पुरुष यांनी परस्परांना पूरक राहून आपला विकास साधला पाहिजे.

आज मात्र हा अर्थ कोणालाही मान्य नाही. स्त्री 'भावनाशील' व पुरुष 'आक्रमक' ही अविवेकी मांडणी आज अमान्य होते आहे. माणूस म्हणून स्त्री-पुरुषांचे गुणधर्म व कल्पना एकच असल्या पाहिजेत ही नवीन विचारसरणी समाजात रूजू लागली. सर्वच क्षेत्रांत सुसंस्कृत जीवन जगताना स्त्री व पुरुषांमध्ये भेद होता कामा नये, या दोहोंमध्ये माणूस म्हणून कोणताही भेद नाही. आजवर स्त्रियांना जी वेगवेगळ्या क्षेत्रांत असमानता भोगावी लागली ती निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे, पुरुषप्रधान संस्कृतीचा भाग आहे हे नव्या विचारसरणीने मान्य केले.

स्त्रियांविषयीच्या पारंपारिक भूमिकेपासून ते परिवर्तनातील आधुनिक भूमिकेपर्यंत विविध विचारांच्या छटा, संकल्पना या परिवर्तनाचा अंतर्भूत झालेल्या दिसतात. विविध व्यक्ती, संघटना, विचारप्रणाली यांनी स्त्रियांच्या भूमिका परिवर्तनाला चालना दिली. त्यामध्ये जहालवादी विचार आहेत तसेच मवाळ विचारांचेही योगदान आहे. क्रांतिकारी विचारांनीही स्त्रीच्या भूमिकेला नवे पैलू पाडलेले दिसतात. स्त्रीयांच्या दास्यत्वाच्या कल्पनेपासून ते स्त्री एक स्वतंत्र माणूस आहे हा विचार समाजामध्ये प्रसृत करण्याचे काम वेगवेगळ्या पातळ्यांवर विविध क्षेत्रांत झालेले दिसते. नवीन आलेल्या विचारांना कधी समाजाने सहज स्वीकारले तर कधी स्त्रियांना बंड करावे लागले. कधी समाजातील पुरुषांनीच या कामी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे लक्षात येते. परंतु समाजाने आखून दिलेल्या चौकटीत जगणाऱ्या स्त्रीला आत्मभान देण्याचे काम या परिवर्तनाच्या चळवळीत झाले हे नक्की. काळाप्रमाणे स्त्रिया बदलल्या. कधी स्त्रियांनी परिस्थितीला बदलण्यास भाग पाडले, परंतु स्त्रीची भूमिका आधुनिक काळात बदलली आहे. एका हातात कुटुंबाची जबाबदारी घेणारी आणि दुसऱ्या हातात स्मार्ट फोन बाळगून जगाशी कनेक्ट होऊ पाहणारी स्त्री आज पहावयास मिळते. केवळ उच्चभ्रू समाजातीलच नव्हे तर मध्यमवर्गीय तसेच तळागाळातील स्त्रियांचे जीवन आज कॅशलेस व्यवहाराच्या माध्यमातून बदलू पाहते आहे. कायदा, तंत्रज्ञान, श्रद्धा, शिक्षण या व्यवस्थाही कधी स्त्रियांच्या परिवर्तनात सहाय्यभूत ठरल्या तर कधी अडथळेही ठरल्या.

स्त्रियांच्या परिवर्तनाची चळवळ कशी आकार घेत गेली हे पाहणे अतिशय रंजक असले तरी समस्त स्त्रीजातीच्या स्वातंत्र्यासाठीचा लढा सोपा नव्हता.

**स्त्रीचळवळीतील विविध प्रवाह** – भारतात अगदी जुन्या काळापासून स्त्रियांना पुरुषी वर्चस्वाचा सामना करावा लागला आहे. स्त्रीबद्दलच्या पूर्वग्रहदूषित कल्पना त्याला बव्हंशी कारणीभूत आहेत. स्त्री म्हणजे

सहनशीलता, परावलंबन हा तिच्यातील सर्वात मोठा दोष. स्वतःकडे दुय्यमत्व स्विकारणारी स्त्रीच कुटुंबात आदर्श, जी वाद घालते, मोठ्याने बोलते, स्वातंत्र्य मिळवते, ती स्त्री अत्यंत वाईट समजली गेली. स्त्रियांना स्वतःची मते असता कामा नये हाच मूलमंत्र जपत तिने संसारात पाऊल टाकणे गरजेचे होते. खाली मान घालणारी स्त्रीच सज्जन आणि वर बघून ठामपणे मते मांडणारी स्त्री अप्रिय ठरवली गेली. हे सर्व विचार समाजात रूजावे ते पारंपारिक मनोवृत्तीतून, समाजातील पुरुषसत्ताक व्यवस्थेतून, याच विचारप्रणालीने पुरुषाला अगदीच झुकते माप दिले. पौरूष म्हणजे कृतिप्रवणता, स्वातंत्र्य हे समीकरणच बनले. पुरुष श्रेष्ठ कायम. त्याचा अहंकार दुखावला जाणार नाही असे वागायची जबाबदारी स्त्रीची. आजही अनेक कुटुंबांमध्ये अशिक्षित, सुशिक्षित, स्वावलंबी, परावलंबी सर्व स्त्रियांचे हे मोठे काम ठरलेले दिसते. त्यामुळे पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही स्वातंत्र्यशील व सृजनशील आयुष्य घडविण्याचा अधिकार आहे हे सूत्र समाजाने अमान्य केलेले होते.

परंतु आधुनिक विचारांमध्ये तेच समान सूत्र पाहावयास मिळते. पारंपारिक विचारसरणीमध्ये कुटुंबसंस्था, खाजगी संपत्ती व सार्वजनिक निर्णयप्रक्रिया या क्षेत्रात स्त्रियांना माणूस म्हणून किंवा एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून वागण्याचे स्वातंत्र्य नाकारण्यात आले.

समकालीन स्त्रीवादी हा विचार मांडतात की, स्त्री-पुरुषांमध्ये जो शारीरिक भेद आहे त्यामुळे विषमता निर्माण होत नाही तर या शारीरिक भिन्नतेला जे अर्थ दिले गेले, जे मूल्य चिकटवले त्यामुळे स्त्रियांना दुय्यमत्व प्राप्त झाले. त्यातून पुढे स्त्रीवाद्यांनी स्त्री-पुरुषांमध्ये येणारा लैंगिक साचेबंदपणा, पुरुषी मानसिकता, स्त्रियांची पारंपारिक कामे, पुरुषशाहीचे राजकारण अशा विविध प्रश्नांना हात घातला.

स्त्री जीवनाला जवळून स्पर्श करणारे चार पैलू म्हणजे - १) उत्पादन २) पुनरूत्पादन ३) लैंगिकता ४) मुलांवरील संस्कार प्रक्रिया

या चार पैलूंभोवती स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी झालेली दिसते असे मत विद्युत भागवत यांनी मांडले आहे. (स्त्री प्रश्नांची वाटचालक्ष पा.२०२) तसेच कुटुंबसंस्था हेच केंद्र मानून आजवरच्या पुरुषी वर्चस्वाचे आणि स्त्रियांच्या दडपणुकीचे विश्लेषण केलेले दिसते.

**स्मकालीन स्त्री चळवळीतील दृष्टीकोन -**

**परंपरावादी दृष्टीकोन** - ज्यामध्ये स्त्री व पुरुष दोघे भिन्न निर्मिती असल्याने हा भेद मान्य करून त्यांना भिन्न वागणूक देणेच न्याय्य आहे. या विचारसरणीच्या अनुषंगाने स्त्री-पुरुषांमधील नैसर्गिक भिन्नतेला अनुसरून स्त्री-पुरुषांनी भिन्न भूमिका बजावल्या पाहिजेत हा दृष्टीकोन स्पष्ट होतो.

**उदारमतवादी दृष्टिकोन** - स्त्रियांना व्यक्ती म्हणून पुरुषांइतकीच आपली भूमिका ठरविण्याचा अधिकार आहे. त्यासाठी त्यांना स्वातंत्र्य आहे असे मांडणे. म्हणजे उदारमतवादी दृष्टीकोन समान हक्कासाठी व जाचक निर्बंधातून सुटका व्हावी म्हणून आग्रह धरणे, न्यायासाठी संघर्ष करणे ही उदारमतवादी भूमिका आहे. याने स्त्रियांनी समानता मिळाली पाहिजे, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रांत सहभाग घेतला पाहिजे, अपत्य संगोपनाची जबाबदारी एकट्याा स्त्रीची नाही असे मानणारा हा गट आहे.

**अभिजात मार्क्सवादी दृष्टीकोन** - या विचारानुसार, ऐतिहासिकदृष्ट्याा खाजगी संपत्तीच्या उदयातच स्त्रियांच्या दडपणुकीची कारणे सापडतात. स्त्री मुक्तीवाद हा साम्यवादी समाज अस्तित्वात आणण्यासाठी द्यायच्या लढ्यााचाच भाग आहे. विवाहसंस्था उदयास आल्यानंतर त्यात स्त्रियांना दुय्यम व पुरुषाला कुटुंबप्रमुख असे स्थान मिळाले. कुटुंबाचा वारस पुरुषाचाच स्वतःचा मुलगा असेल अशी अट निर्माण झाली. यात स्त्री व पुरुष दोघांसाठी दुहेरी नितीमूल्य व्यवस्था निर्माण झाली. भांडवलशाही व्यवस्थेतच स्त्रीचे अवमूल्यन झाले आहे अशी ही विचारधारा मानते. घरातील स्त्रियांच्या कामाला मूल्य नसणे, स्त्रियांना पुरुषांपेक्षा मजुरी कमी मिळणे ही, त्याचीच लक्षणे आहेत. मार्क्सवादी असा आग्रह धरतात की सार्वजनिक जीवनात स्त्रियांना स्वतंत्रपणे समान पातळीवर सहभाग घेता आला पाहिजे. समानता म्हणजे माणूस म्हणून जगण्यासाठी सर्वांचा समान सहभाग होय.

**जहाल स्त्रीवाद** - समाजातील स्त्रीच्या दडपणुकीचे कारण तिची लैंगिक दडपणूक असते असे मत जहाल स्त्रीवाद ही विचारधारा मानते. स्त्रियांच्या शरीरावर पुरुषांनी सांगितलेला हक्क हाच वर्गीय दबावाचेही मूळ आहे. स्त्रियांचे सर्व दुःख, समस्या त्यांच्या शारीरिकतेत आहे. गरोदरपणामुळे त्या परावलंबी बनतात, कुटुंबावर अवलंबून राहतात. स्त्रियांवरील अत्याचार, लादलेले विवाह, सक्तीची बाळंतपणे, यातून मुक्त व्हायचे असेल तर स्त्रीशिवाय मूल जन्माला घालण्याचे तंत्र विकसित करण्याची गरज ही विचारधारा व्यक्त करते. त्यातूनच स्त्रीला मुक्तता मिळू शकेल असा विश्वास व्यक्त करते.

लढाऊ स्त्रीवादी जाणीव होऊन आर्थिक पाया बदलला जाणे म्हणजे स्त्री-पुरुष समानता हा विचार

या दृष्टिकोनाने जन्माला घातला. स्त्रियांनी सार्वजनिक उत्पादन प्रक्रीयेत भाग घेतला पाहिजे, पण त्याचबरोबर घरकामही उत्पादकच मानले गेले पाहिजे. अभिजात मार्क्सवाद व जहाल स्त्रीवाद यांच्यातील दोष टाळून महत्त्वाचे बीज पेरून हा दृष्टिकोन तयार झाला आहे.

स्त्रीवादाच्या संदर्भात फेमिनिझम (मिउपदपेउ) ही संकल्पना जगभर वापरली जाते. १८९० पासून ही संकल्पना प्रचारात आली आहे. स्त्रियांकरीता समान अधिकाराचे तत्त्व जे स्त्रियांच्या समता सिद्धांतावर आधारित आहे, अशी फेमिनिझमची व्याख्या केली गेली आहे. स्त्री ही पुरुषांप्रमाणेच एक व्यक्ती आहे. त्यामुळे तिलादेखील मानवी अधिकार मिळाले पाहिजेत हा विचार स्वीकारण्यात आला. त्यातून स्त्रियांच्या दर्जा सुधारणेला चालना मिळाली. भारतात १८२६ मध्ये सतीबंदी कायदा पास झाला. राजा राम मोहनराय यांनी यासंदर्भात प्रयत्न केले. म. फुले यांनी स्त्री शिक्षण, केशवपन व बाल विवाह विरोध यासाठी कार्य केले. १८१५ मध्ये दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची स्थापना करून त्या माध्यमातून स्त्री शिक्षणाचा प्रचार केला. बंगालमधील समाजसुधारक पं. ईश्वरप्रसाद विद्यासागर यांनी विधवा विवाहाला प्रोत्साहन दिले. २६ जुलै १८५६ ला विधवा पुनर्विवाह कायदा पास करण्यात आला. महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री सुधारणेचे विशेष कार्य केले . ११ मार्च १८६३ ला पहिला पुनर्विवाह घडवून आणला. हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेनेही स्त्रीशिक्षणासाठी विशेष कार्य केले. म. गांधीजींच्या आंदोलनात स्त्रियांचा सहभाग मोठा होता. घराबाहेर न पडणारी स्त्री राष्ट्रीय आंदोलनात सहभागी झाली होती. त्यामुळे महिला शक्तीची ताकद समाजाच्या लक्षात आली. १६१२ पासून महिलांच्या विविध संघटना स्थापन होऊ लागल्या. स्त्रियांना समान अधिकार आणि संधी प्राप्त करून देण्यासाठी स्त्री संघटना कार्य करू लागल्या. भारतीय राज्यघटनेच्या १५ व्या कलमानुसार लिंगभेदाच्या आधारावर कोणत्याही नागरिकाविरूद्ध राज्य भेदभाव करणार नाही अशी हमी देण्यात आली. कायद्याने स्त्री-पुरुषांना समान दर्जा दिला.

**वर्तमान स्त्रियांचे स्थान** – समाजात स्त्री शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले. आज मुली शिक्षण घेतात, अर्थार्जन करतात. विविध नोकरी, व्यवसाय, उद्योग, शेती यामध्ये स्त्रिया कौशल्य प्राप्त करून सर्वोच्च पदाला पोहचल्या आहेत. शिक्षण, नोकरी यामुळे स्त्रियांच्या पारंपरिक भूमिका बदलल्या आहेत. वरवर पाहता हे बदल अत्यंत आनंददायक वाटत असले तरीही समाजातील पुरुषांचा स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टिकोन आजही बदललेला नाही.

**विविध विचारप्रवाह आणि भारतीय स्त्री** – गेल्या काही वर्षात सामाजिक समतेच्या चळवळीला विशेष जोर आलेला दिसतो. सर्व सामाजिक चळवळीच्या जाणीवेत स्त्री आहेच. भारतातील जातीयतेचे बीज, वर्गीय विषमता, राजकारण यातून स्त्रियांचे प्रश्न वाढत गेलेले दिसतात. वरील सामाजिक प्रश्नांना हात घातल्याशिवाय स्त्रियांचे प्रश्न सोडवले जाऊ शकत नाहीत. स्त्री प्रश्नांचा इतिहास पाहिल्यास लक्षात येते की गरीब व श्रीमंत, ग्रामीण व नागरी, शेतकरी वा नोकरी करणारी, दलित वा सवर्ण कोणत्याही स्त्रीचे काही प्रश्न समान आहेत. भारतात कोणत्याही ठिकाणी स्त्रियांना होणारी मारहाण, शारीरिक, बौद्धिक, मानसिक छळ व अपमान, विविध तऱ्हेने तिला गांजवणे व अत्यंत हिन व दुय्यम दर्जाची वागणूक हे स्त्रियांचे खरे प्रश्न आहेत. जीवनात दररोज भोगाव्या लागणाऱ्या प्रश्नातून स्त्री मोकळी होणार नाही. तोपर्यंत ती क्रांतीच्या बाजूनेही उभी राहू शकणार नाही. कुटुंबात आणि बाहेर होणारा तिचा शारीरिक व मानसिक छळ थांबला पाहिजे. हुंडाबळी, अत्याचार, बलात्कार, छेडछाड अशा प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी या प्रश्नांना हात घालण्याची आजच्या सामजिक/राजकीय चळवळीची तयारी नाही. स्त्रिया जर बोलत्या झाल्या, त्यांनी मौन सोडले तसेच संघटित झाल्या तर पुरुषी विचार व सवयी असणाऱ्या राजकीय पक्षांना ते परवडणारे नाही. परंतु महात्मा फुले यांनीही विधवा विवाह व केशवपन या समस्यांना कधी कमी लेखले नाही. त्याचप्रमाणे या स्त्रियांच्या दैंनदिन समस्या आधी सोडवणे आवश्यक आहे. पुरुष मग तो उच्चविद्याविभुषित असो, प्रचंड लोकप्रियता मिळवलेला राजकीय कार्यकर्ता व नेता असो वा सामान्य कामगार, तो घरात कसा वागतो या प्रश्नाला आपण भिडत नाही तोपर्यंत स्त्री जीवनाची किंवा स्त्री प्रश्नांची जाणीव आपल्याला होणार नाही. सामाजिक चळवळीची धुरा वाहणारेही या प्रश्नाकडे डोळेझाक करतात.

स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न आज ऐरणीवर आहे. निसर्गतःच स्त्री व पुरुषांची शरीरचना वेगळी असते. पण त्यातून काढला जाणारा अर्थ मात्र मानवनिर्मित असतो. लिंगरचना जरी निसर्गाने ठरते तरी लैंगिक जडणघडण समाजच घडवतो. यावरचा उपाय म्हणून समानतेचा आग्रह धरला जातो. ज्यात स्त्रीच्या विरूद्ध पुरुषाला उभे केले जाते. त्यामुळे स्त्रीचा लढा म्हणजे कायम पुरुषांविरोधात असा सूर समाजात उमटतो. स्त्री-पुरुष असमानतेचे प्रश्न सोडवत असताना असा

सूर समाजाने बाळगणे हे स्त्री विकासासाठी घातक ठरते. विवाहितेने मंगळसूत्र नाकारणे, पुरुषी कपडे घालणे, अहमहमिकेने जे जे पुरुष करतात ते करू पाहणे ही समानता नव्हेच. मातृत्व नाकारण्यात कसलेही शहाणपण नाही हे स्त्रियांनीही लक्षात घेणे आवश्यक आहे. निसर्गदत्त स्त्रियांचे हक्क बजावून पुरुषांच्या बरोबरीने विश्वासाचे, मित्रत्वाचे व माणुसकीचे नाते निर्माण होणे आवश्यक आहे. स्त्रियांना किमान शारीरिक व मानसिक संरक्षण मिळाल्याशिवाय स्वातंत्र्य व समता यावर उभे असणारे जीवन जगण्याची अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे.

**निष्कर्षः–** आजच्या स्त्रियांचा खरा प्रश्न जसा समानतेचा आहे तसाच तो स्वातंत्र्याचाही आहे. स्वातंत्र्याचाही खरा अर्थ आपण जाणून घेतलेला नाही. उलट स्वातंत्र्य व स्वैराचार यात नेहमीच गल्लत केली जाते. जबाबदारी नाकारून, फसवणूक करून केलेली गोष्ट स्वैराचारात येते. यातील फरक ओळखला पाहिजे. यातील मूल्यात्मक स्पष्टता मिळवणे अधिक गरजेचे आहे. शेवटी भारतातील स्त्रियांचे प्रश्न स्वातंत्र्य व समानतेच्या आधीन राहूनही रोजच्या जीवन जगण्याशीच निगडीत आहेत. आजही ग्रामीण किंवा आदिवासी स्त्रीला पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. जळण आणण्यासाठी काबाडकष्ट करावे लागतात. यापासून तिला मुक्त करण्यासाठी आधी स्त्री चळवळींनी या प्रश्नांना अग्रक्रम देणे आवश्यक आहे. तळागाळातील सर्व मुलींना सकस शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे. स्त्रियांना महिला कायद्याची माहिती होणे ही काळाची गरज आहे.

*संदर्भ :*

१. *महिला सशक्तीकरण और कानुन : सरस्वती प्रकाशन, कानपूर*
२. *स्त्री प्रश्नांची वाटचाल परिरव्तनाच्या दिशेने : विद्युत भागवत, प्रतिमा प्रकाशन, पुणे*
३. *भारतीय स्त्री, लिंग अनुपात एवं सशक्तीकरण, कृपा गौतम, मिश्रा पब्लिकेशन, पुणे*
४. *स्त्री वाकासाचे नवे क्षितीज : संपा. स्वाती कर्वे, प्रतिमा प्रकाशन–२००८, पुणे*
५. *स्त्री प्रश्नांचा वेध : डॉ. विलम गोल्हे, पद्मगंधा प्रकाशन–२००६, पुणे*
६. *स्त्री मुक्तीचा आत्मस्वर : तास भवाळकर, श्रीविद्या प्रकाशन–१९९४, पुणे*
७. *भुमंडलीकरण और स्त्री के प्रश्न : प्रभा खेतान, वाणी प्रकाशन–२००४, दिल्ली*
८. *Women Empowerment and Challenge of Change* : Latika Menon, Kanishka Publishers, New Delhi.

# कुपोषणामुळे होणारे रोग आणि त्यावरील उपाययोजना

*प्रा. सुनिता अ. राठोड, गृहअर्थशास्त्र विभाग, एस.एन. मोर महाविद्यालय, तुमसर.*

प्रत्येक परिवारासाठी आहार आयोजन आवश्यक आहे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला आवश्यकतेनुसार आहार मिळायला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला असा आहार मिळायला पाहिजे ज्यामुळे त्यांची भूख भागेल तसेच शरीराचे पोषण ही पूर्ण होईल. प्रत्येक कुटुंबामधील भिन्न भिन्न वयाच्या व्यक्तींसाठी वेगवेगळा आहार आवश्यक आहे जो आहार कींवा अन्न आपली भूख तर मिटवू शकतो परंतू सर्व पोषकतत्व आवश्यकतेनुसार मिळत नाही त्याला अपूरे पोषण कींवा कुपोषण असे म्हणतात.

**भारतातील कुपोषणाची कारणे :-**

१) **कुटुंब सदस्य संख्या :-** कुटुंबातील संख्येत वारंवार पडणारी भर हेच कुपोषणाचे प्रमुख कारण सांगता येईल. याचे परिणाम म्हणून सर्व वयोगटातील व्यक्तींमध्ये कुपोषण आढळते. बालकांमध्ये याचे प्रमाण सर्वाधिक आहे. एकुण संख्येच्या ४० टक्के बालक आहेत. मेळघाट, कुपोषण समस्या ऐकुण सर्वांना माहिती आहे. पहिली पाच वर्षे बालकाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्वाची असतात. कारण त्यावरच पुढील अवस्थांचा विकास अवलंबुन असतो. पहिल्या बालकाच्या अन्नविषयक गरजा चांगल्या प्रकारे पूर्ण होत नाही तर दुसरा बालक कुटुंबात हजेरी लावतो. वारंवार होणारी प्रसुती यामुळे मातेच आरोग्य बिघडते. त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो.

२) **देशातील लोकसंख्या :-** भारत दाट लोकसंख्या वस्तीचा देश आहे. जगातील एकुण लोकसंख्येपैकी १४.६ टक्के लोक भारतात आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळेच दारिद्रय आहे. प्रतिडोई अन्नघटकाची उपलब्धता कमी पडते. त्यामुळे कुपोषण दिसून येते.

३) **आजार :-** पचनाद्रियांचे आजार असल्यास व्यक्ती पुरेसा आहार घेवू शकत नाही. अशक्तपणामुळे किंवा दाताचे विकार, घशाचे विकार असल्यास चर्वणशक्ती कमी पडते आणि ही परिस्थिती काही महिने राहिल्यास कुपोषण घडून येते. अंत्रस्त्राव ग्रंथी, चयापचय क्रियेत अडथळा आल्यास कुपोषण होते.

४) **आर्थिक :-** पैशाच्या अभावी क्रयशक्ती कमी होवून खाद्यान्नाची पाहिजे त्या प्रमाणात खरेदी करू शकत नाही. त्यामुळे कुपोषणासारख्या गंभीर बाबीला सामोरे जावे लागते. प्रामुख्याने जीवनसत्वे आणि खनिजे यांची कमतरता दिसून येते.

५) **गरिबी :-** शारीरिक श्रम करणाऱ्या व्यक्तीला जास्त कॅलरीजची गरज असते. परंतु आर्थिक कारणांमुळे अशा व्यक्ती अर्धपोटी असतात. आहाराच्या कमतरतेमुळे कमी कॅलरीज मिळतात. काही विशेष अवस्थांमध्ये जसे गर्भवती व दुग्धसृजनशील मातेला पौष्टीक अन्नाची गरज असते. आहारात दुध मिळणे आवश्यक असते. परंतु पैशाच्या अभावी आहारविषयक गरजा पूर्ण होत नाहीत. त्यामुळे माता-शिशु मृत्यु दर वाढतो. दुग्ध सृजनशील काळातील २५ टक्के मातांना प्रथिने आणि कॅलरीची आवश्यकता असते. जिवनसत्व ‘अ’ आणि खनिजे ही संरक्षक अन्ने आर्थिक कारणाने पुरेशी होवू शकत नाही.

६) **अज्ञान :-** आहारावर त्या-त्या समाजधारणेचा प्रभाव असतो. व्यक्ती परंपरेनी चालत आलेले अन्न खाणे पसंत करते. संवयीचा पगडा प्रामुख्याने दिसून येतो. म्हणूनच विशिष्ट समाजाची पदार्थ करण्याच्या कृती आणि पध्दतीत काही अंशाने फरक आढळतो. अन्न शिजविण्याच्या चुकीच्या पध्दती यामुळे अन्नातील घटक कमी होतात. उदा. तांदुळ चोळून चोळून धुणे, भाजी चिरल्यावर धुणे, जास्तवेळ शिजविणे यामुळे अन्न तत्वांवर परिणाम होतो. आणि पोषकतत्वांची हानी होते. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास कुपोषणाचे महत्वपूर्ण आणि मुख्य कारण म्हणजे अज्ञान हे होय.

७) **पौष्टीक घटकांचा असमतोल :-** पौष्टीक घटकांची कमतरता किंवा आधिक्य असल्यास शरीरावर कुपोषणाची लक्षणे दिसून येतात. जिवनसत्व ‘अ’ आणि लोहाची कमतरता प्रामुख्याने दिसून येते. बरेचदा अज्ञानामुळे आहारात असमतोल घडून येतो.

८) **पदार्थांविषयी पूर्वग्रह :-** दुधी भोपळा हे देवीला वाहिलेले फळ आहे. अशाप्रकारचे पूर्वग्रह भारतीय समजात आहेत.

९) **संवयी :-** अन्न सेवनाच्या चुकीच्या संवयींमुळे कुपोषणाला मदत होते. जेवणात विविध खाद्यपर्थांचा अभाव असतो. त्याचा परिणाम एखाद्या खाद्यपदार्थाचे आधिक्य वाढते तर एखादे पोषणतत्वाची कमतरता निर्माण होते.तळलेले पदार्थांचा मसालेयुक्त पदार्थ रूचीने खाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. असे खाद्यपदार्थ सेवन करणे हा संवयीचा भाग होतो. पुढे जावून त्याचे आरोग्यावर वाईट परिणाम निश्चितच होतात.

अन्न हे देहधारणेसाठी आहे. असे आपल्या पूर्वजांनी सांगितले आहे. अन्न हे शुध्द आणि पवित्र वातावरणात ग्रहण करण्यासबंधी सुचविले आहे. परंतु आजच्या गतिमान जीवनात आहार विषयक संवयी बदलत आहेत असे दिसते. सुग्रास जेवणाची जागा फास्ट-फूड, घेवून भूक भागविणारे काही थोडे-थोडके नाहीत. असे जरी असले तरी प्राप्त परिस्थितीत शरीराचे पोषण करणाऱ्या अन्न पदार्थाची निवड करणे तर आपल्या हाती आहेच. म्हणून 'स्वास्थ हा प्रगतीचा केन्द्रबिंदु आहे' हे तत्व प्रत्येकाने स्वीकारून आपल्या आहारविषयक सवयी आरोग्यवर्धक असाव्यात असा आग्रह असला पाहिजे. लहान मुलांच्या आहाराकडे जातीने लक्ष पुरविल्यास या सवयी पुढील आयुष्याला उपकारक ठरतील. काही वर्षापूर्वीच्या काळात किराणाबरोबर मध्यमवर्गीय कुटुंबातून सुकामेवा हा आवर्जून आणत असतो. परंतु अलिकडे त्याची जागा 'बिस्कीट, चॉकलेट' नी घेतलेली दिसते. महाग खाद्यपदार्थात पोषणतत्वे अधिक असतात, हा चुकीचा ग्रह आहे. म्हणून कमी खर्चात जास्त पोषणमूल्ये मिळणाऱ्या आहाराची सवय अंगिकारण्याची गरज आहे.

१०) **अंधश्रध्दा** :- आहारीय अंधःश्रध्देमुळे बहुतेक व्यक्तीच्या आहार सदोष आढळतो. विशिष्ट ऋतुत अमुक पदार्थ खायचे नाही. उपवासावर विशेष भर देणे. त्यामुळे पोषणमूल्ये आहारात कमी पडतात. नाशिकच्या कुंभमेळयात २००३ मध्ये प्रसादासाठी किती चेंगराचेंगरी होवून जीवित हानी झाली हे आपल्याला माहीत आहे. महाराजांनी रामकुंड स्थळी उधळलेल्या प्रसादाचे कण मिळविण्याकरीता झालेली ही चेंगराचेंगरी होती. अंधःश्रध्दा हा त्या मागचा महत्वपूर्ण भाग असल्यामुळेच अशी बाब घडून आली. गर्भवतीने पुरेसे जेवण करू नये. कारण प्रसुतीच्या वेळी त्रास होतो. अशा भ्रामक कल्पना व्यवहारात आणल्यामुळे कमी वजनाची नवजात बालके जन्माला येतात. स्त्रियांनी दुध पिणे चांगले नाही. अशी अंधःश्रध्दा त्यांच्या स्वास्थाला बाधक ठरल्या तर नवल ते कोणते? अशा पार्श्वभूमीवर कुपोषण घडून येते.

११) **व्यसनाधिनता** :- मद्यपानासारखे व्यसन आहारावर परिणाम करते. पचनविषयक तक्रारी उद्‌भवतात. त्यामुळे कुपोषण घडून येते.

१२) **सभोवतालचा परिसर** :- सभोवतालचा परिसराचा व्यक्तीच्या आरोग्यावर आणि मानसिकतेवर परिणाम होतो. गलिच्छ वातावरणात कुपोषण संभवते. माशांचा त्रास हा खाद्यपदार्थ दुषित करणारा भाग आहे. संसर्गामुळे, तसेच पाण्याचे प्रदुषण या सर्व बाबी कुपोषणाला आव्हान देतात.

१३) **अन्नभेसळ** : 'अन्नभेसळ' कुपोषणाला आमंत्रण देणारे ठरते. खाद्यपदार्थात असलेल्या भेसळीमुळे आरोग्यावर दीर्घकालीन वाईट परिणाम संभवतात. जसे सरबतातील रंग, तिखटाला दिलेला रंग, हळदीतील मेटानिल यलो असे खाद्यपदार्थ सेवनाने मज्जातंतूवर वाईट परिणाम होतात. मोहेरीच्या तेलात अर्जिमोनची भेसळ झाल्यास सर्वांगावर सुज येते. १९९८ साली तेलात अर्जिमोन तेलाची भेसळ झाल्याने पायावर सूज आल्याची नोंद आहे. लोणी, तूप, दूध यातील भेसळ सर्वांना परिचित आहे.

१४) **भौगोलिक कारण** :- नैसर्गिक बदलामुळे देशात महापूर, भूकंप होतात. अशावेळी जनजीवन विस्कळीत होते. त्या ठिकाणचे लोकांमध्ये कुपोषण संभवते. जीवनाची पूर्ववत घडी बसणे याला काही कालावधी लागतो. पुर्नवसनासारखे उपक्रम भारत सरकार राबवित आहे. तरीह पण वित्तहानी, आप्त-स्वकीय दुरावणे याचे गंभीर परिणाम होवून कुपोषण संभवते.

**कुपोषामुळे पुढील प्रमाणे रोग होतात –**

१. **क्वॉशिऑरकर** (Kwashiorkor) – प्रथिनांच्या कमतरतेमुळे बालकांचे कुपोषण होते तेंव्हा लहान मुलांना क्वॉशिऑरकर रोग होतो. १ ते ४ वर्ष वयात या रोगाचे प्रमाण जास्त असते. बहुतांशी शिशूंना स्तनपान बंद केल्यावर कर्बोदके युक्त अन्न दिले जाते. प्रथिने पुरेशी न मिळाल्याने प्रथिनांच्या कमतरतेची लक्षणे बालकात दिसू लागतात. उंची व वजन फारसे वाढत नाही. शरीरात पाणी साचते. त्यामुळे शरीरावर सूज येते. सर्वात प्रथम शरीराच्या खालच्या भागात पाय, मांडयावर सूज येते. त्यानंतर हात आणि चेहऱ्यावर सूज येते. शरीर दुखते, मुले चिडचिड करतात अशा बालकांचा दंडघेर कमी असतो. त्वचा, कोरडी होते. त्वचेची साल निघते. कधी कधी त्वचेवर काळे डाग पडतात. भूक लागत नाही. डायरिया होतो. केस गळतात. केसाचा रंग लाल, भेरकट, पांढरा होतो. क्वॉशिऑरकर झालेली बरीचशी बालके उपचाराअभावी मृत्युमुखी पडतात.

२) **मरॅसमूस** (MarasmuS) – प्रथिने व कॅलरीच्या कमतरतेमुळे शिशूना मरॅसमूस (सुका रोग) होतो. निम्न वर्गीय, कुटुंबातील बालकात हया रोगाचे प्रमाण जास्त असते. मरॅसमूस रोग एक वर्ष वयापेक्षा कमी वयाच्या शिशूंना अधिक प्रमाणात होतो. मातेची वारंवार गर्भधारणा झाल्यास या काळात पोषण नीट होत नाही. आणि स्तनपान बंद केल्यावर सुध्दा

प्रथिनांच्या दृष्टीने निम्न प्रतीचा आहार मिळतो. अज्ञानामुळे सदोष आहार तयार केला जातो. याचा परिणाम म्हणजे रोगांचे संक्रमण वाढते.

मरॅसमूस झालेल्या शिशूची वाढ खुंटते. शिशु अशक्त होतात. भूकेने व्याकूळ झालेले दिसतात. हातपाय सुकून काडयासारखे होतात. ओटीपोट फुगलेले दिसते. त्वचा कोरडी व त्यावर सुरकूत्या दिसतात. केस, त्वचेत परिवर्तन होते. जीवनसत्वाच्या अभावाने विकार होतात. बहुतांशी शिशुचा मृत्यु होतो. आपल्या देशात शिशुमृत्युचे प्रमाण जास्त आहे. काही जगतात परंतू त्यांचा शारीरिक व मानसिक विकास योग्य प्रकारे झालेला नसतो. शिशूच्या मृत्युसंख्येमुळे कुटुंबातील स्त्रियांच्या प्रसूतीचे प्रमाण वाढते. अशा प्रकारे समस्या सारख्या वाढत जातात.

**३) अस्थिविकृती** – निम्न आर्थिक स्तरातील बालकांच्या अस्थिचा विकास प्रथिने, कॅल्शियम, फॉस्फोरस आणि जीवनसत्व 'ड' च्या कमतरतेमुळे अत्यंत मंद गतीने होतो. त्यामुळे दीड ते दोन वर्षापर्यंत शिशू चालू शकत नाही.

अ. मुडदूस (Ricketd) – मुडदूस रोग जीवनसत्व 'ड' ची कमतरता किंवा कॅल्शियम, फॉस्फोरस च्या असंतुलनामुळे होतो. साधारणपणे ५ वर्षापर्यंतच्या मुलांना अधिक होतो. या रोगात अस्थिची बांधणी अव्यवस्थीत होते. हाडात कॅल्शिफिकेशनची क्रिया नीट होत नाही. त्यामुळे ते मऊ बनतात. त्यांत विकृती येते. बालकांचे हातपाय बारीक, पोट मोठे होते. हातपायाच्या हाडांना वाक येतो. कपाळ पुढे येते व चौकोनी दिसते. डोके मोठे दिसते. यकृत वाढते. दात अनियमीत येतात, हगवण लागते अशा अनेक तक्रारी आढळतात. बालकाची वाढ नीट होत नाही.

ब. अस्थिमृदुता (Osteomalacia) – प्रौढांमध्ये कॅल्शियम व जीवनसत्वाच्या कमतरतेने हा रोग होतो. वारंवार गर्भधारणा व पौष्टीक घटकांची कमतरता यामुळे विशेषतः स्त्रियांना हा रोग होतो. अस्थि मजबूत राहत नाही. वाकतात आणि तुटतात. पाठीच्या कण्यात विकृती येते. पाय , सांधे, कंबर दुखते.

**४. जीवनसत्व 'अ' ची कमतरता :–** आपल्या देशात जीवनसत्व 'अ' ची कमतरता ही एक आरोग्य विषयक समस्या आहे. बहुतांशी लोकांच्या आहारात जीवनसत्व 'अ' व कॅरोटीन कमी आढळते. त्याचा परिणाम ५ वर्षाखालील बालकावर होतो. १० टक्के बालक हे जीवनसत्व 'अ' च कमतरतेचे शिकार आहेत. भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान मंडळाच्या च्या अंदाजानुसार १२ ते १४ हजार मुलांना दरवर्षी जीवनसत्व 'अ' च्या कमतरतेने अंधत्व येते.

गर्भवती स्त्रिया व इतर व्यक्तीमध्ये हया जीवनसत्वाची कमतरता आढळते. जीवनसत्व 'अ' च्या अभावाने प्रामुख्याने डोळयांच्या कार्यावर परिणाम होतो. बालकांमध्ये रातआंधळेपणा येतो. डोळे निस्तेज कोरडे होतात. डोळयातील पांढरा भाग मोठा होतो. अश्रु ग्रंथी सुकतात. अश्रुग्रंथीचा स्त्राव बंद होतो. त्यामुळे किटाणूना रोखण्याची क्षमता कमी होते. बहुतांशी बालक आणि व्यक्ती पूर्णपणे आंधळया होतात. अशा आंधळया व्यक्ती समाजावर एक प्रकारचा भार बनतात. डोळे निरोगी ठेवणे अत्यंत आवश्यक असते. जीवनसत्व 'अ' हे डोळयाच्या आरोग्यासाठी आवश्यक असते. त्याचबरोबर त्वचा निरोगी ठेवण्यास व पचन संस्थेच्या आतील पेशीची निर्मिती व पेशी सजीव ठेवण्यास उपयुक्त.

**५. जीवनसत्व 'ब' ची कमतरता :–** जीवनसत्व 'ब' ची कमतरतेने बेरीबेरी हा रोग होतो. बेरीबेरी रोगाचे आर्द्र व शुष्क असे दोन प्रकार आहेत. शुष्क बेरीबेरी रोगात स्नायू अतिशय अशक्त बनतात व हळूहळू चालणेही अशक्य होते. तर आर्द्र बेरीबेरी रोगात अंगावर सूज येते. दम लागतो. श्वास घ्यायला त्रास होतो. मातेच्या दुधात 'ब' चे प्रमाण कमी असल्यास लहान मुलांना बेरीबेरी रोगाची लक्षणे एकदम दिसू लागतात. मुले बेचैन होतात. झोपत नाही. पचनक्रिया बिघडते. भूक लागत नाही. उलटया होतात. मुले अशक्त बनतात. मांसपेशी व हृदयावर परिणाम होतो. दीर्घकाळ कमतरता राहिल्यास पोलिओ होतो. व मृत्युही होवू शकते.

**६. जीवनसत्व 'ब' ची कमतरता – पेलेग्रा** – जीवनसत्व 'ब' च्या कमतरतेने पेलेग्रा रोग होतो.. ज्या लोकांच्या आहारात मका व ज्वारी हे प्रमुख अन्न आहे त्या भागात हयाचे प्रमाण जास्त आढळते. पेलेग्रा रोगांत त्वचेवर प्रथम परिणाम होतो. त्वचा लालसर होवून काळी पडते. व खरखरीत होते. दीर्घकाळ 'ब' ची कमतरता राहिल्यास पचनक्रिया बिघडते व मज्जातंतू कमजोर होतात. नंतर मेंदूवर परिणाम होतो. पेलेग्रा झालेले ८ ते १० टक्के लोक मनोरूग्णालयात आढळतात.

**७. जीवनसत्व 'क' ची कमतरता – (स्कर्व्ही)** – जीवनसत्व 'क' च्या कमतरतेने प्रौढांना स्कर्व्ही हा रोग होतो. हिरडया मधून रक्त येते. दात सैल होतात. अस्थि ठिसूळ होतात. लहान मुलांना सुध्दा हा रोग होवू शकतो. हाडांच्या टोकांना सूज येते. मुले हातपायांना हात लावल्यास रडतात. त्वचेवर चट्टे दिसतात. श्वास घ्यायला त्रास होतो. लहान मुलांचा मृत्यु होण्याची शक्यता असते.

८. **लोहाची कमतरता - (रक्तक्षय)** - भारतीयांच्या अन्नामध्ये मुख्यतः लोहाची कमतरता असते. लोहाच्या कमतरतेचे गांभीर्य आकडेवारीने समजू शकेल. रक्तक्षयाने ५० टक्के बालक, ३० टक्के पुरूष, व ८० ते ८५ टक्के गरोदर स्त्रिया पीडीत आहेत. यावरून असे लक्षात येते. आपल्या देशात रक्तक्षय ही गंभीर समस्या आहे. त्यामुळे माता व शिशू मृत्युचे प्रमाण जास्त आहे. रक्तक्षय झालेल्या स्त्रियांची अकाली प्रसुती होते. गर्भपात होतो. जन्मतः शिशुचे वजन कमी असते. गंभीर समस्या असल्यास माता व शिशूची जगण्याची समस्या निर्माण होते. शाकाहारी पदार्थात लोह जास्त असते परंतु त्यात असणाऱ्या रसायनामुळे शरीरात लोह मिसळत नाही. त्यातून लोहाची कमतरता आढळते.

९. **आयोडीनची कमतरता :- (गॉइटर)** - आयोडीनच्या अभावी अनेक व्यक्तींना गॉइटर हा घशाचा रोग होतो. थॅायराईड ग्रंथीतील थॅायरॉक्सीन स्त्रावाच्या निर्मितीसाठी आयोडीन आवश्यक आहे. हया स्त्रावाचे प्रमाण कमी असल्यास बालकाची शारिरीक व मानसिक वाढ खुंटते. शरीरावर सूज येते. त्वचा जाड व खरखरीत होते. ओठ जाड होतात. काही बालकात खुजेपणा येतो.

**१०. दातांच्या तक्रारी :-** मागील ३-४ दशकात दातांसंबंधी विकारांचे प्रमाण सारखे वाढत आहे. यामध्ये बालकाचा व इतर व्यक्तीचा समावेश होतो. १९५० पर्यंत ५० टक्के लोकांना हिरडयांचे विकार व दातांना कीड या समस्या भेडसावत होत्या. आत हे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा जास्त कुपोषण व मुख आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे सर्वसामान्य भारतीयांच्या दातांचे आयुष्य ४० वर्षेच असते. गर्भावस्थेत व पुढील काळात मातेच्या होणाऱ्या कुपोषणाचा बाळाच्या दातांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. कुपोषणामुळे शरीराची एकुण प्रतिकारशक्ती कमजोर झालेली असते. अशा परिस्थितीत दंतक्षय, हिरडयांचे विकार अधिक उग्र स्वरूप धारण करतात. संतुलीत आहारामुळे कुपोषण टाळता येते.

दातांच्या अस्वच्छतेमुळे दातांना किड लागणे व हिरडयाचे विकार या दोन समस्यामुळे बहुतांशी भारतीयांचे दात अकाली पडतात. दात स्वच्छ न केल्यास डेंटल प्लाकमधील जीवाणूमुळे हिरडयांना सूज येते. हळूहळू हा संसर्ग दातांच्या मुळांकडे जातो. हिरडयातून रक्त पू येणे, दात टणकणे, हलू लागणे, तोंडाला घाण वास येणे इत्यादी समस्यांना सुरूवात होते. खाण्याच्या अयोग्य सवयी, स्वच्छतेचा अभाव, अंतर्स्त्रावात होणारे बदल गर्भावस्थेतील शारीरिक बदलामुळे दातांचे आरोग्य बिघडते. गर्भावस्थेत स्त्रियांच्या हिरडयातून रक्त येण्याच्या तक्रारी दिसून येतात. ही तक्रार अंतर्स्त्रावामुळे उद्‌भवते. सुजून दात सैल होतात. त्याचा परिणाम त्या भागात पोकळी तयार होते. हया पोकळीत अन्नकण जावून अडकले म्हणजे गंभीर परिस्थिती निर्माण होते. चाकलेट, मिठाई, फास्ट फुड चा उपयोग, तंबाखू, पान, पानमसाला इत्यादी मुळेही दाताचे आरोग्य बिघडते. भारतात सहा लाख लोक मुख कर्करोगामुळे मृत्युमुखी पडतात.

भारतात अनेक भागात पाण्यात फ्लोराइडचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे दात पिवळे व विद्रुप दिसतात. ज्या ठिकाणच्या पाण्यात फ्लोराइड कमी असते त्या ठिकाणी मुलांचे दात लवकर किडू लागतात. दातांना मजबूती येण्यासाठी फ्लोराइडची आवश्यकता असते. खनिजद्रव्याच्या अभावी दातांचे विकार उद्‌भवतात. आहारात लिंबू, संत्री, टोमॅटो इ. पदार्थ असावेत. जेवनानंतर मुखशुध्दीसाठी सफरचंद, गाजर यासारख्या फळाचे सेवन केल्यास त्यातील तंतुच्या सहाय्याने दातांना चिकटलेले अन्नकण निघण्यास मदत होते.

**भारतात कुपोषण समस्या निर्मुलनासाठी उपलब्ध कार्यक्रम** - आपल्या देशातील पोषण विषयक समस्या बऱ्याच आणि गंभीर स्वरूपाच्या आहेत. त्या सोडविण्यासाठी, शासनाने राष्ट्रीय स्तरावर निरनिराळया कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. अनेक संस्था, शासकीय विभाग, समाज कल्याण विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, अन्न विभाग, शिक्षण विभाग, ग्रामीण विकास विभाग इत्यादी व्दारे हे कार्यक्रम राबविले जातात.

पोषणासंबंधी समस्यांचे निराकरण करण्यासाठी भारत सरकारने अनेक मार्गानी लढा देण्याचे प्रयत्न सुरू केले आहे. या बाबत आखलेल्या कार्यक्रमाचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येईल :-

**विशेष पोषण कार्यक्रम**

**पोषण कार्यक्रमाचे वर्गीकरण**

| अ पोषण स्तर सुधारणे | ब पोषण अभावजन्य रोगाच्या उपायासाठी | क इतर कार्यक्रम |
| --- | --- | --- |
| १ सकस आहार योजना | १ राष्ट्रीय गलगंड नियंत्रण कार्यक्रम | १ एकत्रित बाल विकास योजना |
| २ पुरक पोषणाचा कार्यक्रम | २ जीवनसत्व ‘अ’ पुरक कार्यक्रम | २ भारतीय लोकसंख्या नियोजन |
| ३ शालेय विद्यार्थ्यांना भोजन | ३ लोह वितरणाचा कार्यक्रम | |

**अ) पोषण स्तर सुधारणे - १ सकस आहार योजना** :- निकृष्ट दर्जाच्या आहारामुळे संसर्गजन्य रोग व मृत्युचे प्रमाण यात वाढ होवू शकते. म्हणून आर्थिक दृष्टया दुर्बल लोकांच्या आहारात सुधारणा करण्याची गरज असते. लोकांच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या बाबीमध्ये सकस आहार व स्वच्छता या दोन बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत.

व्यक्तीना समतोल आहार मिळण्यासाठी सकस आहार योजना सुरू करण्यात आली. सरकारने जागतिक आरोग्य संघटना व संयुक्तराष्ट्र बालनिधी आणि अन्नकृषी संघटनेच्या मदतीने हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. महाराष्ट्रात १९६४ पासून ही योजना सुरू झाली. १९८८ पासून अन्न व आहार मंडळाने राष्ट्रीय सकस आहार सप्ताह साजरा करण्यास सुरूवात केली.

सकस आहार योजनेचा उद्देश शैक्षणिक आहे. लोकांमध्ये अन्न व सकस आहार आणि आरोग्य विषयक जाणीव निर्माण करणे, सकस आहाराचा दर्जा वाढविणे, इ. तसेच लोकांमध्ये पोषण विषयक जागृती निर्माण करणे. समतोल आहाराचे ज्ञान देणे, आहाराच्या सवयी बदलणे या अनेक उद्देशानी सकस असहार योजना सुरू करण्यात आली. थोडक्यात या योजनाव्दारे अयोग्य पोषण व कुपोषण समस्या सोडविण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

**२. पुरक पोषणाचा कार्यक्रम** :- शहरात समाज कल्याण विभाग व ग्रामीण विकास विभाग याव्दारे पूरक पोषणाचा कार्यक्रम राबविला जातो. शहरातील झोपडपट्टया आणि आदिवासी भागात मागासलेल्या निम्न वर्गातील लोकांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. लहान मुलामध्ये आढळणारी प्रथिने, कॅलरीची कमतरता दूर करणे. ० ते ६ वर्ष वयातील बालक, गर्भवती व दुग्ध सृजन काळातील मातांना पूरक आहार देणे. कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन आणि पोषण हे तीन कार्यक्रम कुटूंब स्वास्थाचे आधारभूत आहेत. प्रसुतीपूर्व व प्रसूतीनंतर स्त्रियांची काळजी घेणे, जन्मलेल्या बालकांचे स्वास्थ आणि स्त्रियांना, बालकांना पोषक आहार हया तीन योजनेव्दारा माता बालसंगोपनाचे महत्वाचे उद्दिष्टय साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. बालमृत्यु व मातामृत्यु दरात घट करणे ही माता व बालसंगोपन कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**३. शालेय विद्यार्थ्यांना भोजन व्यवस्था** :- शालेय आहार कार्यक्रम सर्वात प्रथम जर्मनी व फ्रान्समध्ये सुरू झाला. नंतर इतर देशात त्याची सुरूवात झाली. १९२५ मध्ये मद्रास येथे शाळेत जाणाऱ्या बालकांना मधल्या वेळात आहार देण्याचा कार्यक्रम सुरू झाला. नंतरच्या काळात मुलांचा पोषण स्तर सुधारणे व स्वास्थ सुधारण्यासाठी महत्वपूर्ण उपाय असल्याचे लक्षात आले. आपल्याकडे आहारासंबंधी भिन्नता असल्यामुळे भारतात हया कार्यक्रमाचे समान रूपाने आयोजन केले जात नाही, निम्न वर्गातील बालकांचा पोषणस्तर सुधारण्यासाठी या योजनेअंतर्गत वर्षातून २०० दिवस प्राथमिक शाळेतील बालकांना दुपारचे भोजन दिले जाते.

शाळेतील बालकांच्या आहाराचा दर्जा सुधारणे. बालकांचा शारीरिक, मानसिक व सामाजिक विकास नीट होणे. मुलांच्या शाळेतील उपस्थितीत वाढ व्हावी. सकस आहारमुळे रोगप्रतिबंधक शक्तीत वाढ व्हावी. आदी या कार्यक्रमाचे उद्देश आहेत.

**ब. पोषण अभावजन्य रोगांच्या उपायासाठी -**

**१. राष्ट्रीय गलगंड नियंत्रण कार्यक्रम -** खूप गरीब लोक, आदिवासी, ज्यांना दोन वेळचे पोटभर अन्न मिळत नाही किंवा एकाच प्रकारचे अन्न खातात आणि आयोडीनची कमतरता असते त्यांना गलगंड रोग आढळतो. या रोगामुळे गर्भवती स्त्रियांचा गर्भपात होवू शकतो. अथवा, जन्मतः मूल अपंग असण्याची शक्यता नाकारता येत नाही. गलगंडामुळे मानसिक दुर्बलता येवू शकते. जगात दरवर्षी कमीत कमी ३० हजार मुले आयोडिनच्या अभावी मृत्यु पावतात. जऱ्या मातामध्ये आयोडीनची कमतरता असते त्यांची मुले जन्मापासून मतिमंद, शारीरिक दृष्टया कमजोर, मुकी, बहिरी, अपंग असतात. भारतात सुमारे ४ कोटी शाळेकरी मुलांना आयोडीनची कमतरता आढळून आली आहे. १९६८ सालापासून या रोगाच्या नियत्रंणासाठी आयोडीनयुक्त मीठ वापरण्यास सुरूवात झाली. १८ जानेवारी १९९४ मध्ये सरकारने आयोडीन न मिसळलेले मीठ विक्रिवर बंदी आणली आहे.

**२. जीवनसत्व 'अ' पुरक कार्यक्रम** - आपल्या देशात दरवर्षी १२ ते १४ हजार बालक जीवनसत्व 'अ' च्या अभावामुळे अंध होतात. यावर प्रतिबंधक उपाय म्हणून सर्व राज्यात प्राथमिक स्वास्थ केंद्राव्दारे हा कार्यक्रम राबविण्यात येतो. १ ते ५ वर्ष वयातील सर्व बालकांना दर सहा महिण्यातून एक वेळा जीवनसत्व अ तोंडाव्दारे दिले जाते. २ मि. लि. द्रव्य एकावेळी देतात. जीवनसत्व 'अ' स्निग्धद्राव्य असल्याने यकृतात त्याचा साठा होतो. हा साठा सहा महिने पुरतो. भारतात हा कार्यक्रम १९७० पासून सुरू झाला. १९९५ पर्यंत २ वर्षाखालील ८० टक्के बालकांना जीवनसत्व 'अ' मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

**३. लोह वितरणाचा कार्यक्रम किंवा रक्तक्षय प्रतिबंधक कार्यक्रम** – गर्भवती स्त्रिया, दुग्धसृजन काळातील माता व लहान मुलांना लोह व फोलिक आम्लाच्या कमतरतेने रक्तक्षय होतो. त्यावर प्रतिबंधक उपाय म्हणून आरोग्य खात्यातर्फे प्राथमिक स्वास्थ केंद्रातून लोहाच्या गोळया स्त्रिया व बालकांना देण्यात येतात. अगदी लहान मुलांना द्रव रूपात सुध्दा लोह दिले जाते. गोळया देण्यापूर्वी रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण तपासले जाते.

**क. इतर कार्यक्रम –**

**१. एकत्रित बालविकास योजना** :– एकत्रित बालविकास योजना ही देशात सुरू असलेली अत्यंत महत्वाची योजना १९७५ साली सुरू झाली. देशात ६५ टक्के क्षेत्रात लागू होवून त्याव्दारे २१ कोटी लाभधारकांच्या जीवनात चांगला बदल झाला आहे. या योजनेतील लाभधारक सामाजिक, आर्थिक मागासलेल्या प्रदेशातून राहणारी, शहरी झोपडपट्टयातील ६ वर्षाखालील बालक, गरोदर स्त्रिया व मुलांना अंगावर दूध पाजणाऱ्या माता आहेत. ० ते ६ वर्ष वयातील बालकांचा आरोग्य व पोषण दर्जा वाढविणे. मातेला आरोग्य व पोषणसंबंधीचे शिक्षण देणे, मुलांचे योग्य संगोपन करण्याचे ज्ञान देणे. कुपोषणाचे प्रमाण कमी करणे व मृत्यू टाळणे. बालकांच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक विकासाचा पाया घालणे. शाळेतील अनुपस्थिती कमी करणे. इत्यादी या कार्यक्रमाचे उद्दे्श आहेत.

**२. भारतीय लोकसंख्या नियोजन** :– आपल्या देशात १९५५ पासून कुटूंब कल्याण कार्यक्रम राबविला जात आहे. या योजनेअंतर्गत स्वंयसेवी संस्थाचा महत्वाचा वाटा आहे. त्यासाठी प्रसूतीपश्चात केंद्रे, नागरी व ग्रामीण कुटूंब कल्याण केंद्र, नागरी आरोग्य केंद्र इत्यादी संस्था कार्य करतात. या केंद्रतुन कुटूंब कल्याण कार्यक्रम पार पाडला जातो. त्यात लोकसंख्या नियंत्रण हा उद्देश असतो. अर्थात लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी सुध्दा विविध प्रयत्न केले जातात.

**३. अन्नपूर्णा योजना** :– दारिद्रय रेषेखालील लोकांना स्वस्त दराने धान्य पुरविण्यासाठी १ मे १९९९ पासून शासनाने अन्नपूर्णा योजना कार्यान्वित केली आहे.

समाजातील सर्व व्यक्तींना अन्नाची गरज असते. त्याचप्रमाणे त्यांचे पोषण होणे सुध्दा आवश्यक असल्याचे लक्षात येते. म्हणून शाळा, महाविद्यालये, दवाखाने, प्रौढ शिक्षण वर्ग, महिला मंडहे, यामाध्यमातून आहार शिक्षण देण्यात आले पाहिजे. त्याचप्रमाणे वर्तमानपत्रे, मासिके, रेडीओ, टेलीव्हिजन यासारख्या माध्यमाचा प्रभावीरित्या उपयोग केला पाहिजे. ग्रामीण भागात अंगणवाडी सेविका परिचारीका, प्राथमिक स्वास्थ केंद्रातील अधिकारी या क्षेत्रात प्रभावी भूमिका पार पाडू शकतात. बालकांचा तसेच व्यक्तींचा पोषणस्तर वाढविण्यासाठी काही सर्वसाधारण उपाय खालीलप्रमाणे करता येतात.

**१. गृहीणींना शिक्षण** – कुटुंबातील लोकांना योग्य आहार देणे, यात गृहिणीची भूमिका केंद्रीय असते. तेव्हा गृहीणीला पोषणासंबंधीचे शास्त्रीय ज्ञान असल्यास त्या आहाराचे योग्य नियोजन करू शकतात. त्यासाठी अन्नाची योग्य निवड, स्वच्छता, संग्रह, अन्नशिजविण्याच्या पध्दती, पौष्टीक घटकांचा नाश होणार नाही अशा पध्दतींची निवड, अन्नाचे समृध्दीकरण इ. चे ज्ञान दिले पाहिजे. म्हणजे कुटूंबातील व्याक्तींना समतोल आहार मिळू शकेल. त्याच बरोबर वयाप्रमाणे आहाराची योजना, स्त्रियांच्या बाबतीत अवस्थांप्रमाणे व आजारानुसार आहार पुरविणे याबाबतीत ज्ञान असले म्हणजे कुटूंबातील व्यक्तीचे योग्य पोषण होवून समस्या निर्माण होणार नाहीत आणि आरोग्य चांगले राहण्यात मदत होईल.

**२. बालकांना शिक्षण** – माध्यमिक स्तरापासून बालकांना पोषणासंबंधी शिक्षण दिले पाहिजे. या वयात मिळालेले ज्ञान व झालेले संस्कार पुढील जीवनाला प्रभावित करतात. काही मुलांना काही पदार्थ खायची सवय नसते. अशा प्रकारच्या सवयीत बदल करणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे शाळेतील अभ्यासक्रमांतर्गत अन्नघटक, प्राप्तीची साधने, आहाराचे कार्य, अभावाचे परिणाम यासंबंधीची थोडक्यात माहिती द्यावी. म्हणजे शरीराचे पोषण नीट होवू शकते.

**३. सामान्य जनतेला शिक्षण** – पोषणासंबंधी सामान्य जनतेला शिक्षण देणे सुध्दा आवश्यक असते. हे शिक्षण गृहभेटी, मंडळातील संदस्यांशी संपर्क, सभा, व्याख्याने, संमेलने आरोग्य केंद्राच्या सहाय्याने देण्यात यावे यासाठी जिल्हा स्वास्थ अधिकारी, पंचायत समितीतील अधिकाऱ्याची मदत घेता येईल. तसेच आहार तज्ञांना यासाठी आमंत्रित करावे. अशा प्रशिक्षणामुळे ग्रामीण, शहरी क्षेत्रातील सर्व स्तरातील लोकांचा स्वास्थ विषयक दर्जा सुधारण्यास मदत होईल.

*संदर्भ सूची :*

*१. पोषण आणि आहार शास्त्र, त्रिवेणी फरकाडे, सुलभा गोंगे.*

*२. अन्न व पोषण शास्त्र, डॉ. इंदिरा खडसे.*

*३. गृह विज्ञान, एस.पी. सुखिया, जी.पी. शैरी*

# वर्तमान युगात महात्मा गांधी आणि डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या राजकीय विचारांची गरज

***प्रा. डॉ. सुधाकर जावळे,*** *एम.ए. (राज्यशास्त्र)., एम.फील., पीएच.डी., सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा गांधी कला–वाणिज्य महाविद्यालय, पारशीवनी, जिल्हा, नागपूर*

**प्रस्तावना** : महात्मा गांधी आधुनिक भारतातील प्रमुख राजकीय विचारवंत मानले जातात. परंतु इतर विचारवंताप्रमाणे गांधीनी कोणताही राजकीय सिद्धांत मांडला नाही. स्वाभाविकच ॲरिस्टॉटल, मार्क्स, मील इत्यादी विचारवंतांना ज्या अर्थाने राजकीय विचारवंत म्हटले जाते त्या अर्थाने गांधीजींना ते विशेषण कदाचित लावता येणार नाही. खरे तर ते राजकीय विचारवंत नव्हते; तर ते एक राजकीय कर्मयोगी होते. त्यांचे राजकीय विचार कोणत्याही एका पुस्तकात लेखणबद्ध झालेले नाहीत तर त्यांनी लिहिलेल्या अनेक ग्रंथातून, लेखांतून, भाषेतून ते व्यक्त झालेले आहेत.

धार्मिक नैतिकतेच्या परिभाषेत त्यांनी आपले राजकीय विचार मांडलेले दिसतात. ते म्हणतात, ‘‘राजकारण धर्माला साह्यभूत आहे. धर्मावाचून राजकारण हा मृत्यूचा सापळा आहे. कारण त्यामुळे आत्म्याचा नाश होतो.’’ पुढे ते म्हणतात, ‘‘धर्माचा राजकारणाशी संबंध नाही असे जे लोक म्हणतात त्यांना धर्माचा अर्थच कळत नाही. राजकारणाचे अध्यात्मीकरण व्हावे, असा त्यांचा आग्रह होता. आध्यात्मीकरणाचा गांधींना अभिप्रेत असलेला अर्थ नैतिकीकरण असा होता. राजकारणात सत्याची व न्यायाची प्रतिष्ठापना करणे हे त्यांच्या आध्यात्मीकरणाचे प्रयोजन होते. राजकीय प्रणालींना सत्य, अहिंसा, प्रेम व सेवादी तत्त्वावर अधिष्ठित ठेवणे हा गांधींना अभिप्रेत असलेला अध्यात्मीकरणाचा आशय होता.

डॉ. आंबेडकर हे राज्यसंस्थेला इतर विचारवंतांसारखे अतिशय महत्त्वाचे आणि अवास्तव स्थान देत नाहीत. राज्य ही दैवी संस्था नाही तर मानवनिर्मित संस्था आहे आणि मानवाच्या व्यक्ती विकासाचे एक साधन म्हणून ती अत्यावश्यक संस्था आहे, असेही ते म्हणतात.

डॉ. आबेडकरांच्या मतानुसार राज्यात शांतता आणि सुव्यवस्था राखणे एवढेच राज्याचे ध्येय नाही. लोकांचे जीवन सुखी आणि समाधानी व्हावे हेच राज्याचे ध्येय आहे. समाजाच्या सर्व लोकांची हितपूर्तता करणे म्हणजेच लोककल्याण करणे हेच राज्याचे ध्येय आहे. राज्य ही समाजसेवी संधटना आहे. तिने समाजाची आर्थिक आणि सामाजिक प्रगती धडवून आणावी आणि राज्यात आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करावी हेच राज्याचे कर्तव्य आहे, असेच डॉ. आंबेडकर म्हणतात.

असा सामाजिक आणि आर्थिक बदल धडविताना राज्याने समानतेबरोबरच स्वातंत्र्याचेही वातावरण निर्माण केले. प्रत्येक नागरिकाला सामाजिक, आर्थिक आणि बौद्धिक क्षेत्रात स्वातंत्र्य मिळवून देणे हे देखील राज्याचेच कर्तव्य आहे, असे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात. राज्यातील प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्याचा सुरधित हक्क देणे, आर्थिक व राजकीय विषमता दूर करणे, समाजाचे अंतर्बाह्य धोक्यापासून संरक्षण करणे आणि आवश्यक तेवढे सामर्थ्यसंपन्न बनून समाजव्यवस्था मजबूत करणे ही राज्याची कर्तव्ये डॉ. आंबेडकरांनी सांगितली आहेत.

वर्तमान युगात ‘सबका साथ सबक विकास’’ करायचा असेल तर राजनेत्यांना शहरी विकासासोबतच ग्रामिण विकासाकडे सुद्धा लक्ष देण्याची गरज आहे. तेव्हाच भारताचा जलद विकास धडून येईल. त्या अनुषंगाने, डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारांसोबतच महात्मा गांधीच्या राजकीय विचारांचा देखील स्विकार करून ते विकासासाठी कसे उपयुक्त ठरतील याचा विचार करण्याची आज गरज आहे.

**संशोधन पद्धती** : शोध निबंधातील अभ्यास हा द्वतीय समंकावर अवलंबून आहे. समंकाचे संकलन हे विषयाशी संबंधीत विविध पुस्तक, मासीक, वार्षिक, अहवाल, वर्तमानपत्र व सांकेतिक स्थळा वरून करण्यात आले आहे.

**संशोधनाचा उद्देश** : १) प्रादेशिक असंतुलन दूर करण्यासाठी महात्मा गांधी आणि डॉ. बी.आर. आंबेडकर यांचे राजकीय विचार कसे उपयोगी सिद्ध होतील याचा शोध धेणे. २) महात्मा गांधीचे विचार आणि डॉ. बी.आर. आंबेडकर यांचे विचार विरोधी होते की पुरक होते याचा शोध धेणे. ३) महात्मा गांधीच्या विचारनुसार आणि डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या विचारानुसार स्वराज्य कसे स्थापन करता येईल याचा शोध धेणे. ४) विषयाचे अध्ययन करून जो निष्कर्ष निधेल त्यावर योग्य सूचना देणे ज्यांचा भविष्यातील संशोधनात उपयोग होईल.

**संशोधनाची गरज आणि महत्त्व** : महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्या राजकीय विचारांचे अनेक संशोधकांनी तुलनात्मक अध्ययन जरी केले असले तरी

त्यांचे विचार वर्तमान युगात विकासाला पुरक कसे ठरतील यावर होणारे संशोधने कमीच आहेत. आज २१ व्या शतकात एकीकडे भारत सरकार 'स्किल इंडीया' 'डिजिटल इंडीया'' मेक इन इंडिया'' 'स्मार्ट अप इंडीया'' या सारखी महत्त्वाची उपक्रमे राबवित आहे तर दुसरीकडे ग्रामिण विकास जेवढा व्हायला पाहिजे तेवढा झालेला नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्तेचे वाढते प्रमाण याचे उदाहरण आहे. शहरात हिंसा, चोरी, डकैती, धोकाधडीचे प्रमाण वाढत आहे. पर्यावरणाचा संतुलन बिघडत आहे. त्यामुळे व्यक्तीला आध्यात्म व नैतिक बाबींशी जूळण्याची गरज निर्माण झाली आहे. म्हणजेच औद्योगिक विकासासोबतच प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी, कृषीचा संपूर्ण विकास करण्यासाठी, रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी, विषमता दुर करण्यासाठी जीवन मूल्यांचा विकास करण्यासाठी आणि नैसर्गिक साधन सामग्रीचा योग्य उपयोग करून देशाचा समतोल विकास साधण्यासाठी महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचाराचे अध्ययन करण्याची गरज निर्माण झाली आहे. म्हणून संशोधनाचा हा विषय महत्त्वाचा ठरतो.

**१. गांधीजींचा राज्यसत्तेविषयीचा दृष्टीकोन** :- गांधीजींचा राज्यसत्ताविषयक दृष्टीकोन दोन संदर्भात अविष्कृत झालेला दिसून येतो. त्यापैकी पहिला दृ ष्टीकोन अतिशय महत्त्वाचा मानला जातो. ब्रिटिश राज्यसत्तेविरुद्ध त्यांनी केलेल्या आरोपाचा व दुसरा म्हणजे स्वराज्याची संकल्पना त्यांनी वेळोवेळी मांडली होती. ब्रिटिश सत्तेला पर्यायी ठरणाऱ्या यंत्रणेचा सर्व बाजूंनी गांधीजींनी विचार केला होता. त्याला ते रामराज्य अर्थातच आदर्श राज्य असे म्हटले जाते. आत्मसाक्षात्कार हे गांधीच्या मते अंतिम साध्य होते. ज्या प्रमाणात राज्यसत्ता व राज्यसत्तेशी संलग्न असणाऱ्या इतर संस्था या साध्याप्रत पोहचण्यास साधनीभूत होतात तितक्या त्या सामर्थ्यशाली ठरतात. गांधीजींच्या मते, राजसंस्थेला स्वंयमेव किंवा अंगभूत महत्त्व नाही. त्यांची राज्यसत्तेकडे पाहण्याची दृष्टीही बरीच संशयास्पद होती. राज्यसत्तेच्या कक्षेत वाढ होणे व्यक्ती स्वातंत्र्याला मारक ठरेल, अशी त्यांना भीती वाटत होती.

महात्मा गांधी हे अराज्यवादी होते. राज्यसत्ता व राज्यसंस्था अस्तित्वातच असू नये, अशी अराज्यवादी भूमिका त्यांची होती. राज्यसत्तेचा संपूर्ण अभाव असलेली समाजरचनाही त्यांना आदर्श समाजरचना वाटत होती, परंतु मानवी स्वभावाच्या उणिवामुळे तो आदर्श प्रत्यक्षात येणे शक्य नाही याचीही त्यांना जाणीव होती; म्हणून आदर्शाशी तडजोड करून राज्यसत्तेच्या अस्तित्वाला ते मान्यता देतात.

राज्यसंस्था हे गांधींच्या मते तीव्र व संघटित स्वरूपातील हिंसाचाराचे प्रतीक असते. याच संदर्भात ते राज्यसत्तेला हृदयशून्य यंत्र असे नाव देतात. मर्यादित राज्यसत्तेला ते मान्यता देतात. तथापि पाशवी शक्ती व हिंसाचार यावर आधारित निरकुंश राज्यसत्तेला ते स्पष्ट विरोध करतात. ब्रिटिश सत्तेच्या कार्यावरून त्यांची राज्यविरोधी भावना झाली असावी. त्यामुळे ''थोरो प्रणीत'' जे शासन कमीत कमी सत्ता चालविते ते सर्वोत्तम शासन होय, या विचारांचा गांधीजी पुरस्कार करतात. संपूर्ण अहिंसक समाजव्यवस्था अस्तित्वात आल्यावर सगळी माणसे परस्परांना सहकार्य करतील. खऱ्या प्रेमावर व त्यागावर आधारलेले सामाजिक संबंध प्रस्थापित होतील आणि मग त्या मानवी संबंधावर नियंत्रण ठेवण्याची गरजच राहणार नाही व अशा प्रकारे पर्यायाने राज्यसंस्था अनावश्यक होऊन जाईल, असे गांधींचे मत होते. पण असे धडून येईपर्यंत राज्यसत्ता मर्यादित ठेवणे आणि तिने मर्यादाचे उल्लंधन केल्यास नागरिकांनी तिचा प्रतिकार करणे आवश्यक आहे. गांधीच्या मते, माणसाच्या सुखी जीवनासाठी राज्याची आवश्यकता नाही. राज्याचा उदय व आधार हिंसा हाच आहे. त्यामुळे राज्य नष्ट झाले पाहिजे. परंतु ते मानवी स्वभावामुळेच एकदम नष्ट नाही, असेही ते म्हणतात. राज्य हे पाशवी शक्तीचे, सत्तीचे व अधिसत्तेचे प्रतीक असल्याने त्या शक्तीचा गैरवापर तिच्या हातून होणे स्वाभाविक आहे. अनेकदा ही संस्था व्यक्तीच्या अधिकारावरही अतिक्रमण करीत असते. असे कृत्य राज्यसंस्थेकडून झाले तर तिला प्रतिकार करण्याचा हक्क व्यक्तीला असावा. राज्यसत्ता ही व्यक्तीच्या हक्काची निर्मिती नसल्याने तिला ते हक्क हिरावून धेण्याचा मुळीच हक्क नाही. व्यक्तीचे हक्क हे निसर्गदत्त असतात, अशी गांधीजींची भूमिका होती. राज्यसत्तेचा प्रतिकार करण्यासाठी अहिंसात्मक असहकार व सत्याग्रह या संकल्पना त्यांनी मांडल्या. राज्यसत्तेचे सार्वभौमत्व अमर्याद व निरंकुश असते, हा विचार गांधींना मान्य नाही. त्यांच्या मते, राज्यसंस्थेच्या नैतिक कार्यप्रवणतेनुसार तिची समर्थनीयता ठरत असते. सार्वभौमत्व हे लोकांच्या ठिकाणीच असते. जनता हिच खऱ्या अर्थाने राजकीय सत्तेचा मूलस्रोत असते. राज्याचा आधार केवळ ईश्वरीशक्ती किंवा प्रजाजनांनी केलेले निमूट आज्ञापालन हा नसून व्यक्तीने तिला उत्स्फूर्तपणे केलेले सहकार्य हा असतो. राज्यसंस्थेमुळे व्यक्तीचे अस्तित्वच नष्ट होते. व्यक्तीचा

विकास खुंटतो, कारण व्यक्तीला राज्याकीरता सर्वच अर्पण करावे लागते. राज्यात नेहमीच सत्तेचे केन्द्रीकरण झालेले असते. त्यामुळे बहुसंख्य लोकांना स्वातंत्र्य मिळत नाही. आधुनिक काळातील राज्याचे व्यापक कार्यक्षेत्र व व्यक्ती जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील राज्याच्या हस्तक्षेपाने व्यक्ती स्वातंत्र्याचा फार मोठा संकोच पावला आहे.

**गांधीजींची आदर्श राज्याची कल्पना :** आदर्श राज्याची संकल्पना विषयाचा शोध बऱ्याच राजकीय विचारवंतांनी घेतला आहे. महात्मा गांधींनीसुद्धा आदर्श राज्यासंबंधीचे आदर्श विचार आदर्श ग्रामराज्य किंवा रामराज्य या स्वरूपात केले आहेत. महात्मा गांधींनी स्पष्ट केलेल्या आदर्श राज्याच्या संकल्पनेत राज्यसत्ता हे केवळ साधन मानले असून व्यक्तीला साध्य मानले आहे; तसेच व्यक्तीचे अधिकाधिक कल्याण हेही साध्य आहे. साध्य व साधन हे दोन्ही शुब्द, पवित्र आणि नैतिक असावेत, असे गांधीजींचे मत होते. स्वराज्य व आदर्श राज्य यासंबंधी एकत्र विचार केला जात असला तरी त्या समानार्थी संज्ञा नव्हेत तर स्वराज्य ही आदर्श राज्याकडे जाण्याची एक पायरी ते मानतात. आदर्श राज्याकरिता स्वराज्य ही केवळ तडजोड आहे. अहिंसक समाज ही अराज्यवादी अवस्था आदर्श म्हणून योग्य असली तरी आजच्या परिस्थितीत राज्यसंस्थेचे उच्चाटन लागलीच करणे शक्य नाही. तेव्हा आदर्श अवस्थेच्या खालोखाल चांगल्या असलेल्या राज्य व्यवस्थेलाच 'स्वराज्य' असे नाव गांधी देतात. 'लोक प्रातिनिधिक शासन आणि त्याला वेसण घालणारी जागृत व संघटित लोकशाही अशा दुहेरी आधारावर गांधीजींची स्वराज्य कल्पना उभी आहे.

राजकीय स्वातंत्र्य ही स्वराज्यासाठी पहिली आवश्यक गोष्ट वाटते. कोणतीही परकीय राजवटीची गुलामी त्यांना मान्य नाही. तद्वतच युरोपातील अनेक देशांत स्वातंत्र्य असून तेथील लोकांची पिळवणूक होत असल्याने त्या राज्यांना ते स्वराज्य मानत नाहीत. देशातील सर्व तळागाळातील व्यक्तींची सर्व प्रकारच्या बंधनातून व जोखडातून मुक्ती होणे गांधाजींचा राज्यविषयक मते अराज्यवादी व साम्यवादी यांपैकी कोणाही फाशीही जुळत नाहीत. अराज्यवाद्याप्रमाणे राजकीय व आर्थिक विकेन्द्रीकरणाला ते आदर्श म्हणतात तर साम्यवादाप्रमाणे राज्यांतर्गत श्रमिकांच्या हितसंबंधांना ते सर्वश्रेष्ठ स्थान देतात.

निर्मलकुमार बोस यांनी मांडलेल्या मुद्याचा हवाला देऊन पळशीकर म्हणतात, ''माणसे एकत्र राहतील तेथे तेथे सार्वभौमत्वामुळे व सत्याचे आकलन व्यक्तिसापेक्ष असल्याने कलह अपरिहार्य आहेत, म्हणून सभ्य मार्गाने संघर्ष चालविण्याच्या रीती गांधी आवश्यक मानतात आणि यातूनच गांधीजींची द्वितीयादशी राज्याची संकल्पना आकारली आहे.

'सुसंस्कृत अराज्यवादी' अवस्थेची कल्पना गांधीजींनी मांडली असली तरी अराज्यवादी किंवा साम्यवाद्याप्रमाणे गरज असूनही राज्यसंस्था नष्ट व्हावी, असा आग्रह गांधीजी धरतांना आढळत नाहीत.

स्वराज्यात अभिप्रेत असते रचनात्मक कार्यक्रमाद्वारे नवसमाज निर्मितीतून स्वराज्य साधना केली जाऊ शकते, असे त्याचे मत होते.

स्वराज्याची सत्ता खऱ्या अर्थाने कोणाकडे राहावी याबाबत गांधीच्या मनात मुळीच संभ्रम नव्हता. १९२५ साली स्वराज्याची व्याख्या करताना गांधींनी प्रातिनिधिकतेच्या तत्वावर विशेष भर दिला होता. ते म्हणतात, ''स्वराज्याचा मला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे लोकांच्या संमतीने चाललेले शासन सार्वत्रिक आहे. मताधिकाराद्वारे ही संमती व्यक्त झालेली असावी. संसदीय लोकशाहीचा ते पुरस्कार करीत असले तरी पाश्चिमात्य लोकशाही हे फॅसिस्टवादाचे किंवा नाझिवादाचेच सौम्य स्वरूप वाटते. 'पाश्चिमात्य लोकशाही' हा केवळ मुखवटा आहे. प्रातिनिधिक संस्थांपेधा गांधीना संधटित लोकशक्तीचे राज्यसत्तेवर वेसण असणे गांधीजींना महत्त्वाचे वाटते. मूठभराच्या सत्तेतून नव्हे तर त्या सत्तेचा गैरवापर झाल्याने तिला प्रतिकार करण्याची शक्ती लागण्यातूनच खरे स्वराज्य निर्माण होते. स्वराज्य हे गांधीजींच्या मते, काही सुशिक्षित धनिक लोकांची मिरासदारी असणार नाही. ते सर्वांसाठी असेल कोणत्याही वांशिक धार्मिक भेदभावाला उच्चनीचतेला त्यात स्थान राहणार नाही. स्वराज्य हे समताधिष्ठित असणे तसेच ते धर्मनिरपेक्ष असणेही गांधीजींना अपरिहार्य वाटते जनता हीच सार्वभौमसत्तेची अधिष्ठात्री असून दीन-दलितांचे कल्याण हेच स्वराज्याचे साध्य आहे, अशी वस्तुनिष्ठ भूमिका त्यांनी मांडली.

गांधीजींनी आपल्या आदर्शराज्याच्या कल्पनेत रामराज्याची कल्पना मांडली आहे. त्याच्या मते, रामराज्य व स्वराज्य ह्या दोन्ही एकच आहेत. लोकशाहीचे चित्र रामायणात दिसते असे ते म्हणत. राम व रावण यांचे राज्य म्हणजे आधुनिक लोकशाही व हुकुमशाही राष्ट्र होय. रामायणात दोन्ही राज्यांची तुलना सापडते. रावणाचे राज्य अल्पकाळ टिकले आहे. रावणाचा पराभव म्हणजे असत्याचा पराभव होय. राम हा सत्यवादी असल्यामुळे त्यांचे राज्य दीर्घकाळ टिकले आहे. गांधीजींच्या मते, लोकशाहीत डोके मोजून प्रजेचे मत अजमाविता येणार नाही.

तपश्चर्या करणाऱ्या लोकांच्या मनात पूजेची कल्पना असते. अशा व्यक्तींनी दिलेले मत म्हणजे लोकमत होय. व्यक्तींचे मत चोरून नेणे, त्यांना प्रलोभन दाखविणे, त्यांच्यावर मत देण्यासाठी बळजबरी करणे ही लोकशाही नव्हे. सर्व व्यक्ती सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचर्याचे पालन करणाऱ्या असल्या पाहिजेत. सर्व व्यक्तींची परिश्रम करण्याची व आत्मनिर्भर होण्याची तयारी असावी. मालक व मजूरवर्ग समाजात राहणार नाही. आदर्शराज्यात दुसऱ्याच्या श्रमावर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती राहणार नाही.

परस्पर सहकार्याची भावना प्रत्येक व्यक्तीत असावी. रंग, जात, धर्म किंवा लिंग या आधारावर कोणताही भेदभाव केला जावू नये. आपापली कर्तव्य सद्सद्विकबुद्धीने पार पाडावीत. उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव राहणार नाही. संपूर्ण देशात आर्थिक क्षमता पाहिजे. अधिकारापेक्षा कर्तव्याला व्यक्तींनी जास्त महत्त्व द्यावे. प्रत्येकाने स्वकर्तव्याचे पालन त्याला अधिकार आपोआप मिळतात. सर्व विषमतेचा अंत व्हायला वेळ लागणार नाही. कायदे हे नैतिकतेवर आधारित राहतील. भाषण व मुद्रण स्वातंत्र्याचा लाभ प्रत्येकाला धेता येईल.

**गांधीजींचे सत्याग्रहासंबंधीचे विचार** : सत्याग्रह हे जीवनाचे अंतिम साध्य आहे व त्या साध्यापर्यत जाण्याचा मार्ग म्हणजे सत्याग्रह होय. सत्याच्या प्राप्तीसाठी या मार्गावरून चालणारी व्यक्ती सत्याग्रही समजली पाहिजे. सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह. ही एक आध्यात्मिक आहे. सत्यापर्यंत जाण्याकरिता सत्य शक्तीचा पूर्ण उपयोग म्हणजेच सत्याग्रह होय. यात नेहमी आत्मक्लेषाची भावना अंतर्भूत आहे. सत्याग्रह हे शक्तिशाली व्यक्तीचे शस्त्र आहे. दुर्बल व्यक्ती सत्याग्रहाचा उपयोग करू शकत नाही. सत्याग्रह देशप्रेमाचे युब्द आहे. आत्मक्तेषाद्वारे विरोधकांस त्यांच्या चुकांची जाणावि करून देणे हे सत्याग्रहाचे ध्येय आहे व त्याचा प्रमुख आधार हृदयपरिवर्तन आहे. सत्याग्रहीचा पराभव मृत्यू देखील करू शकत नाही. जसजसा सत्याग्रहाला विरोध होत जाईल तसतशी त्याची शक्ती वाढत जाईल. सत्याग्रही हा अन्यायी व्यक्तीचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी अंतिम प्राण असेपर्यंत लढत असतो. शेवटी सत्याचाच विजय होतो.

महात्मा गांधाजीचे राज्यविषयक विचार त्यांनी मांडलेल्या रामराज्यातून अधिक स्पष्ट होतात. त्यांनी रामराज्यालाच अहिंसात्मक राज्य' असेही म्हटले होते समताधिष्ठित, धर्मनिरपेक्ष जबाबदार अशा आदर्श राज्याला गांधीजींनी रामराज्य किंवा अहिंसात्मक राज्य असे म्हटले आहे. 'राम' हा आदर्श सत्तात्यागी, जबाबदार राज्यकर्ता होता. म्हणून त्यांनी कल्पनेच्या राज्याला 'रामराज्य' अशी संज्ञा दिली. गांधीजीची आदर्श राज्याची कल्पना सामाजिक, राजकीय, आर्थिक इत्यादी विविध मानवमात्राच्या सर्वांगाला स्पर्श करणारी संकल्पना आहे.

**गांधीजींचे सत्य व अहिसेसंबंधीचे विचार** : महात्मा गांधीचे जे कार्यक्षेत्र विस्तृत होते त्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक गोष्टीवर त्यांनी आपले विचार व्यक्त केले. म्हणूनच त्यांचे वैचारिक विश्व फार मोठे होते. गांधीजीचे सत्य व अहिंसेसंबंधीचे विचार पुढीलप्रमाणे सांगता येतील :-

**साध्य व साधन** : साध्य व साधन या एकाच नाण्याचा दोन बाजू आहेत. साध्य व साधन या एकमेकांना परस्पर पूरक आहेत. साध्य हे उत्तम व टिकावू दर्जेदार असेल तर साधनसुद्धा पारदर्शिकता निर्माण करणारे असावयास पाहिजे. त्याशिवाय साध्याची प्राप्ती होऊ शकत नाही. राज्यातील प्रत्येक नागरिकात ईश्वर असल्याचा भास होतो. परंतु त्याचा साक्षात्कार अशक्य आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाचा प्रयल करणे म्हणजेच ईश्वराचे दर्शन करणे होय. समाजसेवेतून सर्वोदय व सर्वोदयातून आत्मानुभूती होते. जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख त्यांना मान्य नव्हते तर 'समाजातील सर्व लोकांचे सुख जास्तीत जास्त सुख म्हणजे साध्य होय.' हे आत्मबलशाही प्राप्त होऊ शकत नाही. श्रम हे साध्य नसून साधन आहे. मानवी जीवनात श्रमाला विशेष महत्त्व आहे. तरीपण श्रम हे साध्यावर अवलंबून न राहता साधनांकडे झुकले असतात.

साध्य व साधनांवरच आधारित १६३६ मध्ये गांधीजींनी साधनांची शुद्धीकरणावर ५ तत्त्वे सांगितली आहेत. ही तत्त्वे जीवनात बहुपयोगी आहेत. दिनचर्येमध्ये व्यवस्थित शिस्तबद्धपणा येण्यासाठी या पाच तत्त्वांचा उपयोग करणे अत्यावश्यक असल्याचे समजते. त्याशिवाय साध्याची प्राप्ती करता येत नाही. ही पाच तत्त्वे गांधींनी त्यांच्या शब्दात शब्दबब्ध केल्याचे दिसते. ही तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

**सत्य** : म्हणजेच सत्य हेच परमेश्वर. अर्थातच सत्य बोलण्याने ईश्वराची प्राप्ती झाल्याचा आत्मसाक्षात्कार होणे होय. अंतिम सत्य हे ध्येयाने व इच्छाशक्तीने प्रेरक बनत असते. त्यामुळे अंतिम सत्यात संपूर्ण ज्ञान आणि अध्ययन आनंद यांचा अंतर्भाव होतो. सत्य हे गांधीजींच्या जीवनातील व

तत्त्वज्ञानातील ध्रुवतारा होय. सत्याचे गांधींनी दोन प्रकार सांगितले आहेत.

सापेक्ष सत्य म्हणजे केवळ परिस्थितीनुसार बदलणारे सत्य होय व निरपेक्ष सत्य म्हणजे चिरकाल व कायम टिकणारे सत्य होय. ते कधीही बदलत नाही. मनुष्याला सापेक्ष सत्याकडून निरपेक्ष सत्याकडे जायचे असते. भौतिक जीवनातील सापेक्ष सत्य बाजूला सारून निरपेक्ष सत्याकडे जाण्याचा आग्रह धरणे म्हणजेच 'सत्याग्रह' होय. भाषण, कृती व विचार या तिन्हींमध्ये सत्य असावयास पाहिजे. न्याय योग्य ते सामाजिक संबंध प्रस्थापित करणे, तसेच स्वतःच्या व इतरांच्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हे सत्य होय. पारतंत्र्य म्हणजे असत्य होय. चुका स्वीकारणे व दुरुस्त करणे, स्वतःवर नियंत्रण ठेवणे, कटुता कमी करणे व अहिंसा इत्यादी सत्याचे प्रकार आहेत. गरीब व दलितांचे शोषण बंद करणे, सामाजिक व आर्थिक समता प्रस्तापित करणे हे सुद्धा सत्य आहे.

**अहिंसा** : अहिंसा हे साधन असून सत्य हे साध्य आहे. अहिंसा हे मानवी हृदयाचे गुणविशेष आहे. सत्य व अहिंसा यांचा संबंध अधिकार व कर्तव्याप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे अधिकार व कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्याचप्रमाणे सत्य व अहिंसा आहे. अहिंसा म्हणजे क्षमतेचे क्षितिज होय. क्षमा ही शूरांची गुणवता आहे. व्यक्तीचा निर्णय झाल्याशिवाय अहिंसा अशक्य

**स्वराज्यासंबंधीचे डॉ. आंबेडकरांचे विचार** :- महात्मा गांधी, लोकमान्य टिळक वगैरे विचारवंताप्रमाणे त्यांना स्वराज्याबद्दल नितांत ओढ होती. इंग्रजांचे राज्य गेले पाहिजे, भारत स्वतंत्र झालाच पाहिजे, परंतु अशा स्वतंत्र भारतात मूठभर भारतीयांच्या हाती राज्य कारभाराची सर्व सूत्रे नसावीत, असेच ते स्वराज्याविषयी म्हणतात.

भारतात सामाजिक अन्याय आहे. त्यामुळे भारतीयांना स्वराज्य कसे द्यायचे, या इंग्रजांच्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणतात की, ''सामाजिक अन्याय हा आमचा आपसातील प्रश्न आहे, तो आम्ही सोडवू. इंग्रजांनी त्या प्रश्नांची काळजी करून आमच्यावर पारतंत्र्य लादू नये.'' जोपर्यंत भारतातील अस्पृश्य समाज जागा होत नाही, संघटित होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने स्वराज्याचा लाभ घेता येणार नाही. याचा अर्थ स्वराज्य असेच असावे की ज्यामध्ये प्रत्येक व्यक्तीला समान न्याय, समान अधिकार, समान स्वातंत्र्य, समान संधी आणि समान बंधुत्व प्राप्त होते. कोणाचीही राज्य कारभार करण्याची मक्तेदारी निर्माण होत नाही. त्यालाच ते स्वराज्य असे म्हणतात.

**२. डॉ. आंबेडकराचे धर्मासंबंधीचे विचार** : डॉ. आंबेडकर धार्मिक वृतीचे होते. धर्मामुळे आध्यात्मिक उन्नती होते आणि मानसिक समाधान लाभते असेच त्यांचे मत होते. परंतु धर्मामध्ये समानता असावी. उच्च-नीचता नसावी असेच ते म्हणतात. हिंदुधर्म हा विषमतेवर आधारित आहे. कनिष्ठांना आणि अस्पृश्यांना तो जनावरापेक्षाही वाईट वागणूक देतो. हिंदु धर्मानी जाती व्यवस्था निर्माण केली, ती तर्काला आणि बुद्धिप्रामाण्यवादाला मान्य नाही असे सांगून डॉ. आंबेडकर म्हणतात की, यामुळेच हिंदुधर्माचे अधःपतन झाले आहे. तो समानता निर्माण करण्यास असमर्थ आहे. म्हणूनच त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि त्यानंतर अनेक अनुयायांनी त्यांचे अनुकरण केले. बौद्ध धर्मात असमानता, विषमता नाही. तो चातुर्वर्ण्य मानीत नाही. 'बहुजन हिताय आणि बहुजन सुखाय' असाच बौद्ध धर्म आहे. विचार स्वातंत्र्य हा बौद्ध धर्माचा पाया आहे. मानवाच्या मुक्तीसाठी बौद्ध धर्मच श्रेष्ठ आहे त्यामुळेच सामाजिक समानता प्रस्थापित होईल असा बौद्ध धर्माविषयीचा विश्वास त्यांनी प्रकट केला.

**डॉ. आंबेडकरांचे समाजवादाविषयीचे विचार** : डॉ. आंबेडकरांनी स्वतः गरिबी अनुभवली होती. त्यामुळे त्यांना दारिद्र्याबद्दल फार चीड होती. भांडवलशाही रचना ही पाश्चात्य देशात जरी यशस्वी ठरली तरी भारतासारख्या अविकसित देशात ती यशस्वी ठरणार नाही. तिचा फायदा मूठभर श्रीमंतांनाच होईल आणि श्रीमंत जास्त श्रीमंत होतील आणि गीरब जास्त गरीब होतील, असेच डॉ. आबेडकर म्हणतात. कष्ट किंवा श्रम यांना व्यक्तीजीवनात महत्त्वाचे स्थान असले तरीही केवळ कष्ट व्यक्तीला श्रीमंत बनवू शकत नाही. भांडवलशाही व्यवस्थेत श्रमिकांच्या कल्याणाचा विचार होत नसतो, म्हणून भांडवलशाहीचा त्यांनी विरोध केला. त्याचप्रमाणे मार्क्सवाद आणि साम्यवाद हा रशियात जरी यशस्वी ठरला तरीही भारतासाठी तो उपयुक्त नाही. कारण मार्क्सवाद धर्माचे अस्तित्व मान्य करीत नाही. त्यांची धर्मावर नितात श्रब्दा होती आणि बौद्ध धर्म मार्क्सवादाला चोख उत्तर देऊ शकतो असाच त्यांचा विश्वास होता.

**जातीव्यवस्था - अस्पृश्यता आणि डॉ. आंबेडकर** : डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माच्या विविध ग्रंथ अभ्यासातून असा निष्कर्ष काढला की, अस्पृश्यता आणि जातीव्यवस्था मनुष्यानेच निर्माण केली. व्यक्ती एखाद्या जातीत जन्माला येते तो तिचा दोष नाही. जात ही जन्मावर आधारित असते. त्यामुळे व्यक्तीला ती बदलविता येत नाही. त्यामुळे प्रत्येक जातीचा

विशिष्ट व्यवसाय व्यक्तीला करावा लागतो. या जातीव्यवस्थेमध्ये रोटीबेटी व्यवहार बंद झाले आणि ही जातीची बंधने तोडणे अवघड झाले. त्यामुळे राष्ट्रभक्ती व ऐक्य दुभंगले. समाजाचे विघटन झाले. म्हणून ही जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी दलितांच्या उद्धाराचे कार्य केले. त्यासाठीच त्यांनी मनुस्मृतीचे दहन करून मंदिर प्रवेशासाठी लढा दिला. या जातीव्यवस्थेमधूनच अस्पृश्यता निर्माण झाली. अस्पृश्यांना अतिशय हलाखीचे जीणे जगावे लागले. डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, वेदात ही तीन वर्गाचा उल्लेख आहे. अस्पृश्यांचा उल्लेख नाही. अस्पृश्यांचा उद्धार करण्यासाठी अस्पृश्यांना वर्णव्यवस्थेतून मुक्त करणे, त्यांना समान, बंधुत्व अणि न्याय प्राप्त करून देणे, यासाठीच डॉ. आंबेडकरांना महाडचा सत्याग्रह केला. मनुस्मृतीचे दहन आणि नाशिक येथील काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी चळवळ केली. त्यांचा उद्देश अस्पृश्य समाजात जागती आणि स्वाभिमान निर्माण करावा हाच होता. अस्पृश्य हा शब्दच त्यांना मान्य नव्हता. त्यांनी स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोद्धार ही त्रयसूत्री योजना समाजाला दिली. त्यांच्याच प्रयत्नामुळे भारतीय राज्यघटनेत स्पृश्य-अस्पृश्यता आणि जातीयता मानणे हा कायदेशीर गुन्हा ठरला आहे.

**लोकशाहीसंबंधी विचार** : बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीची व्याख्या करताना म्हणतात की, 'लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात जिच्याद्वारे रक्तपाताशिवाय मूलगामी क्रांतिकारक परिवर्तन धडवून आणता येते अशी शासनपध्दती म्हणजे लोकशाही होय.' डॉ. आंबेडकर लोकशाहीत शासन व्यवस्थेला सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे साधन मानतात. राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाहीच्या अस्तित्वाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाची प्रस्थापना आणि समताधिष्ठित समाजरचनेचा आग्रह धरला. कारण त्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकणार नाही, याची त्यांना खात्री होती डॉ. आंबेडकरांनी सर्व लोकशाही शासनव्यवस्थांचा सखोल अभ्यास केला होता. भारतीय समाजरचनेत संसदीय लोकशाही शासन व्यवस्थाच यशस्वी होऊ शकेल याची त्यांना खात्री होती. ते म्हणतात की, ''ज्या शासन पद्धतीमुळे सत्ताधारी मंडळींना सामाजिक व आर्थिक क्षेत्रात मूलभूत बदल करता येतात आणि असे बदल गृहीत धरीत असताना जनता हिंसात्मक मार्गाचा अवलंब करीत नाही, तेथेच लोकशाही नांदते. त्यांच्या मते लोकशाही शासन हे वास्तविक जबाबदार शासन असते. डॉ. आबेडकर हे लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. लोकशाहीमुळेच व्यक्ती स्वातंत्र्याची जोपासना होते. पददलितांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यास लोकशाहीसारखा उत्तम मार्ग नाही, असेच त्याचे लोकशाही संबंधीचे विचार आहेत.

इंग्लंडच्या संसदीय लोकशाहीसारखीच भारतातही संसदीय लोकशाही असावी. कारण (१) लोकशाहीत लोकमतालाच प्राधान्य असते. (२) लोकमतच भ्रष्टाचारी सरकारला पदभ्रष्ट करू शकते. (३) संसदीय लोकशाही व्यक्तिगुणांचा विकास करते आणि व्यक्तींचा विशाल दृष्टीकोन बनविते. (४) जबाबदारीची जाणीव निर्माण करते. (५) लोकशाहीत शासन व्यवस्थेत लोकांना शांततेच्या मार्गाने सरकार बदलविता येते. (६) लोकांच्या तक्रारी आणि दुःखांना कायदेमंडळात आणि कायदेमंडळाबाहेर वाचा फोडता येते व भ्रष्ट सरकारविरुद्ध जनमत जागृत करता येते, असे आंबेडकरांनी लोकशाहीचे समर्थन केले आहे.

त्याचप्रमाणे त्यांनी लोकशाहीतील दोषसुद्धा सांगितले आहेत. त्यांच्या मताप्रमाणे :- (१) लोकशाही हे मंदगतीचे शासन आहे. (२) जनतेने निवडून दिलेले सरकार त्याचा कार्यकाल संपेपर्यंत लोकाना खऱ्या अर्थाने जबाबदार नाही. (३) सत्तारूढ झालेल्या पक्षाची हुकूमशाही निर्माण होते. (४) भारतीय लोकशाही जातीव्यवस्थेला प्राधान्य देते. त्यामुळे अल्पसंख्यकांचे हितसंरक्षण होत नाही. असे दोन दृष्टीकोन असले तरीही भारतात लोकशाहीच आवश्यक आहे,

**डॉ. आंबेडकरांचे सरकार विषयीचे विचार** : डॉ. आंबेडकरावर इंग्लंड आणि अमेरिकेतील लोकशाही संस्थांचा आणि उदारमतवादाचा फार प्रभाव पडला होता. त्यांना अमेरिकेतील सत्ताविभाजन आणि सत्तासंतुलन मान्य होते. कारण यामुळे सरकारचे अधिकार आणि नागरिक स्वातंत्र्य यांच्यामध्ये समतोल निर्माण झाला आहे असेच त्यांना वाटत होते. परंतु हा अमेरिकन सत्ताविभाजन आणि सत्तासंतुलन सिद्धांत भारतात अवलंब करणे योग्य नाही. कारण भारतातील सामाजिक व राजकीय परिस्थिती हेच आहे, असे ते म्हणतात.

भारताने काही पथ्ये पाळनूच संसदीय शासनाचा स्वीकार केला पाहिजे. (१) अल्पसंख्यकांचा विश्वास नसणारे सभासद मंत्री म्हणून धेऊ नये. (२) उत्कृष्ट आणि कायम टिकणाऱ्या मंत्रिमंडळासाठी कार्यक्रम प्रशासन निर्माण करावे. (३) अल्पसंख्यकांचे हक्क नाहीसे होतील म्हणून दैनंदिन राज्य कारभारात बहुसंख्यांकाचे नियंत्रण नसावे. (४) अल्पसंख्यकांच्या

संमतीनुसार बहुसंख्यकांना सरकार स्थापन करण्याची परवानगी द्यावी. (५) शासनसंस्थांनी परस्परांच्या कार्यात अवास्तव हस्तक्षेप करू नये. (६) व्यक्तीचे हक्क न्यायमंडळाद्वारे सुरक्षित राखले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेवर लोकशाही तत्त्वाचा प्रभाव होता. त्यांना अमेरीकेतील सत्ता विभाजनाचा सिद्धांत तसेच सता संतुलन मान्य होते. यामुळे राज्याचे अधिकार आणि नागरिकांचे स्वातंत्र्य यामध्ये समतोल साधला जातो. त्यांच्या मते, भारताने संसदीय शासन पध्दतीचा स्वीकार केला पाहिजे. शासन समारंभातील विविध विभागणीत परस्परांच्या कार्यात अवाजवी हस्तक्षेप करू नयेय तसेच देशातील अल्पसंख्यकांना संमतीनुसारच बहुसंख्यकाने सरकार स्थापन करण्याची परवानगी द्यावी. तसेच व्यक्तीचे मुलभूत हक्क न्यायमंडळाकडून सुरक्षित राखले जावे.

**डॉ. आंबेडकरांचे कायद्यासबंधीचे विचार** : कायदा म्हणजे सामाजिक कल्याणाचे साधन होय. कायद्याने व्यक्तीचे अधिकार आणि सुव्यवस्था निर्माण करणे, ही कायद्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. समान कायदा, समान संरक्षण हीच कायद्याची कसोटी आहे. समाजातील सामर्थ्यसंपन्न आणि बहुसंख्य गटाने शक्तिहीन आणि अल्पसंख्यक लोकांवर आपली जबरदस्ती करू नये अशीच खबरदारी कायद्याने घ्यावी. लोकांनी सुध्दा अशा कल्याणकारी कायद्याचा विरोध करू नये. कारण त्यामुळे बेबंदशाही, गोंधळ आणि अराजकता निर्माण होईल व एखादा हुकूमशहा आपले राज्य प्रस्थापित करेल, असेच डॉ. आंबेडकर म्हणतात. डॉ. आबेकडकरानी सविनय कायदेभंगाला यासाठीच विरोध दर्शविला होता.

**डॉ. आंबेडकरांचे अधिकारासंबंधीचे विचार** : अधिकार व्यक्तीच्या कल्याणासाठी आवश्यक आहेत आणि त्यासाठीच राज्यधटनेने व्यक्तीच्या अधिकाराचे संरक्षण करावे. हक्क हे केवळ धटनेत लिहून उपयोगाचे ठरणार नाही तर त्यासाठी खास उपाय अमलात आणावे. हक्कांवर आक्रमण होऊ नये अशाच तरतुदी धटनेमध्ये कराव्यात. हक्काच्या संरक्षणासाठी नैतिक जणिव समाजात निर्माण करावी. कारण समाजाने हक्काला विरोध केला तर त्या धटनात्मक तरतुदी पोलिस आणि न्यायखाते अंमलात आणूच शकत नाही, असेच त्याचे मत आहे.

**डॉ. आंबेडकरांचे स्त्री शिक्षणासंबंधीचे विचार** : स्त्री सुशिक्षित व्हावी, तिला चांगली वागणूक आणि समान दर्जा मिळावा, असे सांगून डॉ. आंबेडकर म्हणतात की, स्त्रीच्या शिक्षणामुळे तिचे कुटुंब विकसित होईल, मुलांना नैतिक वळण लागेल. स्त्रियांनी कपडे आणि दागिने यापेक्षा गुणवत्ता वाढवावी. बालविवाहास त्यांनी आणि समाजाने सुद्धा विरोध करावा.

**निष्कर्ष** :- वरील अध्ययनात असे दिसून आले की, स्वातंत्र्यानंतर धर्माची राजनीती होणार नाही याचा प्रयत्न झाला परंतु, पुन्हा एकदा देशात जातीची व धर्माची राजनीती सुरू होत असल्याचे चित्र आहे हे विदारक चित्र बदलण्यासाठी महात्मा गांधी आणि डॉ. बी.आर. आंबेडकरांच्या विचारांचा स्विकार करण्याची गरज समाजात आहे. आदर्श राष्ट्र निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यात विचाराचा संधर्ष होता तरी आज देशाचा विकास धडवून आणण्यासाठी दोन्हींच्या विचारांची गरज आहे. म्हणजेच 'स्मार्ट सिटी' सोबतच 'स्मार्ट विलेज' या संकल्पनेचा विकास करून 'सबका साथ सबका विकास' धडविता येईल.

**सूचना** :- १) आर्थिक सामाजिक व राजकीय विषमता नष्ट करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे. २) समाजाने शिक्षण प्राप्त करून सांस्कृतिक रक्षण करून अंधश्रद्धांचे निर्मूलन करावे. ३) राजकारणी नेत्यांनी जातीची व धर्माची राजनीती करू नये. ४) पक्षीय किंवा वैयक्तिक हितापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य द्यावे. ५) व्यक्ती स्वातंत्र्य आणि सद्सद्विवेक बुध्दीलाच लोकशाहीचा आधार मानावा. ६) मुल्य शिक्षणाचा प्रचार-प्रसार करून लोकांमध्ये उच्च दर्जाचे चारित्र्य निर्माण करावे. ७) प्रत्येक नागरीकाने संविधानाचा सम्मान करावा.

---

*संदर्भ :*

1. *Chousalkar, Ashok, (1990), India Idea of Political Resistance, Delhi, Ajanta Publication.*
2. *प्रभाकर, विष्णू (१९८५), भारतीय साहित्य के निर्माता : काका काल्लेकर, दिल्ली, साहित्य अकादमी प्रकाशन.*
3. *सावळे, दत्ता (२००६) चंपारण्याचा लढा : गांधीजींचे तंत्र व लोक, महात्मा गांधी अभ्यास केंद्र, कोल्हापूर, जिवजी विद्यापीठ.*
4. *'राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचारवंत' य. च. म. मु. वि. नाशिक.*
5. *गाठार एस.एस. (२०१०), ''आंबेडकरी चळवळीचा इतिहास,'' कब्लाश प्रकाशन, औरंगाबाद.*
6. *वर्तमान पत्र :- लोकसत्ता, लोकमत, नवभारत, टाईम्स ऑफ इंडीया.*

# हलबा/हलबी आदिवासी जमातींची बदलती सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती

*प्रा. सुनिल बी. उईके, संशोधक विद्यार्थी, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.*
*प्राचार्य डॉ. सुरेश खंगार, फुले आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, गडचिरोली*

**प्रस्तावना** :- आदिवासी नेमके कोणाला म्हणावे? यापूर्वी आदिवासी या शब्दाबाबत काही समज-गैरसमज पाहणे अत्यंत उपयुक्त ठरेल. शंभर वर्षापर्यंत खुद्द युरोपातील विद्वान लोकांची आदिवासी समाजाबद्दलची मते अत्यंत टोकाची होती. त्यात शास्त्रीयता नाही तर कल्पनेची भरारी होती. काहींना आदिवासी म्हणजे अत्यंत रानटी, नरमासभक्षक व सतत युध्दे करणारा, नरकप्राय जीवन जगणारा मागास समाज वाटायचा तर काहींना हा आदिवासी समाज म्हणजे कोणतेही बंधन न पाळणारा, खावे-प्यावे व भोगावे असे स्वर्गीय जीवन जगणारा वाटायचा. काहींच्या मते, एखाद्या देशातील आदिवासी अथवा आदिम समाज म्हणजे त्या देशात अतिप्राचीन काळापासून वास्तव्य करीत आलेला समाज आहे. यास्तव ते आदिवासींना मुळचे रहिवासी अगर अगदी प्राचीन काळातील समाज मानतात. परंतु ते खरे नाही. कारण ग्रामीण व नागरी असे म्हणविले जाणारे समाज देखील आदिवासी समाजाएवढा दीर्घकालीन इतिहास लाभले आहेत. परंतु आदिवासी समाजाची सत्य परिस्थिती अशी की बऱ्याच बाबतीत तो इतर समाजापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ आहे. या आदिवासी समाजाला भारतीय समाजात प्रामुख्याने विशेष महत्व आहे.

**आदिवासीचा अर्थ** :- इंग्रजीमधील 'Tribes' या शब्दांचा अर्थ जमात असा होतो. आदिपासून किंवा सुरवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे संबोधले जाते. डॉ. व्हेरियर ईल्विन आणि ठक्कर बाप्पा यांनी आदिवासींना 'Aboriginal' असे संबोधले आहे. 'Aboriginal' याचा अर्थ मुळचे निवासी असा होतो. आदिवासी हे जंगलात किंवा डोंगराळ भागात राहतात. म्हणून यांना 'वन्यजाती' किंवा 'गिरीजन' असेही म्हटले जाते. आदिवासी हे या देशातील मुळचे रहिवासी आहेत. म्हणून त्यांना वनवासी, गिरीजन म्हणणे योग्य नाही. ते खऱ्या अर्थाने या देशाचे आदिवासी म्हणजचे मुळचे निवासी आहेत.

भारतीय संविधानात आदिवासींना अनुसुचित जमाती ;बीमकनसमक ज्ंपइमद्ध असे म्हटले आहे. भारतीय संविधानातील कलम ३४८ (१) अनुसार ज्यांचा समावेश अनुसुचित जमातीच्या यादीत केला आहे त्यांना अनुसुचित जमाती असे म्हणतात. अनुसुचितीत जमातीमध्ये सर्वसाधारणपणे डोगराळ प्रदेशात आणि जंगलात वास्तव्य करणाऱ्या आणि जे आधुनिक संस्कृती तसेच जीवनपध्दती पासून अलिप्त आहेत अशा लोकांचा समावेश करण्यात आला आहे. म्हणून आदिवासी म्हणजे अनुसुचित जमाती असे समीकरण रूढ झाले आहे.

**आदिवासी समाजाची वैशिष्टये** :- १) एका विशिष्ट भुप्रदेशात वास्तव्य. २) मर्यादित लोकसंख्या. ३) रक्त संबंधावर आधारीत समुह. ४) निरक्षरता आणि लेखन किंवा लिपीचा अभाव. ५) तंत्रज्ञानाचा अभाव. ६) प्रारंभिक आर्थिक व्यवस्था. ८) शोधाची मंद गती.

**आदिवासींना शासनाकडून मिळालेल्या योजना** :- भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषतः अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय संविधानातील या मार्गदर्शक तत्वास अनुसरून पंचवार्षिक योजनामध्ये मागसवर्गीयांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभाग विविध विकास योजना राबवित आहे.

महाराष्ट्र राज्यात एकुण ४५ अनुसुचित जमाती आहेत. त्यात मुख्यत्वे भिल्ल, गोंड, महादेव, कोळी, पारा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा) कातकरी (मुख्यतः रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अनुसुचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत.

**आदिवासी हलबा/हलबी समाजः**- हलबा/हलबी समाज ही जमाती अनुसूचित जमातीच्या यादीत क्रमांक १६ व एकत्रितपणे हलबा, हलबी असे दर्शविण्यात आलेले आहे. हलबा, हलबी जमातीच्या उत्पत्तीबाबत कितीही आखायिका असल्या तरी ही जमात मुळची उत्कृष्ट शेती करणारी जमात म्हणून ओळखली जाते. ही जमात रायपूर जिल्ह्याच्या (मध्यप्रदेश) दक्षिणेस तसेच सिहावा, नगरी, कॉंकेर, बस्तर, अतागड,

बडेडोंगर, छत्तीसगड व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात प्रामुख्याने वसलेली आहे. पूर्वीच्या सेन्ट्रल प्रोव्हीन्स एन्ड बेरार (मध्यप्रदेश व विदर्भ) भागात १९११ मध्ये या जमातीची लोकसंख्या १ लक्ष एवढी होती. वास्तविक हलबा उत्तम शेती व शेतमजूरी करणारे असल्याने शेतीसाठी लागणारे हल (नांगर) पासून ''हलबा'' असे नाव पडले व बोलीभाषा ''हलबी'' असल्याने विदर्भात ''हलबी'' असे संबोधल्या जाते. बस्तरमध्ये हलबांना मानाचे (महत्वाचे) स्थान आहे. त्यांनी पूर्वी राजाच्या सेवेत सैनिक म्हणून कामगीरी बजावली त्यामुळे हलबांना/हलबींना राजदरबारी मानाचे स्थान होते. हलबा/हलबी हे उत्तम शेतकरी असल्याने त्यांनी शेतजमीनी धारण केलेल्या आहेत.

हलबा/हलबी ही मुळची पुरातन जमात आहे. 'हलबी' भाषा ही स्वतंत्र भाषा असून ती उडीया, छत्तीसगडी व मराठीच्या मिश्रणातून तयार झालेली आहे. परंतु कालातरांने या जमातीने हिंदू धर्माचा व आर्याच्या भाषेचा स्वीकार केला. विदर्भात सर्वच हलबा/हलबी हे मराठी भाषाच बोलतात.

प्राचीन काळी हलबा/हलबी समाज हा शेतीप्रधान होता. या जमातीला राजाश्रय होता. त्यामुळे त्यांना चांगला दर्जा प्राप्त झाला होता. त्यामुळे या जमातीचा सर्वांगीण विकास झालेला होता. परंतु नंतर काळ बदलत गेला आणि सामाजिक परिवर्तन घडून आले. राजेशाही मोडकळीस आली. इंग्रजांच्या काळात या जमातीवर प्रभाव पडला त्यामुळे या जमातीच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थितीत बदल घडून आले. इतर समाजाचा या समाजावर प्रभाव पडून या समाजाच्या चालिरीती प्रथा, परंपरा व धार्मिक विधीवर परिणाम झालेला दिसून येतो. इतर समाजांनी या जमातीच्या सोयी सवलतींचा गैरफायदा घेतला आहे. इत्यादी बाबीमुळे या समाजाची बदलती सामाजिक, आर्थिक व शैक्षेणिक स्थिती कशी आहे व या समाजावर कशाप्रकारे व कितपत परिणाम घडून आलेला आहे. याविषयीचे अध्ययन या संशोधनामध्ये करण्यात आलेले आहे.

**हलबा/हलबी समाजाची रचना व परंपरा :**

१) **उत्पत्ती** :- हलबा/हलबी जमातीच्या उत्पत्तीबात अनेक आख्यायिका आहेत. त्या आख्यायिकांना बाजूला सारून वास्तविक स्थितीकडे बघता असे दिसून येते की, बस्तर मध्ये ''हलबा'' जमात ही फार प्रभावी असल्याचे पुरावे आढळून येतात.

२) **हलबा/हलबी जमातीचे उपविभाग** :- या जमातीमध्ये पुढीलप्रमाणे उपविभाग आढळून येतात. १) बस्तरिया २) छत्तीसगडीया व ३) मराठीया.

३) **बोलीभाषा** :- हलबा/हलबीची बोलीभाषा ही मराठी छत्तीसगडी व उडीया यांचे मिश्रणातून तयार झालेली 'हलबी' भाषा आहे. परंतु हलबी भाषा ही मध्यप्रदेशातील बस्तर भागात प्रामुख्याने बोलली जाते.

४) **कुळ** :- मध्यप्रदेशात या जमातीमध्ये कुळ (आडनाव) लिहीण्याची पध्दत थोडी वेगळी आहे. जसे कोल्हारे ला कुल्हारा, भोयर ला भुआर्य, देहारे ला देवहरे, खुटमोडे ला खुटमुरीया, मेडे ला मेडीया म्हणजेच ते आडनावा शेवटी 'या' असे लावतात.

५) **कुलदैवत** :- हलबा/हलबी जमातीत हिन्दू देवी, देवतांना कुलदैवत मानत नाहीत म्हणजेच त्यांच्या देव्हाऱ्यात हिंदू देवी-देवताची पुजा केली जात नाही. तसेच मध्यप्रदेशात दंतेश्वरीला कुलदैवत मानतात. या जमातीत भुत प्रेत जादूटोना यावर विश्वास ठेवला जातो यासाठी भगत (पुजारी) असतो.

६) **व्यवसाय** :- हलबा/हलबी जमातीचा मुळ व्यवसाय शेती करणे हा आहे. विदर्भात सुध्दा हलबीचा मुळ व्यवसाय शेती करण्याचाच आहे. तसेच ते जंगलातील मोहाफुले, डिंक इत्यादी प्रकारचे वनोत्पादने गोळा करून उपजिविका करतात.

७) **पारंपारिक सण/त्यौहार** :- हलबा/हलबी जमातीत चैत्र पोर्णिमा साजरी केली जाते. त्यावेळी बडा देवाची पुजा केली जाते व काही ठिकाणी बकरा बळी दिल्या जातो.

८) **सामाजिक चालिरीती परंपरा**:- हलबा/हलबी जमातीच्या काही चालिरीती म्हणून जन्मविधी, लग्न विधी, बोरवन, मृत्यूविधी या आहेत.

९) **राहणीमान** :- हलबा/हलबी जमातीतील मुली, महिला अंगावर गोंदण करून घेतात. पुर्वी पुरूष मंडळी मनगटात चांदीचे किंवा सोन्याचे कडे घालत असत. तसेच तांब्याच्या, पितळीच्या, चांदी किंवा सोन्याच्या कानात बाऱ्या घालत होते.

१०) **मुळचा प्राचिन रहिवाशी** :- सेंट्रल प्रोव्हिसेस डिस्ट्रीक्ट गॅझिटीअर्स (मध्ये) भंडारा जिल्हयात १९०८ साली हलबा/हलबी यांचा उल्लेख द्रविडीयन ट्राईब म्हणून केलेला आहे व त्याची लोकसंख्या १७,००० दर्शविलेली आहे. तसेच सेंट्रल प्रोव्हीसेंस लॅन्ड एलिनेशन ॲक्ट १९१६ नुसार हलबा/हलबींना मुळ रहिवाशी म्हणून घोषित करण्यात येवून त्यांना राज्य

शासनाने विदर्भाच्या आठही जिल्हयात शैक्षणिक सवलती देण्यास सुरूवात केली होती.

**अध्ययनाचे मुख्य उद्देश** :- १) हलबा/हलबी आदिवासी जमातीच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे. २) हलबा/हलबी आदिवासी जमातीच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.

**गृहीतकृत्ये** १) हलबा/हलबी जमातीची आर्थिक स्थिती खालावलेली आहे. २) शैक्षणिक प्रगती न झाल्यामुळे ही जमात प्रगत समाजापासून दूर आहे.

**अध्ययनाची व्याप्ती** :- प्रस्तुत अध्ययनाची व्याप्ती ही गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुका असून या तालुक्यात हलबा/हलबी जमातीचे लोक वास्तव्य करतात.

**नमुना निवड पद्धती**:- प्रस्तुत अध्ययनामध्ये गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीमधून सोयीस्कर नमुना निवडीनुसार देवरी तालुक्यातील १८ ते ६० वर्षे वयोगटातील एकूण ६० उत्तरदात्यांची निवड करण्यात येवून तथ्य संकलन करण्यात आले.

**तथ्य संकलन**:- प्रस्तुत अध्ययनात मुलाखत अनुसूचीचा वापर करून माहिती गोळा करण्यात आलेली आहे. तसेच दुय्यम पद्धतीचा वापर करून माहिती प्राप्त करण्यात आलेली आहे.

**संशोधनाचे विश्लेषण**:- प्रस्तुत अध्ययनात गोंदिया जिल्हयातील देवरी तालुक्यातील हलबा/हलबी आदिवासी जमातीच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करतांना असे आढळले की एकूण ६० हलबा/हलबी आदिवासी समाजातील उत्तरदात्यापैकी सर्वाधिक ३४ टक्के हलबा/हलबी आदिवासी समाजातील उत्तरदात्याचे शिक्षण पदवीपर्यंत झाले असून त्यापैकी अधिकांश ११.७ टक्के हलबा/हलबी आदिवासी समाजातील उत्तरदात्यांच्या मते हलबा/हलबी आदिवासी जमातीकरीता भरपूर प्रमाणात योजना असूनही आजही आर्थिकदृष्टया त्यांची प्रगती झाली नसल्याचे मुख्य कारण इतर समाजाचा हस्तक्षेप असल्याचे निदर्शनास आले आहे.

**निष्कर्ष** :- १) अध्ययनातील सारणीच्या पडताळणी नुसार ६ मुक्त पातळीवर हलबा/हलबी आदिवासी जमातीची शैक्षणिक स्थिती तपासली असता, काई वर्ग मुल्य तपासली असता हे सारणी मुल्यापेक्षा कमी असल्यामुळे शैक्षणिक स्थिती व आर्थिक स्थिती खालावलेली आहे. २) अध्ययनाअंती ८.५ पातळीवर शिक्षण आणि हलबा/हलबी जमातीकरीता भरपूर प्रमाणात योजना असूनही आजही आर्थिकदृष्टया प्रगती झाली नसल्याने ही जमात प्रगत समाजापासून दूर आहे.

**उपाययोजना**:- १) शैक्षणिक व आर्थिकदृष्टया या हलबा/हलबी जमातीपर्यंत शासकीय योजनाचा प्रचार व प्रसार व्हायला पाहीजे. २) हलबा/हलबी जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची सामाजिक संघटनेनी एकत्र येवून त्याच्यासाठी लढा देणे आवश्यक आहे. ३) प्रगत समाजाने या जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्यासोबत सौहार्दपूर्ण संबंध/ वागणूक ठेवणे आवश्यक आहे. ४) शासकीय कार्यप्रणालीद्वारे दुर्गम व तळागाळातील हया जमातीपर्यंत शासकीय योजनाची अंमलबजावणी करणे ही आजची गरज आहे.


***संदर्भ ग्रंथ सूची*** *:-*

*१. डॉ. भांडारकर पु.ल., 'सामाजिक संशोधन पद्धती', महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.*

*२. 'खरे हलबा, हलबी कोण?', प्रकाशक- अजयकुमार सदाशिव कोठेवार, आदिवासी हलबा/हलबी समाज संघटना विभागीय शाखा गोरेगांव, जि. गोंदिया.*

*३. www.halbatribemaharashtra.htm.com*

# आदिवासी समाज आणि व्यसनाधिनता

***डॉ. धनराज चौखुंडे,*** *सहयोगी प्राध्यापक, आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा.*
*Email- dchoukhunde@yahoo.com*

**प्रस्तावना** :- मादक पदार्थाचे सेवन करण्यास नक्की कोणत्या काळापासुन सुरूवात झाली याचा इतिहास उपलब्ध नाही. परंतु जगातील सर्व देशात कोणत्या ना कोणत्या मादक पदार्थांचे सेवन फार प्राचीन काळापासून प्रचलित असल्याचे आपणाला दिसून येते. सर्वसाधारणपणे गुंगी आणणारे काही पदार्थ आहेत याचा जेव्हा मानवाला शोध लागला तेव्हापासून ह्या पदार्थांच्या सेवनाला प्रारंभ झाला असे म्हणता येईल. मद्यपानाचा प्रश्न आधुनिक असला तरी नशा आणणाऱ्या या मादक पेयांचे सेवन प्राचीन काळापासून केले जात आहे. वैदिक काळात आर्य लोक सोमरस पान करीत नंतरच्या काळात भांग, गांजा, चरस व अफुचे सेवन करीत मध्ययूगामध्ये मद्यपानाचे प्रमाण वाढले होते. इतकेच नव्हे तर राजदरबारी मद्यपान करणे शिष्टसंमत होते.

ब्रिटीशाचे आगमन व त्यांनी बसविलेला अबकारी कर ह्या दोन गोष्टी भारतात मद्यपानाचे व्यसन समाजात अगदी खालच्या स्तरापर्यंत पोहोचविण्यास पुरक झाल्या असे म्हणता येईल. मद्यपान सेवन करणाऱ्या लोकांचे अनेक प्रकार आहेत. त्यास रोज नियमित प्रमाणात सेवन करून आपली दैनंदिन कर्तव्ये व्यवस्थित करणाऱ्या लोकांचा पहिला क्रमांक लावता येईल. दुसऱ्या प्रकारात वाईट कृत्य करण्यास्तव सद्सद्विवेकबुध्दी नष्ट करण्यासाठी प्रमाणाबाहेर मद्यपान करणारे येतात. तर तिसरा प्रकार मानसिक विकृती असलेल्या किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या लोकांचा असतो. त्यांना कोणत्याही बिकट परिस्थितीत धैर्याने तोंड देणे जमत नाही व म्हणून मानसिक ताण कमी करण्यासाठी ते मादक पदार्थाचे अमर्याद सेवन करतात.

सद्यकाळात मद्यपानाचे प्रमाण कधी नव्हते इतके वाढले आहे. १९९३ च्या एका अहवालात भारतात सुमारे १२ लक्ष लोक हिरॉइनच्या व्यसनाचे शिकार झाले आहेत. यावरून अंमली पदार्थाच्या व्यसनाची समस्या गंभीर झाल्याचे दिसून येते. १९८४ ते २००० काळात अवैध मादक अंमली पदार्थाची जप्ती करण्याच्या प्रमाणात हजारो पटीने वाढ झाली असून ज्या मादक द्रव्यांची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कोटी रूपयांमध्ये आहे. भारतातील मुंबई हे शहर या मादक पदार्थाच्या चोरटया व्यापाराचे सर्वात मोठे केंद्र झाले आहे. भारतात मद्यपानाचा प्रश्न अतिशय जटील आहे. युवकांमध्ये व्यसनाधिनतेचे वाढते प्रमाण चिंतेची बाब आहे.

**अर्थ व स्वरूप**:- ''औषधी द्रव्ये म्हणजे इंग्रजीमध्ये ड्रग (Drug) असे संबोधिले जाते''. ड्रग म्हणजे असा रासायनिक पदार्थ की ज्यामध्ये काही विशिष्ट शारीरिक व मानसिक स्वरूपाचे बदल घडवून आणण्याची क्षमता असते. कोणत्याही औषधी द्रव्याचे सेवन केले की त्याचा माणसाच्या शरीरातील विभिन्न अवयव, स्नायू, बुध्दी व मानसिक चेतना या सर्वांवर काहीना काही तरी परिणाम होतोच. जोसेफ ज्युलियन यांनी १९७७ मध्ये ड्रग या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''ड्रग म्हणजे असा रासायनिक पदार्थ की ज्याचा शरीर, अवयवांचे कार्य, माणसाची मनःस्थिती व चेतना या सर्वांवर प्रभाव पडतो तसेच ड्रगमध्ये त्याचा दुरूपयोग केला जाण्याचे सामर्थ्यही समाविष्ट असते. कोणत्याही अंमली पदार्थाचे सेवन करणे म्हणजे कालांतराने तो व्यक्ती त्यांच्या आहारी जातो आणि व्यसनाधिन होतो. व्यसनाच्या सवयीमुळे त्या व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक व आर्थिक जीवनावर गंभीर परिणाम होतो. ही सवय जडली म्हणजे व्यक्ती त्या सवयीतून मुक्त होऊ शकत नाही व व्यसनाधिनतेमध्ये अनेक अंमली पदार्थाचा वापर केला जातो. उदा. चरस, गांजा, अफू, मद्यपान, कोकीन, हेरॉइन, तंबाखु, गुटखा, खर्रा, बिडी-सिगारेट इत्यादीचा समावेश होतो.

**आदिवासी समाज आणि व्यसनाधिनता**:- अनुसूचित जमाती म्हणजे आदिवासी समाज होय. आदिवासी समाज हा प्रगत समाजापासून अलिप्त असलेला, दुर रानावनात वास्तव्य करणारा आणि धर्म, बोलीभाषा, संस्कृती इत्यादीबाबतीत समानता असलेला एक साधा सामाजिक समुह होय. हा समुदाय दुर्गम भागात वास्तव्य करणारा समुदाय आहे. आदिवासी समाजात व्यसनाधिनता एक गंभीर समस्या आहे. आदिवासी समाजाची जीवनपद्धती ही नैसर्गिक घटकांशी जुळलेली असते. भारतात एकुण लोकसंख्येच्या ७ टक्के लोक हे आदिवासी आहेत. भारतात आदिवासी समाजाच्या अनेक समस्या आहेत. जसे आर्थिक समस्या, अज्ञान, निरक्षरता, सामाजिक समस्या, आरोग्यविषयक समस्या आणि व्यसनाधिनता

या प्रमुख समस्या आहेत. आदिवासी समाजात गुंगी यावी म्हणून ताडी, मोहफूलापासून, शिंदीच्या फूलापासून तयार केलेली दारू घेतात. तसेच तंबाखु, बिडी, चिलम यासारखे सहज उपलब्ध होणारे अंमली पदार्थ सेवन केल्या जातात. परंतु अलिकडे आदिवासी समाजाचा प्रगत समाजाशी सहसंबंधामुळे त्यांच्या सुध्दा जीवनपद्धतीमध्ये बदल होताना दिसत आहेत. परंतु अजुनही आदिवासी समाजात आर्थिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक अनेक समस्या दिसून येतात. समाजकार्याचे शिक्षण घेतांना आदिवासी समाजाशी नेहमीच जवळचा संबंध येतो. या समाजाची आरोग्य आणि व्यसनाधिनता याविषयी अधिक माहिती जाणुन घेण्याच्या उद्देशाने हे संशोधन करण्यात आलेले आहे.

**अध्ययन क्षेत्र** :- या संशोधनाकरीता भंडारा तालुक्यातील 'कोका (जंगल) व चंद्रपूर' या आदिवासी ग्रामीण भागाची निवड करण्यात आलेली आहे. कोका (जंगल) व चंद्रपूर हे गाव भंडारा पासून २० कि.मी. अंतरावर असून पुर्णतः गोंड आदिवासी समाज वसलेला गाव आहे. या आदिवासी समाजातील व्यसनाधिनता आणि आरोग्य याविषयीचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

**संशोधनाचे उद्देशः-**

१) आदिवासी समाजात व्यसनामध्ये कोणते मादक पदार्थ घेतात हे जाणून घेणे.

२) आदिवासी समाजात व्यसनाधिन होण्याचे कारणे जाणून घेणे.

३) आदिवासीच्या आरोग्यावर व्यसनामुळे कोणते परिणाम झालेत हे जाणून घेणे.

**संशोधनांचे गृहितकृत्येः-**

१) आदिवासी समाजात सहज सोप्या पद्धतीने मिळणारे मादक पदार्थाचे सेवन केले जाते.

२) आदिवासी समाजात अज्ञान, गरिबी आणि समारंभामुळे लोक व्यसनाधिन होतात.

३) व्यसनामुळे आदिवासीच्या आरोग्यावर दुष्परिणाम झालेले आहेत.

४) व्यसनामुळे आदिवासी समाजातील कुटुंबावर वाईट परिणाम झालेले आहेत.

**संशोधनाची व्याप्ती** :- प्रस्तुत संशोधन हे कोका व चंद्रपूर या आदिवासी गावापुरतेच मर्यादित आहे. कोका (जंगल) व चंद्रपुर हे गाव भंडारा तालुक्यातील आहे. या गावात ६५ टक्के 'गोड' ही आदिवासी जमात वास्तव्य करते.

**नमुना निवडः-** प्रस्तुत संशोधनात गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीत सोईस्कर नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. नमुना म्हणून कोका (जंगल) व चंद्रपूर गावातील प्रत्येकी ३० प्रमाणे एकुण ६० आदिवासी पुरूषांची निवड करण्यात आलेली आहे.

**तथ्य संकलनः-** प्रस्तुत संशोधनात मुलाखत अनुसूचीचा वापर करून माहिती गोळा करण्यात आलेली आहे. तसेच दुय्यम पद्धतीचा वापर करून माहिती प्राप्त करण्यात आलेली आहे.

**संशोधनाचे विश्लेषणः-** प्रस्तुत संशोधनात 'कोका (जंगल) व चंद्रपूर' या गावातील गोंड आदिवासी समाजातील व्यसनाधिनता यावर अध्ययन करतांना असे आढळले की, गोंड समाजातील पुरूष हे १८ वर्षाखालील असतांनाच व्यसनाधिन होतात. सर्वच गोंड आदिवासी उत्तरदाते मजुरी करणारे आहेत. सर्वच उत्तरदाते ५ वर्षापासून तर १५ वर्षेपासून व्यसन करणारे आहेत. व्यसनामध्ये खालील मादक पदार्थ वापरतात.

**व्यसनामध्ये घेण्यात येणारे मादकपदार्थ आणि सेवनाचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | मादक पदार्थ | नियमित | कधी-कधी | कधीच नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | दारू | ४८(८०%) | ०४(०६.६७%) | ०८(१३.३३%) | ६० |
| २. | तंबाखू | २८(४६.६७%) | १२(२०%) | २०(३३.३३%) | ६० |
| ३. | खर्रा | ५२(८६.६७%) | ०८(१३.३३%) | - | ६० |
| ४. | बिडी-सिगारेट | १६(२६.६७%) | ३२(५३.३३%) | १२(२०%) | ६० |
| ५. | चिलम | - | - | ६० | ६० |
| ६. | गुटखा | - | - | ६० | ६० |
| ७. | गांजा | - | - | ६० | ६० |
| ८. | गुंगी आणणारे पदार्थ | - | - | ६० | ६० |

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, आदिवासी समाजात व्यसनामध्ये दारू, तंबाखु आणि खर्रा या मादकद्रव्य पदार्थाचा समावेश जास्त प्रमाणात केला जातो. व्यसनाधिन होण्याचे मुख्य कारण मित्र समुहाच्या संगतीमुळे आणि सहज इच्छा झाली म्हणून तसेच लग्न समारंभामध्ये घेतल्यामुळे जास्तीत जास्त

युवकांना व्यसनाची सवय लागली. व्यसनामुळे अनेकांना अशक्तपणा, पोटात त्रास, त्वचारोग, चिडचिडेपणा, श्वसनाचा त्रास, चिंताग्रस्त यासारखे मानसिक आणि शारीरिक आजार झालेले दिसून येतात. तसेच व्यसनाधिनतेचे परिणाम त्यांच्या कुटुंबावर झालेला दिसून येतो. त्यामध्ये कुटुंबाकडून अपमानास्पद वागणूक, कुटुंब कलह आणि मुलांकडे दुर्लक्ष यासारखे परिणाम झालेले दिसून आलेत. व्यसनामधून मुक्त व्हावे असे त्यांना वाटत नाही.

**प्रमुख निष्कर्षः-**

१) १८ वर्षाखालील वय असतांनाच अनेक युवक व्यसनाच्या आहारी गेले आहेत.

२) व्यसनामध्ये मद्यपान, तंबाखु, खर्रा आणि बिडी या मादक पदार्थाचा वापर जास्त केला जातो.

३) मित्र समुहामूळे, समारंभामध्ये आणि सहज म्हणून घेतल्यामुळे व्यसनाधिन झालेत.

४) व्यसनामूळे आदिवासींच्या आरोग्यावर परिणाम झालेला आहे.

५) व्यसनामुळे कुटुंबात आर्थिक अडचण, मुलांकडे दुर्लक्ष, कौटुंबिक कलह यासारखे परिणाम कुटुंबात दिसून येतात.

***संदर्भ ग्रंथ सूची :-***

१. *आगलावे प्रदिप, 'सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे', नागपूरः साईनाथ प्रकाशन.*
२. *डॉ. आकरे बी.एन., 'आदिवासी आणि सामुदायिक विकास योजना', नागपूरः पिंपळापुरे प्रकाशन.*
३. *डॉ. कुलकर्णी शौनक, 'महाराष्ट्रातील आदिवासी', पुणेः डायमंड पब्लिकेशन.*
४. *देवगावकर शैलजा, 'आदिवासी विश्‍व', नागपूरः आनंद प्रकाशन.*
५. *डॉ. देवगांवकर एस.जी., 'महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती', नागपूरः साईनाथ प्रकाशन.*
६. *लोटे रा.ज., 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र',* नागपूरः पिंपळापुरे प्रकाशन.

# आंबेडकरी चळवळीची दिशाहीनता : एक समाजशास्त्रीय आकलन

*प्रा.डॉ.नारायण तु. कांबळे, समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद ता.अहमदपूर जि.लातूर मो.९९२११५३१५९*

अलिकडे 'चळवळ' या शब्दाचा अर्थ आणि संदर्भ खूप बदललेला आहे. शासनव्यवस्थेशी संबंधित एवढेच चळवळीचे क्षेत्र नसून लोकांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांविषयी भूमिका घेणे, निष्ठेने ते प्रश्न सोडविण्यासाठी पाठपुरावा करणे हे चळवळीचे उद्दिष्ट असून मानवी मूल्ये, मानवी प्रतिष्ठा यासाठीचा तो लढा आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड दबदबा निर्माण केलेली चळवळ आज मरगळ अनुभवत आहे. सन २०१४ च्या निवडणुकीच्या निकालानंतर या चळवळीची सद्यःस्थिती फारच केविलवाणी व चिंताजनक झाली आहे.

सत्तेच्या राजकारणात किंवा संसदीय राजकारणात आंबेडकरी चळवळीला खूप मर्यादा आहेत, हे नीट लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्रात स्वतःच्या ताकदीवर राजकीय सत्ता हस्तगत करणे आज तरी शक्य दिसत नाही. एवढेच कशाला राखीव मतदारसंघातही आंबेडकरी विचाराचा माणूस वा 'मागासवर्गीय' निवडून येणे वा ना येणे हे खुल्या प्रवर्गाच्या हातात आहे, असे निदर्शनास आले आहे. मग प्रश्न शिल्लक राहतो की संसदीय राजकारण करण्यासाठी व सत्तास्थानी येण्यासाठी मागासवर्गीयांनी कुठल्या पक्षासोबत जायचे? तसे बघितले तर सर्वच पक्ष मागासवर्गीयविरोधी. रिपब्लिकन पक्षाने आजपावेतो अनेकदा काँग्रेसबरोबर युती केलेली आहे. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाचे राजकारण काँग्रेसभोवतीच फिरत राहिले. इतर पक्षांच्या तुलनेत काँग्रेस धर्मनिरपेक्ष आहे म्हणून दगडापेक्षा वीट मऊ याच युक्तिवादाने रिपब्लिकन पक्षाने त्यांच्याशी युतीचे समर्थन केले आहे. परिणामी सेना-भाजप जातीयवादी आहेत म्हणून त्यांना रोखण्यासाठी काँग्रेस-रिपब्लिकन युती आवश्यक आहे असा प्रचार केला गेला.

आजपर्यंत मागासवर्गीयांनी 'ॲजिटेशनल पॉलिटिक्स' आणि 'पार्लमेन्टरी पॉलिटिक्स' अशा दोन पद्धतीने राजकारण केले असे दिसते. समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी अस्पृश्यता, जातनिर्मूलन आणि मागासवर्गीयांची प्रगती साधण्यासाठी राजकीय - सामाजिक चळवळी केल्या आहेत. सामाजिक परिवर्तनासाठी राजकारण असा आंबेडकरी चळवळीचा रोख होता. जातीचे उच्चाटन व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठीच या चळवळी केल्या गेल्या. या प्रयत्नाचा रोख हा उच्चवर्णियांच्या वा उच्च जातीचा निषेध व प्रतिकार करण्याचा होता. परिणामी आंबेडकरी राजकारण आणि सवर्णांचे राजकारण जवळ आले नाही.

महाराष्ट्रातील आंबेडकरी राजकारण हे 'बौद्धकेंद्री' किंवा एकाच जातीचे हितसंबंध जोपासणारे आहे, अशी भावना मातंग, चांभार व ढोर जातीत मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. परिणामी बौद्धेतरांनी बौद्धांना 'नकारात्मक संदर्भ गट' ठरवून त्यांच्या विरोधी राजकीय व सामाजिक कृती करण्याचा झपाटा सुरू ठेवला. 'जय भीम पेक्षा रामराम बरा', 'महारापेक्षा मांग-चांभार बरा' असा प्रचार जोरकसपणे केला गेला. महार मंडळी स्वाभिमानाची भाषा करतात व शासनकर्ते व्हायचे म्हणतात. मग त्यांना चांगलाच धडा शिकवला पाहिजे असे बोल जनमानसातून कानी पडू लागले. बौद्धांना राजकारणातच नव्हे तर प्रशासनामध्येही खड्यासारखे बाजूला काढले जाऊ लागले. बौद्धांना पर्याय म्हणून वा त्यांच्याविरोधात ओबीसी व मांग-चांभार या जातींना वापरण्याचा प्रयत्न केला गेला आणि तो अद्याप सुरू आहे. सेना-भाजप युती सरकारने तर मांग व चांभार या जाती समूहांना जवळ करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर मोक्याच्या जागाही दिल्या. राजकारणात, प्रशासनात झुकते माप दिले. परिणामी बौद्ध व बौद्धेतरांमध्ये अंतर व रोष वाढत गेला. एवढेच नव्हे तर आंबेडकरी राजकारणाला एकांगी पाडले.

आज मागासवर्गीयांच्या राजकारणात बौद्धांना 'विश्वासाची कॉन्स्टिट्युअन्सी' म्हणून संबोधले जाते. पण हा समुदाय तरी एकसंघ आहे का? बौद्ध समुदायात भिन्न आर्थिक स्तर निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसते. जातीअंतर्गत स्तरीकरण होऊन मागासवर्गीयांमध्ये मध्यम वर्ग निर्माण झाला आहे, हा आरक्षण धोरणाचाच परिणाम आहे. बौद्धांत आजमितीला ढोबळमानाने खालील प्रकारचे स्तरीकरण नजरेत येते.

१. मागासवर्गीय अभिजन वर्ग चर्चासत्र, परिषदा व प्रकाशनामध्ये मग्न आहे.
२. मागासवर्गीय मध्यम वर्ग नोकरी, रोस्टर, बढती व आरक्षणाच्या भोवऱ्यात अडकला आहे.

३. राजकीय पुढारी व कार्यकर्ते संसदीय आणि अस्मितेच्या राजकारणात गुंग आहेत.
४. धम्मबंधू धर्मांतर घडवून आणण्यात, धर्मपरिषदा घेण्यात व 'आंबेडकर फेस्टिव्हल' आयोजनात धन्यता मानतात.
५. सामान्य जनता सर्व पुढाऱ्यांनी एकत्र यावे अशा भाबड्याा अपेक्षेत आहे.

अशा प्रकारच्या आंबेडकरी समूहाच्या स्तरीकरणात मागासवर्गीय अभिजन वर्ग, मागासवर्गीय नोकरदार आणि धर्मसेवक असे चित्र पहावयास मिळते. तर धर्मसेवकांना राजकारणाची फार मोठी 'ॲलर्जी' आहे. घरच्या व 'भरवश्याच्या कॉन्स्टिट्युअन्सी' अशी अवस्था आहे तर मग आंबेडकरी राजकारण धारदार कसे होणार, परिणामकारक कसे होणार हा खरा यक्षप्रश्न आहे.

आंबेडकरी राजकारण, समाजकारण, धम्मकारण ही अंगे परस्परव्यापक आहेत की चळवळीची निरनिराळी अंगे आहेत याची उकल व्हायला हवी. वरील प्रकारच्या चिरफळ्याा आणि 'रिपाइं' मधील गट याची जाणीव महाराष्ट्रातील इतर पक्षातील धुरीण राजकारण्यांना आहे. म्हणून आंबेडकरी पुढाऱ्यांना एक तर ते गृहित धरतात किंवा आपल्या राजकारणाचा भाग समजतात. वेळप्रसंगी त्यांना 'को-ऑप्ट' करतात. अलिकडे तर आंबेडकरी नेत्यांना आपल्या कवेत घेण्याची सर्व पक्षामध्ये आता स्पर्धा सुरू झाली आहे. तर उलट आंबेडकरी चळवळीचे रुपांतर राजकीय पक्षामध्ये झाल्याने ही चळवळ संपल्यात जमा आहे. खरे पाहता सामाजिक व सांस्कृतिक चळवळ जिवंत राहिली तरच आंबेडकरी राजकारण जिवंत राहू शकते म्हणून आंबेडकरी राजकारणाचे चळवळीकरण होणे फार महत्त्वाचे आहे.

आंबेडकरी राजकारणाचे चळवळीकरण होण्यासाठी हीच खरी योग्य वेळ आहे. सामुदायिक कृती, विचारप्रणाली, नेतृत्व व बदलाभिमुखता ही सामाजिक चळवळीची प्रमुख वैशिष्टे लक्षात ठेवून चळवळ करणे अत्यावश्यक आहे. अशा प्रकारच्या बांधणीतूनच धारदार व विकासाभिमुख राजकारण होऊ शकते. म्हणून आंबेडकरी चळवळीला राजकीय चळवळ करण्यासाठी भौतिक साधने व अभौतिक साधनसामुग्रीची गरज आहे. आंबेडकरी राजकारणाची उद्दिष्टे पटण्यास आर्थिक बळ, वेळ व विशेष ज्ञान ही साधनसामुग्री मागासवर्गीय श्रेष्ठीजन व मध्यम वर्ग पुरवू शकतो. मूलभूत प्रश्नांवर धरसोड न करता कायम भूमिका मांडली पाहिजे. आपण क्रांतीचे वाहक आहोत या विचारविश्वात न राहता इतर समुदायांसोबत काही प्रश्नाच्या आधारे आपली मैत्री होऊ शकते का याचीही नीटपणे तपासणी करणे व काळसुसंगत समविचारी पक्षाशी संबंध साधता येऊ शकतील का याचा विचार करणे गरजेचे आहे. शहरी भागातील आंबेडकरी राजकारण व ग्रामीण भागातील राजकारण यात सुसूत्रता नाही म्हणून स्थानिक पातळीवर कार्यकर्ते आपापल्या सोयीने राजकारण करतात असा अनुभव आंबेडकरी विचारवंतांना आल्याची साक्ष नोंदवताना दिसतात. राजकीय साधनाचा व बिगर राजकीय साधनांचा वापर करून संघटन बांधणे सहज शक्य आहे. प्रथम 'विश्वासाची कॉन्स्टिट्युअन्सी' घट्ट करणे अत्यावश्यक आहे व या विश्वासाची कॉन्स्टिट्युअन्सीचे हितसंबंध सांभाळत व्यापक स्वरूपाचे राजकारण करणे, हे आंबेडकरी चळवळीला शहाणपणाचे ठरेल.

सारांशरुपाने जागतिकीकरण व खासगीकरणाच्या धोरणानंतर आर्थिक संरचनेत व त्या अनुषंगाने सामाजिक संरचनेत काही मूलगामी बदल होताहेत. या बदलाच्या सर्वव्यापी प्रभावाला सामोरे कसे जावे हे न कळल्यामुळे आंबेडकरी चळवळीमध्ये वैचारिक सैरभैरपणा आलेला आहे. कोणतीही चळवळ ही भूमिका, धोरण व कृतिकार्यक्रम यावर चालते. या तिन्हींबाबत जर स्पष्टता नसेल तर चळवळ ही उथळ सत्ताकारण व वलयांकित व्यक्तिमत्त्वाभोवती फिरत राहते. आंबेडकरी चळवळीकडे बदलत्या काळानुरुप आजच्या भांडवलशाही विरुद्ध लढण्यासाठी भूमिका, धोरण व कृतिकार्यक्रम नसल्यामुळे ती संसदीय चौकटीतील सत्ताकारण व जोडीला अस्मिताकेंद्री राजकारणाभोवती फिरत आहे.

काळाच्या एका टप्प्यावर राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रस्थापित व्यवस्थेवर धाक निर्माण करणारी आंबेडकरी चळवळ आता प्रभावहीन झाली आहे. नेत्यांची सत्तालालसा, अस्मितादर्शी व आरक्षणकेंद्री राजकारण, ऐतिहासिक मिथकांमध्ये अडकलेले अभिनिवेशी राजकारण बदलणाऱ्या आर्थिक संरचनेबरोबर बदलणाऱ्या सामाजिक संरचनेचे भान नसणे अशा अनेक समस्या आंबेडकरी चळवळीमध्ये दिसून येतात, ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही. ही चळवळीच्या अनुषंगाने आत्मपरीक्षण करायला लावणारी बाब आहे.

# ब्रिटीशकालीन अकोला जिल्ह्याची उद्योग स्थिती

***प्रा. मनोज सोनोने,*** *इतिहास विभाग, श्री. ज्ञा. म. बुरुंगले महाविद्यालय, शेगाव.*

**प्रस्तावना** :- सन १६०१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ८१.१६ टक्के लोक शेतीव्यवसायाची निगडीत असल्याचे आकडेवारीवरून निदर्शनास येते. नैसर्गिक साधनांच्या उपलब्धतेमुळे कृषी आधारित उद्योगधंद्यात वाढ झाल्याचे दिसून येते. कापूस पिंजून काढणे, गाठान बनवणे व त्याचे धागे बनविण्याची व्यवस्था अकोला जिल्ह्यातच विकसित झालेली होती. त्यामुळेच लागवडीखालील जमिनीत ४१. ०७ टक्के जमीन कापूस पिकाच्या लागवडीखाली असल्याचे स्पष्ट होते. कृषी आधारित उद्योगधंद्यात लक्ष दिल्यास असे निदर्शनास येते की, त्यात प्रशिक्षित कामगारांचा अभाव आहे. हा अपवाद वगळता कार्यक्षमता त्यांच्यात कुटून भरलेली होती. काही सोयी कामगारांच्या अनुभवासाठी जिल्ह्यातच केल्या गेलेल्या होत्या. जेथून प्रशिक्षण घेतलेले कामगार अधिक प्रभावी कार्य करत असल्याचे उपलब्ध पुराव्यावरून लक्षात येते. दुसरी महत्वाची बाब ही की, औद्योगिकरणामुळे लोकांच्या जीवनावर सामाजिक व आर्थिक परिणाम घडून आलेले दिसून येतात. खूप कमी उद्योजक हे ह्या कालखंडात अकोला जिल्ह्यात रुपये गुंतवणारे होते. कारण उद्योजक पैसा गुंतवणूक करत असत. कारण त्यांना पैसा बुडवण्याची भीती वाटत असे. ते तेंव्हाच गुंतवणूक करत जेंव्हा त्यांना त्यामधून नफा मिळवण्याचा संभव असे. त्या काळातील शेतकरी किंवा कामगार त्यांच्याकडून प्रभाव पाडण्यात यशस्वी झाले होते. त्यामुळे नंतरच्या काळात त्याचे सकारात्मक परिणाम घडून आल्याचे आढळून येते.

कृषिविरहीत उद्योगधंदे ग्रामीण भागातील कामगारांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करत असत. असे उपलब्ध माहितीवरून समजते. परंपरागत उद्योगात कुटीर उद्योग अग्रेसर होते. स्थानिक खेड्यामधून कच्चा माल उपलब्ध होत असे. खालील तथ्यामधून व दिलेल्या आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, १६६१ च्या जनगणनेनुसार खालीलप्रमाणे वेगवेगळ्या व्यवसायात कामगार गुंतलेले होते.

| अ. क्र. | | एकूण कामगार | | एकूण कामगार |
|---|---|---|---|---|
| | वस्तू | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १ | लोकर व फर | ६३ | १३ | ७६ |
| २ | रेशीम | ५२ | ३६ | ६१ |
| ३ | कापूस | ६२२४ | ४६६१ | ११२१५ |
| ४ | ताग, हेम्प, टेक्सटाईल | २६२ | ३० | २२६२ |
| ५ | कापड | १८५६ | ७०७ | २५६३ |
| | एकूण | ८४५७ | ५७८० | १४२३७ |

या व्यतिरिक्त दुसऱ्या उद्योगावर लक्ष केंद्रित केले असता, असे लक्षात येते की, विटा आणि स्टाईल बनवण्याचे उद्योग देखील कार्यरत होते. त्यामध्ये कामगार व मजूर काम करत असत. उपलब्ध आकड्यावरून असे निदर्शनास येते की, १६०१ च्या जनगणनेनुसार १८६ पुरुष व ६८ स्त्रिया या कामात गुंतलेल्या होत्या. १६१० च्या जुन्या गेजेटीअरमधील खालील आकडेवारी अकोला जिल्ह्यात कार्यरत असलेल्या विविध उद्योगांवर प्रकाश टाकते.

१. **सोने व चांदीचे उद्योग** :- ब्रिटीशकालीन अकोला जिल्ह्याच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करत असतांना असे लक्षात येते की, विविध उद्योगधंदे अकोला जिल्ह्यात अगोदरपासून कार्यरत होते. ब्रिटीश भारतात आल्यावर त्यांनी आपल्या सोयीच्या दृष्टीने कृषी व उद्योगधंद्यात विविध सुधारणा केल्या. सोने व चांदी उद्योग अकोला जिल्ह्यात स्थिर करण्यात अकोला जिल्ह्यातील सुवर्णकारांचा वाटा असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. सोने व चांदी उद्योगात त्यांचीच मक्तेदारी असल्याचे त्यावरून निदर्शनास येते. त्यांची संख्या ८००० होती. सोने व चांदी उद्योगांचा ब्रिटीशकालीन अकोला जिल्ह्यातील लोकावर त्याच्या जीवनावर अनुकूल परिणाम घडवून आलेला दिसून येतो. तत्कालीन कुलीन घरातील स्त्रियां सोन्याची कर्णफुले घालायला लागल्या होत्या. पैसे बचत किंवा गुंतवणूक करण्यासाठी लोक सोन्या-चांदीचे दागिने खरेदी करून अंगावर मिरवत असत. सर्व जातीतील स्त्रीयां देखील चांदीचे दागिने खरेदी करीत असत.

२. **लोहारकाम** – लोहारांची सगळीकडे गरज असते तशी अकोला जिल्ह्यात देखील होती. ही कामे पंचालामार्फत केली जात असत. जे लोक आपापले परिवार घेऊन राहत असत.

३. **सुतारकाम** – सुतार तुलनेने फार कमी असत. त्यांची संख्या मात्र उपलब्ध नाही. त्यांचे मुख्य कार्य म्हणजे कृषी उपकरणे दुरुस्त करणे, नवी तयार करणे ही होती. त्यापैकी बरेच लाकडांची किंवा लोखंडाची तयार केली जात असत. त्यांच्या कार्यामुळे मोठ्याा

प्रमाणात लोखंड व लाकूड उद्योगाच्या हातभार लागला होता.

४. **दागिने जडण-घडण उद्योग**- मोठ-मोठे दागिने जडण-घडनीसाठी येत असत. मारवाडी लोकांकडून लाकडावर जडण-घडण करून दिल्या जात असे.

५. **ब्लँकेट तयार करणे**- काही महार लोक ब्लॅकेट बनवण्याच्या उद्योगात गुंतलेले होते. कोष्टी लोक जाडे-भरडे कापड बनवण्यात निष्णात होते.

६. **जिनिंग आणि प्रेसिंग**- अकोल्यात मिड इंडिया मिल होती. जिथे ६०० कामगार काम करत होते. जिनिंग आणि प्रेसिंग ची कामे तिथेच केली जात.

७. **कापड उद्योग** - अकोला जिल्हा हा कापूस उत्पादक जिल्हा म्हणून नावलौकिक प्राप्त होता व पूर्वीपासून आहे. त्यामुळे कापड उद्योग तसेच कापड गिरण्यांना येथे फार वाव असणे क्रमप्राप्त होते. अकोला हावडा-बॉम्बे रेल्वे मार्गावरील हे फार मोठे स्थानक आहे.  खांडवा-हिंगोली-पूर्णा मिटरगेज वरील देखील अकोला हे महत्वाचे ठिकाण आहे. वाहतूक सुविधा व बाजारपेठांच्या सोई-सुविधा मुळे कापड उद्योगाला व गिरण्यांना येथे कायम प्रेरणा मिळत गेलेली दिसून येते. मोहता मिल अकोला, सावतराम मिल अकोला कापड उद्योगात अग्रगण्य होत्या. मोहता मिल १९५९-६० ला बंद करण्यात आली. कारण कर्जपुरवठा तसेच मजुरांच्या समस्या व रचनात्मक अडचणीमुळे या मिल ला सरकारने चालवण्यास घेतले.

८. **खाणकाम, मीठ व खनिज उद्योग** - खनिज स्त्रोतांबद्दल फारशा नोंदी आढळत नाहीत. अकोला डीस्ट्रीक गेजेटीर - १९१० नुसार पूर्णा नदीच्या काठावर काही ठिकाणी मीठ तयार केले जात असल्याचे पुरावे निदर्शनास येतात. सोडा-अलुमिनिअमचा उपयोग यासाठी केला जात असावा. दहीहांडा येथील विहिरीचे पाणी देखील या कामी येत असल्याचे संदर्भ आढळतात. अकोट तालुक्यात देखील १०० फुट खोल असलेल्या विहिरीतील पाणी मिठाच्या  उद्योगासाठी वापरले जात असल्याचे संदर्भ आढळतात. दहीहांडा येथील सत्याग्रहात देखील याचे संदर्भ आहेत.

९. **वीजनिर्मिती व वितरण**- औष्णिक वीजनिर्मितीचे एक केंद्र पारस येथे स्थापित केल्या गेल्याचे दिसून येते. कोळशापासून वीज निर्मिती केली जात असे व आजदेखील केली जाते. महाराष्ट्र वीज पुरवठा व वितरण केंद्रामार्फत हे कार्य हाती घेतल्या गेले आहे. विदर्भातील दोन भागात वीज पुरवठा केल्या जातो. विदर्भ, मराठवाडा व खानदेशात पारस औष्णिक विद्युत केंद्रातून वीज पुरवली जाते. या उपक्रमाची वीज क्षमता ६२.५ मेगा वॅट इतकी आहे. या उपक्रमासाठी १०,६१,५६,२०१८ एवढा पैसा गुंतवलेला आहे.

१०. **जिनिंग आणि प्रेसिंग उद्योग** - ३,३८,६०२ पैकी १९६४ मध्ये ३,३५,६२१ हेक्टर जमिनीतून येणाऱ्या कापसाचे खूप सारे प्रमाण होते. ७६,३६५ गाठानी सुरुवातीला एका वर्षात तयार केल्या जात. जिनिंग मध्ये कापूस पिंजून त्याच्या गाठानी तयार करण्यापर्यंतचे काम अगदी मेहनतीने केले जाई. त्यानंतर योग्य जागी कापसाची गाठान पोहचल्यावर हे काम संपत असे. त्यासाठी अकोला हे एक मुख्य केंद्र बनले होते. १९२३ साली अकोला हे यासाठी फार नावजलेले होते. या कामासाठी एक युनिट तयार केले गेले होते. जे हंगामी होते. वर्षातून १६० दिवस हे युनिट काम करत असे. ह्या युनिटची एकूण गुंतवणूक १,८०,००० रुपयापासून सुरु होऊन पाच लाखापर्यंत पोहोचलेली होती. एकूण ह्या उद्योगात जागा, वास्तू, मशीन्स तसेच फर्निचर साठी निश्चित गुंतवणूक किंवा पैसा इंधन व कच्चा माल आणण्यासाठी वापरात घेतलेला असे.

एक युनिट ५० कामगारांना रोजगार उपलब्ध करून देत असे. चार कुशल कारागीर ४ रूपये ५० पैसे ते ५ रुपये रोज कमवत असत. वर्षाला ८००० रुपये कामगारावर खर्च केला जाई. या उद्योगाला वेगवेगळ्या गरजा भासत असत. त्यासाठी इंधन, लाकडी इंधन, वीज आणि इतर सामग्री लागत असे. एका गाठनीला १०,००० रुपये श्रम पडत असे.

११. **ऑईल मिल्स** - कापूस जिनिंग आणि प्रेसिंग च्या जोडीने दुसरा महत्वाचा उद्योग म्हणजे तेलघाण्या किंवा गिरण्या हा होता. अकोला जिल्ह्यात हा व्यवसाय ऊर्जितावस्थेत होता. हा एक कृषिआधारित उद्योग होता. तेलबियांना चिरडून त्यातील तेल वेगळे करण्याच्या ह्या उद्योगात टरफलाच्या पेस्ट चा उपयोग गुरांच्या चाऱ्यासाठी केला जाई. १९६४-६५ साली तेलबियांची कापणी ४६,१०६ हेक्टर जमिनीवर केली गेली होती. भुईमुग पिकाची लागवड ३३,७०७ हेक्टर जमिनीवर केली गेली होती. भुईमुगाचे उत्पादन १८१८७ मेट्रिक टन इतके घेतल्या गेले होते. अकोला जिल्ह्याच्या ठिकाणी ह्या तेलघाण्या केंद्रित झाल्या होत्या. बोरगाव, पिंजर, आलेगाव व मालेगाव येथे देखील तेलघाण्या सुरु होत्या. असे संदर्भ आढळतात.

१२. **सॉ मिल्स** - सॉ मिल्स साठी फारसा भूभाग उपलब्ध नसल्याने अकोला जिल्ह्यात तसेच जंगलाच्या अभावाने या उद्योगाला अकोला जिल्ह्यात फार मोलाचे स्थान नसल्याचे दिसून येते. परंतु काही सॉ मिल

लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी निर्माण केल्या गेल्याचे आढळून येते. ह्या अकोल्याला लागुनच असलेल्या अकोला, कापसी, बाळापुर निमकर्दा, मालेगाव, वाशीम, काटा, रिसोड, मंगरूळपीर, तेल्हारा, अकोट, आणि सेलू बाजार इत्यादी ठिकाणी सॉ मिल चालू होत्या. ह्या सर्व सॉ मिल वर्षभर चालू असल्याचे निदर्शनास येते. या व्यतिरिक्त ह्या व्यवसायाचे संदर्भ देखील मिळतात. ह्या व्यवसायात अधिगृहित जमीन बांधकाम कटाई यंत्राचा समावेश होतो. प्रत्येक सॉ मिल मध्ये ४ कामगार काम करत असत. प्रत्येक युनिसट वर्षाला ४००० रुपये कमवत असे. एक युनिट (संच) ६०० रुपये विद्युत व इंधनावर खर्च करत असे. बहुतेक संच करार पद्धतीवर चालविले जात असल्याचे निदर्शनास येते. वर्षाला १५००० रुपयांचा कच्चा माल उपयोगात आणला जात असे या सर्व उद्योगाची वार्षिक उलाढाल ४५००० ते ५०००० हजार रुपये असल्याचे आढळून येते.

१३. **डाळ आणि पोहा मिल्स** – सर्व डाळ व पोहा मिल्स अकोला जिल्ह्यात कार्यरत होत्या. या डाळ मिल चे व पोहा मिल च्या संचाची किंमत मशिनरी, बांधकाम व गुंतवणूक धरली असता १८००० रुपया पर्यंत पोहचते. प्रत्येक संचाला वर्षाला १०००० रुपये खर्च लागतो प्रत्येक संच किमान ६ जणांना रोजगार उपलब्ध करून देत होता. या संचाचे वार्षिक श्रम मूल्य ६००० रुपये मिळत असे. प्रत्येक संचाला विद्युत पुरवठा लागत असे. तर इतर इंधनाचा खर्च वर्षाला २००० लागत असे. ह्या उद्योगातून तयार होणारा माल सामान्यपणे बाजार पेठेत विकला जाई.

१४. **लोखंड आणि स्टील तसेच अभियांत्रिकी वर्क शॉप** – अकोला लोखंड व स्टील वार्क शॉप ची मुख्य केंद्रे म्हणून अकोला, अकोट, तेल्हारा, मुर्तीजापूर व मालेगाव असल्याचे नोंद आढळते. हे संच स्टील निर्मितीत गुंतलेले आढळून येतात. फर्निचर, कृषी साधने, लोखंड व स्टील उद्योगातून चांगली उत्पादने तयार केली जात असत. मशीन च्या दुरुस्तीचे काम देखील जोमाने केले जात असे. १९१९ ते १९२८ ह्या कारकीदित १ संचाची निर्मिती आढळते. हे सर्व संच वार्षिक पद्धतीने कार्यरत असल्याचे निदर्शनास येते. या संचाची सर्व भांडवल फर्निचर, यन्त्र, बांधकाम, मशीन्स, यांचे एकत्रित मूल्य धरले असता २२००० रुपये असल्याचे आढळून येते. प्रत्येक संचाला काम करण्यासाठी वर्षाला २०००० रुपये लागत असत. प्रत्येक संच ४ व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देत असे. प्रत्येक वर्षी प्रत्येक संच १४००० रुपये श्रम मूल्यावर खर्च करत असे. कुशल कारागिरांची गरज भासत असे. त्यांना जास्तीचा पगार मिळत असे. प्रत्येक युनिट चा वर्षाचा विद्युत व इंधनावरील खर्च १५०० रुपये होता. ह्या उत्पादनात स्टील च्या अलमारी, बादल्या, घामिले, बनवून विकल्या जात असे. हि विक्री अकोला जिल्ह्य अंतर्गत तसेच शेजारील जिल्ह्यातील ठिकाणी केली जात असे. शेजारील जिल्ह्यात यवतमाळ, अमरावती, बुलडाणा चा समावेश होता. या उद्योगाला लागणारा कच्चा माल मुंबई तसेच आजू बाजूच्या मोठ्याा बाजार पेठातून खरीदी केल्या जात असे. या पैकी २ संचांना आर्थिक मदत बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे १७,५०० रुपये दिल्या गेली असल्याचे पुराव्या वरून निदर्शनास येते. या उद्योगाच्या संचालकांना राज्याकडून मशनरी खरीदी साठी ११००० रुपयाचे सहाय्य मिळाले होते. या उद्योगाची मुख्य गरज कुशल कारागीर व कच्चा माल असे.

१५. **सोप कारखाने** – अकोला जिल्ह्यात अनेक सोप कारखाने होते. परंतु तयार होणारी सोप उच्च प्रतीची नसल्याचे निदर्शनास येते. स्थानिक मागणीवर यांचे उत्पादन चालत असे. ५००० रुपये प्रत्येकी संचाला खर्च अपेक्षित धरला जातो. ह्या कारखान्याचे काम वार्षिक स्वरुपात चालत असे. या उद्योगाची गुंतवणूक साधारणता ५००० रुपये कायम निर्धारित केली गेली होती. शिवाय एका व्यक्तीला व्यवस्थापन व प्रशासकीय कामासाठी रोजगर दिला जात असे. श्रम मूल्यावर वार्षिक १०,००० रुपये खर्च केल्या जात असे. सोप चे अकोला जिल्ह्यातील उत्पादन १९६० साली ६३६० क्विंटल तसेच १९६१ साली ६१०० क्विंटल असल्याचे निदर्शनास येते.

**निष्कर्षः–** ब्रिटीशकालीन अकोला जिल्ह्यात ब्रिटीशांच्या औद्योगिक नीतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. प्रारंभी कृषिआधारित उद्योगाला चालना मिळालेली दिसते तर नंतरच्या काळात व्यावसायिक पिकांना महत्व दिल्या गेल्याचे स्पष्ट होते. रेल्वे, रस्ते व दळणवळण सुविधांमुळे उत्तरोत्तर उद्योगांना विकासाच्या दिशेने नेल्या जात होते. कापड उद्योग, हस्तोद्योग, चर्मोद्योग, कुटीरउद्योग इत्यादी अनेक उद्योगांचा पाया याच काळात घातल्या गेला. ज्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात याचे सकारात्मक परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर घडून आले असल्याचे निदर्शनास येते.

*संदर्भ –*


१. *नागपूर प्रांताचा इतिहास, डॉ.यादव माधव काळे.*
२. *प्रोब्लेम्स ऑफ इंडिअन इकॉनॉमीकस, पी. सी. जैन.*
३. *अवर इकॉनॉमीक प्रोब्लेम, प्रो. वाडिया अंड प्रो. मर्चंट.*
४. *दि अकोला डीस्ट्रीक गेजेटीअर, डॉ. बी. जी. कुंटे.*
५. *नागपूर युनिवर्सिटी जर्नल, खंड-२, वाटर.*

# भारतीय महिलांची स्थिती आणि गती

*डॉ. दत्तात्रय बाजीराव वाटमोडे, शरद्चंद्र महाविद्यालय, बुटीबोरी मो. ९९७५५३१०५५*

आधुनिक काळात महिलांमध्ये त्यांच्या मानवाधिकारांच्या संदर्भात जागतिक पातळीवर फार मोठ्या प्रमाणात जागरूकता आलेली दिसून येते. त्यामागचा दृष्टिकोन विशुद्ध मानवतावादी आहे, याबाबत कोणाच्याही मनात संदेह असण्याचे कारण नाही. महिलांच्या अधिकारांबाबत निर्माण झालेल्या या वैचारिक आंदोलनाचा परिणाम भारतीय सांस्कृतिक जीवनावरही तितकाच झाला आहे. तसे पाहिले तर १९ वे शतक हे भारतीय सांस्कृतिक जीवन परिवर्तनाच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे ठरले आहे. या वैचारिक परिवर्तनाचा परिणाम सांस्कृतिक जीवनाच्या सर्वच क्षेत्रात झाला होता. त्यातूनच आपल्याकडे राजकीय परिवर्तन धडवून आणणारी आणि सामाजिक परिवर्तन धडवून आणणारी सुधारकांची फार मोठी परंपरा निर्माण झाली. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गाणेश आगरकर, लोकहितवादी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, बाबा आमटे, प्रकाश आमटे इत्यादी परिवर्तनकार हे त्याच परंपरेचे पाईक आहेत. या सुधारकांमधील महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांबद्दल केलेले चिंतन हे अत्यंत मुलगामी आणि मर्मभेदी आहे. महात्मा फुले यांनी ताराबाई शिंदे यांच्या लेखन कार्याबद्दल काढलेले गौरवोद्गार फार बोलले आहे.

**प्राचीन भारतात महिलांचे स्थान** : आजच्या काळात महिलांची दुरावस्था, त्यांचे जीवन, त्यांचे अधिकार या संदर्भात विचार करताना काही ठोकताळे बांधूनच आपण सामोरे जात असतो. ते करताना आपली दृष्टी भूतकाळात अत्यंत दूरपर्यंत न नेता काही मर्यादित काळाच्या आणि मर्यादित दूषित दृष्टीवर आपण ठोकताळे बांधत असतो. भारतीय सामाजिक व्यवस्था ही चातुवर्ण्यप्रधान आहे, हे खरे आहे. त्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण आहेत; हेही तेवढेच सत्य आहे. या वर्ण्यव्यवस्थेत स्त्रियांची गणना शूद्रात केली गेली आहे, हे सुद्धा मान्य आहे. मात्र आपण सरळसोट विधान करतो की, भारतीय समाजात अत्यंत प्राचीन काळापासून महिलांना त्यांच्या सर्व अधिकारांपासून वंचित ठेवल्या गेले; हे चुकीचे आहे. हे विधान मर्यादित सत्य शोधनातून आणि मर्यादित हेतूने केले गेले आहे.

भारतीय समाजामध्ये वैदिक काळापासून तर आपण सवातंत्र्याला मुकेपर्यंत महिलांना सन्मानाचे स्थान होते. त्यांना विविध अधिकार होते. एवढेच नव्हे, तर सामाजिक जीवनातील विविध क्षेत्रे त्यांच्या हातात होते. त्याचे किती तरी पुरावे प्राचीन साहित्यातून मिळते. हे पुरावे संस्कृत भाषिक साहित्याप्रमाणे मराठी भाषिक साहित्यामध्येसुद्धा मिळते. ‘वशिष्ठ स्मृति’ या प्राचीन ग्रंथात महिलांचा उल्लेख येतो तो ‘‘मनसा भर्तुरभिचारे त्रिरांत्रं यावकं क्षीरौदनं वा भुत्रग्नाऽध : शथीत ऊर्ध्व त्रिरात्रादप्सु निमग्नाया : सावित्र्यष्टशतने शिरोभिर्जुहुयात पूता भवर्तीति विज्ञायते।’’[१] असा. ‘महाभारत’ या श्रेष्ठ ग्रंथाच्या आधारावर डॉ. स. रा. गाडगीळ म्हणतात, “प्राचीन वाङ्.मयात स्त्रीराज्याचे उल्लेख आढळतात. अर्जुनाशी युद्ध करणारी प्रमिला ही एका राज्याची स्वामिनी होती. ह्यूएत्सेंग यांनी सुध्दा ‘पूर्वेकडील स्त्रीराज्य’ आणि ‘पश्चिमेकडील स्त्रीराज्य’ असा उल्लेख केला आहे.”[२]

स्वामी विवेकानंद महिलांच्या श्रेष्ठतेबद्दल म्हणतात, ‘‘भारत! तुम मत भूलना कि तुम्हारी स्त्रियों का आदर्श सीता, सावित्री, दमयंती है। मत भूलना कि तुम्हारा विवाह, तुम्हारा धन और तुम्हारा जीवन इंद्रिय सुख के लिये है; अपने व्यक्तित्व सुख के लिये नहीं है। मत भूलना कि तुम जन्म से ही माता के लिये बाती स्वरूप रखे गए हो; मत भूलना कि तुम्हारा समाज उस विराट महामाया की छत्रछाया है।’’ स्वामींची ही पावतीच सर्वकाही सिद्ध करते.

मराठी साहित्यात गद्य वाङ्मयाचे सामर्थ्य वृद्धिंगत करणाऱ्या महानुभावीय साहित्यात याचे कितीतरी पुरावे मिळतात. प्राचीन काळात महिला संन्यासी जीवन जगताना आश्रमात किंवा गुहेत राहात होत्या. त्या एवढ्या ज्ञानी होत्या की, त्या पुरुषांना पण ज्ञानदानाचे कार्य करीत होत्या, हे लीळाचरित्र[३] या ग्रंथातील ‘मुक्ताबाई भेटि’ या लीळेतून सिद्ध होते. ‘चर्मकारा भेटि’ या लीळेत तर पतीला आपल्यावरचा अधिकार सोड म्हणणारी स्त्री दिसते. तर ‘तैल्यकारयुग्मा स्थिति’ यासारख्या लीळेतून महिला अर्थाजनाचे कार्यही करीत असल्याचे पुरावे मिळतात. ‘लीळाचरित्र’ हा ग्रंथ शके १२०० च्या सुमारास रचला गेला आहे. याचा अर्थ १२ व्या शतकापर्यंत आपल्या समाजात महिलांना

विविध अधिकार प्राप्त होते आणि त्या अधिकाराच्या बळावर सन्मानाचे जीवन जगत होत्या.

**महिलांच्या बंधनाचे मूळ :** आपल्या येथे १२ व्या शतकाच्या मध्यापर्यंत यादवांचे राज्य होते. त्यानंतरचा काळ हा भारताच्या गुलामीचा आहे. आपल्या देशात मुस्लिम राजयकर्त्यांचे बस्तान बसल्यानंतर महिलांवर विविध बंधने आलीत आणि तेव्हापासूनच त्यांच्या विविध अधिकारांच्या हननाचा आलेख सारखा वरवर चढत गेला. त्याचाच परिणाम म्हणून त्यांचे जीवन 'चूल आणि मूल' यापूरतेच मर्यादित झाले. हे महिलांच्याच नव्हे; तर संपूर्ण भारतीय समाजाच्या विकासाला लागलेले खग्रास सूर्यग्रहणच होय. याकाळापासून महिलांना सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक इत्यादी अधिकार नाकारल्या गेलेत. त्याचा परिणाम म्हणून आपल्या विकास प्रक्रियेतून महिलारूपी ५० टक्के समाज बाद झाला आणि आपण उत्तरोत्तर अज्ञानी, दरिद्री, धर्मभोळे, अंधश्रद्धाळू आणि अन्यायी-अत्याचारी होत गेलोत.

**महिलांची आजची स्थिती :** भारतीय सामाजिक जीवनात आज फार मोठ्याा प्रमाणात परिवर्तन झाले असले तरी महिलांना सन्मानाचे स्थान, त्यांचे मानवी व हक्काचे अधिकार आजही मिळाले नाही. आजही कुटुंबात महिलांना पुरुषांप्रमाणे नि त्यांच्या बरोबरीचे स्थान दिल्या जात नाही. बरेचदा आपण महिलांच्या परिवर्तनाबाबत महाराष्ट्र, गुजरात, पंजाब यासारख्या पुढारलेल्या राज्यांचाच विचार करतो. मात्र बिहार, मध्यप्रदेश, झारखंड या व यासारख्या इतर राज्यांतील महिलांची अवस्था अत्यंत विदारक, चिंताजनक आहे. मागासलेल्या राज्यांमध्ये महिलांना त्यांचे प्राथमिक अधिकारही मिळत नाहीत. त्यांच्यासोबत अमानवी वर्तन केल्या जाते. त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचा आलेख सारखा वर जाणारा आहे.

सरकार पातळीवर कायदेकरून महिलांचे रक्षण, त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाला आळा धालण्याचे आणि त्यांच्या हक्कांचे जतन करण्याचा प्रयत्न केला जातो; पण तो तोकडा प्रयत्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानायचे की, 'कोणाच्याही हक्कांचे रक्षण फक्त कायदे करून होत नाही. त्याकरिता कायद्यांसोबतच सामाजिक परिवर्तनची नितांत गरज असते. महिलांच्या हक्काकरिता समाजमानस बदलविण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता सामाजिक नेत्यांची फार मोठी जबाबदारी आहे.

**भारतीय संविधान :** भारताचे संविधान प्रत्येक नागरिकाला कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सामाजिक न्याय, समता आणि प्रतिष्ठा देते. संविधानानुसार आपल्या देशात धर्म; मूल, वंश, जाती, लिंग, जन्मस्थळ यासारख्या गोष्टींच्या आधारावर भेद केल्या जाऊ शकत नाही.[४] परंतु वास्तविक परिस्थिती एकदम भिन्न आहे. आपल्या देशात महिलांना सन्मान देण्याच्या ऐवजी काही लोक स्वस्वार्थाकरिता तिला अपमानित करतात. काही दशकांपासून महिलांवरील अत्याचार, बलात्कार, लैंगिक शोषण यांची सातत्याने वाढ होत आहे. महिलांच्या अधिकारांचे रक्षण होण्यापेक्षा तिच्या अधिकारांवर धाला धालण्यातच समाज धन्यता मानतो आहे. भारतीय संविधानाने महिलांना समानतेचा अधिकार दिला असला तरी तिला तो दर्जा समाजात मिळत नाही. महिलांची अवस्था दिवसेंदिवस अत्यंत हलाखीची होत चालली आहे. त्याचे मुख्यतः दोन कारणे आहेत.

१) **महिलांमधील शिक्षणाचा अभाव :** भारतीय महिलांची अवस्था हलाखीची होण्यास महत्त्वाचे कारण जर कोणते असेल तर ते म्हणजे भारतीय समाजाचा महिलांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दुय्यम दृष्टिकोन. वर निर्देशित केल्याप्रमाणे प्राचीन काळात स्त्रियांना शिक्षण धेण्याचा आणि ज्ञानदानाचा अधिकार होता; परंतु नंतरच्या काळात महिलांचा शिक्षणाचा अधिकार समाजाने हिरावून धेतला. त्यामुळे त्या शिक्षणाला पारख्या झाल्यात. महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व विशद करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात –

''शहाण्यांनी विसरू नये। गावी सर्वांची करावी सोय।
जेणे पुरुषांचे तैसेचि स्त्रियांचे होय। उत्थान आता।।
तरीच ग्राम शोभू लागे। पुरुष-नारी दोन्ही विभागे।
जेणे स्वर्गचि उतरेल कार्यायोगे। विकासाच्या।।
महिलांच्या आंतरिक गुणांचा विकास।
करील ऐसे शिक्षण खास।
जरि दिले जाईल त्यांस। तरीच भावी जग पालटे।।''[५]

शिक्षणाचे मानवी जीवनात एवढे महत्त्व असताना भारतात शिक्षणाचे प्रमाण पुरुषांचे ६३.८७ आहे तर महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण अवधे ३६.४२ आहे.[६] शिक्षणाच्या अभावामुळे महिलांवर अत्याचार होत असतात; पण त्यांना त्याची जाणीवही नसते. एवढेच नव्हे; तर त्यांना त्यांच्या अधिकारांचे ज्ञानसुद्धा नसते. अधिकारांची जाणीव नसल्यामुळे भारतीय महिला अधिकार मिळविण्याकरिता संघर्षच करीत नाहीत.

२) **महिलांचे आर्थिक परावलंबीत्त्व :** आपल्या पुरुषप्रधान समाज रचनेत महिला आर्थिकबाबीच्या दृष्टीने पुरुषांवर अवलंबून आहे. हे ही त्यांच्यावर होत असलेल्या अत्याचाराचे महत्त्वाचे एक कारण आहे. आपल्या समाजाने महिलांना चार भिंतींच्या आत बंदिस्त ठेवल्याने त्याच्यात व्यावहारिक ज्ञान निर्माण

झाले नाही. सोबतच महिलांना शिक्षणापासून वंचित ठेवल्याने त्यांच्यात ज्ञानाची कमतरता, आत्मविश्वासाचा अभाव, कौशल्याची कमी निर्माण झाली. त्याचा परिणाम म्हणून स्त्रियांना अर्थाजनात वावच मिळाला नाही. त्या बालपणी पित्यावर, तारुण्यात पतीवर आणि म्हातारपणात मुलांवर विसंबून राहातात. याच्याही पुढे जाऊन विचार करतो म्हटले तर गेल्या एक हजार वर्षांच्या काळात महिलांचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक जो कोंडमारा झाला. त्याचा परिणाम म्हणून आधुनिक काळात अर्थाजनाकरिता धराच्या बाहेर पडलेल्या महिलांची सुद्धा स्थिती चिंताजनक आहे. त्यांनी कठोर परिश्रमातून मिळविलेल्या संपत्तीच्या चाव्या कुटुंब प्रमुखाच्या म्हणजे पुरुषांच्याच हातात आहेत. त्यामुळे त्यांना स्वेच्छेने स्वतःच्या विकासाकरिता पैशाचा विनियोग करता येत नाही.

**महिलांच्या उन्नतीची दिशा :** प्राचीन काळापासून राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात भारतीय महिलांचे योगदान फार मोलाचे ठरल्याने आपण महिलांच्या उन्नतीकरिता कार्य करणे अगत्याचे आहे. आज सर्व विश्व विकासमंत्राचा जप करीत आहे. अश्या अवस्थेत आपण स्त्रियांची चालवलेली कुचंबना राष्ट्रासाठी आत्मधातकीच ठरणार आहे. म्हणून आपण महिलांच्या सर्वांगीण उन्नतीकरिता निहित ध्येय बाळगून कार्य करणे राष्ट्राची आणि काळाची गरज आहे.

**कुटुंब महिला केंद्री व्हावे :** कोणत्याही राष्ट्राचा विकास त्या राष्ट्रातील लोकसंख्येवर विसंबून नसतो तर जनतेत कौशल्यवानांचे प्रमाण किती आहे, यावर असतो. प्राचीन काळात महिलांना त्यांच्या अंगभूत असलेल्या गुणांना दाखविण्यास वाव होता. म्हणून कितीतरी महान महिला सामोर आल्यात. आज ती परिस्थिती राहिली नाही. तरीही आपल्याला महिलांच्या ठिकाणी असलेल्या गुणांचा परिचय धडतोच. मिळालेल्या छोट्यातील छोट्या संधीचा उपयोग करण्याचे कसब महिलांमध्ये असते. त्यांना राष्ट्रीय जीवनात आज फार संधी मिळत नाही. तरीही धर सजविणे, पाककला, भरतकाम, रांगोळी, मुलांचा सांभाळ, कुटुंब एका सूत्रात गोवून ठेवणे, वृद्धांचा सांभाळ, त्यांची सेवा इत्यादी गोष्टींमधून त्यांच्यातील कौशल्य उजागर होतच असते.

महिलांच्या कौशल्याचा अधिक उपयोग करून धेण्याकरिता त्यांना कुटुंबाच्या केंद्रस्थानी आणणे अत्यावश्यक आहे. प्राचीन काळात हिंदुस्थान सर्व बाबतीत विश्वाचे गुरुस्थानी होता. त्याचे कारण महिला समाजाच्या आणि कुटुंबाच्या केंद्रस्थानी होत्या, हे आहे. त्यामुळे तरुण पिढीवर कौशल्याचे, समाजसेवेचे आणि राष्ट्रउन्नतीत योगदान देण्याचे संस्कार होत होते. आज सामाजिक, राष्ट्रीय जीवनात या सर्व गोष्टींचा अभाव दिसतो कारण ही क्षेत्र महिलांच्या अखत्यारित राहिली नाहीत. त्यामुळे सर्वीकडे स्वार्थ; चंगळवाद, आळस वाढलेला दिसतो. कुटुंबाच्या केंद्रस्थानी महिलांना आणले तर पुन्हा आपले गतवैभव परत येईल, यात कोणतीही शंका नाही.

**राष्ट्रीय जीवनात, अधिकारात महिलांचा सहभाग :** महिलांना विविध क्षेत्रांमध्ये संधी मिळायला सुरुवात झाल्यापासून त्यांनी स्वकर्तृत्त्वाचा ठसा उमटविला आहे. याचाच अर्थ हा होतो की, महिलांना सामाजिक, राजकीय क्षेत्रात अधिक वाव दिला तर त्या मिळालेल्या संधीचे सोने करेल आणि सामाजिक व राजकीय क्षेत्र अधिक उन्नत व विकासाभिमुख करेल. भारतीय महिलांच्या कौशल्याचा वापर राष्ट्रविकासाकरिता करण्यासाठी त्यांना त्यांचे हक्काचे अधिकार वाढविले पाहिजे. त्यासोबतच त्यांना कुटुंबात आणि समाजात मानाचे स्थान दिले पाहिजे. स्वतःला सुशिक्षित, आधुनिक माणनारे पुरुषसुद्धा महिलांकडे दुय्यम दृष्टीनेच पाहतात, हे विसरून चालणार नाही.

निसर्गाने स्त्री-पुरुष ही जोडी जीवनविकासाच्या दृष्टीने निर्माण केली आहे. या दोधांमध्ये भेद करणे ही निसर्गाची प्रकृती नाही. निसर्गाने स्त्री आणि पुरुष या दोनही धटकांमध्ये कोणत्या ना कोणत्या चांगल्या गोष्टींचे रोपण केले आहे. त्या बीजाचे रोपटे आणि नंतर विस्तीर्ण वृक्षात रूपांतर करून त्याचा वापर समाज नि राष्ट्रविकासाकरिता करणे ही आपली जबाबदारी आहे. आपण महिलांना त्यांचे अधिकार देऊन त्यांच्या ठिकाणच्या गुणांचा आणि कौशल्यांचा वापर केला तर आपले राष्ट्र आणि आपला समाज अधिक उन्नतीच्या मार्गावर जाणार आहे. म्हणून महिलांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे, ही काळाची गरज आहे.

*संदर्भ :*
*१) वशिष्ठ स्मृति २१-७*
*२) गाडगीळ स. रा., साहित्यमीमांसा आणि समाजदर्शन, पृ. क्र. १६७*
*३) तुळपुळे शं.गो., लीळाचरित्र : एकाक, पृ. क्र. ७२, ७४*
*४) भारतीय संविधान, लोक सभा सचिवालय, पृ. क्र. ८*
*५) तुकडोजी महाराज, ग्रामगीता, पृ. क्र. २२५*
*६) भारत सरकारची जनगणा १९९१ नुसार*
***संदर्भ ग्रंथ :***
*१) तुळपुळे शं.गो., लीळाचरित्र, सुविचार प्रकाशन, मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण, १९८८*
*२) शर्मा कृष्ण कुमार, महिला कानून एवं मानवाधिकार, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, प्रथम संस्करण, २०१२*
*३) शर्मा रमा, महिला और मानवाधिकार, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, प्रथम संस्करण, २०१०*
*४) माहेश्वरी अविनाश, महिला अधिकार और कानून, प्रिज्म बुक्स, जयपुर, प्रथम संस्करण, २०११*
*५) भारत का संविधान, लोक सभा सचिवालय, प्रथम संस्करण*
*६) गाडगीळ स. रा., साहित्यमीमांसा आणि समाजदर्शन, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००७*
*७) तुकडोजी महाराज, ग्रामगीता, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण, १९९९*

# पंचवार्षिक योजनेमध्ये सार्वजनिक ऋणाचा आणि विदेशी मदतीचा सहभाग

*प्रा. डॉ. अर्चना अंतुरकर (धवधवे), एम.ए. (अर्थ.), एम.ए. (राज्य.)., एम.फिल., बी.एड., पीएच.डी.*

**प्रस्तावना :** आजचे युग हे नियोजनाचे युग आहे. ज्या राष्ट्राने आपले नियोजन केले नाही, त्याचा विकासच होणार नाही. राष्ट्र विकसीत असो किंवा अविकसीत असो अशा दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थेत आर्थिक नियोजनाचा अवलंब केला जातो. विकसीत देशातील नियोजनाचा उद्देश मुख्यतः अर्थव्यवस्थेतील असमतोल दूर करणे हा असतो. तर अविकसित देशातील नियोजन हे विकासाकरिता केले जाते म्हणूनच अविकसीत देशातील नियोजनाला विकासाचे नियोजन असे म्हणतात.

देशातील कोणत्याही पंचवार्षिक योजनेसाठी सर्वात आधी कोणत्या क्षेत्रावर किती खर्च करायचा?, कोणत्या क्षेत्रातून किती निधी प्राप्त करायचा याचा अंदाज तयार करण्यात येतो. यामुळे योजनेची अंमलबजावणी करणे सोईस्कर होते. विविध योजनांसाठी विविध स्त्रोतापासून निधी प्राप्त केला जातो. हा वित्तीय पुरवठा प्राप्त करण्याचे अंतर्गत व बाह्य असे दोन मार्ग असतात. विविध पंचवार्षिक योजनेवर वित्तपुरवठा करणाऱ्या स्त्रोतांना, अंतर्गत स्त्रोत, सार्वजनिक कर्ज, तुटिचे अर्थ प्रबंधन आणि विदेशी मदत अशा भागत विभागले जाते. हे भांडवल जरी देशाच्या विकासासाठी असले तरी त्याचा व्याजाचा भार हा देशावर पडत असतो. या कर्जाचा उपयोग योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही यावर देशाचा विकास अवलंबून असतो. म्हणूनच पंचवार्षिक योजनेमध्ये सार्वजनिक ऋणाचा आणि विदेशी ऋणाचा काय सहभाग आहे? याचे उत्तर शोधण्याच्या उद्देशाने व या ऋणाचा योग्य वापर कसा करता येईल याचा शोध घेण्याच्या उद्देशाने मी हा संशोधनाचा विषय निवडला आहे

**संशोधन पद्धती :** शोध निबंधातील अभ्यास हा द्वितीय समंकावर अवलंबून आहे. समंकाचे संकलन हे विषयाशी संबंधीत विविध पुस्तके, मासीके, वार्षिक, अहवाल, वर्तमानपत्र व सांकेतिक स्थळा वरून करण्यात आले आहे.

**संशोधनाचे उद्देश :** १) देशाची मौद्रीक स्थिरता कशी ठेवली जाते. याचे अध्ययन करणे. २) घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या स्वरूपाचे व अटिंचे अध्ययन करणे. ३) देशाच्या अर्थव्यवस्थेवर सार्वजनिक ऋणाचा आणि विदेशी ऋणाचा कशा प्रकारे भार पडतो याचे अध्ययन करणे. ४) सरकारच्या मौद्रीक आणि राजकोषीय धोरणाचा पंचवार्षिक योजनेवर काय प्रभाव पडला याचे अध्ययन करणे. ५) पंचवार्षिक योजनांमध्ये सार्वजनिक ऋणाची व विदेशी ऋणाची काय भूमिका आहे याचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गरज आणि महत्त्व :** कोणत्याही देशात अर्जीत राष्ट्रीय उत्पन्नातून खर्च वजा करता जी रक्कम शिल्लक राहते तीला बचत म्हणतात. या बचतीचा योग्य प्रकारे उपयोग झाल्यास राष्ट्राचा जलद विकास घडून येतो. शासन विकासाच्या काही उद्देशांना सामोर ठेऊन विविध माध्यमातून भांडवल प्राप्त करण्याच्या प्रयत्न करते व हे भांडवल विविध योजनांच्या माध्यमाने संसाधनाच्या वितरणावर खर्च करते. हे भांडवल सिमीत असते, व हे कर्जावर घेतलेले, ही असू शकते, यावर व्याज द्यावा लागतो, म्हणून या कर्जाचा उपयोग ज्या उद्देशासाठी हे कर्ज घेतलेले आहे त्यावरच करणे गरजेचे असते व त्यासाठी या विविध योजनांवर या प्राप्त ऋणाचा काय प्रभाव पडतो हे ऋण देशाच्या विकासात कशी मदत करते त्यामुळे पंचवार्षिक योजनेमध्ये सार्वजनिक ऋणाचा आणि विदेशी मदतीचा सहभाग जाणून घेण्यासाठी हा विषय महत्त्वाचा ठरतो.

**पंचवार्षिक योजनांमध्ये सार्वजनिक ऋणाचा आणि विदेशी मदतीचा सहभाग :** भारतात सार्वजनिक ऋणात वृद्धीचे एक महत्त्वपूर्ण कारण म्हणजे पंचवाषिक योजनांमध्ये केली गेलेली गुंतवणूक होय. या योजनेमध्ये आधारभूत संरचनेचा विकास सामाजिक सेवांचा विस्तार व औद्योगिककरणाचा विकास यावर मोठ्याा प्रमाणावर गुंतवणूक केली गेलेली आहे. विविध पंचवार्षिक योजनांचा काळात अंतर्गत व बाह्य कर्ज पुरवठ्याचे विस्तृत विवरण खालील प्रमाणे आहेत.

**१) प्रथम पंचवार्षिक योजना :** या योजनेमध्ये ५२० कोटी रुपये अंतर्गत कर्ज प्राप्त करण्याचे लक्ष ठेवण्यात आलेले होते. परंतु ६०० कोटी रुपयाचे कर्ज घेतले गेले. या योजना काळात १८६ कोटी रुपये विदेशी कर्ज व मदत म्हणून प्राप्त झाले.

**२) दुसरी पंचवार्षिक योजना :** या योजनेत औद्योगिक विकासासाठी सार्वजनिक क्षेत्राचा विस्ताराला सर्वच प्राधान्य देण्यात आले होते. या उद्देशाचा प्राप्तीसाठी अंतर्गत ऋण म्हणून १२०० कोटी रुपये प्राप्त करणे प्रस्तावित होते. परंतू वास्तविकतेत ११८० कोटी रुपये प्राप्त केले गेले. या योजना कालावधीत १०४६ कोटी रुपयाचे बाह्य ऋण प्राप्त झाले होते.

३) **तिसरी पंचवार्षिक योजना** : तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये अंतर्गत ऋण म्हणून १४०० कोटी रुपये प्राप्त करण्याचे ठरविले होते. परतू वास्तविकतेत १८०० कोटी रुपये धेतले गेले. या योजना काळात बाह्य ऋणाचा स्वरूपात २४२३ कोटी प्राप्त झाले.

४) **चौथी पंचवार्षिक योजना** : या योजनेसाठी बाजार कर्ज म्हणून ३१४५ कोटी रुपये व अल्प बचतीमधून ११६२ कोटी रुपयाचे कर्ज प्राप्त झाले व २०८७ कोटी रुपये बाह्य ऋण म्हणून प्राप्त झाले.

५) **पाचवी पंचवार्षिक योजना** : या योजनेसाठी आंतरिक ऋण म्हणून ५१३० कोटी रुपये प्राप्त करण्याचे ठरविले होते. परतू वास्तविकतेत ६६० कोटी रुपये बाजार कर्जापासून आणि २०२२ कोटी रुपये अल्पबचतीतून प्राप्त झाले व ५८३४ कोटी रुपये बाह्य ऋण म्हणून प्राप्त झाले.

६) **सहावी पंचवार्षिक योजना** : सहाव्या योजनेच्या प्रारूपानुसार १८५०० कोटी रुपये बाजार कर्जापासून ६८३७ कोटी रुपये अल्पबचतीतून आणि ३५६४ कोटी रुपये भविष्य निधी कोषातून प्राप्त करण्याचे लक्ष निर्धारीत केले होते. परंतु सरकारने एकूण ४०११३ कोटी रुपये अंतर्गत ऋण म्हणून प्राप्त केले. या योजनेत ७७६५ कोटी रुपये बाह्य ऋणातून प्राप्त करण्याचे लक्ष ठेवण्यात आलेले होते. परंतु वास्तविकतेत ६८५५ कोटी रु. बाह्य ऋण प्राप्त झाले.

७) **सातवी पंचवार्षिक योजना** : सातव्या पंचवार्षिक योजनेत ३०५६२ कोटी रुपये बाजार कर्जापासून १७६१६ कोटी रुपये अल्पबचती पासून अणि ४६३६ कोटी रुपये वित्तीय संस्थाकडून प्राप्त करणे प्रस्तावित होते. या योजनेत बाह्य ऋण एकूण १८००० कोटी रुपये धेतले गेले.

८) **आठवी पंचवार्षिक योजना** : आठव्या योजनेच्या अंतर्गत सार्वजनिक क्षेत्रासाठी एकूण ४३४१०० कोटी रुपये वहनासाठी ठेवण्यात आले होते. या कालावधीत २०१२५५ कोटी रुपये अंतर्गत ऋणाच्या स्वरूपात आणि २८७०० कोटी रुपये बाह्य ऋणापासून प्राप्त करण्याचे ठरविले होते. म्हणजेच आठव्या योजनेमध्ये वित्त पुरवठा करणाऱ्यासाठी सार्वजनिक कर्जाला स्थान दिले आहे.

९) **नववी पंचवार्षिक योजना** : नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सार्वजनिक क्षेत्राअंतर्गत एकूण ८५९२०० कोटी रुपये व्ययाची तरतुद करण्यात आली होती. या राशी मधून ४६०१७९ कोटी रुपयाचे वित्त पोषण सार्वजनिक कर्जाद्वारे केले गेले होते. अशाप्रकारे सार्वजनिक ऋणाचे एकूण वित्त पुरवठा करण्यामध्ये योगदान जवळपास ५३.५ होते.

१०) **दहावी पंचवार्षिक योजना** : दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये एकूण योजना राशीच्या १५९२३०० कोटी रुपयामधून ६४६६६७ कोटी रुपयाची वित्त पूर्ती कर्ज होऊन गेली होती. ही राशी एकूण योजना व्ययाच्या जवळपास ६० प्रतिशत होती.

११) **अकरावी पंचवार्षिक योजना** : या योजनेत सार्वजनिक ऋण व इतर देयतांमध्ये ५०२५३७२ कोटी रुपये सकल देयतांचा भाग आहे जो एकूण योजना व्ययाच्या ५५ प्रतिशत आहे. म्हणजेच अकराव्या योजनेमध्ये वित्त पुरवठासाठी सार्वजनिक ऋणावर विशेष लक्ष देण्यात आले आहे.

१२) **बारावी पंचवार्षिक योजना** : या योजनेमध्ये सार्वजनिक ऋण एकूण योजना व्ययाच्या १०१ लाख कोटी धेण्याचे प्रास्तावित केले गेले होते. वर्ष २०१३-१४ मध्ये ५५.८६ लाख कोटी रुपये आंतरीक ऋणापासून प्राप्त केले गेले जे जी.डी.पी. च्या ४६.२ होते. वर्ष २०१४-१५ मध्ये ६२.२२ लाख कोटी रुपये आंतरीक ऋणापासून धेण्यात आले.

**भारतात सार्वजनिक आणि अन्य देयता**

| वर्ष | आन्तरिक कर्ज | बाह्य कर्ज | एकूण कर्ज | अन्य देयता | एकूण देयता |
|---|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | २,०२२ | ३२ | २,०५४ | ५११ | २,५६५ |
| १९६०-६१ | ३,९७५ | ७८२ | ४,७५७ | १,८०८ | ६,५६५ |
| १९७०-७१ | ७,६६३ | ५४०५ | १४,०६८ | ५७९६ | १९,८६४ |
| १९८०-८१ | ३०,८६४ | ११,२९८ | ४२,१६२ | १७,५८७ | ५९,७५९ |
| १९९०-९१ | १,५५,२०४ | ३१,५२५ | १,८५,५२९ | १,२९,०२९ | ३,१४,५०५८ |
| २०००-०१ | ८,०३,६९८ | ६५,९४५ | ८,६९,६४३ | २,९८,८९८ | ११,६८,५४१ |
| २००५-०६ | १४,०६,५२५ | ६३,२१५ | १४,६९,७४० | ७,६२,१४६ | २२,३१,८८६ |
| २००८-०९ | २०,१४,४५१ | १,२१,६३४ | २१,३६,०८५ | ९,९९,९९० | ३१,३६,०७५ |
| २०१२-१३ | ३७,४३,६५८ | १,७८,०९८ | ३९,२१,७५६ | ११,०३,६१६ | ५०,२५,३७२ |
| २०१४-१५ | ४७,७१,६०२ | १,८८,४६३ | ४९,६०,०६५ | १२,६२,५६२ | ६२,२२,६५७ |
| २०१५-१६ | ५९,६३,७८३ | ८,५४,५९५ | ६८,१८,३७८ | १७,२५,२१३ | ८५,४३,५९१ |

भारताला १९९०-९६ पर्यंत ८३७२६ कोटी रुपये विदेशी मदत प्राप्त झालेले असून त्यापैकी ५४०५६ कोटी रुपये आपल्या योजनांवर सरकारने वापरले. या विदेशी मदतीचा माध्यमाने विद्युत प्रकल्प रेल्वे, औद्योगिक विकास व कृषीचा विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला.

**विदेशी मदत** : भारताला मिळणाऱ्या परदेशी आर्थिक मदतीचे ढोबळ मानाने तीन प्रकार पाडता येतील. (१) कर्जे (२) अनुदाने व (३) पी.एल. ४८०/६६५ अंतर्गत मिळणारी मदत. या तीन प्रकाराने भारताला निरनिराळ्या वर्षी किती रक्कम मंजूर झाली व त्यापैकी किती रकमेचा वापर झाला हे पुढील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**भारताला मिळालेली विदेशी मदत (कोटी रु.)**

| | कर्ज | | अनुदाने | | पी.एल. ४८०/६६५ | | एकूण मदत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कालखंड | मंजुर | वापर | मंजुर | वापर | मंजुर | वापर | मंजुर | वापर |
| १ ते ४ थ्या योजनांच्या | ६,६५५ | ८,५७३ | ७५३ | ७१३ | २,६३८ | २,६३८ | १३,०५६ | ११,६२२ |
| अंतर्गत योजना | ७,६१३ | ५,६२० | १,७६५ | १,१५७ | १३६ | १८२ | ६,८४४ | ७,२५६ |
| | १,२६५ | १,०४६ | ५६४ | ३०५ | – | – | १,८५६ | १,३५४ |
| १९७९-८० | १४,८४३ | ६,१२३ | १,५६४ | १,७८० | – | – | १६,४०७ | १०,६०३ |
| १९८५-८६ | ५,०८६ | २,४६५ | ३१३ | ४४३ | – | – | ५,३९९ | २,६३८ |
| १९८६-८७ | ५,३७४ | ३,१७६ | ४३० | ४२० | – | – | ५,८०४ | ३,५६६ |
| १९८७-८८ | ७,९९४ | ४,५७५ | १,०६२ | ४५७ | – | – | ९,०५६ | ५,०३२ |
| १९८८-८९ | १२,९८६ | ४,७३८ | २१४ | ५५३ | – | – | १३,२०० | ५,२९१ |
| १९८९-९० | ८,२८८ | ५,१३८ | ८१६ | ६२४ | – | – | ९,१०४ | ५,७६२ |
| **एकूण** | **७३,४४४** | **४४,७८७** | **७,५११** | **६,४५२** | **२,७७४** | **२,८२०** | **८३,७२६** | **५४,०५६** |

वरील तक्त्यावरून असे आढळते की, एकूण कर्जाची रक्कम ७३,४४४ कोटी रुपये असली तरी, या मंजूर रकमेपैकी फक्त ४४,७८७ कोटी रुपये कर्जाचा वापर सरकारने सन १९५१ ते १९९० या कालखंडात केलेली आहे. परदेशी कर्जे, परदेशी विदेशी सरकारे किंवा आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांकडून मिळविली जातात तेव्हा अशा कर्जावर व्याज देऊन त्याची मुद्दलासह कर्जफेड करण्याची जबाबदारी भारत सरकार वर पडते. त्यामुळे ह्या घेतलेल्या कर्जाचा वापर सरकारने अतिशय कार्यक्षमतेने व उत्पादक स्वरूपाच्या प्रकल्पासाठी करावयास हवा; की ज्यामुळे देशाच्या उत्पादनात भर पडून नव्या उत्पन्नातून कर्जफेड करणे सोपे जावे. परंतु जर सरकारने कर्जाचा वापर अनावश्यकअनुत्पादक कार्यासठी केला (उपभोगावर) किंवा वापर अकार्यक्षमतेने केला तर अशा कर्जाची परतफेड करणे अवघड जाते. अविकसित देशातील अनेक सरकारांनी कर्जाचा उत्पादक कार्यासाठी वापर न केल्यामुळे त्यांच्यासमोर आज कर्जफेडीची समस्या उभी आहे.

परदेशी सरकारे जेव्हा कर्ज देतात, तेव्हा त्याचे दोन प्रकार असतात –

**अटींसह कर्ज** : जेव्हा कर्ज काही अटी घालून दिले जाते तेव्हा त्यास ''अटींसह कर्ज'' (Tied Loan) असे म्हटले जाते. उदा. कर्जाचा वापर त्यांच्या देशातील वस्तू खरेदी करण्यासाठीच करावा किंवा ज्या प्रकल्पासाठी हे कर्ज दिले आहे, त्याखेरीज इतरत्र या कर्जाचा उपयोग करता येणार नाही किंवा अमेरिकेसारखी काही सरकारे 'जागतिक राजकारणात भारताने अमेरिकेची साथ द्यावी', अशीही अप्रत्यक्ष अट लादतात. भारताला मिळालेल्या एकूण कर्जापैकी साधारण ३३ प्रतिशत कर्ज हे ''अटींसह कर्ज'' या स्वरूपात मिळाले.

**बिना अटीचे कर्ज** : कर्जाचा वापर कसा करावा यासंबंधी कर्ज घेणाऱ्या देशाला संपूर्ण स्वातंत्र्य असते किंवा जे कर्ज कोणीही अट न लादता दिले जाते अशा स्वरूपाच्या कर्जास बिना अटी कर्ज (Un-Tied Loan) असे म्हटले जाते. भारताला मिळालेली ६६ प्रतिशत कर्जे या स्वरूपाची होती.

**निष्कर्ष** : भारता सारख्या देशात श्रमबाहूल्य आहे परंतू भांडवल कमी आहे. म्हणून कमी भांडवलाची गुंतवणूक करून आणि श्रम प्रदान तंत्राचा अवलंब करून अधीकाधीक उत्पन्न प्राप्त केले जाऊ शकते. भारतात योजना काळात विविध क्षेत्रावर भांडवल गुंतविले गेले. परंतू त्यामानाने त्या योजने पासून मिळणारे प्रतिफल पुरेशे मिळाले नाही. भारतात पंचवार्षिक योजनेला वित्त पुरवठा करण्यात आंतरीक ऋण ज्यात बाजार कर्ज, अल्पबचती, सार्वजनिक ऋण ज्यात बाजार कर्ज; अल्पबचती, सार्वजनिक उपक्रम

संम्मेलित असून यांचे मोठा योगदान आहे. त्याचप्रमाणे बाह्य ऋणात म्हणजे विदेशी कर्जाच्या संपूर्ण योजनांवर वित्त पुरवठा करण्यात महत्त्वाचे स्थान आहे. आजपर्यंत योजनांअंतर्गत एकूण ४६१.६४ अरब डालर एवढे विदेशी कर्ज धेतले गेलेले आहे. ज्याचा ऋण शोधन अनुपात ५.६ आहे. अशाप्रकारे या दोन्ही साधनामुळे आपल्या योजना कार्यान्वित करतांना सरकारला आधार मिळाला आहे.

विदेशातून कर्ज प्राप्त करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, जसे- विभिन्न मुद्रा, विनिमय प्रतिबंध व नियम, व्याजदरातील भिन्नता अधिकोषण सोयीची भिन्नता इत्यादी. धनको देश कर्ज देण्यापूर्वी ऋणको देशाची राजनैतिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करतो. प्रतिकूल परिस्थितीत बाह्य कर्ज प्राप्त करणे फार कठीण असते. ऋणको देशाच्या आर्थिक धोरणाचा सुद्धा कर्ज प्राप्त करण्याच्या क्षमतेवर प्रभाव पडत असतो.

**सुचना :** १) सरकारने श्रम प्रदान तंत्राचा अवलंब करून कमीत कमी भांडवलाचा वापर करून अधिकाधिक उत्पादन काढण्याचे तंत्र विकसीत करावे. २) विदेशी कर्जावर जास्त अवलंबून न राहता देशाअंतर्गत बचतीला प्रोत्साहन द्यावेत. ३) सरकारने आयव्ययाची स्थिती व शासनाच्या कर्ज फेडीची क्षमता लक्षात धेऊनच विदेशी कर्ज द्यावे. ४) धेतलेल्या कर्जाचा उपयोग उत्पादक, किंवा आर्थिक विकासाकरिताच केला जावा. ५) देशात राजकीय मौद्रीक स्थिरता कायम करण्याचे प्रयत्न करावेत. ६) विविध योजना त्याच्या विशिष्ठ कालावधीतच पूर्ण करण्याच्या प्रयत्न करावा. ७) औद्योगीकरणा सोबतच कृषी व्यवसायाचा विकास करण्याची गरज आहे. त्यामुळे प्रादेशिक विषमता दूर होईल.

*संदर्भ :*


१. *भारतीय अर्थशास्त्र, डॉ. डायगव्हाने, डॉ. खापेकर, डॉ. कावडकर - साई ज्योती प्रकाशन, नागपूर.*
२. *मौद्रीक अर्थशास्त्र, डॉ. आकाश बेले, साई ज्योती प्रकाशन, नागपूर.*
३. *मौद्रीक अर्थशास्त्र, डॉ. देहलीवाल, विश्व प्रकाशन, नागपूर.*
४. *सामाजिक संशोधन पद्धती, डॉ. सुधीर बोधनकर, डॉ. विवेक अलोणी, साईनाथ प्रकाशन, नागपूर.*
५. *वर्तमान पत्रातील लेख.*

# जोतीराव फुले यांचे शेती आणि शेतकरी याबाबतचे विचार

*प्रा. डॉ. सरोज आगलावे, सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर*

जोतीराव फुले यांनी भारतीय समाजाचे अतिशय वस्तुनिष्ठ अवलोकन केले होते. भारतीय समाजात ज्या महत्वाच्या समस्या त्यांना आढळून आल्या, त्या समस्यांच्या संदर्भात त्यांनी अतिशय मुलगामी सवरूपाचे विचार मांडले आणि त्या समस्या नष्ट करण्याबाबत त्यांनी सामाजिक आंदोलने देखील उभारली. वर्ण आणि जातीव्यवस्था, शुद्रातिशुद्र, स्त्रीदास्य, शिक्षण, शेतकरी इत्यादी विषयांवरील महत्वाच्या समस्या त्यांनी स्पष्टपणे समाजासमोर मांडल्या होत्या. विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे फुले यांच्या समकालीन असलेल्या समाजसुधारक आणि विचारवंतांनी मात्र या सर्व मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष केले होते.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. बहुसंख्य लोक खेड्यात राहतात. शेती हा देशातील बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. या देशातील श्रम करणारा, शेती पिकविणारा शेतकरी वर्ग सतत उपेक्षित राहिला. जोतीराव फुले हे शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे पहिले विचारवंत आणि सुधारक होत. मुंबईत भायखळा येथे 'शेतकऱ्यांची स्थिती' या विषयांवर १० डिसेंबर १८८२ ला फुले यांनी एक व्याख्यान दिले होते. १८८३ मध्ये 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या विदारक परिस्थितीचे सविस्तर विवेचन केले, तसेच शेतकऱ्यांच्या परिस्थितीची मूलगामी मीमांसा केली.

जोतीराव फुले या देशातील शेतकरी चळवळीचे मूळ प्रवर्तक आहेत. १८७५ मध्ये पुणे परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांकडे जाऊ नयेत म्हणून त्यांनी शेतकऱ्यांची चळवळ उभारली होती. जुन्नर येथील शेतकरी कुळांवर ब्राम्हण सावकारांनी आणि जमिनदारांनी खूप जुलूम केला होता. म्हणून १८७५ मध्ये फुले यांच्या सत्यशोधक समाजाने शेतकऱ्यांना भट, सावकार व खोत यांच्यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार शेतकऱ्यांनी सावकारांच्या जमिनीवर बहिष्कार टाकला होता. चार-पाच हजार शेतकऱ्यांच्या अडचणी सरकारपुढे मांडल्या. शेतकऱ्यांचे हे आंदोलन दोन वर्षे चालू राहिल्यानंतर सरकारी अधिकारी, सावकार, जमीनदार आणि फुले यांच्यात चर्चा झाली. जमिनीच्या लागवडीचा कमी दर करण्यात आला. नंतर सरकारने 'डेक्कन ॲग्रीकल्चरल रिलीफ ॲक्ट' पास केला. तसेच सरकारने शेतकऱ्याला संरक्षण देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर शेतकऱ्यांनी आपले आंदोलन मागे घेतले. फुले यांच्या नेतृत्वाखाली झालेले शेतकऱ्यांचे हे आंदोलन देशातील पहिले शेतकरी आंदोलन होय.

२ मार्च १८८८ ला राजपुत्र ड्यूक ऑफ कॅनॉट यांचा पुणे येथे सत्कार घेण्यात आला होता. या सत्कार समारंभात फुले हे शेतकऱ्यांच्या वेशात गेले. त्यावेळी त्यांनी आपल्या भाषणातून राजपुत्राला सांगितले की, "सुवर्णालंकारांनी मढलेले नि, उंची वस्त्रे परिधान केलेले श्रीमंत हे या देशातील जनतेचे खरे प्रतिनिधी नाहीत. देशातील लोक जे शेतकरी, त्यांचे हे प्रतिनिधी नाहीत."[१] पुढे फुले म्हणतात की, "खरा हिंदूस्थान हा खेड्यात दिसतो. खेड्यातील लोक निर्धन, भुकेकंगाल, बेघर असतात आणि अनवाणी चालतात. बहुसंख्य ग्रामीण जनतेला पुरेसे कपडे मिळत नाहीत आणि त्यांचा पेहेराव माझ्यासारखाच पण विटलेला असतो, जर राजपुत्राला खरा हिंदुस्थान पहायचा असेल आणि राणीला खरा वृत्तांत निवेदन करायचा असेल, तर त्यांनी आजूबाजूच्या काही खेड्यांना भेटी द्याव्यात आणि अज्ञानी जनतेचे दारूण दारिद्र्य प्रत्यक्ष पहावे. त्यांनी महार-मांगांच्या काही वस्त्यांनाही भेटी द्याव्यात आणि त्या वस्त्या उकीरड्यापेक्षा वाईट असून मनुष्यवस्तीला अयोग्य आहेत की नाही, याविषयी खात्री करून घ्यावी."[२]

**शेतकऱ्यांचे सामाजिक जीवन :-** शेतकऱ्यांच्या सामाजिक, धार्मिक व आर्थिक परिस्थितीचे फुले यांनी विस्तृत विश्लेषण केले. 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाच्या उपोद्घातामध्ये फुले यांनी स्पष्टपणे नमूद केले की, 'जगातील सर्व देशांचा इतिहास लक्षात घेतला तर भारतातील अज्ञानी व देवभोळ्या शुद्र शेतकऱ्यांची अवस्था ही इतर देशांतील शेतकऱ्यांपेक्षाही अतिशय निकृष्ट असून पशूपेक्षाही वाईट आहे.'[३] भारतातील शेतकऱ्यांच्या संदर्भात त्यांनी तीन प्रमुख गोष्टींचा उल्लेख केला आहे. पहिली गोष्ट येथील शेतकरी अज्ञानी आहेत. दुसरी गोष्ट त्यांच्यावर धर्माचा विशेष प्रभाव असल्यामुळे ते देवभोळे आहेत. आणि तिसरी गोष्ट म्हणजे शेतकरी हे शुद्र आहेत. अज्ञान, देवभोळेपणा आणि शुद्र जात या तीन गोष्टी भारतीय शेतकऱ्यांची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

फुले यांनी स्पष्ट केले की, 'भारतीय शेतकऱ्यांमध्ये प्रामुख्याने शूद्र शेतकरी किंवा कुणबी, माळी आणि

धनगर असे तीन भेद आहेत. मूळचे जे लोक फक्त शेतीवर आपला निर्वाह करू लागले ते कुळवाडी किंवा कुणबी, जे लोक आपले शेतीचे काम सांभाळून बागायती करू लागले ते माळी आणि जे ही दोन्हीही करून मेंढरे, बकरी वगैरेचे कळप बाळगू लागले ते धनगर, असे निरनिराळ्या कामावरून प्रथम हे भेद निर्माण झाले असावेत. परंतु आता या तीन पृथक जातीच मानतात. यांचा सांप्रत आपसांत फक्त बेटीव्यवहार होत नाही. बाकी अन्नव्यवहारादी सर्व काही होते.'[४] यावरून फुले यांनी कुणबी, माळी आणि धनगर हे पूर्वी एकाच शुद्र जातीचे असावेत असा निष्कर्ष काढला.

भट ब्राम्हण अज्ञानी शेतकऱ्यांची धर्माच्या नावावर फसवणूक करतात. अशाप्रकारची फसवणूक जगात कुठेही होत नाही, असे फुले यांचे मत होते. पुढे फुले म्हणतात की, 'पूर्वीच्या धूर्त आर्य ब्राम्हण ग्रंथकारांनी आपले मतलबी धर्माचे लचांड शेतकऱ्यांच्या मागे इतके सफाईने लावले आहे की, शेतकरी जन्मास येण्याच्या पूर्वीच त्याच्या आईस तिच्या गर्भाधानादी संस्कारापासून तर हा मरेपर्यंत कित्येक गोष्टींनी लुटला जातो. इतकेच नव्हे तर हा मेला तरी त्याच्या मुलांस श्राद्ध वगैरेच्या मिशाने धर्माचे ओझे सोसावे लागते.'[५]

'शेतकऱ्यांचा जन्म होण्यापूर्वीच त्यांच्या शोषणास सुरूवात व्हायची. मुलाच्या लग्नाच्या प्रसंगी, लग्नसमारंभात, घर बांधताना आणि मृत्यूच्या वेळीही भट-ब्राम्हण शेतकऱ्याला फसविण्यासाठी तयारच असायचे. त्याचप्रमाणे चैत्रातील वर्षप्रतिपदा, रामनवमी, हनुमान जयंती, ऋषिपंचमी, अनंतचतुर्दशी, नागपंचमी, श्रावणी पोर्णिमा, श्रावणातले सोमवार, हरितालिका, विजयादशमी, अमावस्येची लक्ष्मीपूजा, बलिप्रतिपदा, तुळशीचे लग्न, मकरसंक्रांत, महाशिवरात्री, होळी इत्यादी सण हे शेतकऱ्यांना लुबाडण्यासाठीच होते. इतके करूनही शेतकऱ्यांची मस्ती जिरलीच नाही, तर तिर्थयात्रा, आणि जत्रा होत्याच. त्याशिवाय चंद्रग्रहण, सूर्यग्रहण होतेच.

शेतकरी हे आजपर्यंत अज्ञानात राहून ब्राम्हणांकडून कसे लुटले जातात? या शंकेचे उत्तर देतांना फुले स्पष्ट करतात की, 'आर्य भट ब्राम्हणांचा या देशांत अंमल चालू होताच. त्यांनी आपल्या हस्तगत झालेल्या शुद्र शेतकऱ्यास विद्या देण्याची अटोकाट बंदी करून, त्यास हजारो वर्षे मन मानेल तसा त्रास देऊन लूटून खाल्ले, याविषयी त्यांच्या मनुसंहितेसारख्या मतलबी ग्रंथात लेख सापडतात.'[६] असा इतिहास फुले यांनी मांडला.

पुढे फुले इंग्रज सरकारवर टिका करतात की, 'या वहिवाटा आमचे भेकड इंग्रज सरकार जशाच्या तशाच आज दिवसपावेतो चालू ठेवून त्याप्रित्यर्थ कष्टाळू शुद्रादि अतिशुद्र शेतकऱ्याचे निढळाचे घामाचे पट्टीचे द्रव्यांतून हजारो साल दर साल खर्ची घातले.'[७] शूद्र आणि अतिशुद्र शेतकऱ्यांनी कष्ट करून मिळविलेल्या पैशांतून कर वसूल करतात आणि या पैशांचा उपयोग शेतकऱ्यांच्या कल्याणाकरिता न करता ब्राम्हणांच्या जुन्या चालीरीतीसाठी खर्च करतात, असे अतिशय परखड विचार फुले यांनी मांडले. या वहिवाटी शुद्र शेतकऱ्यांच्या पिळवणूकीस जबाबदार आहेत. परंतू या वहिवाटी इंग्रज सरकारने बंद केल्या नाहीत, कारण येथील लोकांचा रोष ओढवला जाईल, असे त्यांना वाटत होते.

फुले यांनी स्पष्ट केले की, 'आर्य पेशव्यांच्या राज्यात शेतकऱ्यांचे अतिशय हाल करण्यात आले होते, जर शेतसारा देण्यास शेतकऱ्यास उशीर झाल्यास त्याचा अमानवी पद्धतीने छळ केला जायचा. पेशव्यानंतर इंग्रजांची सत्ता आली. नवी राजवट येऊन देखील शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा झाली नाही. कारण शेतकरी हे अज्ञानी होते. इंग्रजांसोबत काम करणारे भट-ब्राम्हण कामगार यांना शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी असे कधीच वाटले नाही. जर शेतकरी शिकले तर आपली गुलामी कोण करेल, आपणास समाजात मान-सन्मान कोण देईल आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांची फसवणूक करता येणार नाही. म्हणून भटब्राम्हण अधिकाऱ्यांनी इंग्रज सरकारला शेतकऱ्याची खरी परिस्थिती सांगितली नाही. कधी इंग्रजांनी शुद्र, अतिशुद्र शेतकऱ्यांच्या सुधारणेचा विचार मांडला तर त्यास हे भटब्राम्हण कामगार विरोध करीत.'[८]

**शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची आणि शोषणाची कारणे** :- शेतकऱ्यांची लुबाडणूक कशी होते, त्यांचे कसे शोषण होते, त्यामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती किती विदारक बनली आहे, यासंबंधीचे वर्णन फुले यांनी केले. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची आणि शोषणाची कारणे कोणती आहेत याचा देखील त्यांनी शोध घेतला. त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाची पुढील प्रमुख कारणे नमुद केली आहेत.

**१. धर्मश्रद्धा आणि धर्मभोळेपणा** :- शेतकऱ्यांची परिस्थिती वाईट असण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांची खुळी धर्मश्रद्धा आणि धर्मभोळेपणा होय. शेतकऱ्यावंर हिंदू धर्माचा विशेष प्रभाव आहे. शेतकऱ्यांमध्ये खोट्या धर्मश्रद्धा निर्माण करून भटब्राम्हण हे धर्माच्या नावावर त्यांना अक्षरशः लुबाडतात याबाबतचे सविस्तर वर्णन

त्यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी धर्मभोळे राहून धर्मासंबंधीच्या सर्व गोष्टी निमूटपणे कराव्या असे येथील भटब्राम्हणांना वाटत होते. स्वार्थामुळेच त्यांनी शेतकऱ्यांना खरा धर्म कधी शिकविला नाही. उलट विविध 'धार्मिक गोष्टी' करण्यास सांगून त्यांची लुबाडणूक केली. म्हणून फुले यांच्या मते, देवभोळेपणा, देवधर्माबद्दलची अंधश्रद्धा हे शेतकऱ्यांच्या शोषणाचे आणि त्यांच्या दारिद्र्याचे खरे कारण आहे.

**२. भटब्राम्हण कामगार** :- शेतकऱ्यांचे शोषण करणारा दुसरा वर्ग म्हणजे भटब्राम्हण कामगार वर्ग होय. इंग्रज सरकारमध्ये विविध खात्यांत भटब्राम्हण लोकांचेच प्राबल्य होते. या लोकांवर त्यांची श्रद्धा होती. परंतु भटब्राम्हण कामगारांनी आपल्या शेतकरी बांधवांच्या कल्याणाचा कधीच विचार केला नाही. शेतकऱ्यांना अज्ञानात ठेवून भटब्राम्हण कामगारांनी त्यांचे सतत शोषण केले असल्याचे फुले यांनी स्पष्ट केले आहे.

**३. सावकार** :- सावकार शेतकऱ्यांच्या गरिबीचा फायदा घेऊन त्यांना लुटतात. अवाजवी दराने शेतकऱ्याला कर्ज द्यायचे. बिचारा शेतकरी आपले कर्ज फेडत असतो. परंतु सावकार कर्जाच्या रक्कमेमध्ये फेरफार करतो. कोऱ्या कागदावर अज्ञानी शेतकऱ्याचा अंगठा घेतो. त्यामुळे सावकाराचे कर्ज शेतकऱ्याने व्याजासकट दिल्यानंतर देखील कर्जाची रक्कम शिल्लक राहते. अनेकदा शेतकऱ्यावर जप्तीचे वॉरंट आणून त्याची शेती जप्त केली जाते. परिणामतः शेतकरी भूमीहिन होतो. एकदा शेतकऱ्याने कर्ज घेतले की, त्याचे कर्ज कधीच फिटत नाही. तो आयुष्यभर कर्जाच्या ओझ्याखाली राहतो. याविषयीचे फुले यांनी सविस्तर विवेचन केले आहे.

**४. कर, लोकलफंड, इत्यादी** :- शेतकऱ्याची वाईट अवस्था असण्याचे आणखी एक कारण म्हणजे सरकारने लावलेले विविध कर हे होय. शेतकरी रात्रंदिवस शेतात राबतो. धान्य पिकवतो. परंतु सरकार शेतकऱ्यावर अनेक कर लावून त्याला कराच्या ओझ्याखाली दाबून टाकतो. दरवर्षी शेतकऱ्याला सरकारला शेतसारा द्यावा लागतो. त्याचप्रमाणे लोकलफंड हा एक नवीन कर सुरू करण्यात आला होता. शेतकऱ्यांनी विकण्यासाठी आणलेल्या भाजीपाला, अन्नधान्य आणि इतर शेतीमालावर हा कर लावला होता. कधी कधी कर देण्यासाठी शेतकऱ्याला सावकारांकडून कर्ज घ्यावे लागते. अवाजवी कर, लोकलफंड यामुळे आधीच गरीब असलेला शेतकरी कराच्या ओझ्याने दबून जातो.[६]

**५. अज्ञान** :- शेतकरी वर्षानुवर्षे अज्ञानामध्ये राहिला. त्याला शिक्षण घेण्याची बंदी होती. त्यामुळे त्याचा विकास होऊ शकला नाही. त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊनच भटब्राम्हण, सावकार हे सर्व त्याचे शोषण करतात. 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाच्या उपोद्घाताची सुरूवात करताना अविद्येने कोणकोणते अनर्थ केले हे त्यांनी नमूद केले आहे.

**६. इतर कारणे** :- अलिकडे शेतीवर लोकांचा फार भार पडला आहे. ब्रिटिश राज्य येण्यापूर्वी राजे लोकांनी व संस्थानिकांनी आपल्याजवळ मोठी सैन्ये ठेवली होती. त्यात मोठ्या संख्येने लोक नोकरी करीत होते. त्यामुळे शेतीवर मोठा भार पडत नसे. परंतु ब्रिटिशांच्या राजवटीत सैन्यांची संख्या खूप कमी झाली. सैन्यातील लोक घरी आल्यामुळे शेती जमिनीवर त्यांचा भार पडला. पूर्वी लोकसंख्या कमी होती. आता लोकसंख्या वाढली आहे, परंतु जमीन तेवढीच आहे. कुटुंबातील वाटपामुळे जमिनीचे लहान-लहान तुकडे पडले. तुकडे पडलेल्या शेतजमिनीच्या उत्पन्नावर आपल्या कुटंबाची आणि गुराढोरांची गुजराण करणे कठीण झाले.

अशाप्रकारे जोतीराव फुले यांनी शेतकऱ्यांच्या वाईट परिस्थिती, दारिद्र्य आणि शोषणाच्या कारणांचा शोध घेवून ती कारणे स्पष्टपणे नमूद केली आहेत.

**शेतकरी आणि शेती विकासाबाबत उपाययोजना** :- जोतीराव फुले यांनी शेतकऱ्यांच्या विदारक परिस्थितीच्या कारणाचां शोध घेऊ त्यांसंबंधी अनेक महत्वाच्या उपायोजना सुचविल्या. फुले यांनी सुचविलेल्या उपाययोजना या दोन प्रकारच्या आहेत.

**शेतकऱ्यांची सुधारणा करण्याबाबत उपाय**[१०]

**१. शेतकऱ्यांना नीतिमान बनविणे** :- शेतकऱ्यांनी एकापेक्षा जास्त लग्ने करू नये, मुलामुलींची लहान वयात लग्न करू नये म्हणून त्यासंबंधात सरकारने कायदा करावा. असा कायदा केल्याशिवाय त्यांची संतती चांगली निपजणार नाही.

**२. ब्राम्हणांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या द्याव्या** :- जोपर्यंत शूद्र शेतकऱ्यांची मुले सरकारी अधिकाराच्या जागा चालविण्यास समर्थ होत नाहीत, तोपर्यंत ब्राम्हणांस त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणपेक्षा जास्त जागा देऊ नयेत. सरकारी नोकऱ्यांत ब्राम्हणांची संख्या जास्त राहिलयास, हे लोक शुद्र शेतकऱ्यांना शिक्षण मिळू देणार नाही आणि त्यांच्या विकासाचे सर्व मार्ग बंद करतील.

**३. शिक्षणाचा प्रसार** :- शूद्र शेतकऱ्यांच्या शोषणाचे मूळ कारण हे त्यांच्या अज्ञानात आहे ही गोष्ट लक्षात घेऊन इंग्रज सरकारने शेतकऱ्यांना शिक्षण दिले पाहिजे,

असे फुले यांना मनापासून वाटत होते. अज्ञानी शेतकऱ्यांना धर्माच्या नावावर लुबाडले जाते. म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देणे अतिशय आवश्यक असल्याचे फुले स्पष्ट करतात. शूद्र शेतकऱ्यांच्या मुलांस विद्वान करण्यासाठी त्यांच्या जातीतील स्वतः पाभरी, कोळपी व नांगर हाकून दाखविणारे शिक्षण तयार करावेत. असे शिक्षक असलेल्या शाळेतच शेतकऱ्यांनी आपल्या मुलांना शिकवण्यासाठी पाठविण्याचा कायदा करावा. शेतकऱ्यांच्या मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून सुरूवातीला काही वर्षे त्यांच्या परीक्षेतील अभ्यासक्रम सोपा करावा.

**४. शेतकऱ्यांच्या मुलांना सरकारी नोकऱ्या द्याव्या** :- जसजसे शेतकऱ्यांची मुले सरकारी षाळेत शिकून विद्वान होतील तसतसे त्यांना मामलेदार वगैरे सरकारी कार्यालयांत लहानमोठ्या नोकऱ्या द्याव्यात. तसेच इतर विविध खात्यांत त्यांची भरती करावी. शेतकऱ्यांची मुले सरकारी नोकऱ्यांत आल्यामुळे शेतकऱ्यांचे पूर्वीसारखे शोषण होणार नाही. सरकारला शेतकऱ्यांविषयीची खोटी माहिती मिळणार नाही. भटब्राम्हण कामगार शेतकऱ्यांचे शोषण करीत आहेत त्या शोषणास फार मोठा प्रतिबंध लागेल. म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांना सरकारी नोकऱ्या द्याव्या असा उपाय फुले यांनी सुचविला होता.

**५. व्यापारांच्या व्यवहारावर नियंत्रण** :- गुजर, मारवाडी इत्यादी व्यापारी भेसळीच्या वस्तू शेतकऱ्यांना विकतात, तसेच खोटे मापे वजन वापरतात, त्यामुळे गरीब अज्ञानी शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. म्हणून सरकारने व्यापारांच्या भेसळीवर नियंत्रण ठेवावे. शेतकरी आणि सावकार ह्यांच्यातील व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने कायदा केला, त्या कायद्याप्रमाणेच व्यापाऱ्यांच्या भेसळीवर आणि खोट्या मापावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा करावा.

**शेती सुधारणांबाबत उपाययोजना** :- जोतीराव फुले यांनी शेतकऱ्यांमध्ये कशा सुधारणा घडवून आणता येईल याबाबतच्या उपाययोजना सांगितल्या, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष शेतीत सुधारणा करण्याबाबत त्यांनी अतिशय महत्वाच्या उपाययोजना सुचविल्या आहेत.

**१. शेतकऱ्यांना कृषिज्ञान द्यावे** :- शेतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारने सर्व शेतकऱ्यांस युरोपियन शेतकऱ्यांसारखे कृषीज्ञान द्यावे म्हणजे ते चांगल्या प्रकारची शेती करू शकतील.

**२. गोमांस खाण्याची बंदी** :- भारतीय शेतकऱ्यांना यंत्राच्या सहाय्याने शेती करण्याचे कौशल्य प्राप्त होत नाही तोपर्यंत गायी-बैलांची शेतकऱ्यांना आवश्यकता आहे. म्हणून गायी-बैलांसह त्यांची वासरे कापून खाण्यावर बंदी आणावी. गोरे इंग्रज आणि मुसलमान यांनी शेळ्या बकऱ्या मारून खाव्या. परदेशातून गायांची आयात करून गोमांस खावे. परंतु देशातील गायी-बैलांचे मांस खाऊ नये. म्हणून सरकारने तसा कायदा करावा. असा कायदा केल्याने शेतकऱ्यांजवळ बैलपुरवठा होऊन त्यांना आपल्या शेताची मशागत चांगली करता येईल, शेणखत भरपूर होईल. त्या शेणखताचा शेतीसाठी उपयोग होऊन शेतजमिनीची सुपिकता वाढेल.

**३. तळी, तलाव, बंधारे बांधणे** :- दरवर्षी डोंगर पर्वतावरील गवतझाडांच्या पान-फुलांचे व मेलेल्या कीटक श्वापदांचे, मांसहाडाचे कुजलेले सत्व वळवाच्या पावसाने धूपून पुराबरोबर वाहून जाते. म्हणून सरकारला अशी सूचना करतात की, लष्करात पोलीस खात्यात बरेच निरूद्योगी शिपाई आहेत. त्यांना कोणतेही काम नाही. म्हणून सरकारने जागोजागी तालीवजा बंधारे या शिपायांकडून बांधून घ्यावे. वळवाचे पाणी हे शेतात मुरून नंतर नदीनाल्यास जाईल अशाप्रकारे हे बंधारे बांधावे. त्यामुळे शेतीची सुपीकता वाढेल.

**४. शेतीची पाहणी करून पाण्याचा शोध घ्यावा** :- सरकारने एकंदर सर्व शेतीची पाहणी करावी. पाणवठ्यांकडून पाहणी करून ज्या ठिकाणी भरपूर पाणी आहे त्या जागांच्या खुणा त्या त्या गावाच्या नकाशामध्ये नमूद कराव्या. जे शेतकरी सरकारच्या मदतीशिवाय विहिर खोदून, बांधून घेतील त्यांना बक्षिसे देण्यास सुरूवात करावी. नदी, नाले व तळीतलावात साचलेला गाळ शेतकऱ्यांना फुकट नेऊ द्यावा.

**५. गावराने गावास परत करावी** :- ज्या ज्या गावाची गावराने जंगल खात्यात सामील केली असतील ती सर्व त्या त्या गावास परत करावी.

**६. उत्तम शेळीमेंढरांचे उत्पादन** :- इतर देशांतील विविध प्रकारच्या चांगल्या शेळ्यामेंढ्यांची बेणी आयात करून येथे त्यांची पैदास वाढवावी. त्यामुळे शेळ्यामेंढ्यांपासून चांगले खत शेतकऱ्यांना मिळेल. या खतापासून शेतीची सुपिकता वाढेल. तसेच शेतकऱ्यास लोकर मिळेल.

**७. शेतीच्या पिकांचे संरक्षण** :- जंगलातील रानटी जनावरांमुळे शेतीचे खूप नुकसान होते. म्हणून शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांच्या संरक्षणची जबाबदारी पोलीस खात्यावर टाकावी आणि नुकसान भरपाई देण्याचे बंधन असावे.

**८. कृषिप्रदर्शन भरवावी** :- दरवर्षी श्रावण महिन्यात कृषिप्रदर्शने भरवावीत आणि प्रत्येक आश्विन

महिन्यात शेतपिकांच्या व औते हाकण्याच्या परीक्षा घेऊन उत्तम शेतकऱ्यांस दर तीन वर्षांनी पदव्या द्याव्यात.

**६. शेतकऱ्यांच्या मुलांस शेतकी शाळा बघण्यासाठी विदेशास पाठवावे :-** शेतकऱ्यांच्या विद्वान मुलांनी आपली शेती उत्तम प्रकारे करून कामापुरते लोहारी, सुतारीचे ज्ञान मिळवून परीक्षा दिल्यास तयांना सरकारी खर्चाने इंग्लडमधील कृषिशाळा बघण्यासाठी पाठवावे. त्यामुळे येथील शेतकरी आपल्या शेतीत सुधारणा करून सुखी होईल.

शेतीत सुधारणा घडवून आणण्याच्या अतिशय महत्वाच्या सूचना जोतीराव फुले यांनी सरकारला केल्या होत्या. या सुचनांचे अध्ययन केलयानंतर या सुचना शेतीचा विकास करण्याबाबत विशेष उपयुक्त असल्याचे आढळून येते.

जोतीराव फुले यांनी शेतकऱ्यांच्या विदारक परिस्थितीचे विश्लेषण करून शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारल्याशिवाय भारतीय समाजाचा विकास होऊ शकत नाही ही गोष्ट प्रामुख्याने निदर्शनास आणून दिली शेतकऱ्यांची दुर्दशा ही प्रामुख्याने धार्मिक आणि सामाजिक कारणांमुळे झाली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. समाजातील शेतकऱ्यांचे खालचे स्थान, खोट्या धर्मग्रंथाचा प्रभाव, खोट्या धर्मश्रद्धा, देवभोळेपणा, अज्ञान या सामाजिक कारणांमुळे शेतकऱ्यांचे सामाजिक आणि आर्थिक जीवन अतिशय दुःखमय झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांसंबधी मांडलेल्या विचारांवरून समाजाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे हे त्यांच्या सामाजिक विचारांचे एक अतिशय महत्वाचे वैशिष्ट्य असल्याचे स्पष्ट होते.

***संदर्भः-***


१. *धनंजय कीर – महात्मा फुले, पॉप्युलर प्रकाशन, 1996, पृ. 265*
२. *शेतकऱ्यांचा असूड – महात्मा फुले : समग्र वाङमय, 1991 पृ. 254*
३. *तत्रैव, पृ. 265*
४. *तत्रैव, पृ. 253*
५. *तत्रैव, पृ. 257*
६. *तत्रैव, पृ. 265, 266*
७. *तत्रैव, पृ. 267*
८. *शेतकऱ्यांचा असूड – महात्मा फुले : समग्र वाङमय, 1991 पृ. 247*
९. *तत्रैव, पृ. 295*
१०. *तत्रैव, पृ. 319, 320, 321*

ISSN 2278-3199

Published By

DEPARTMENT OF SOCIOLOGY

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE & SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in
Website - www.snmorcollege.org.in
Phone No. - 07183-233300 / 07183-233301 Mobile - 09422113067 / 09420359657
journal website- www.journalsnmcsip.org.in